# गुरुदेव

प्रथम

## शिक्षकोत्तम



१८४१
म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
9330

REFBK-0007263

शरीर मन बुद्धीच्या द्वारे आत्मविकासाची
शिष्यांस सच्छील देणारा जाणता शिक्षकोत्तम

वि. ३/०५
ग्रं.क्र. २०२५८
२७/१०/५८

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २०२५८ वि. ३/०५
क्रमांक ९३३० नों: दि. २.११.०५८

# गुरुदेव

अथवा

# शिक्षकोत्तम

स्थळप्रत.
वि. ..........
नों दि ..........

शिष्टाक्रिया कस्यचिदात्मसंस्था संक्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता ।
यस्योभयं साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ।।

—कालिदास

REFBK-0007263

प्रथमावृत्ति द १९४९

[ सर्वाधिकार लो. प्र. सं. कडे ]

लो. प्र. सं. करितां

प्रकाशक

मुरलीधर मोरेश्वर कुलकर्णी

शिक्षक, नू. म. वि. माध्यमिक शाळा, पुणें २.

मुद्रक

चि. गं. केतकर

लोकसंग्रह मुद्रणालय, ६२४ सदाशिव पुणें २

[ किंमत सव्वातीन रुपये ]

## समर्पण।

कोण तुम्ही? नी काय करितां? केलें कांहीं?
पुढली वार्ता?
तुमचीं ध्येयें? कशास? कोणां? केव्हां? कोठें?
काशिं? विचारणा
कारिती त्या त्या जिज्ञासूंना!
अभ्यासें होवोनी अभिनव
स्फूर्ति नव नव देती त्या त्या
अभ्यासूंना! रसिक जनांना! ज्ञानिजनांना!
गुरुजींविषयीं डोळस आदर आहे ऐशा मान्य सज्जनां!
स्वयंप्रभा दे! त्याच्या चरणां
"शिक्षकोत्तमाची" या
अथवा
"गुरुदेवाची" ही
समर्पणा!

# महामहोपाध्यायांचा आशीर्वाद

'**गुरुदेव** अथवा **शिक्षकोत्तम**' हा कवि मुरलीधर (श्री. मु. मो. कुलकर्णी) यांनीं रचिलेल्या कवितांचा एक संग्रह आहे. या धर्तीचा हाच पहिला ग्रंथ असावा.

गुरुमाहात्म्य या देशांत पराकोटीला गेलेलें आहे. पुढील मार्मिक वचन जुनेंच आहे.

**गुरवो वहवः सन्ति शिष्यवित्तापहारकाः ।**
**गुरवो विरलाः सन्ति शिष्यचित्तापहारकाः ॥**

आतां लोकयुग आहे. सर्वत्र लोकशाळा, लोकशिक्षक, लोकशिक्षण, यांचा गदारोळ ऐकूं येतो. पूर्वीं श्रीसमर्थांसारख्यांनीं गुरुशिष्यांचीं उद्बोधक विवरणें केलेलीं आहेत. आजच्या लोकयुगांत त्या सद्गुरूंचें वर्णन व स्तवन प्रस्तुतच्या पद्यसंग्रहांत मुरलीधरकवींनीं केलेलें आहे. जातिवंत शिक्षकाच्या जिव्हाळ्यानें तें थबथबलेलें आहे. 'गुणकारी शिक्षण' असा विषय घेऊन अनेक वर्षांपूर्वीं ट्रेनिंग कॉलेजांत एक व्याख्यान झालें होतें, त्याची मला आठवण झाली. पण या नव्या युगांत नवशिक्षणाच्या मूलतत्वांची पद्यांत गुंफण झालेली विरळाच आहे; म्हणून हा ग्रंथ अपूर्व म्हटला पाहिजे. हा ग्रंथ पाहून, वाचून आणि नित्य चाळून शिक्षकांचा आत्मविश्वास जागृत राहील, मनाला धीर येईल, योग्य दिशेनें पाउलें पडत जातील, खचलेली उमेद पुनः परत येईल, पालकांना शिक्षकांची खरी योग्यता समजेल आणि ते शिक्षकांचे आणि शिक्षणाचेहि खरे 'पाळक' होतील, मग बाळकांच्या पाळणाची निराळी काळजी नको.

मार्ग. शु. १५ १८७१, पुणें } **दत्तो वामन पोतदार**

**डॉ. गजानन श्री. खैर, एम. ए. (वांबे), ए. एम्. (कोलंबिया), पी एच्. डी. ( न्यूयार्क ) यांचा अभिप्राय.**

अध्यापक, अध्ययन आणि अध्यापनकला व शिक्षण यांना सर्वस्वीं वाहिलेला हा कवितासंग्रह आहे. शिक्षणविषयक ग्रंथांत ही नवीन प्रकारची भर आहे.

शिक्षणाचीं तत्त्वें रूक्ष नसून त्यांच्यांत भावनाहि असूं शकतात, हें लेखकानें सिद्ध केलें आहे. "**मारूं नको रे**" ही कविता प्रेमानें व करुणरसानें परिपूर्ण आहे. कवीला शिक्षकपेशाचा अभिमान आहे व तसा त्याच्या काव्यांत तो पदोपदीं उतरला आहे ("राजे"). आदर्श शिक्षकाचा जीवनक्रम कसा असावा, त्याचें जीवितध्येय काय असावें, हें "**दर रविवारीं**" व "**कला सुंदरी**" या कवितांत दृष्टीस पडतें. शिक्षकाचें वर्णन पहा—

"**सन्मानवता निर्मायाचीं ध्येयें ज्यांच्या सदा शिरीं.**"

त्याचप्रमाणें शाळाचालकांना विचार करण्यासारख्या पुढील ओळी पहा.

"**शाळा नाहीं इमारती त्या, म्हणा न शाळा त्या साहित्या मुलें, मुली, शिक्षिका नि शिक्षक, म्हणजे शाळा म्हणती सात्त्विक**"

श्री. कुलकर्णी हे आपल्या व्यवसायाशीं समरस झालेले आहेत, हें त्यांच्या कवितांतील जिव्हाळ्यावरून सहज दिसून येतें.

अध्यापन शास्त्राची चर्चा करतांना मधून मधून उपयोगी पडण्यासारखीं अनेक सूत्रमय व सारभूत वाक्यें या संग्रहांत विखुरलेलीं आहेत.

शिक्षकाच्या व्यवसायाला समाज आणि स्वतः शिक्षकहि कंटाळलेले असतांना श्री. कुलकर्णी यांनीं या व्यवसायांतील ध्येयवाद, भावना आणि आनंद काव्यरूपानें समाजापुढें सादर केला आहे, त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

शिक्षक, पालक आणि काव्यरसिक त्यांचें स्वागतच करतील.

महाराष्ट्र-विद्यालय, पुणें. } ग. श्री. खैर

# थोडें निवेदन

जेथें सद्गुण दिसेल तो आपला गुरुच ! पवित्र शिक्षणक्षेत्र तर सद्गुणांची खाणच ! तेथेंच गरूंचें अपारपण ! शिक्षकोत्तमांचें वैपुल्य ! मनाला तेथें सर्वोच्चाकडे भरारावेंसें वाटून त्यानें गुणगानाची हौस भागवून घेतली, इतकेंच !

जगांत नवें काय असतें ? पुस्तक नवें नाहीं, पण वेगळें आहे ! विक्षिप्त नाहीं, पण चांगलें आहे ! चांगलें हातीं आलें तें चांगलेंच तडीस नेण्याची शक्य ती जपणूक झाली आहे. स्तुति आहे, ती हेतुतःच आहे ! वृथा नाहीं ! सद्गुणांच्याच घरचा " सन्मान वावरो झिजवाया उंबरा ! " चंद्रच चंद्रकान्ताला पाझर फोडतो. ! सूर्यप्रकाशच सृष्टि खुलवितो, डोलवतो, नाचवतो ! गुण त्या भव्योदात्तांचे ! एरव्हीं प्रचंड शब्दकोशांनीहि काय केलें असतें ?

मनाला उच्च प्रतीचा आनंद देणारें वेगळेंपण जेव्हां प्रतीत झालें, तेव्हांच नोंदलें गेलें. पुढें पुनःप्रत्ययानें ज्यांतील परमानंद देणारी भव्योदात्तता जशीच्या तशी शब्दरूपांत आणतां आली तेंच वेगळेंपण यांत घेतलें आहे ! कवितेच्या तळचा दिनांक कविता पूर्ण झाल्याचा आहे ! प्रसंगनोंदणीचा नाहीं !

कवितांचा काळ गेल्या तीस वर्षांचा आहे.

हल्लीं वसुधाव्याप्त सर्वंकष डोळस रसिकता उदयास येत आहे ! बुद्धिगम्य वाङ्मयाकडे लक्ष धावत आहे, म्हणून शालेय जीवनाचें हें कवितावाङ्मय आदरिलें जाईल अशी खात्री वाटते; शिवाय हल्लीं शिक्षणक्षेत्र सर्व बाजूंनीं संपन्न करण्याचे नानाविध प्रयत्न चालू आहेत. अशावेळीं येथील अभिजात दैवी संपन्नत्व, सर्वश्रेष्ठत्व व त्रिकालाबाधीत शुद्धत्व हीं जर झगझगीत प्रकाशांत उदय पावलीं तर योग्य तेंच होणार असून या पवित्रक्षेत्राचा जीवनरथ एकादें अंगूळ भूमीपासून वर अधांतरीं चालू लागण्यास थोडासा हातभार लागेल, म्हणूनही हें प्रसिद्धिकरण आहे.

—लेखक—

**डॉ. गजानन श्री. खैर,** एम. ए. (बांबे), ए. एम्. (कोलंबिया), पी एच्. डी. (न्यूयार्क) **यांचा अभिप्राय.**

अध्यापक, अध्ययन आणि अध्यापनकला व शिक्षण यांना सर्वस्वीं वाहिलेला हा कवितासंग्रह आहे. शिक्षणविषयक ग्रंथांत ही नवीन प्रकारची भर आहे.

शिक्षणाचीं तत्त्वें रूक्ष नसून त्यांच्यांत भावनाहि असूं शकतात, हें लेखकानें सिद्ध केलें आहे. "**मारूं नको रे**" ही कविता प्रेमानें व करुणरसानें परिपूर्ण आहे. कवीला शिक्षकपेशाचा अभिमान आहे व तसा त्याच्या काव्यांत तो पदोपदीं उतरला आहे ("राजे"). आदर्श शिक्षकाचा जीवनक्रम कसा असावा, त्याचें जीवितध्येय काय असावें, हें "**दर रविवारीं**" व "**कला सुंदरी**" या कवितांत दृष्टीस पडतें. शिक्षकाचें वर्णन पहा—

"**सन्मानवता निर्मायाचीं ध्येयें ज्यांच्या सदा शिरीं.**"

त्याचप्रमाणें शाळाचालकांना विचार करण्यासारख्या पुढील ओळी पहा.

"**शाळा नाहीं इमारती त्या, म्हणा न शाळा त्या साहित्या**
**मुलें, मुली, शिक्षिका नि शिक्षक, म्हणजे शाळा म्हणती सात्त्विक**"

श्री. कुलकर्णी हे आपल्या व्यवसायाशीं समरस झालेले आहेत, हें त्यांच्या कवितांतील जिव्हाळ्यावरून सहज दिसून येतें.

अध्यापन शास्त्राची चर्चा करतांना मधून मधून उपयोगी पडण्यासारखीं अनेक सूत्रमय व सारभूत वाक्यें या संग्रहांत विखुरलेलीं आहेत.

शिक्षकाच्या व्यवसायाला समाज आणि स्वतः शिक्षकहि कंटाळलेले असतांना श्री. कुलकर्णी यांनीं या व्यवसायांतील ध्येयवाद, भावना आणि आनंद काव्यरूपानें समाजापुढें सादर केला आहे, त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

शिक्षक, पालक आणि काव्यरसिक त्यांचें स्वागतच करतील.

महाराष्ट्र-विद्यालय, पुणें. } **ग. श्री. खैर**

# थोडें निवेदन

जेथें सद्‌गुण दिसेल तो आपला गुरुच ! पवित्र शिक्षणक्षेत्र तर सद्‌गुणांची खाणच ! तेथेंच गरूंचें अपारपण ! शिक्षकोत्तमांचें वैपुल्य ! मनाला तेथें सर्वोच्चाकडे भरारावेंसें वाटून त्यानें गुणगानाची हौस भागवून घेतली, इतकेंच !

जगांत नवें काय असतें ? पुस्तक नवें नाहीं, पण वेगळें आहे ! विक्षिप्त नाहीं, पण चांगलें आहे ! चांगलें हातीं आलें तें चांगलेंच तडीस नेण्याची शक्य ती जपणूक झाली आहे. स्तुति आहे, ती हेतुतःच आहे ! वृथा नाहीं ! सद्‌गुणांच्याच घरचा " सन्मान वावरो झिजवाया उंबरा ! " चंद्रच चंद्रकान्ताला पाझर फोडतो. ! सूर्यप्रकाशच सृष्टि खुलवितो, डोलवतो, नाचवतो ! गुण त्या भव्योदात्तांचे ! एरव्हीं प्रचंड शब्दकोशांनींहि काय केलें असतें ?

मनाला उच्च प्रतीचा आनंद देणारें वेगळेंपण जेव्हां प्रतीत झालें, तेव्हांच नोंदलें गेलें. पुढें पुनःप्रत्ययानें ज्यांतील परमानंद देणारी भव्योदात्तता जशीच्या तशी शब्दरूपांत आणतां आली तेंच वेगळेंपण यांत घेतलें आहे ! कवितेच्या तळचा दिनांक कविता पूर्ण झाल्याचा आहे ! प्रसंगनोंदणीचा नाहीं !

कवितांचा काळ गेल्या तीस वर्षांचा आहे.

हल्लीं वसुधाव्याप्त सर्वकष डोळस रसिकता उदयास येत आहे ! बुद्धिगम्य वाङ्मयाकडे लक्ष धावत आहे, म्हणून शालेय जीवनाचें हें कवितावाङ्मय आदरिलें जाईल अशी खात्री वाटते; शिवाय हल्लीं शिक्षणक्षेत्र सर्व बाजूंनीं संपन्न करण्याचे नानाविध प्रयत्न चालू आहेत. अशावेळीं येथील अभिजात दैवी संपन्नत्व, सर्वश्रेष्ठत्व व त्रिकालाबाधीत शुद्धत्व हीं जर झगझगीत प्रकाशांत उदय पावलीं तर योग्य तेंच होणार असून या पवित्रक्षेत्राचा जीवनरथ एकादें अंगूळ भूमीपासून वर अधांतरीं चालू लागण्यास थोडासा हातभार लागेल, म्हणूनही हें प्रसिद्धिकरण आहे.

—लेखक—

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | मी फक्त येथला ! | १ |
| २ | जरा विश्रांति येथें रे, घे, घे. | २ |
| ३ | जा गुरुदेवा, करिं तूं रंजन | ५ |
| ४ | ये काव्यदेवते, | ६ |
| ५ | तिथें पहारा करिं मी इमानें | ७ |
| ६ | उद्यानाधिपति | ८ |
| ७ | शालागीत | ९ |
| ८ | नको मारूं रे ! | ९ |
| ९ | माझी श्रीशारदा | ११ |
| १० | चैतन्यरूपसंपदा | १५ |
| ११ | आवाहन | १७ |
| १२ | आम्ही कोण ? | १८ |
| १३ | थोर नाना गुणी | २५ |
| १४ | बलवंतवसतिगृह | २७ |
| १५ | गुपित उपमर्द | ३० |
| १६ | शिकवणि करणें | ३२ |
| १७ | नवलाची कथा | ३६ |
| १८ | जाइं अशा देवळांत | ३७ |
| १९ | गुरुदेव | ३९ |
| २० | पारतंत्र्य जरी देशास | ४० |
| २१ | गोड आशा | ४१ |
| २२ | पेठ, सदाशिवमघोल गुरुजी | ४२ |
| २३ | तो पात्र सुस्वागता | ४७ |
| २४ | अनाथविद्यार्थिगृह | ४८ |
| २५ | निर्दोष कार्यांतर | ४९ |
| २६ | असा काय केला गुन्हा | ५० |
| २७ | नका सांगुं कांहीं | ५१ |
| २८ | खरें कार्य आहे | ५४ |
| २९ | बंड्या झाला बंडूनाना ! | ५५ |

३० नावुं द्या तींत कलासुंदरी .. .. ५७
३१ नाहींत शाळा त्या गुणी ! .. .. ५८
३२ गैरसमज तूं दूर करीं .. .. ६३
३३ नवीन खेळणीं .. .. ६५
३४ होतात शाळा त्या गुणी .. .. ६९
३५ साध्याही विषयांत .. .. ७५
३६ सरलता व वक्रता .. .. ७६
३७ सद्‌गुण-दुर्गुण-मर्यादा ... .. ७८
३८ गुणी मुलांचें चीज करा ... ... ७९
३९ दैन्या फेकोनी देतों बाहेर .. .. ८१
४० भाषा खडीसाखरी .. .. ८३
४१ अमुचे शिक्षक ! ... .. ८४
४२ ती ज्ञानलालसा आहे जागृत झाली .. ८७
४३ कार्य येथें एक चाले .. ... ८७
४४ अभिनंदन हें प्रेमळ सोज्ज्वल ... ... ८९
४५ शिक्षक व संत ... .. ९०
४६ चार डोळे ... .. ९४
४७ अमुची शाळा ... .. ९५
४८ जगाच्या कुलाला .. ... ९७
४९ तिथें हिरकण्या हिऱ्यां प्रभव कोहिनूरां पण .. ९८
५० संमेलना येउं द्या तीं मुदें .. .. ९९
५१ शाळकरी .. ... १००
५२ हाक आयका ! .. ... १०२
५३ कवडी किमत तुझी ! .. .. १०४
५४ निश्चित येतिल यशःफलें .. .. १०६
५५ चांगलें ! .. .. १०७
५६ मधुनी मधूनी भेट देउनी .. .. १०८
५७ एक व्हा हो एक व्हा ... ... ११६
५८ स्वयंशासनाचें एक दिग्दर्शन ! .. .. १२०
५९ घे, तोंड भरोनी म्हणवुनि गुरुजी गुरुजी .. १२१
६० मति असे जरि अल्प ... .. १२४

६१ पावसावर मात ! .. .. १२६
६२ मी प्रकाशूं शकतों ! .. .. १३६
६३ कोणत्याही आमिषाचें अस्त्र तूझें मोहिनीचें ! १३९
६४ राजकुमारांचे हो, शिक्षक .. .. १४२
६५ साम्राज्य मानवजगावरी शिक्षणाचें .. १४३
६६ संप नका करूं, संप नका हो ! .. .. १५१
६७ पाठाचे अभंग .. .. १५९
६८ दरररविवारीं .. .. १६८
६९ शिक्षाविवेक .. .. १७२
७० भीति कोणा नको .. .. १७५
७१ मी फिरतों मागत माधुकरी .. .. १७६
७२ आदरगंगच्या कावडी .. .. १७७
७३ सावधानतेचा देत हा इषारा .. .. १७८
७४ काम तुला सांगायाची नको वाट पाहूं .. १८१
७५ निर्मितीचें मम चीज असें झालें .. .. १८३
७६ प्रवेश मिळूं दे .. .. १८४
७७ माँटेसरीगौरव .. .. १८५
७८ घे श्रेय संचेतनीं ... .. १८७
७९ व्यवहारी तें शिक्षण केलें .. ... १८७
८० अनुकरणा भूदेवी .. .. १८८
८१ यशः श्रेय कार्याचें सुंदर .. .. १८९
८२ अभिनंदन अपुलें .. .. १८९
८३ तेजस्वी व्हा ! .. .. १९२
८४ जगन्नाथ हो वाट ! .. .. १९२

कृतज्ञता:—आशीर्वाद व अभिप्राय यांबद्दल उभय सद्गुरु श्रेष्ठांचा मी अत्यंत ऋणी आहे.

—प्रकाशक


शरीरमन
आत्मविकासनी



फादर पेस्टलॉत्सी.(आर्थर मीच्या आधारें)

# वाणीगौरव

१

वक्तृत्वगंगा मुखांतूनि तुझ्या, स्त्रवूं लागली हें न जों ऐकिलें
स्नानासि मी तोंच धावूनि आलों, जियेमाजि विद्यानिधी रंगले!
मुंगीससुद्धां नसे रीघ तेथें ! तरी दीघली मी उडी फेकुनी
शांतीपरी भंगली ती न कोठें, तसा तीमधें जाइं मी पोहुनी !
वाणी अगाधा करी थक्क आम्हां, हरी भान ! चित्रांपरी बैसवी
आम्हां मराठींत वक्तृत्व ऐसें. बहू धन्य जन्में अम्हां भासवी !
ओजस्वि तूझी गिरा सुंदरा ती, सुगंभीर धावे अखंडा अती
श्रोत्या महाज्ञानराशीस दे ती, श्रमें अल्प; जे तीजला ऐकती !
वक्तृत्वशक्ती–महागौरवाला, नको शोधणें ग्रंथ अन्य स्थळीं
शैलींत ओथंबलेल्या गुणांचीं, सुतेजस्वि रत्नें तुला लाभलीं !
जीं ग्रंथ वाचोनिया जाणलेलीं, तशीं येथ धादांत मीं पाहिलीं
माझी मराठी महाथोर भाषा, अशा प्रत्ययां जागृती लाभली !
व्याख्यानभू अन्य होती रित्या त्या, तुझें थोर वक्तृत्व हें चालतां!
आकर्षणाला महाशक्त वाणी, पटे साक्ष हें नित्य आलोकितां !
नाहीं कुठें 'खुट्ट' ही व्हावयाचें, घडे शत्रुमित्रां समाधिस्थिती
छावे हरीचे सभा मोडणारे, मृगांच्यापरी भाषणा ऐकती !
आवेश आकाशवाणींतला ये, क्रमें पंचमींही चढे वैखरी
ज्ञानौघ बेफाम ! बेफाम वृत्ती, सभेमाजि होती स्थिति हे खरी !
तूं हेलवावें नऊही रसांना, कुणा येईना ती तुझी रे सर
श्रोत्यांस भारी भरारींत नेसी, सुहर्षांत तूं शुद्धतत्त्वांवर !

२

धर्मस्वरूपें जरी भिन्न लोकीं, तिथें ऐक्य ! वाणी तुझी सांगते
पंथादिकीं कार्य संरक्षणाचें, न विद्वेष तेथें ! कळे हें इथें !
तेथें समानांत सद्धर्मसिंधू, समाजोपयोगी असे नांदता

त्यांतील सार्‍या गुणी संस्कृतींना, असे शीलधर्मांत सन्मान्यता !
भिन्नोदधींच्या महीलागि पाणी, मिळे एक गोडें सदावर्षणीं
भिन्नांतुनी एक ये धर्मदेवी, तशी शीलचारित्र्यसंजीवनी !
एकत्र येतील धर्मप्रणेते, तरी एक देतील सद्धर्म ते
सच्छील! सच्छील! हें नांव त्याचें, असच्छील होतील ते त्यागिते!
भ्रांतींत निभ्रींति शुद्धी अशुद्धीं, अयोग्यांतलें योग्य तें सर्वदा
भिन्नांत रम्यैक्य तूं दाखवावें, करावी तुवां त्या विषाची सुधा !
वज्रास लोण्यापरी ये मृदुत्व, मृदुत्वांतुनी दिव्य शक्ती निघे
नाना चमत्कार होतात येथें, सभेमाजि तूझ्या सदा मी बघें !
विद्वेषवन्हीच तेथें दिसे कीं, उगाळूनि त्या भेदभावा सदा
प्रेमामृताचेंच रम्यैक्य आणी, तुझी शुद्ध ती बुद्धिची संपदा !
अन्नांतुनी आंत्र घे अन्नसत्त्वें, असत्त्वांश सारा दुरावूनिया
योग्यास घेणें अयोग्या त्यजीणें, नमूं आंत्रसत्त्वी नवीना नया !
सामर्थ्य संपन्न प्रत्येक येथें, सहाय्यें सदा पूर्ण दक्षक्षम
कोठें नसे वाव त्या आक्रमाला, परांच्या सुखासाठि हो विक्रम !
साधुत्व येथें परित्राण घेतें, विनाशीं असाधुत्व जातें सदा
निःशंक तत्त्वें सदा लाभताती, तुझी भारती ऐकतां एकदां !

३

ब्राह्मण्य मेधाप्रकर्षांत ! तैशी प्रजापालनीं दक्षता क्षात्रता
संपूर्णता पोषणीं वैश्य आणी, श्रमाची सुसेवा असे शूद्रता !
श्रेणीसमानत्व या सेवकांचें, समाजास हे भाग आवश्यक
संपन्नता सद्गुणीं सर्वभागीं, नसे नीचता उच्चता जाचक !
कर्तव्य-निष्ठा इथें जागणारी, म्हणा भाग वा वर्ग कांहींहि ते
सार्‍या जगाचाच हा वर्णठेवा, जगीं नांदतो नित्य जाणूं इथें !
वाणी तुझी भांडणावीण सांगे, समाजव्यवस्थामहावास्तव
यज्ञांत, दानीं, तपांमाजि, कर्मीं, गुणांचाच सारा निसर्गोद्भव !
संस्कारसामर्थ्य तें संचयाचें, अशा संचयीं पुण्य आचार ते

आचार भिन्नत्व वर्णाश्रमांचें, श्रमाच्या विभागावरी चालते !
केला गुणोत्कर्ष निर्माण येथें, विकासास साऱ्यां खुलें जीवन
सत्संस्कृतीचीच सारी व्यवस्था, जिचा लोक-कल्याण हा सद्‌गुण!
सारे शुचिष्मंत ! एका प्रतीचे, शुचिष्मंत! चांडाल! कोणी न ते
सद्ध्येय कर्तव्य ते जाणणारे, विरोधी न वारें कुठें वाहतें !
चारीच वर्णांत ये धारणा ती, सुशीलांत सारी कलावंतता
नैसर्गिकी उन्नती यांत आहे, कथाया खरी रे, तुझी पात्रता !
ज्यांची समाजस्थिति संप्रयोगीं, समाजाचिया ये न अंगावर
नाहीं तिथें त्याग तूझा कधींही, तुझें चांगलें वेचणें सुंदर !
दु:शीलता मोहुं द्या ती कितीही, तिथें मात्र तो त्याग ! ती नश्वर
चाणाक्षता धाडसी ये दिसूनी, तुझी पावलोपावलीं ती तर !
पूर्णस्थिति शीलशाली समाजीं, तिथें नांदते सौख्यशांति गुणी
व्यक्ती-समष्टीस उत्कर्ष तेथें, विनावाद निष्कर्ष! ये घोषुनी !
भूलोकचा स्वर्ग तो तूं कथावा, अध:पातही जाणवावा क्षणीं
शक्तिद्वयीं पूर्ण निष्णातता ती, तुझी सव्यसाची सुवाणी गणी !
नाहींच जेथें कुटुंबस्थिती ती, कशाची तिथें ये समाजस्थिती
स्वातंत्र्य तेथें नसे व्यक्तिलागी, नसे प्रेम ! ती पाशवी संस्कृती !
ते मानवांचे थवे कीं म्हणावे, पशूंचे अरण्यीं जसे रानटी
नाहीं प्रशंसा तुझी पारतंत्र्यीं, जरी त्यांस आकर्षकें संगती !
शीलास उत्कर्ष ज्या ये समाजीं अध:पात कोशीं तिथें फक्त तो
दु:खांत दैन्यांत तेथें न कोणी, विशालीं तिथें संग्रही नांदतो !
दैवी गुणांची सदा वाढ जेथें, तिथें स्वास्थ्य नांदे खरें शाश्वतीं
तूझ्या सभेमाजि सारें पटे हें, सुखें शीलधर्मी सुखें राहती !
दु:खी असे विश्व ऐसेंहि नाहीं, सुखासाठीं सारें नसे केवळ
एका थडीचेच हे पोहणारे, नदीपार जाण्या न त्यांना बल !
दोन्ही थडींना पुरे जाणणारे जलापार होण्यास ते लायक
संसारसिंधू तरायास सारे,, तुझ्या शीलधर्मी खरे साधक !

ज्ञाना बहिष्कार नाहींच, कोठें, तयांमाजि व्हावेंहि पारंगत
युक्तास घ्यावें, अयुक्ता त्यजावें, अशी स्पष्ट उक्ती तुझी सांगत
चारित्र्यसंपन्नसच्छील देते, समाजोपयोगी सुतत्त्वावली
विश्वास साधार हा उद्भवीसी, अशी दिव्यकोटी तुला लाभली!
वाणीमध्यें तेज अभ्यासकांच्या कसें राहतें, पूर्ण जाज्वल्य तें
शक्तींत अभ्यास, नैपुण्य तेथें, कसें देवरूपत्व त्या लाभतें ?
ज्ञानीं कशी राहते कार्यकारी ? गुणी लोककल्याण सद्भावना
प्रत्यक्ष वाणी तुझी ऐकल्यानें, अम्हांला खरी येतसे कल्पना !

४

चारित्र्यसंपन्नता केधवांही, ढळूं द्यावयाची न ती अल्पही
ब्राह्मी स्थिती शीलवंतांत ही ये, तिथें जागृती नांदते प्रत्यहीं !
ब्राह्मी स्थिती सद्गुणीं ये जशी ही, मतीच्या प्रकर्षांतही येत ती
दृष्टींत त्यांच्या असें एकता ती. जगाच्या सुखाचीच तेथें युती !
ब्राह्मीस्थितीमाजि तत्त्वार्थवेत्ते, महाज्ञानतेजोनिधी जाहले
आहेत, होतील, हें सांगताती विकासक्षमाचीं तुझीं सद्वलें !
द्रष्टे, स्मृतीशादि, आचार्ययोगी तसे श्रेष्ठ सच्छास्त्रमीमांसक
आम्हां इथें दर्शनें पुण्य देती, महाभाग तत्त्वज्ञ, संशोधक !
प्रत्यक्ष मंथोनि संशोधिताती, समाजोपयोगी गुणां शोधक
नाना सुखांना विपूलत्व येतें, प्रयत्नार्थ त्यांचें करूं कौतुक
सोई जहाल्या तरी सौख्य नाहीं, असें शेवटीं त्या कळे शाश्वत
शीलोदधीलाच त्या चालल्या कीं, नद्या ज्ञानगंगाहि त्या धावत !

५

निष्णात जे आपणां मानिताती, जयांना नसे निश्चिता भूमिका
ज्ञानोदधी मंथुनी काढिती ते, शिला, शैल, शैवाल वा वालुका !
त्यालाच तूं मंथुनी काढितोसी, महारत्नराशी नि सन्मौक्तिकें
तूं निश्चयाचा महामेरु आम्हां, अलंकार देसी सदा कौतुकें !
देदीप्यमानामधीं अग्रभागीं असं पुण्यकार्यांत आम्ही रत

झालों अपक्रांत सत्तेज गेलें, पुरे जाहलों पुण्यकर्मच्युत !
जाणीव त्याची अम्हांला न कांहीं, खरींभूतकाळीं अम्हां श्रेष्ठता
तूं व्यासपीठावरी सांगतांना, तुझें ज्ञान दावी अम्हां दिव्यता !
ज्यांची कृती शुद्ध त्या सज्जनांना वृथा दोषिलें वाटतें प्रांजल
ते देव आम्हां खरे वाटवाया, तुझी भारिते भारती सोज्वल !
कीं यक्षिणीचीच कांडी फिरोनी, अम्हांला करी पूर्ण तेजोन्वित
होती शिरें उंच खालावलेलीं, क्षणीं वाटतें आम्हि कीं प्रोन्नत !
त्या पारतंत्र्यीं अधःपात झाला, अम्हां त्यांत ये मंदताभ्रंशता
तूं जागवीसी विचारप्रणाली क्षणीं दावुनी उन्नतीच्या पथा !
येतों मनें कृष्ण घेऊनि येथें विशुद्धा तुझ्या ज्ञानशाळेंत या
रूपांतरूनी उजाळूनि जातों, सुधाभाषसिंधूंत पोहोनियां !
मानीत होतों बहू शत्रु मोठे, बहू अल्प आम्ही तयांच्यापुढें
त्यांचा दरारा झुगारावयाला, न सामर्थ्य आम्हां आम्ही बापुडे !
तुझ्या निशाणासभोतीं परंतू, अरि क्षुद्र वाटे, न ये तद्भय;
वाटे खरें येय भूदेव आम्ही, मनीं होउनी ज्ञानसूर्योदय !
वैमानिकानें विमानस्थितांच्या सवें धाव घ्यावी नभोमंडळीं
लीलागुणें आक्रमावें विताना, जशी दाखवावी प्रदेशावली !
वा वारिराशीवरी थेट घ्यावें, भरारींत कीं तुंग शैलावरी
ऐसा सभांना सदा भास व्हाया, असावास वक्ता तयां तूं तरी !
तीं वेदशास्त्रें, तशीं धर्मशास्त्रें, पुराणेतिहासादिकाव्येंहि तीं
पौर्वात्यपाश्चात्यहि ग्रंथशास्त्रें, प्रवासांत तीं आपुल्या लागती !
आकाशभूगर्भविज्ञान यांचा, परामर्ष दृष्टी तुझी घेत ती
होती सभा त्या विमानापरी रे, तुझीं भाषणें ज्यांमधें चालती !
अभ्यासही खोल विस्तारलेला बहु दांडगा आत्मविश्वासही
कांहीं कथायास आधार देसी, क्षणीं शोधुनी ही विशाला मही !
विश्वास देसी खरा जागवोनी, चिकित्साप्रधानाग्रणींमाजि त्या
तेजस्वि तूं बोधिसी शीलधर्मा, समाजास तारावया आजच्या !

६

विद्यानिधी थोर आचार्य तूझे ! तुला लाभलें भाग्य तूझें महा
त्यांची झळाळे प्रभा भाषणीं जी, मना मोददायी नितांता अहा !
वैशिष्ट्य तूझें स्मृती सांगतांना, स्मृती तीव्र तूझी तुला शोभते
गेलें निरीक्षे-परीक्षेंत आयू, महाशील तेथें मिळालें तुतें !
दैवी तशी निर्भयाचीच वाणी, तुला निस्पृहाला असे लाभली
तेथें पटे सत्य आम्हांस भारी, तुझी सांगण्याची कला चांगली !
वाणीमधें नाहिं संदिग्ध कांही 'त्वयार्धमयार्धं' कशाचें तिथें
सत्यास त्या सत्य खोट्यास खोटें दणाणून वाणी तुझी सांगते !
तोफेंतुनी वर्षती थोर गोळे, जसे लांबच्या लांब पल्यावरी
ते तत्त्वगोळे मुखांतूनि तूझ्या, हजारोंहि जातात कोसीं दुरी !
तेथें फुटोनी विरोधांवरी ते स्वसामर्थ्य धुंदी जयांच्या उरीं
त्यांची महादुर्दशा ते करीती, अशी दे प्रचीती तुझी वैखरी !
पौरस्त्यपाश्चात्यसच्छास्त्रशस्त्रीं तुझी सव्यसाची महावाणी रे
येई शतांगत्व त्या व्यासपीठा, सभा युद्धभूमींत रूपांतरे !
सत्कर्मसिधूंत संस्कारदुर्गीं, असें शत्रुंनीं पूर्ण ज्या वेढिलें
चारी दिशांनीं तुवां संचरोनी पराभूत केलें तयां चांगलें !
द्रष्टे नि तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, काव्यां-पुराणेतिहासादिकांचे पिते
आधार तूझ्या मुखें बोलताती यशा लागलीं ज्यां तपेच्या तप
तेथें यथायोग्यशा गौरवाला तुझी प्रांजला सन्मती धावते
पुण्याइच्या नम्र ती स्वागताला, उणीवी कधींही न ती रंगते !
सहर्षांत येतात जे ग्रंथरूपीं, सभेमाजि तूझ्या सदा धावत
नांवें तयांचीं कशीं सांगूं सारीं ! असंख्यात तेजोनिधी पंडित !
तेजोनिधी एक तूं या ठिकाणीं, प्रकाशांत तेजें दुजीं लुप्त तीं
तूझी विनम्राच वाणी अम्हांला तयांचें खरें दावि अस्तित्व ती !

७

तत्त्वें यशस्वी जगामाजि यावीं, अशा बुद्धिनें वाद होती इथें
सत्यार्थ संशोधनाच्या प्रयत्नीं, महायुद्ध चाले असें वाटतें !

निर्बाध जें जें जगाच्या सुखाचें, तयांचीच होते खरी संस्कृती
तूझे महामोददायी निवाडे, कळोनी अम्ही धन्य होतों अती !
फारा दिसांच्या बहु रूक्ष झाल्या मनांच्या सुविस्तीर्ण शेतीवरी
ज्ञानामृताचा महामेघ तूझा, धडाडून वर्षाव येथें करी !
आकंठ तृप्ती तिथें येउनीया, पुढें धावती त्यांतुनी निर्झर
ज्यांना नसे लाभ त्यां वारी द्याया कराया सुखांच्या पिकांचा भर !
अद्रींद्र-उत्तुंग शृंगांस धारी, पहातांच कौतूकवी वामन
विस्फारितो नेत्र आकाशगामी मुखा खोलितो 'आ' स उद्गारुन !
आश्चर्यतंद्रा तशी येत येथें महाथोर वाणी तुझी ऐकतां
अल्पोद्गमाची महौघांत जातां, तुझी भारती हो सभा भारितां
डोळे विकासूनि बाहू स्फुरोनी, पुढारूनि छाती तदा जाय ते
अंगें थरारूनि रोमांच येती, भरारूनि बुद्धी हि अंकूरते !
शत्रू दरारे पळानें पसारे, तुझी भाषणें ऐकतां भासते
सामर्थ्यवारें भरे सन्मनांना, जगाचेंहि साम्राज्य आकांक्षितें !
त्वद्भारतींतूनि जीं पुण्यकारी बिजें पेरिसी तूं मनोभूवर
वाढून जोमें फळें लागण्याला, कशाला हवें थोर कालांतर ?
चाखील त्यांची सुधा लोकजाती, अती आदरें आणि त्यानंतर
होईल संपूर्ण कल्याणकारी, जगा अर्पुनी जीवनें सुंदर !
तीं ईश्वरी प्रेरणेचींच तत्त्वें जगा शीलचारित्र्यसंमानक
वक्ते तुझ्यासारखे नित्य यावे कथाया तपस्वी खरे लायक !
ऐशी प्रभावी मनीषा मनाची ! तुला पाहतां वाटते वास्तव
ते लाभतां ईश्वराच्या कृपेनें, यशाचाच भासे खरा संभव !

८

केली किती ? तीहि होईल थोडी, महादिव्यवाणी प्रशस्ती तरी
पूर्ण स्वरूपें तिला गावयाला मला शक्ति नाहीं स्थिति हे खरी!
ज्या लाविल्या थोर तीनें समाधी सदा लाभण्याच्या जनां कोठूनी
त्यांची सुरम्या स्मृति गावयाला प्रशस्ति इथें ठेविली गुंफुनी !

पूर्वी प्रशस्ती तुझ्या जाहलेल्या, समाजांत कीं विश्वविद्यालयीं
माझी प्रकाशेल त्यांमाजि कांहीं, महाराष्ट्रभाषेंतल्या वाङ्मयीं !
नी विश्वविद्यालयींही प्रशस्ती, कुतूकांत जाईल अभ्यासिली
वक्तृत्वपुण्याइनें जन्मलेली ! तरी कीर्ति लाभेल हीला भली !
त्या ईश्वराच्या प्रसादांतली ही तुला पुण्यवंता मिळाली गिरा
उत्कर्ष होवो तिचा सर्वकाळीं असें याचितों नित्य विश्वंभरा !
आकांक्षिण्याला महाथोर ठेवा, तुवां दीधलासी अम्हां उज्ज्वल
सद्ध्येय तें सद्गुरो आक्रमाया, तुवां उद्भवीलें तसें सद्बल !
वागीश्वरीचा खरा लाडका तूं, तुला वंदितों भक्तिनें वाग्विभो !
ज्ञानीजनांच्या महामंडळीं तूं, पदा वंदितों हे महावाग्विभो !
पौरस्त्यपाश्चात्यसज्ज्ञानमूर्ती, तुला वंदितों श्रीमहावाग्विभो !
हीं राहिल्या कारणें वंदनें घे, महाराष्ट्रभाषामहावाग्विभो !
तूं काव्ययज्ञांत अध्वर्यु माझा, महाराज भूदेव विद्वद्वरा !
तेजस्वि वाणींतुनी काढियेला, स्वयंभू तुवां होम-वैश्वानरा !
गीताहुती होमिल्या त्याच या कीं, तुला वंदनांची महादक्षिणा !
झाला पुरा यज्ञ द्यावें प्रसादा, मला आणि या यज्ञजिज्ञासुंना !
वाणीप्रभावें तुझ्या भूमिदेवा, मला लागल्या कल्पनामंजरी !
आलीं फुलोनी फुलें त्यांमधोनी, तुझ्या अर्पिली पादपद्मांवरी !
पुण्यांश वाणींतला लाभण्याला, सदा सिद्ध मी या तुझ्या मंदिरीं !
माझ्या मनीषेपरी लाभ व्हाया, महावाक्प्रवीरा कृपा तूं करी !

## महत्त्वाचे मुद्रणदोष

| पान | ओळ | शुद्ध |
|---|---|---|
| ४७ | ६ | पुढें या दोन ओळी वाचाव्या, |

विस्मृति काळी माती खणतां, दिसते नयनां कळते चित्ता
तांबडमाती जिस जन म्हणति, होत तांबडी ती या रीतीं !

| पान | ओळ | शुद्ध |
|---|---|---|
| ६५ | ६ | वडवाग्नि |
| ८४ | १ | परस्पर गुणी |
| १५१ | ११ | तीचा तो |

२०५४८ वि. काव्य
९३३० नों. दि.

# गुरुदेव

अथवा

# शिक्षकोत्तम

शरीरमनबुद्धीच्याद्वारें आत्मविकासनीं
शिष्यां सच्छील देणारा जाण मी शिक्षकोत्तम

## :१: मी फक्त येथला !............ [प्रणयप्रभा]

" बाग गुणांचा येथें फुलला । तोच आपणां दावायाला
' गुरुदेव ' असा फलक रोविला । रोवणार मी फक्त येथला ! "
" मातृपितृगुरुदेवपंक्तितुन । पद घेउन 'गुरुदेव' वेंचुन
पुण्यें पुण्या टाकुं गौरवुन । अधिकारी त्या पूर्ण जाणुन
शिक्षकोत्तमा दिलें समर्पुन । समर्पिता मी फक्त येथला ! "
समाधान सन्मनास सद्धन । परिस्थितीतें करि सन्नंदन
असोत नच वा समुन्नति गुण । नसोत निश्चित कांहीं अवगुण!
असलें साधें कोणीही मन । स्वर्गस्फूर्तिचा प्रवेश साधुन
करून घेतें जीवन शिक्षण । व्यतीत होतें संतोषांतुन
शिक्षणक्षेत्रीं जातां रंगुन । स्वयें समुन्नति येते धावुन !

" उन्नत चित्तें या क्षेत्रांतुन । जैहीं दिसलीं, तो पुण्यक्षण
पूर्ण रंगवी विनम्र मन्मन । भक्तीची दीक्षा ये धावुन
कृपानुग्रह भक्ता झाला । प्रसाद त्याला जसा मिळाला,
तोच आपणां असे वाढला । वाढणार मी फक्त येथला !"
" सुरम्यता ही दिपून गेली । जिथें रुक्षता बातच ठरली,
साक्षात्कारी प्रचीति झाली । ती प्रतिभेनें प्रदीप्त केली
तीं तीं दृश्यें इथें मांडलीं । मांडणार मी फक्त येथला !"
" संस्मरणाचीं स्मृतिचीं पात्रें । काव्य नित्य घे छायाचित्रें
वाऱ्यावरि किति उडून गेलीं । तींच राहिलीं, जीं मीं धरिलीं
तींच संग्रहीं या संग्रहिलीं । संग्राहक मी फक्त येथला !"
दि. २२-३-४९

———०———

## : २ : जरा विश्रांति येथें रे, घे घे....... [ मुक्तछंद ]

१

मरुवनींच्या श्रमी पांथस्था
रम्य रणद्वीप ! —भाग्यशाली तूं,
तुझीयापूढें ! जरा विश्रांति येथें रे, घे घे !
जरा विश्रांति येथें रे, घे घे !

* * *

नंदनवनींच्या श्रमी पांथस्था,
एक रम्यस्थली ! —भाग्यशाली तूं,
तुझीयापूढें ! नवी न ती तूला ! तूं तिला नविन
धन्य करीं या, रम्यस्थलीला, पुनः प्रत्यया !
जरा विश्रांति येथें रे, घे घे !

* * *

नाहीं मरुवनीं, नाहीं नंदनवनीं
श्रमी अस वा, श्रमी नस वा !
अशा पांथस्था
एक रम्यस्थली ! —भाग्यशाली तूं,
तूझीयापूढें अनेकांपरी पाहून घई
निश्चित नवानंद रे, तूला
मिळेल येथें
जरा विश्रांति येथें रे, घे घे !

* * *

व्हायाचें तूला अशा पांथस्था,
एक रम्य स्थळी ! —भाग्यशाली तूं
तूझीया पूढें पाहूनीया घे, प्रवासांत पुढें
ओळखीची जागा होईल तूला
रम्य विश्रांति असते कशी ?
पाहूनी घे घे !
जरा विश्रांति येथें रे, घे घे !

* * *

२

..आत्माराम जर रंगून गेला, तर जगांत रुक्ष असलें कांहींच नाहीं ! खरें ध्यानीं घे, सूज्ञ, पांथस्था !
..ऐक, रे खरें हें–हेंच रे श्रमी पांथस्था ! भ्रांतीचा ग्रह राशीस तूझ्या आला म्हणूनी, शिक्षणक्षेत्रा रुक्ष बोलसी ! खरें आहे का हें रुक्ष क्षेत्र ! जरा अंतरंग खोलून पहा ! ज्ञानासारिखा पुण्याचा ठेवा, शिक्षणक्षेत्रीं विषय व्हावा; प्रवेश तुझा तेथें असावा; आत्मविकासी सर्वोच्चसेवा, करीत तूझा जन्महि जावा, ऐसा भाग्याचा येथें प्रसंग !
..येथ अध्ययन, येथ अध्यापन, येथ संशोधन, येथ उपासन

सद्‌गुणांचें नी शुद्धकलांचें येथ आचरण येथ, उचारण, येथ सुचिंतन! अंतःशक्तीचें बाह्यशक्तींचें एक मेळाचें येथ संमेलन ! येथ श्रमाचें सदा जीवन, तपस्येनें तें झालें संपन्न ! यांतून नित्य वर्धिष्णु होतें दिव्य कल्याण !
यांत आनंद अनुपमेय; मानवोद्धारा संपन्नता ही शिक्षणक्षेत्रीं बीजरूपांत विस्तार घेती सामावलेली !
म्हणेल कोण रुक्ष क्षेत्र हें !

* * *

..द्रव्याचा पाऊस नाहीं म्हणोनी क्षेत्रास रुक्ष का रे बोलसी ! परंतु पहा ! द्रव्य येईल द्रव्य जाईल ! चंचल लहर स्वामित्वा-साठीं विजयी व्हावी, योग्य काय हें ? पण येथील तपस्येची ती दैवी संपत्ती येथें जी आली, कधींच येथून नष्ट व्हायाची नाहींच नाहीं ! कोणीच तीला नष्ट करील ऐसाही नाहीं ! कुठल्या क्षेत्रीं संपन्नताही चिरंतनाच्या जी वैभवाची आहे हें सांग !
आणिक पहा, नित्य नवता येथील दिव्य ! नवनवता प्रसवणारी चैतन्यरूपी जागृत सारी तूझ्याभोंवतीं नित्य नांदती !
..दिव्य शक्तींच्या वसंतागमा आणायासाठीं आंतरबाह्य दिव्य-प्रवृत्ति तूझ्याही सज्ज ! आहेत येथ !
..नवनवता वैरीच नित्य त्या रुक्षतेचा ! जेथ नवता, तेथ रुक्षता संभव नाहीं ! तिचें वैपुल्य शिक्षणक्षेत्रावीण न कोठें ! म्हणसी कैसें रुक्ष क्षेत्र हें ! रुक्ष म्हणणें भ्रांति रे भ्रांति !

* * *

स्वयंस्फूर्तीच्या आवडी तूला जेथ नसती आलास तेथ !
ऐसें कांहीं तें तूजविषयीं झालें नाहीं ना ! आत्माराम तो जेथ रंगेल, तेथ मृत्तिका सोनें होईल ! आत्माराम तो नच रंगतां सुवर्णाचीही माती होईल ! हवें सांगणें काय हें तूला! परिस्थितीशीं समरसून, अंतःकरण तींत ओतून प्राप्तकर्तव्य

चालविण्याचें दिव्य कौशल तूज लाभणें सहजसाध्य ! कोठें-हो तूला आवश्यक हें आहेच आहे ! दिव्य कौशल जयास ऐसें, रुक्षता कधीं वाऱ्यास त्याच्या उभी राहाया धजणार न ! शिक्षकोत्तमा, याच्याचसाठीं शिक्षणक्षेत्र नाहींच रुक्ष !
आनंदवनभुवन आहे शिक्षणक्षेत्र !
शिक्षणक्षेत्र रुक्ष म्हणणें भ्रांति रे भ्रांति !

* * *

.. शिक्षणक्षेत्रा रुक्ष बोलणें नाहींच योग्य ! खरा हाडाचा रुक्ष असावा, बोलणारा हें क्षेत्रच रुक्ष ! आकाशगंगा त्याच्या नयनां खूपवीलही ! सुशीतलही शुभ्र चांदणें अंग तयाचें तापवीलही! कोकीलगान बेसूर त्याला ! दरवळत्या पुष्पसुगंधा म्हणेल किती दुर्गंध याला? सुधाही त्याला वमनाऐशी वाटेल त्याज्य ! प्राप्तकर्तव्यीं गोडी न ज्याला द्युभूलोकीचा कुठला आनंद संतोषकारी होईल त्याला ! त्याचें हो, येथ कामच नाहीं ! येथें आनंदा स्वयंसंप्राप्ति ! कार्यजागृती नित्य घे येथें क्रियाप्रचीति ! नित्य नवता घेऊन येते सुरम्यता ती ! असलीं क्षेत्रें रूक्ष नसतीं कधीं कोठेंही ! रुक्ष म्हणणें असलीं क्षेत्रें भ्रांति रे भ्रांति !
दि. २८।८।४८

---

## :३: जा गुरुदेवा, करिं तूं रंजन ........[पादाकुलक]

जा गुरुदेवा, करि तूं रंजन । सद्गूरु–शिक्षक गुण संकीर्तुन
रंजनि गाईं शीलसुभूषण । देशा दे जें अभिनवजीवन ॥ ध्रु० ॥
शिक्षणसेवा घेईं साधुन । अनाहूत तूं जाईं धावुन
बालापरि तूं ठेविं आचरण । राहीं नांवापरि तूं भूषण १
इतर नसावी कसली आशा । सेवेची तूं धरिं अभिलाषा
गुरुदेवच तो करि गुरुसेवा । नाम सार्थ हो तुज गुरुदेवा २

कल्याणाला प्रकाशणारा । 'दिव्' धातुला अर्थ न दुसरा
सत्सेवेंतुन तो साधावा । नाम सार्थ मग तुज गुरुदेवा ३
सुधा असूं दे तुझ्या भाषणीं । रुचणारी करि अमोल करणी
अनद्भुतानें करि मनधरणी । अढळ ठाव घे अंतःकरणीं ४
घे संतांचें गोड बोलणें । घे संतांचें गोड वागणें
सद्रूढी तुज असो भूषणें । क्रांती—क्रांती नको बोलणें ५
चुकींत सविनय होईं प्रांजल । तीवर ओती सुधारणाजल
कृती करीं आपुली सुनिर्मल । जपुन टाक तूं अपुलें पाउल ६
जे जे दिसतिल कोणी त्याचे । घेइं सद्गुण सन्निष्ठेंचे
पुष्कळ होइल ही तर सेवा । एवढेंहि करि तूं गुरुदेवा ७
अनुभव झालें रंजन लेणें । मधुर करावें तें काव्यानें
संता अभिमत तेंच बोलणें । तुवां सेवणें सन्मानानें ८
दि. १२–७–४८

## : ४ : ये काव्यदेवते........... [विडांत मराठे]

ये काव्यदेवते ! श्रुती कराया धन्य
तव मुक्तमनानें इथें होउं दे गान ॥ ध्रु० ॥
जे रुक्ष बोलती शिक्षणभूमी कोणी
तव रसाळ जावो गान तयांच्या कानीं
त्या रसिक भ्रमरा मोहुनि येथें आणीं
परिचयें तुझ्या वाढुं दे येथला मान ! १
ते कलाजीवनीं असुं दे वादी कोणी
स्वागता तयांच्या सिद्ध क्षेत्र हें जाणीं
तें कळुनि येउं दे तुझिया सुरम्यगानीं
तूं काव्यकलेंतुनि ओतिं समुन्नतिजीवन ! २
तूं गीता, ज्ञानेश्वरी नि गाथा गासी
हो वाणी निवृत तेथ रंगुनी जासी

मरुवनेंहि नंदनवनें कृपेनें करिसी
तव निरंकुशाचा प्रभाव येवो दिसुन ! ३
तूं मजुर–शेतकरि–कामकन्यांमधिं जासी
अभिनवा चारुता त्यांच्या जोवनिं देसी
श्रमजीवी अमुची त्यांची एकच राशी
गुरुजनावरी करिं कृपा देवते, म्हणुन ! ४
संक्रीडनचेतनरंजनादि संपूर्ण
तव कार्य चालतें नाना क्षेत्रांतून
हें हेंच आधुनिक शिक्षण कथि गर्जून
तूं उत्तमोत्तमांतील शिक्षिका म्हणुन ! ५
हें स्वयंप्रभेचें सक्रिय शिक्षणशास्त्र
तूं सुरम्य करि हें अमुचें शिक्षणक्षेत्र
तो सुदिव्य नांदो मानवता जगतांत
दे तिला भूषणें उत्तम उत्तम सुगुण ! ६
होऊं दे शिक्षक उत्तम पालक आतां
होऊं दे पालक उत्तम शिक्षक आतां
ये घरांत शाला, शाला मंदिरिं गृहता
होऊं दे बालक सन्मानव संपूर्ण ! ७

दि. २१–७–४५

---

## :५: तिथें पहारा करिं मी इमानें............ [उपजाति]

या बालका शिक्षण द्यावयाचें । प्रभूकृपेनें मज काम आलें
सर्वस्व वेंचूनि तें मी करीतों । तें निश्चयें पाहिजे चालवीलें १.
जे जे कुणी वैभवशालि झाले । प्रारंभि तीं सर्व बाळेंच होतीं
पुण्याई त्यांना बहु थोर लाभे । उत्कर्षमार्गीं तयां तेच नेती. २
थोरांत आनंद जो थोर होई । तो शिक्षणीं बालकांच्या मला ये
बालाविना अन्य न मन्मनांत । सदा तयांच्या मनिं मीं वसावें. ३

द्यायास बाळांस सुनीतिविद्या । स्वभाव माझा बहुमोल झाला.
यथार्थ संगोपिन लाभलेला । माझ्या तपानें मज तो मिळाला ४
नैराश्य, वैरस्य नी रुक्षता ती । वाटे जनांना जरि येथ कोणां
प्रशांतचित्तीं सुविचार होतां । दिसेल आनंद इथें तयांना ! ५
भूमंडळीं जेथ चांचल्य आहे । तिथें सुखाचा नच वास राही
अहो, मनें रंगति थीरतेंत । तीं रंगतां सर्वच मोददाई ! ६
या बालकीं जे गुण बीजरूपें । ठेवी प्रभुजी अपुल्या करानें
त्यांच्यामध्यें सद्गुणवृद्धि व्हावी । तिथें पहारा करिं मी इमानें ७
इमान हें जागृत राहुं द्याया । समर्थता दे मज देवराया,
तीही मिळाया मजला सुमानें । तिथें पहारा करिं मी इमानें ! ८
दि. १८—१—१८

: ६ : उद्यानाधिपति............ [साधी]

करि अहंकार गार । विलसत विनय शरण
सुमन जणुं गगन ' मालाकार ' ।। ध्रु० ।।
लावितो महोद्यान बिजांना
घेई तिथें तनयातनयांना
फुले पान । नसे वाण । तेजदार । होई फार
वसंत तेथें अवतारे हो
जनता ते जगतीं या बोले 'पुण्याकार' ! १
वारि दे सरल विमल मनानें
पुष्ट करी तो सुविचारानें
आपोआप । नासे ताप । ज्ञानलोचनीं । दीप्तिभार
नाचे उमले कलिका मोदें
बहर दिसे मधुरवेंचि । गुंजे जयजयकार! २
संकटें सहज दूर करावीं
शक्ति तशी अभया विभवी ही

लावी वाढ । फाही पाड । जनता धार । प्रेमोदार
देती सुफलें जनतीं भारी
सौख्य गमे; जन मनांत ध्याती वारंवार ! ३

दि. १९२०

---

## : ७ : शालागीत ............... [मंदारमाला]

१

ही वंदनीया असे नित्य शाला, असामान्य हीची असे थोरवी
सन्मंडलाकार तेजःकिरीटा, धरी हीवरी राष्ट्रतेजोरवी
निःस्वार्थक्षेत्रीं हिचा जन्म झाला, गुणीं लोककल्याणही भूषवी
नव्याजुन्या चांगल्यांची धनीही, म्हणूनी हिची संस्कृती होनवी

२

ज्ञानावरी सक्त येथील सारे, सदा वर्षि ही येथ सन्मंगलां
छात्रांगुरूंना म्हणा वत्सधेनू, हिच्या अंतरंगांत ही प्रेमला
आकांक्षिण्याला इथें न्यून नाहीं, यशस्वी महा हीस आहे प्रथा
आम्हां तरी भक्तिचें स्थान झाली, हिची वाढवूं थोर संपन्नता

३

देती अम्हां जन्मदाते शरीरें, अम्हां देइ चारित्र्य शाळा गुणी
संगोपिती शैशवीं जन्मदाते, पुढें सर्व शाळा करी शिक्षणीं
ही थोर हो जन्मदात्यांहिपेक्षां, करी स्वावलंबी अम्हां पूर्णही
चारित्र्यसत्तेज अर्पी अम्हां ही, म्हणोनी महावैभवीं ठेवुं ही !

दि. १७—३—३४

---

## : ८ : नको मारूं रे !........... [ साधी ]

नको मारूं रे । नको मारूं रे
कोमल बाळाला नको मारूं रे ॥ध्रु०॥
नको मारूं रे । नको मारूं रे
कोमल गालीं त्या, नको मारूं रे

कोमल गालीं त्या । कोमल गालीं त्या
भावी सुखाचा, वारा वाहि रे ! १
नको मारूं रे । नको मारूं रे
कोमल हातीं त्या, नको मारूं रे
कोमल हातीं त्या। कोमल हातीं त्या
कला–देवीची, वस्ती पाहीं रे ! २
नको मारूं रे । नको मारूं रे
कोमल पाठीं त्या, नको मारूं रे
कोमल पाठीं त्या । कोमल पाठीं त्या
यशो–राशींची, दैवी भूमी रे ! ३
नको मारूं रे। नको मारूं रे
कोमल मस्तकीं, नको मारूं रे
कोमल मस्तकीं। कोमल मस्तकीं
मनोबुद्धीचे 'शशीभानू' रे ! ४
गंगायमुना । गंगायमुना
सत्वर धांवती, त्याच्या गालीं रे
तूझी क्रूरता । तूझी क्रूरता
धिक्कारूनीया, पुढें जाती रे ! ५
कोमल देहीं रे । कोमल देहीं रे
प्रफुल्ल जाहल्या बागा पाहीं रे
छबी तयांची । छबी तयांची
धुवुनि चालली, आतां सारी रे ! ६
तूझें गाजूं दे । तूझें गाजूं दे
संपूर्ण बल तें रणीं भारी रे
इथें प्रेमाचा । इथें प्रेमाचा
तुझा जिव्हाळा सदा जागो रे ! ७

ओ. न. स्थळप्रत.
२०२५८ वि. काव्य ११
९३३०. नों. दि. २२/११/५४



पितामाता तूं । पितामाता तूं
गुरुजीदेवही त्याचा होसी रे
दया–सिंधु तूं । दया–सिंधु तूं
तूझ्या लाटांनीं, त्यासी खेळे रे ! ८
तुला क्रूरता । तुला क्रूरता
विचित्र वाटते मला सारे रे
गुरुजी राहीं तूं गुरुजी राहीं तूं
गुरूंपण तूं घेऊं नको रे ! ९

दि. १–५–३४

---

## : ९ : माझी श्रीशारदा........ [श्यामला]

श्रीशारदा ही देवता—विद्याकलांची स्वामिनी !
ती संचरे विद्यालयीं—मोरावरी या बैसुनी ! १
विद्यालयाचा भव्य हा—तो मोर तीला शोभतो
ही लोकवस्ती, बाग ही—उल्हास वायु वाहतो २
जें रम्य भासे हो, वनीं—तें रम्य आतां या स्थळीं
विद्येमुळें हो, भासतें—नाहीं प्रमोदाला खळी ! ३
सृष्टींत जें मधुगुंजन—तें बाळकंठीं गायन
पक्षीगणांना, बालकां—तीं किलिबलें, कोलाहल! ४
नानागुणांच्या श्रेणि या—ते चंद्रकांचे चंद्रक !
केकी पिसारा विस्फरी—जो दिव्यदिव्योत्पादक ! ५
केका शिखी तो केकतो—सौंदर्यधन ज्या लाभ तो
बोले तुऱ्यांची मंजरी—'अध्यापकां' मी घे शिरीं! ६
श्रीशारदा पाठीवरी—आरूढ झाली सुंदरी,
तीं पाऊलें तरि नाचरी—झाली शिखीला साजिरी ! ७

तें शुभ्र जैसें चांदणें—ती नेसली शीलांबर,
ते कंचुकी, हे नम्रता—त्या सुंदरा अंगावर ! ८
रत्नाकरानें वांछित—विद्वद्गुणानें मंडित,
त्या यत्नगुंणि, रत्नावली—पदव्या गुणी संभूषित ! ९
जो राजशाही टोप तो—ते ग्रंथसंपत्ति इथें
त्या कुंडलांच्या मंडनीं—तें तत्त्वमंडल डोलतें ! १०
हो सद्गुणांचीं तीं फुलें—जीं भूषवीती कुंतल,
भालीं सुमंगल कुंकू तें—जें ज्ञानजिज्ञासाबल ! ११
तें ज्ञान नी विज्ञान हे—त्वन्नेत्र भानू चंद्रसे
चाफेकळीशी नासिका—सत्यं शिवं नी सुंदरं ! १२
त्या श्वास निःश्वासास्तव—हें जीवनाचें वास्तव, !
दे स्वार्थता–निःस्वार्थता—तूझें असे ओष्ठद्वय ! १३
तेजःशलाका तूझिया— विश्वांत साऱ्या धावती
कार्यें तिथें जीं चालती-त्यांचीं न कोणाला मिती ! १४
गृहगोल नी तारागण—आकाशगंगाशोधन,
सिंधूतलाला स्पर्शन—पाताल–भू–संचारण ! १५
हो मारुतीं आरोहण—दावानलीं संमेलन,
विद्युत्सवें संक्रीडन—अध्यात्मतेचें चिंतन, १६
ऐशा कृती आंदोलती—तेजांत तूझ्या हें खरें !
भालप्रदेशीं गुंगती—तेजाळलेले भोवरे ! १७

* * *

ते पाठ नी पाठांतरें—प्रश्नोत्तरांचीं दर्शनें
तूझ्या मुखाचीं भूषणें—ते धन्य ज्या हें ऐकणें ! १८
नाना कलांचीं साधनें—तीं त्वत्करींचीं कंकणें
तूं गे, कलांची स्वामिनी—यत्नाग्रशांच्या सद्गुणें ! १९
पायीं तुझ्या हे लोटती—त्वद्भक्त विद्योपासक
ते हंस त्या पादांबुजीं—त्यां ज्ञान हें गंगोदक ! २०

त्यांचीं बलें संगोपुन—उल्हास दे उत्कर्षुन,
दे स्फूर्तिनें त्या भारुन—आयुष्यमार्गीं फेकुन ! २१
आकांक्षिण्या दे हृद्रथ—आकाशगामी धावते,
ठेवूनि माथे उन्नत—स्वातंत्र्यघेते झुंजते ! २२
यावी अशी मानोन्नति—व्हावें जिनें सर्वोन्नत
जें वांछिती तें हो घडे—वाजोत त्याचे चौघडे ! २३

* * *

झालीं पुरा नी होतिही—तीं ज्ञानभांडारें खुलीं
होतील हो कालास हो—बांधी न ती सीमावली! २४
कालास नाहीं अंत तो—ज्ञानास नाहीं पार तो
कष्टाविना ज्ञानार्थि तो—ज्ञानाकडं नच धावतो ! २५
त्याचीं बलें मर्यादित—विघ्नें यशोमार्गावरी
आयुष्यही हें भंगुर—तूं मात्र गे, सर्वेश्वरी ! २६
सर्वेश्वरी सत्तेवरी—त्या मात कोणी ना करी
होईलही ऐसें नसे—कौमार्य तूझें सत्यसें ! २७
निर्जीतसें सामर्थ्य घे—ज्या साधनीं संप्रसूती
ते भक्त तूझी संतति—तूं पुत्रकन्यावत्सल ! २८
भक्तप्रणाली निर्मुनी—तूं नित्य चालू ठेविली,
या कार्यसातत्यें तुझी—अक्षय्य झाली मातृता ! २९
कौमार्य नी तें मातृता—संमेळ यांचा पाहतां
ते देवदेवी शुद्धता— वाखाणिते त्वत्पात्रता ३०
ही भाग्यखाणी शारदा—ही प्रेमला सन्मंगला !
मीं जाणली; ती गावया—हा जीव माझा रंगला ! ३१

* * *

[अनु०] माझी श्रीशारदादेवी, भव्य अर्थी अशी महा
कशाला गोड बंगाल ! अर्थ साधासुधा पहा ! ३२
अध्यापनाध्ययनांनीं शालामंदिर शोभते,
गुरु-शिष्य इथें सारे शारदेचे उपासक ! ३३

अभ्यासें लाभते विद्या विद्येनें सकला कला
कलांनीं संपदा येई, संपदा सुखदायिनी ! ३४
विद्या दे बलसंपत्ती पराक्रम करावया,
पराक्रम पुजायाला स्वयें संपत्ति धावते ! ३५
तपस्येनें मिळे विद्या संपदा साहसें मिळे
तपस्यासाहसक्षेत्रीं नांदे विद्यासुसंपदा ! ३६
मुळीं वैरिणी नाहीं या श्रीलक्ष्मीश्रीसरस्वती
चांचल्यालागि लक्ष्मीच्या शारदा जाणते पुरी ! ३७
शारदेची कृपा देते महोत्कर्ष अम्हां जनां
माथा पदीं तिच्या वाहूं—वाहूंही शतशःसदा ! ३८

* * *

## ....शारदावंदन....

वंदन तुज सतत असो देवी शारदे,
भक्त-जनां सुलभ सदा ज्ञानसंपदे ॥ ध्रु० ॥
अन्यांचें भजन वितरि सुख न जन्मि या
सुखद आणि सुलभलाभ भजनि तुझिया
तव दया न देइ लाभ जगति तो न या
विफलजन्म होत तुझीं विसरतां पदें ! १
नच नश्वर पार्थिवांत वास तो तुतें
त्यावरि परि तव सत्ता सुचिर नांदते
मानस-भू ती स्वतंत्र तुज स्वतंत्रते !
आक्रमणीं अधिराज्ञी तूंच मी वदे ! २
वीण्यावरि तारामय विविधवाङ्मया
चलित काढण्यास सुरा अंगुली तुझ्या
तल्लिन करि मधु-निनाद तो जगास या
साहित्यप्रेमी-जन-मयुरनृत्य दे ! ३

द्वंद्वाच्यारहित सदा तव कला छबी
लक्ष्मी त्यावरतीं संपदेस वर्षवी
ती कलार्थ तुजसि मैत्रि सुचिर नांदवी
उत्तमता विरोधास कधिं न ठाव दे! ४
जलविहीनमानसभू-प्रदेश भव्य हा
आकांक्षा पिकविण्यास सज्ज तो पहा,
दयामेघ ओतिसि तूं त्यावरी महा
विविध, रम्य, उच्च, युक्त तोंच वाढ दे! ५

दि. ९-२-४६

---

## : १० : चैतन्यरूपसंपदा.... [केशव]

बाग जगाची मनुजजाति ही लता तिथें लागली
महीला व्यापुनि फोफावली!
तिची सदाशा जणूं फुलें हीं तीवर बहु बहरली
असे ही बालबालिकावली
ही तर अपुली महाशक्ति हो, भावी कालांतली
पाहिजे आपण संगोपिली
या विषमजगांमधि समता आणावया
तें स्वतंत्रतेचें द्वार मुक्त व्हावया
त्या मानवधर्मा जगिं नांदवाया
देव चालते, देव बोलते, देव मानवांतुनी
निर्मुं या आपण हो, बहुगुणी
ही यास्तव अपुल्यापुढें असे चैतन्यरूपसंपदा
यशाला आणिल जी निजपदा! १
भव्य-दिव्य-कल्पना पूजितों चैतन्याच्या भल्या
जडाजडिं असति आरोपिल्या

त्या-त्यापरिच्या सिद्धी दिसती मानवास लाभल्या
तयांचा अनुभव आहे दिला
सुदिव्य ठेवे चैतन्याचे पुढती तर हीं मुलें
कलेला अपुल्या झाले खुले
हेतुपुरस्सर करूं देव हीं मुलें
जीं कल्याणांचीं निर्मितील सत्कुलें
ती कला विस्तरो विविध दिव्य सद्दलें
देव चालते, देव बोलते, देव निर्मुं या जगीं
करूं खरिखुरीच सुरभू-सुगी
ही यास्तव अपुल्या पुढें असे चैतन्यरूप संपदा
यशाला आणिल जी निजपदा ! २
देव चालते, देव बोलते, क्रांति देव निर्मिती,
ऋषि-मुनि त्यांस कुणी बोलती
पवित्र अपुली शिक्षणभूमी तपोभूमि जागती
ऋषिमुनिदेव येथ जन्मती
क्रियावंत अभ्यासक येथिल बुद्धिनिष्ठ नांदती
प्रचीतित कार्यों ज्यांच्या गति
ते नेते, द्रष्टे, शासक, संशोधक,
ते त्यागी, योगी, ज्ञानी, जनसेवक,
सन्मानव, रक्षक, चतूर इत्यादिक
संसृति जगिं उत्तमांत व्हाया जें जें आवश्यक
पुरवि तें शिक्षण उद्धारक
ही यास्तव अपुल्यापुढें असे चैतन्यरूपसंपदा
यशाला आणिल जी निजपदा ! ३

दि. ८—१२—३१

## .: ११ : आवाहन ....... [ अनुष्टुप्

[ शिक्षकसभेंतील गायनाकरितां ]

यावें प्राचार्य, आचार्य, मुख्याध्यापक आपण
क्रांति केली तुम्हीं मोठी शिक्षकीं मिसळोनिया. १
यावें उत्तेजना तैसें सन्मान्य पर्यवेक्षक
कविराज ! म्हणा आम्हां, रंगवा ! सगळे फळे २
सातयत्तायुता झाला सप्त-सागर–अंबरा
पसरा तैलवत् कीर्ती सर्व यत्तांमधूनिया. ३
साहित्याचे कुणी मित्र 'सहस्रकर' भासती
'ध्रुवतारा' दिसो आम्हां दिवसां येथ प्रेक्षकीं. ४
यावें यावें अहो, डौलें कथांतिल 'मतंगज'
लिहाव्या पटकथा तुम्हीं येऊं द्या सुंदरी कथा. ५
'नाटयमंडळ' येऊं द्या आणि ते 'कवि' 'गायक'
रसिकांनो, तुम्ही या, या ! भरवा रस गायनीं. ६
प्रशांत बाह्यरूपाचें 'चैतन्य अणुगोलक'
प्राण तुम्हीच कार्याचे करा पावन ही सभा! ७
आणि कोणी गुणी जे जे आणखी मंडळाग्रणी
स्वयंस्फूर्त सभे यावें, शोभवाया बहुगुणीं. ८
आकर्षक मनोहारी तुम्हां येथें नसेलही !
उपस्थितींत कल्याण मात्र माझेंच खास हो ! ९
पुरुषांनीं नये गाऊं, कुणी सन्मित्र बोलती
महिलांचा असे हक्क आम्ही ओरडणें फुका! १०
रडण्याओरडण्याचें माझ्या आईस कौतुक
साहित्यीं मी असें बाळ साहित्य–जननी तुम्ही ! ११
कोकिळेचा नसे सूर, कोंबडा आरवे परी
दोष दुर्लक्षुनी त्याचा भानू ये उदयाचलीं १२

अर्थाअर्थी न संबंध कुक्कुटाचा नि भानुचा !
मान्य नाहीं नि आहेही, फक्त आहेच सांगतों. १३
भरली मनि आकंठ, उत्कंठा कंठ नादवी,
भानुप्रेमप्रमोदानें होई संगीत–आरव १४
साधी परंतु काव्यांगी बघा, मत्कविता सुता
रंजवाया असे सिद्ध आज रसिक मंडळी १५
काव्यलीला मुदें नेती गृहस्थ गृहमंडना
संन्यासी–ब्रह्मचारीही संसारी होति वाङमयीं १६
रम्य वाणी श्रुती ऐको भावनोत्फुल्ल मानसें
विकासो कौतुकें नेत्र अंगीं आवेश संचरो ! १७
बोलणें, वाचणें, गाणें, रडें, ओरडणें म्हणा;
विरोही तें हवेमाजी काव्यगंधें भरो हवा ! १८
विशालांतःकरणानें अवधाना! श्रवणास ये,
विज्ञाप्ति ही तुझ्या पायीं नम्रभावें करीतसें ! १९
दि. २६–१–४६

## :१२: आम्ही कोण ?........ [सुनीत]

### ........माळी [१]

आम्ही कोण ? म्हणूनि काय पुसतां आम्ही असूं शिक्षक !
घेतों मासिक–शुल्क नित्य ! म्हणुनी बोलाल हो भिक्षुक !
व्याख्यानें, करितोंहि प्रश्न म्हणुनी, वक्ते न न्यायाधिश
घेतों वेत्र करीं, तशीच हजरी ! पाटील ना पोलिस !
ब्रह्म्यानें जनिली, विशाल नटली, जी सृष्टि विस्तारली,
चैतन्यें भरली, तयांतिल भली, जी शुद्ध त्या वाटली.
भांडारें सुमहार्ह व्हावि बलवान् तीं–बोलती बाल ज्यां
तीं ब्रह्मा अमुच्या समर्पित करी विश्वस्त! आम्ही तया

जन्मा घालिति बालकांस पितये, तैसेंच संगोपिती
आम्ही मानवता तयांत विभवूं, सामर्थ्य संपन्न ती
भावी कार्य सुभव्य सिद्ध करणें ऐशी मनीषा इथें
क्षेत्रीं पुण्य अशा तपें करितसुं ! दे पुण्य पर्णेहि तें
बालांकूर समर्थ होति इथले ते आत्मसंगोपना
माळी हो अम्हि लाडके प्रभुजिचे ! 'माळी'च आम्हां म्हणा.
दि. २६–२–४६

## ........राजे ! [२]

आम्ही कोण ? असें अजूनि पुसतां ! राजे अम्ही येथले !
सांगायास तुम्हां सुबुद्ध इथले आजे न का लाभले ?
पाहा ही हजरी ! पितामह, पिते, नी पुत्रपौत्रादिकां
ही सारी अमुची प्रजा प्रभु अम्ही, ज्यां राजनिष्ठा सुखा !
छत्री छत्र ! अम्ही स्वयेंचि धरितों, तो वेत दंडास्तव
सिंहासन खुर्चिचें, तिजपुढें तें मेज ! हें वैभव !
दर्बारी बसतात चूप अमुच्या धाकें; न मेंढचा तशा
बाजूला परिवेष–मंडल उभें आज्ञार्थ चारी दिशा
सत्तेला तर कायदे करितसुं ! चाहील दिल् त्या गुणां
सत्तारोधि 'ब्र' ही करील असल्या ती माय व्याली कुणा!
सत्तेचे अधिराज्य थेट कडच्या पर्यन्त त्या भिंतिच्या
सत्तामत्सर तो करील बहुधा सम्राटहि आमुचा.
राशीला अमुच्या सदैव वसलें दारिद्र्य–लक्ष्मीबल
शाळेचें अधिराज्य मात्र अमुचे निर्वैरमुर्वीतल
दि. २७–२–४६

## .......आमची शंका ! [३]

शंका एकदिनीं मनीं उपजली, झालों कसे शिक्षक ?
निद्रादेवि अम्हांस झोपवि; अम्ही निद्रासुसंशोधक !

वैकुंठीं ञणि पातलों नि शिरलों, त्या विष्णुच्या मंदिरीं,
राजांच्या निवडीस जेथ भरली चंडा सभा अंतरीं !
रांगेमाजि उभे सभेंत बघुनी राजेच्छुकांना तिथें
रांगेमाजि उभे अम्हीहि ! दिसली जागा बरीशी जिथें !
भाग्याचा गमला न वर्णुं शकतों ! मोठा प्रभावी क्षण !
सारे कां बघती अम्हां टकमका ! तें भान आम्हांस न
'आतां नाहिं जरूरि हो नृपतिची' पाटी झळाळे वरी;
वाटे कोसळली कुऱ्हाड नभिची ती आमुच्या हो, शिरीं !
भग्नाशा बघुनी, दयाब्धि भगवान् अत्यंत हेलावला,
झालें जाहिर राजवांटप नवें ! हो, कायदा नोंदिला.
आधारेंच तया अम्हांत विभुनें राजांश जो ओतिला
तो हा शिक्षकरूप घेउनि जगीं हो, वावरूं लागला !
दि. २८-२-४६

## ........लक्ष्मीचा संताप ! [४]

'वाऱ्यावारि अहो ! प्रभु प्रभुपदें देतात तीं फेंकुनी '
लक्ष्मी येइ सभेस वातमि अशी वाऱ्यावरी ऐकुनी
होती ती 'हजरी' स्वतां प्रभुजिची ! तेथें वदे देवि जे
टाळ्यांच्या गजरीं अम्हां न कळलें, आम्हीं मनीं जाणिजे
'शांती हो ! अवधान द्या' ञणि तिथें गेलेंहि उद्घोषिलें,
'विष्णू जें कमलापति कथित हो, तें पाहिजे ऐकिलें.
"देवी-संमतिवीण हें ! न तरि मत्सत्तेंत हो संकर,
देवी, मी उधळा ! उदार म्हण हो, भोळा न मी शंकर
सत्ता मीं दिधली विभागुन, मला साम्राज्यशाही नको
ऐश्वर्यी अधिराणि तूंहि करिं हें ! श्री, लोभ ठेवूं नको."
"छे! छे ! हा उधळेपणा प्रभुवरा, हें नांव काढूं नका
भिक्षापात्र गृहीं तुम्ही स्वकृतिनें ओढून आणूं नका."

दावोनी मतभेद, जाइ कमला ! ऐश्वर्य हो, कोठलें ?
  राजे आम्हि दरिद्रि ! विश्वजनकें जें वांटपीं निर्मिलें !
दि. १–३–४६

## ....बृहस्पतींचें भाषण ! [५]

राजे आणिक दैन्य ! जोडि जमली झालीच पंचाइत !
  विष्णूंना न खपे ! "गुरूंस म्हणती द्या येथ तुम्हीं मत !"
येतां ते पुढती, सभेंत पसरे तैं दिव्य विद्वत्प्रभा !
  आशाभानु जणूं धरेंतुनि वरी आला नि राही उभा !
बोले सद्गुरु "पार्थिवा वरिल हे तुम्हीं प्रभू निर्मिलें,
  आतां या नविनां अपार्थिव–जगीं हो, द्वार व्हावें खुलें.
विद्येचे सगळे प्रदेश विभु हो, यांच्या हवालीं करा !
  यांना वैभव हो, हवें ! तर तयां द्या, ज्ञान योगेश्वरा !
नाना शोध, कला नि कल्पित कृती, यांना असो भूषण,
  तेथें यद्विजयां विरोध करणें व्हावें नभा शक्य न !
होवो लक्ष्मिकृपा न वा ! न परवा ती क्षेत्रिं या माधवा!
  ऐसें येथ करा, जनांस नविनां त्यागी गुणीं रंगवा.
द्रव्याचा अभिलाष जे धरिति ते द्रव्यार्थि हो, नायक
  ज्ञानाचा अभिलाष यांत वितरो ज्ञानार्थि हे शिक्षक !"
दि. २–३–४६

## .......आमचें वक्तृत्त्व ! [६]

झाला गौरव आमुचा परि तया आम्ही न टाळी दिली,
  रोधाया गुरु भाषणास आमुची स्वारी उभी राहिली.
'बोले कोणी बसा' प्रभूच वदले 'बोला' 'अहो, बोलुं द्या.'
  "देवा, काय कथूं कथा पुढति हो, या सर्वसाक्षी–पदा
'आम्हां राजपणा विभो तुम्हि दिला, क्षेत्रें गुरूंनीं दिलीं
  लक्ष्मी वैभव देति ना ! गुरुजिनीं त्यागी मती बोधिली!

विश्वाधार तुम्ही ! रमाहि तुमच्या रत्नाकराच्या सुता!
येथें हे जमले पितात सगळे हो, नित्य त्या अमृता.
दैन्यानें अम्हि गांजलों! मनुजता आहे अम्हांला कशी ?
गेलीं कैक युगें तुम्हीं प्रभु अहो, केली नसे चौकशी!
लक्ष्मींना कळवा तुम्ही न अपुली दृष्टी दिली भूवरी
वाया जातिहि संपदा कितितरी पापांतल्याही घरीं!
लक्ष्मींना शिकवा स्वतां तुम्हि विभो, पावित्र्य सत्कल्पना
भिक्षापात्र अम्हांमुळें प्रभुगुणांमाजी चढे भूषणा! ''

दि. ४-३-४६

## ........आमचें वक्तृत्व ! [७]

'' राजे हो, कसले श्रमी जन अम्ही ! ठेवीतसां गौरवीं !
गावोनी स्तुतिसंगिता दडपितां दैन्याचिया रौरवीं !
आम्हां अन्न न वस्त्र तेंहि पुरतें दारें-घरेंही न तीं
कार्यें श्रेष्ठ सुपूर्त केलींत अम्हां, पाडूं कशीं पार तीं !
दैत्यीं, देविं नि मानवांत असती जे वैभवीं लोळती,
युद्धीं, यज्ञि नि भांडणांत अपुली जे संपदा होमिती,
वाया जात पहा ! अमंगलपणीं त्याची न कोणा मिती!
यांतूनी जरि अल्पमात्र मिळती, आम्हीं ठरूं भूपति! ''
दैन्यें घोर पुढें अम्हीं प्रकटिलीं, वेशीवरी टांगलीं,
दैन्यें जीं प्रभुंनीं न हो बघितलीं, नाहींतही जाणिलीं !
झाली सर्व सभा विसर्जित, अशी नाहीं कधीं जाहली,
साऱ्यांचीं हललीं मनें नि म्हणती ''वा ! तुम्हि हो, जिंकिली''
आम्हांला प्रभुंनीं प्रभावळिमधें तात्काल आश्वासिलें
विष्णू ते उठले! न कांहि वदले! मामंदिरीं धावले !

दि. ६-३-४६.

## ........ जाहीरनामा! [८]

विष्णूंनीं कमलेसह प्रकटिला जाहीरनामा नवा!
ऐका कांहि! जगावरी तर सुधा–वर्षाव,! जसा हवा!
"विश्वाच्या अधिराज्य दैन्य असणें विश्वास हें लांछन!
ऐश्वर्यी कुठल्या न राहि म्हणुनी गोडी अम्हांलागुन!
आम्हां कोषगृहे, हिरण्मयगिरी, रत्नाकराचा तळ
तैशी ही वसुधा कशास? असले ताराग्रहांचें बळ!
झालें हें तुमचें प्रदर्शन पुरें! वारी न दैन्या जगीं!
नाहीं सौख्य कुणां! नकोच भरती! यांची अम्हां वाउगी!
द्या, द्या! हें उधळून भूषण नसे 'श्रीमंत नारायण'!
भिक्षापात्र अम्हांस भूषण अम्ही 'निर्द्रव्य नारायण'!
राजे, छे! तर रंक! नांवहि नको! आम्ही असूं मध्यम
ऐश्वर्ये मिळूं द्या, श्रमांस! कवळो नारायणा उद्यम!"
जें जें अभ्युदयास पूर्ण रुचलें, त्या त्या गुणीं मंडित
भाग्याचीं वचनें अशीं कितितरी 'श्रीविष्णुचिन्हांकित!

दि. ८–३–४६

## .... स्वप्नभंग! [९]

झाली हो, जगतीं उधानभरती उत्साह–सिंधूवर
क्रांती उच्छ्‌वसितापरी सहज तो साधीत सर्वेश्वर
क्षेत्रें रक्षिति तेच सर्व ठरती खादाड हो, कुंपणें!
आतां धावत पातले प्रभुपुढें घालीत लोटांगणें!
आज्ञा त्या सुटल्या म्हणे, विभु "चला हो, देव, त्या भूवरीं
कल्याणीं प्रकटूं सुरांश अपुला! पूजा न घ्या यावरी!
सर्वांना सकलां गुणांत मिळुं द्या सन्मान्यशी उन्नति
तैशी तेथ असो सदैव समता–स्वातंत्र्य–पुण्यकृति"
हा! हा! साखरझोंप पार अमुची कोणी अहो, मोडिली

बाळें आलि शिकावयास ! आमुचीं दारेंच ठोठाविलीं !
झालों खिन्न आम्ही ! तरी शिकवणी घे देह हा जुंपिला,
नाहीं ऐकियला विभाग पुरता देवेश कार्यातला.
ऐशा स्वप्नसुखींहि रंजन जगीं आहे कुठें जीवनीं
नाना व्याधि नि ओढि वेढिति अम्हां जैशा महावैरिणी!
दि. १०–३–४६

## .......भेटीची आतुरता! [१०]

ये, ये येथ विभो! सुसिद्ध तर मी तुझ्या सदा स्वागता
झारी ही मम खापरी ! नच फुटो, रस्ता तुझा शिंपितां!
माझी आतुरता सरो न, मज जी रंगावलीच्यास्तव
उत्साहास फुलें प्रफुल्ल असती, जावो न तद्वास्तव!
अंधारांत उभा, निशा न सरली, नाहीं दिशा फांकली,
मन्नेत्रीं उभि राहिली, तर खडी ही प्राणदिव्यावली !
आशेचा तर सूर्य अंतरिं विभो, मध्यान्हि आला असे;
श्रद्धा आगमनीं जगत्प्रभुजिच्या ! हें का तुला ना दिसे!
झालीं कैक युगें ! तयांत दिसती योगी, मुनी, तापसी;
तुझ्या मार्गप्रतीक्षणांत रमती देवा, दिनीं नी निशीं
कोणाला प्रभु भेट तूं नच दिली! हें होय, रे! शक्य न !
भाग्याचीं प्रतिकें जगांत दिसती, तीं का ! फुकाची खुण
त्यांमाजी प्रभु मी असो, मज कृपासिंधू ! कृपा तूं करीं!
भेटीवीण नसे सुरम्य मज या कांहीं प्रभू भूवरी !
दि. १०–३–४६

## : १३ : थोर नाना गुणी........ ृवी]

[ज्याला शाळा हें रम्य घर व घर ही रम्य शाळा करण्याची सुंदर कला साधली आहे, तो उत्तम शिक्षक उत्तम पालक असतोच ! त्याला 'नाना' या घरगुती नांवानें जशी घरीं, तशी शाळेंतही संबोधण्याची गोड हौस—असल्याच इतर नांवांबद्दल आदर दर्शवून—भागवून घेतली आहें.]

१

कुठेंहि दिसला जरी गुण तुम्हां अणूच्यापरी
नगासम करावया प्रकटिली तुम्हीं चातुरी
कधींहि दिसलें न यामधि मुळीं मनोरंजन
कृती सबळ व्हावया, करितसां तुम्ही गुंजन १

अलौकिक असें जरी कथियलें न विक्षिप्त तें
असें सुकर, साजिरें, गुणनिधान वाखाणितें
म्हणोनि दिसती तुम्हांभंवतीं सद्‌गुणीं लोलुप
जलाभंवति राहती चिरसुखें जसे पादप २

तपोमय तनूमधें मन विशाल नी कोमल
कुशाग्र घटनाप्रिया वरि सुधी तुम्हां निर्मल.
सुकार्य करण्यास ती सतत चालना देतसे,
सदा प्रकट आपुली सुजन मूर्ति आम्हां दिसे. ३

तुम्ही सहज टाकिल्या लवकृपाकटाक्षांतुन
अचेतनहि मृत्तिका सहज पावतें कीं धन.
सचेतनहि धावती तर महोन्नतीच्या पदा
असें चरित दावितें तव कृपा महा संपदा ४

गृहींहि दिसतां तुम्ही सदय वत्सल, प्रेमळ
गृहींहि नसतां तरी सुगुण हे तुम्हां सोज्ज्वळ

हवेंचि सकला अशी मिळविली तुम्हीं मोहिनी
म्हणोनि म्हणती तुम्हांस तर 'थोर नाना गुणी!' ५
दि. ८-६-४०

## २

['नाना' कार्यनिवृत्त होतांना...... वहु असोत]

प्राध्यापक कुशल सुगुणि सुजन सद्गुरु
वंदन त्या 'नानाला आदरें' करूं ॥ ध्रु० ॥
शाळेचा विद्यार्थी चतुर व्हावया
झटलासी सत्कृतिनीं शक्य शक्य त्या
तूं पिताच! कर्तृत्वा जन्म द्यावया
देश उद्धरोत असे लाविले तरु! १
आकांक्षा तुंग विपुल विविध निर्मिल्या
उत्साहें सर्व दिशा मुदित ठेविल्या
उच्चांकीं सकलवृत्ति सतत रंगल्या
यत्कृपाच निर्भयता देइ संचरूं! २
क्रीडांगणि ज्ञानांगणि समसुरम्यता
स्वल्प-अल्प कार्य असो सम सुदक्षता
सान-थोर यांवरली समचि सदयता
लागलीच वत्सलता सतत वावरूं! ३
सहकारी अधिकारी एक रूपता
सुखि, दुःखि दाविलीस समचि वंधुता
परकल्याणावरतीं दिसत तीव्रता
बोल सत्य दाविलें 'दैन्य संहरूं'! ४
झाले बहु, होतिल, आहेतही महा
परि 'नानापरि नाना' सत्य एक हा
आकर्षि आणि किती सकल हा पहा!
वाटतेंच ही मूर्ती कधि न अंतरूं! ५

+ + +

[मालासमर्पण : सारंग, त्रिताल]

ध्या हा सुसत्कार नाना,
शिक्षक करिती अपूर्व माना ॥ध्रु०॥
जें जें कांहीं असेल ठावें,
रम्य करावें नी शिकवावें
विश्वास धरा । पाळूं वचना १
फुलें न हीं हो, या मालेचीं
मनें गुंफिलीं हीं मानाचीं
भेटाया जीं । अधीर आपणां २

दि. १७-४-४२

## : १४ : बलवंतवसतिगृह........ [गीति]

१

" ध्यावे शंभर रुपये, व्हावा उत्तीर्ण आमुचा बाळ
वर्ष वृथा नच जावें ! देत अल्प ! तरि गोड करुनि घ्याल !
नाहीं नका म्हणूं हो, जात न पैसा असा अनाठायीं,
बाळा वर्ष मिळे हा, लाभ लाभतो अम्हांस यापायीं;
आयुष्याच्या पुढतीं, किंमत कांहीं नसेच पैशाची
गेला, मिळेल पैसा ! गेलीं वर्षें पुन्हा न यायाचीं.
वर्ष असें हें चौथें ! एका यत्तेंत नांदतो बाळ
तळमळ अमुची होते ; हा तर खेळून काढतो काळ!
म्हणुनि विनंति करितों, आपण यावर्षि बाळुला तारा
द्रव्य आणखी मागा, परि गरिबावरि कराच उपकारा !
बघुं या पुढल्या वर्षी, बाळ कसा? तो करी न अभ्यास
आहे मी अन् तोही ! माझा असुं द्या, तुम्हांस विश्वास

किंवा सुरू करावी, शिकवणि अमुच्या तुम्हींच बाळूची
पगार सांगा नी घ्या, जमेल तेव्हां सुरू करायाची!
मदृड तसा न कांहीं, आहे मोठा चलाख हा बाळ
प्रतिकुल दैवच त्याला, म्हणुनी करणें तुम्हींच सांभाळ"

२

"छान काळजी घेतां, तुम्ही अपुल्या चलाख बाळूची!
सावध पालक तुम्ही! जरूर इतुक्या कशास तसदीची?
तथापि वर्षाकांठीं, वेळ अशी एकदांच यायाची
जबाबदारी मोठी! विना न तुमच्या कुणा कळायाची!
करा म्हणूनी आतां प्रथम तयाला तुम्ही बरे कपडे!
नाहींतर जायाचें पुढच्या वर्षींच लक्ष त्याजकडे
व्यायामास्तव धाडा, दूध तया द्याच रोज प्यायाला!
पैसा आहे तुमचा! बाळू तुमचा! कळोच आम्हांला!
वह्या नि पुस्तक पाटी, याची नसते कधीं ठिकाणीं ती
कोणी पोऱ्या नेमा, जो त्या लावील चांगली रीती!
परंतु अभ्यासास्तव, ठेवुं नका हो, कुणाहि पोराला
करुं द्या तो बाळूला! इलाज कांहीं न आढळे, याला
जन्म तुम्ही त्या दिधला, त्याच्यासाठीं न जन्मली वेळा!
तुमची वेळ तुम्हांला! वेळ तया का मिळेल पैशाला?
तुमच्यापाशीं असला पैसा उपयुक्त कारणीं लावा
विपरित मार्गें जातो, पैसा हा आत्मघातकी गांवा!

३

असल्या वक्र उपायें, अंक वाढला जरी इयत्तांचा
पण हा अक्षरशत्रू, बाळू राहिल असाच कायमचा!
गेला काळ पळाला, गेला तो काळ नाहिं यायाचा
कितीहि पैका ओता, मी पापाचा धनी न व्हायाचा!

तुमची महामनीषा, लेखी मजला लिहून जरि द्याल,
पुण्यच मानिन तें मी, जर ती तुम्हां तुरुंग दावील !
असल्या पापापेक्षां, जर त्याची काळजी तुम्ही घ्याल,
कर्तव्य खरें घडोनी, बाळू तुमचा खरा सुधारेल !
खरोखरी हो नसती, या यत्तांचे कठीण अभ्यास
परिशीलन शिकल्याचें, नेमें करितां मिळेलही सुयश
दक्ष राहुनी अडला! निश्चित ऐसें कधीं न होईल,
रजा नि आजारांनीं जेव्हां मागें बराच राहील
तेव्हां शिकवणि ठेवा, वर्गाच्या तो बरोबरी आणा,
राहो ती तात्पुरती! ती डौलाचा प्रकार नच माना!
असो, नमस्ते आतां! योग्य पथें यत्न तूमचा जावा
कल्याणार्थ मुलाच्या वदलों, त्याचा न राग मानावा"

४

"धन्य सद्गुरो, तुमची ! सद्गुणरत्नें जगांत दुर्लभ तीं
तुमच्या जवळीं असतीं, सत्पुरुषाची तुम्हीच हो मूर्ती !
विचार प्रांजल तुमचे, सत्य नि सुस्पष्टसे तुम्ही वदला
बारिक सारिक कळतें, तुम्हां मुलांचें, तसें न पितयाला.
जें जें कथिलें त्याचा, राग न आम्हां, तसा नसो कोणा !
राग न व्यापाऱ्याला, निस्पृहतेचा जसा तुम्हां बाणा !
पगार थोडा, असुनी! त्यावर ज्याचा प्रपंच हो, तरतो,
द्रव्या धिक्कारी तो, अव्यवहारी अम्ही तया म्हणतों.
निस्पृह तुम्ही मोठे ! लाभ तियेचा मिळोहि इतरांना
असतिल बाळूपरि जे, बाळूसह आपुलेच त्यां माना !
आतां लेखी देतों, खर्चासाठीं निधी तुम्हांपाशीं
मागासल्या मुलांची घ्याच काळजी तुम्हां हवी तैशी!
वसतिगृह तुम्हि काढा, बाळूला त्यामधेंच घ्या, पहिला

आणिक कांहीं सांगा, देइन मिळवुन पवित्र कार्याला.
लक्ष न येथें दिधलें, बिघडुनि जातील चांगलीं पोरें
अमुच्या वेळेपायीं, होइल त्यांचें वृथाच मातेरें.
तुरुंग अमुचा जावो ! आम्ही लेखी तुम्हांस हें देतों;
पुण्याचें फल लाभो ! यदर्थ घ्यावा तुम्हीच पैका तो
तुरुंग अमुचा गेला; शक्य न लेखें अम्हांस या येणें
तुरुंग तैसा जावो; या पोरांचा ! अशा उपायानें
अभ्यासाच्या कष्टें, शाला बाला तुरुंग कष्टाची
अभ्यासाच्या प्रेमें, होवो शाला सुखांत खेळाची!
हा घ्या लेख तुम्हांला, हुंडी तैसी दहा हजारांची
लागा सत्कार्याला, इथें उधारी कधीं न व्हायाची !
पैसा आणिक मागा, मिळेल तुम्हां जरूर त्या वेळां
मिळतो पैसा, देतों! वेळ न तैसा मिळेल देण्याला!
असो, नमस्ते आतां ! योग्य पथें यत्न तूमचा जावा,
माणुस सत्कार्याला शोधीला मी, न राग मानावा!

× × ×

बलवंताभिधानें हें । विद्यार्थि–वसतिगृह
लक्ष्मीरस्त्यावरी आहे । भव्यशी ती इमारत!
शिक्षक आपुला तेथें । आहे प्राचार्य निस्पृह
दानशूर–कृपादृष्टि । प्रसन्ना खेळवी सुखें!

दि. २०–१०–३०

---

## : १५ : गुपित उपमर्द........ [मुद्रिका]

१

होतों मी शिक्षक, इथें पुण्य–मंदिरीं
गुरुभक्ति मुलींची भारी—तशि मुलें लुब्ध मजवरी!

ती स्वयंस्फूर्ति उल्हास भक्ति पाहुनी
लडिवाळ हासरी वाणी—वाढवी हर्ष बहुगुणी
ऐशाहि ठिकाणीं चुकुनि आमुचा भला
उपमर्द गुंपित जो झाला—जरि हेतु न तो त्यांतला
मम एक सूचना तिथें नोंदिली असे,
'लिहुं नये पुस्तकीं ऐसें, सांगतों तुम्हां तें कसें?

२

मी सुटित एकदां वर्ग बघत चाललों
नव पुस्तक पाहुनि धालों—वाचीत तेथ बैसलों
तो वर्ग मुलींचा पुस्तक कुणि विसरली
जिज्ञासा शोधूं गेली—परि ओळ अशी दिसली
"हें पुस्तक कुमारि.." पुढिल पूढतीं बघे
जिज्ञासा वाढूं लागे—जैं प्रथम ओळ ही निघे
नि चौथ्या पानीं होति अक्षरें तर
जागा न पानि या फार—बघ पान तीस सत्वर
मी क्षणांत घेई धाव तिथें नंतर—
"छे! इथें कसें दिसणार—बघ ऐंशीव्यावरि खरं!
मी हसत वाचुनी तेथ जाइ भरभर
"चित्रें रे! पानीं फार—बघ शंभर पानावर"
मी आतुरतेनें धांव घेत त्यावर
नंतर त्या पानीं पार—मीं गेलों झरझरझर!
मीं 'समाप्तपदि' शेवटीं असें पाहिलें
"मूर्खा! तुज वेडें केलें—नांवानें माझ्या भलें
धरि रस्ता अपुला ठेवि पुस्तक तियं
रे! तुजला पंचाईत—सांगितली कोणी कथ?
जरि इच्छिसि करणें; अशी चौकशी करीं
मम पिता कथिल तुज सारी—मम नांवांतिल माधुरी!

× × ×

हें विनोद वच वाचुनि तिथें ठेविलें
जरि ओशाळुनि वाचीलें—परि हसुनि पोट दूखलें
ये विनोद चुटके नित्य मासिकीं पुढें
लेखन गुण तेथें वाढे——संस्कार इथें पण घडे !

३

मज नका विचारूं काय नांव तें तिचें ?
नाहीं तर व्हायाचें——मम झालें, तें तूमचें !
उत्तरें होउनी ठार ! फिरे मी घरा
जिरलों मी पूरा पूरा—कां प्रकार चोरूं खरा !

दि. ३–८–३१

---

## : १६ : शिकवणि करणें........ [फटका]

### १ पूर्वपक्ष

"शिकवणि करणें,
शिकवणि करणें ! शिकवणी करणें हराम हें
सरस्वतीच्या पुण्यमंदिरीं पापकृती हो, बरी न ही ॥ध्रु०॥
बालक ठेवुनि हो, अज्ञानीं जाळ्यामधिं पालक धरितां
पगार गंगार्जळि ठेवोनी, इतर धनावर कीं जगता
पगार घेउनि हो शाळेचा, झोपा वर्गांतरि घेतां
जागे होता शाळा सुटतां, शिकवाया धावत जातां! १
बालक गुरुगृहिं धावत पूर्वी, आश्रम होते जरी दुरी
परंतु आतां गुरुजी धावति, शिष्यगणांच्या घरोघरीं
सांदीपनिसा मान मागतां, नित्य करोनी लाचारी
मान राहुं द्या ! अवमानाचें पिशाच्च तुमच्या बसे उरीं २
पैशासाठीं शिक्षणकार्यीं होतो काळा बाजार
जनमनलज्जा कोळुनि प्याला ! कोणि न शिक्षा करणार

ठा... स्वल्पधन.
अनुक्र. २०२५४४ दि. ...३३
क्रमांक ९३३० नों: दि: २०/१०/५४



सुधारलेल्या नव्या युगांतिल अघोर ऐशी ही चोरी
अदंड राहुनि करि गुरुमाता, धन्य तियेची बहादुरी ! ३
इमान ठेवुनि शाळेमध्यें जरि केलें तुम्हि नित काम
नको शिकवणी ! परि दामाविण म्हणाल ना तुम्ही राम
लोभ तुम्हांला ओढित नेतो; ने तो पापी मार्गानें
वाइट वाटे ! फक्त सांगतों, सूज्ञा जादा नच वदणें !" ४

## २ उत्तरपक्ष

"थांबा, ऐका, तुम्हि सज्जनहो, शिकवणि करणें हराम नही
सरस्वतीच्या पुण्यमंदिरीं पुण्यकृती हो, ठरली ही ! ॥ध्रु.॥
शिकवणिचीही शक्कल नाहीं, कोण्याही गुरुमातेची
गरज असे हो, ही शिष्याची, नी पुरवी पालक त्याची.
घरेंच शाळा बनतील जेव्हां, तिथें चालतिल अभ्यास
मुळींच नाहीं शिकवणिची हो, जरूर कोणा मग खास १
व्यवसायी रत तुम्ही, तुम्हांला वेळ कशाचा या कामीं
इथें जन्मते 'गरज' सत्य हें, व्यर्थ दोषितां अम्हां तुम्ही
या गरजेवर शिकवणिचा हो, आला जन्मा संसार !
पालक–शिक्षक–सहकार्यीं या चोर न कोणी लाचार २
पंगू चाले, चल तो धावे, भरारी मारी जो धावे !
अनुभव झाला सूज्ञ म्हणोनी भजतो; शिकवणिला भावें
'झोंपा चालति' 'इमान नाहीं' असत्य तुमचा प्रवाद हा
सत्ता तुमची, शाळा तुमची, तुम्हि अधिकारी सत्य पहा ३
पैका आम्हां ओढित नेतो. 'गरज' गाडुनी बोलुं नका,
"प्रभावि तुमचें जाळें" बोलुनी, शहाणपण बळि देऊं नका !
पैकापैका तुम्ही बोलतां ! नको अम्हांला तो पैका,
परंतु आम्ही त्या पैशाला हवे, सत्य हें विसरूं नका ! ४

श्रम करणारा पैका घेतो; वृथा बोलतां या चोरी !
फुकटावारी ज्ञानशिदोरी मिळवा, बघुं या बाजारीं !
व्यवहाराचें तंत्र बदललें, सांदीपनिच्या पुरें कथा !
तत्सम आतां वागुं लागतां, गुरुजी जातिल मृत्युपथा ५
पुत्र तत्क्षणा, मिळे दक्षिणा, प्राण पातले यदा गळीं !
अशी उधारी दिवाळखोरी घेइल हो आमुचा बळी !
सोन्याची द्वारका जयानें दिधली अपुल्या मित्राला
ज्ञानानंतर महादक्षणा, त्याची ये गुरुचरणाला ६
परंतु मोळ्या शिरीं वाहितो, आधीं त्या गुरुजिच्या घरीं
तशापरीचे असती शिष्य कां ? बघा विचारुन घरोघरीं.
तशी भावना दिसेल आजहि, पद्धत गेली बदलोनी
'तुरुत दान तें महापुण्य'ही, पद्धत आली चालोनी. ७
गेलें वन तें, आले जन हे, गेलीं कंदमुळें नि फळें,
युष्मन्मन वन्हींत जळे का ? श्रममोलयुगीं हें न कळे.
पगार गंगाजळी न कोणा, नेत्रिमात्र गंगाजमुना !
दैन्यावरि घेउनी धावती क्षारोदक सिंचिण्यास ना ! ८
असह्य होती महावेदना ! श्रमवाव्या त्या परिश्रमें
स्वावलंबि या युगांत अमुचीं अंगें भिजती हो, घामें
ज्ञान घेऊनी तुम्ही संपदा खेचा त्याच्या बळावरी
आम्हि असावें मात्र भिकारी, कुण्या गांवचा न्याय तरी ९
कोण मागतो ती श्रीमंती भिकारपणही नको तरी
मध्यम स्थितिला हयाति लाभो,जीवन जगुं द्या बऱ्यापरी !
तें जगण्याला पगार अपुरा, प्रपंच व्याधी उरीं सुरी,
धरुनि शिकवणी, तोंडमिळवणी करितां होते वाट पुरी ! १०
प्राप्ति वहातुकवाल्यांचीही आम्हांपेक्षां कितितरी
अमोल ज्ञाना मोल न कांहीं, वहनाचें कां व्यवहारीं ?

हारामाचें द्रव्य कुणाचें घेणें आमुचें ब्रीद न ही
मात्र सांगतों शिकवणि करुनी, पैसा घेणें हराम् नहीं ११

## ३. फलश्रुति

[अनु०]

"क्षमा गुरो महाराज़, कळे वाणी रसाळशी,
दाम घ्या रोख हे आधीं, शिकवाया घरीं चला. १
ऊब येतां खिशालागीं प्रसन्न गुरुमाउली !
पालकाच्या घरीं आधीं, विजेच्यापरि धावली. २
पक्षकार वकिलांच्या, तैसा पालक शिक्षकीं
संचरतां यशःप्राप्ति, दाव्याला तशि बालका ! ३
विश्वासानें अशा वागे, पालक आपुल्या गृहीं
द्रव्यमासिक आधीं दे, मुक्त हस्तेंच शिक्षका ! ४
आणि सांगे प्रमोदानें, ज्याला त्याला स्वगौरव
"ठेविला मी मुलासाठीं, एक विद्वान् शिक्षक ! ५
सुधारे बाळ हा माझा, वेळीं सावध जाहलों
वाया गेलाच होता तो, आतां गेलीच काळजी." ६

* * *

बाळ यदा यथा कालीं, परीक्षोत्तीर्ण जाहला,
हायसें हो, पहा झालें, कुटुंबासह पालका ! ७
छान धोतरजोडा तो शालजोडीहि–देणगी,
संभावुनी गुरूंना दक्षिणा रुपये दहा ! ८

दि. २०–१–४६

## : १७ : नवलाची कथा....[ चाल : सुटी झाली ]

नवलाची कथा ही आतां मी कायम झालों ।।धृ० ।।
केश माझे काळे । श्वेतवर्णी झाले
मरणाचीं निशाणें हो, ही । मज त्याची पर्वा नाही. १
गेली उधानी लाट । ओहोटीचीच वाट
आतां अवसान भारी आलें । जरठाचे हो, दंड फुगले २
वर्षे बारा नि आठ । होति भीतिशीं गांठ
बिनकायम निमकायम होणें । माणुसकीस लाजिरवाणें ३
वर्ष संपे जेव्हां । धसका बसे तेव्हां
असे बाहेर माझा पाय । शोधि काळीज त्याचा ठाय !४
मला म्हणोत बरे । अधिकारी खरें
मरमर मरमर मेलों । चिता-चितेंतुनि मी आलों. ५
जन्म मृत्यूमधें । मृत्यु जन्मामधें.
जीवन्मृतावस्था मी ल्यालों । पुण्यवान म्हणुनि मी झालों.६
खोटें आजवरी । कायम नव्हतों तरी
सांगे मी हो अब्रूवाला । शेर माझा कायम झाला. ७
मेला आत्मविश्वास । झाला जीवननाश
आतां हरताळ नाशा घालूं । सिधे सिधे आयुष्यपथ चालूं८
ज्यांचा होतो मजूर । तेच माझे हुजूर
म्हणताती अध्यापक भाई । 'मुख्य' शब्दनसूं द्या-नाहीं९
आधीं जसा मी चोर । भाषा नाहीं शिरजोर
कायमवालेच मालक होते । आतां साऱ्यांचें एकच नातें१०
कर्तव्याच्या दौडी । आतां चढाओढी
त्यांत प्राण ओताया आलों । निर्घोर मी कारण झालों ११
साऱ्या पोटासाठीं । भल्याबुऱ्या गोष्टी
स्मरणीचे मणी या गांठी । आठवितां न कोणी कष्टी १२

होमिल्या मी आधीं । आयुष्याच्या संधी
आश्वासनेंच वारा प्यालों । गाण्यापुरता आतां उरलों १३
खऱ्या जगीं कुणा । नाहीं कायमपणा
तो दे ही संस्थावाली । प्रभुजीवर मातच झाली १४

दि. २९-१-४६

---

## : १८ : जाइं अशा देवळांत....[ ऊठ तुझ्या अंगणांत ]

१

जाइं अशा देवळांत-जें सर्वां मोकळें ।। ध्रु. ।।
धर्म-जाति-पंथातित । सर्व मान्य - पूजापथ
प्रेमानें चालतात—जयें देव तोषले. १
पूज्य सर्व धर्मग्रंथ । प्रेमें अभ्यासितात.
पूर्वग्रहनिष्ठान्वित-जेंथ कार्य चालले. २
मानव ही एक जाति । बंधुभाव मानिताति.
सद्भावां वधिताति-हृदय एक जाहलें ३
मानवता धर्म तेथ । सर्वहितीं स्वार्थ जेथ
व्यक्तिमोक्ष समाजांत-प्रेम दिव्य थाटलें. ४
निर्माया स्फूर्तिपंथ । एक, तसा क्रियावंत
अभिमानें मानोन्नत-क्षेम डोलुं लागलें ५
भाव तसा देव तेथ । सद्भावोद्भवच जेथ
दक्ष सकल पालनांत-सूत्र एक गोंविलें. ६
मति असो, मूर्ति नसो । चिन्ह असो ग्रंथ वसो,
परमपूज्य सर्व दिसो-देवरूप तें भलें ७
संचारे सर्वोन्नत । दैन्य-दुःख नाश घेत,
देवाच्या प्रसादांत-सुफल जेथ लाभलें. ८

विद्यांच्या मंदिरांत । हें सकल साध्य होत
स्वयंप्रभाच्या बिजांत–ज्ञान पूजना खुलें ९

२

अनु०—म्हणाया देवळें ऐशीं । शाळा स्थानेंच उत्तम
सर्व धर्मोपधर्मांच्या विद्यांचें हेच आश्रम १
ज्ञानभक्ति असे येथें, प्रतीकें नच कोणतीं
कार्यकारण -भावानें व्यवहारा इथें गती २
एक जातीच विद्यार्थी, विद्यार्थि भक्त शोभती,
भेदभावा नसे जागा समता येथ जागती ३
कर्तृत्वाचीं इथें बीजें, सद्भावा–सन्मतींतलीं
अप्रत्ययां नसे थारा, भ्रांति नांदे न या स्थलीं ! ४
सर्वेंद्रिय जाणती जें प्रत्यया जें सुसंमत
अभ्यासानें कळे जें जें ईश्वरी तें गुणान्वित ५
विद्यांच्या मंदिरांमाजी सामर्थ्यें हीं स्वयंप्रभ
बीजरूपेंहि नांदू द्या, देवा, हीं देवळें शुभ ! ६
ज्ञानदेव इथें देव, विद्यार्थी भक्त येथले
अभ्यास, विधि पूजेचा, प्रसादफल कौशलें ! ७
असो शाळा, महाशाळा, विद्यापीठेंहि कोणतीं
सारीं हीं ज्ञानदेवांचीं म्हणावीं देवळेंच तीं ! ८

३

" जुनीं देवळें पडति पाडिती, उभारूनी तीं नवीं करा
ज्ञानामृत, पानास्तव होतीं ! पूर्वीचा क्रम पुनः बरा ! १
परमार्थाचें ज्ञानहि असुं द्या, ऐहिक आतां तिथें असो
म्हणा देवळें किंवा शाळा, ज्ञान तिथें निर्भेळ वसो ! २
नवीं संचारावीं चैतन्यें, नव्या युगीं नाना सुगुणीं
पुनरुज्जीवन उत्तम हें हो, जुन्या देवळां नव्यापणीं" ३

दि. २५–५–४८

## : १९ : गुरुदेव........... [ अंधारामधि ]

गुरुदेव जगीं मानकरी । सत्यकथा ही धरी उरीं
म्हणोत कोणी वरुनी कांहीं । गुरु तद्हृदयीं राज्य करी १
चत्रकार घे कुंचलिला । मूर्तिकार घे टाकीला
अचेतनावरी कार्य तयांचें । सचेतनावरि गुरुजीला २
अचेतनाची कलाकृति । सुंदर झाली जरी किती
त्यांतिल गुण ते रंग शिलेचे । करतिल कधि कांही प्रगती ३
परि गुरुजींची कलाकृती । सतत राहते प्रगतित ती
जनास होते बहु उपकारी । अशी कलेची या महती ४
डोळस अंधांना करितो । स्वावलंबनें वाढवितो
मुके बोलवी, पंगु चालवी । चमत्कार हे दावीतो ५
करील शोधक सृष्टि नवी । बलशाली शासील मही
सुकर करिल हा व्यवहाराला । समाज सारा सुशील ही ६
हा सद्भावना पोशी । असद्भावनांना नाशी
सद्दल आणि सर्व शरिरीं । संवर्धी मानवतेसी ७
लावी विचार वल्लींना । देई सहानुभूति जला
निपजी नाना फुलां-फुलांना । गुरुदेवच जगीं खरा भला ! ८
मजूर तसा शेतकरी । इतर कुणीहि कामकरी
कमती नाहीं महत्त्व त्यांचें । गुरुदेवच तत्क्षेम करी. ९
ईश्वर जग निर्माण करी । सुखसंचय करि मनुज परी
हा ही विक्रम, गुरुदेव कृपा । गुरुदेव जगीं मानकरी. १०

दि. २२-५-४८

---

## : २० : पारतंत्र्य जरि देशास.... [अंधारामधि]

पारतंत्र्य जरि देशास। आम्हि न कोणाचे दास
गुलामगिरितिल शिक्षक आम्हां। म्हणणें चुकिचें हमखास ! १
नाहि सोडिल्या जरि शाळा। दिल्या न सोडूं जरिहि मुलां
दास्यशृंखला तोडायाचा। शिकवीला अम्हि त्या चाळा. २
ओस जरी शाळा पडती। दास्यशृंखला दृढ होती
प्रतारणा ती जन्मभूमिशीं। मोठी झाली हो, असती. ३
विद्यान्वित गुण या जगतीं। अतिशय मोलें वावरतीं
उच्चासनिं जी असते प्रतिमा। उठुनि दिसते सुभव्य ती ४
आम्हि न कोण्या पक्षाचे। विशिष्ट जाति न पंथाचे
ज्ञान आमुचें अम्हां जाणवी। आम्ही मानव जातीचे ! ५
अध्ययनांतुनि ज्ञानाचा। अध्यापनांतुनी त्याच्या
कल्याणाचें अमृत धावे। अनुभव अमुचा नित्याचा ६
सुविद्य केलें बालांना। स्त्री–पुरुषांना, तरुणांना
देशभक्तिच्या सुभव्यतेच्या। कांती दिधल्या त्या नाना ७
दिसती झाल्या ज्या क्रांत्या। होतिलहि नाना परिच्या
मुळांसि तर हो शिक्षक त्याच्या। बिया लावितो जागृतिच्या ८
अडकविलेलीं हीं शरिरें। सारें वरुनी दिसणारें
खेळत असते स्वयंस्फूर्तिच्या। स्वातंत्र्याचें मनिं वारें ! ९
बालमनीं तें संचारूं। देश आपुला उद्धारूं
दिव्य मनीषा सदा अम्हांला। आम्हि न 'केवळ पोटभरू' १०
चिंता अन्नावस्त्राची। जरुरीपुरती हो, अमुची
सर्वस्वी चिंता परि असते। देशा उद्धारायाची ११
आली स्वतंत्रता देशा। फार दिसांची हो आशा
सुफलित झाली प्रभुकृपेनें। अंत न अमुच्या उल्लहासा ! १२

दास न आम्ही इतरांचे । दास आम्हि या देशाचे
सकल पणाला लावुनि आम्ही । पांग फेडुं भारतभूचें १३

दि. २६–५–४८

---

## : २१ : गोड आशा.......[द्रुतविलंबित]

अजुनि रांगत बाळ दिसे, जरी
पुढति जाईल लंघुनिही गिरी.
सुतनु तोषवी आप्त गृहामधीं
सुकृति तुष्ट करील जनोदधी १

पण धरून शिशू अपुल्या करीं
तव सुसंस्करणीं नित वावरीं.
तव कृपेक्षण त्यावरि राहतां
शिशु समुज्जवल होइल वाढतां २

निपजि, सृष्टि लता–तरु–लेकरूं
तशि यथाक्रम वाढ शके करूं.
जरि फिरेल, तुझा कर त्यावरी
चरित दिव्य मिळेलच त्या तरी. ३

जरि हिरा करि, त्वत्कर कोळसा
दिसत हा बहु विस्मय जादुसा !
कर तिथें तव वापरतां भला
सहज येइल वैभव त्याजला! ४

जर नसेल, तुझें अवलंबन
तर मुलांमधि येतिल दुर्गुण
करि, कृपाच तुझी परिवर्तन
सहज येतील बालकीं सद्गुण ५

दिसति दुर्गुण आणखि सद्गुण
उभय नांदत वृत्ति मुलांतुन
बहुत दारुण दुर्गुण भंजन ६
कठिण त्यापरि सद्गुण–वर्धन

कठिण काम तुझ्या पुढलें असें
तव सुवर्तन साध्य करीतसे;
उठिव, तो शिशुवर्तनि तूं ठसा
तव करामत लागतसे कसा. ७

शिरिं सरस्वति नांदिव, सुंदरा
करिं कला वसवींहि शुभंकरा
सुबल सद्गुण दे शरीरांतरा
फुलिव बालगणीं असल्या धरा ! ८

[ शा. वि. ]

रक्षूनी गुरु–धेनु–आश्रम, तसें वाहूनिया सर्पण
पूर्वी सद्गुरुच्या कृपेंतुनि मुलें झालीं महाभूषण !
आला काळ नवा, मनोगुण परी घेऊन पूर्वीपरी
हीं बाळें तुज भोंवतीं सुविनयीं ! उद्धार त्यांचा करीं ! ९

दि. ३१–५–४८

---

## : २२ : पेठ, सदाशिवमधील गुरुजी.... [ प्रणयप्रभा ]

१

पेठ, सदाशिवमधील गुरुजी। भोकरवाडित जाती येती
कितिक दिसांची त्यांची रीती। एकच घाई एक लकब ती!
एक्या हातीं पुस्तक पिशवी। हातीं दुसऱ्या काठी बरवी
मार्गी रोखुनि डोळे चालती। पायीं धावाधावी करिती.
भोकरवाडित हरिजन वसती। त्यांना कोणी दलितहि म्हणती
दलितोद्धरणीं हे गुरु झटती। कलंक धर्माचा घालविती

विरोध आरंभीं बहु झाले । सहिष्णुतेनें साहुनि नेले
कच्च्या गुरुचे नव्हते चेले । माननीय गुरु अमुचे झाले.

*   *   *

फिरून सकाळिच जन उठवीती । स्वच्छपणाचें शिक्षण देती
स्वतां राबुनी कामें करिती । गलिच्छ हलकें कांहि न म्हणती
शौच कुपांपासूनि घरांच्या । गटारगल्ली रस्त्यावरच्या
बाजारादी पाणोथ्याच्या । स्वच्छपणीं नजरा गुरुजींच्या
भांडि घासणीं, धुणीं चालतीं । स्नानादिक कर्में जें होतीं
गुरुजी त्यांना स्वतां शिकविती । हौदावरही असे राबती
गुरुजी आघाडीवर पाहून । कार्य करी आबालवृद्धगण
हृदयदेवता गाई आंतुन । गुरुचरिताचीं स्तोत्रें रंगुन

*   *   *

विद्यामंदिर भव्य पटांगण । फुलवुन टाकी प्रौढबालगण
बलोपासना हो गुरुकडुन । मग विश्रांतित हो, मनरंजन
सहर्ष न्याहारीस्तव उठती । एका पंक्तित सारे बसती
गुरुजि तयांची सोय लाविती । पंक्तित त्यांच्या प्रसाद घेती
गरिब जनांना कुठली न्याहरी । गुरुजी व्यवस्था करिती सारी
भिक्षेंतिल धन येथ वेंचिती । कारण ही गरिबांची वसती !

*   *   *

विद्यामंदिर बालांसाठीं । स्वतां स्थापुनि, गुरु चालविती
दलितां गरिबांना शिकवीती । तया शाहणे करूनि सोडिती
शाळकरी शाळेंत रंगती । कामकरी कामावर जाती
त्यांची शाळा संध्याकाळीं । सोय गुरुजि ती करिती सगळी
दैन्यावरतीं सुमहौषधि धन । स्वावलंबनीं विद्यासाधन
सद्गुरुंना ये, हें दृष्टे, पण । प्रशांत कार्यी तरि दृढधोरण
भजन–कथा नी पुराण–कीर्तन । हें ही शिक्षणिं घेती साधन
सर्वांगिण उन्नति घे हरिजन । जाति रंगुनी सर्व शिष्यगण

व्यसनें सोडुन त्यांना गेलीं । गलिच्छता ती स्वच्छ जाहली
उद्योगांमधि पुरीच रमली । गुरुपुण्याई फळास आली
* * *

दर रविवारीं भिक्षा साधन । करिती गुरुजी आणिक गुरुजन
हरिजननिधि आणिती जमवुन । खर्चुन उद्धारिति तो हरिजन.
आधीं होती खरी परीक्षा । एकाकी गुरु मागति भिक्षा
त्यांची झाली कधि न उपेक्षा । यशस्वि कारण होति अपेक्षा !
नंतर गुरुजी नी गुरुराणी । सद्भाव नि नम्रताच दोन्ही
दान मागतां योग्य कारणीं । भिक्षा धावे स्वयंस्फूर्तिनीं
परार्थ ज्यांच्या प्रज्ञादिगुणां । येते भरती महासन्मनां
शिवे परिग्रह कधि न जीवना । भिक्षापति ते लखपति जाणा
* * * *

दर गुरुवारीं गुरु सद्भाषण । ऐकवि शाळेचें क्रीडांगण
जें हें चाले हरिजन-बोधन । आजवरी तें केलें कोणि न
* * * *

"एका मानव जातींतिल गण । होतों आपण सारे ब्राह्मण
जरूर तेव्हां जाति विभागुन । समाजोपयोगीं तें विभजन
वर्ण चार हे येती विकसुन । गरज निर्मि या मनुज न कारण
कालांतर हें टाकी विसरून । व्यर्थ भांडती नांवावरुन
कोण विचारी त्यांचें भांडण । कालच करि हें विशुद्धिकरण
यंत्रयुगाचें तांडव आलें । समाजरचनीं चालति हल्ले
घटक पाहिजे म्हणुनि सगळे । समाजामध्यें विलीन झाले
क्षत्रिय राजा पूर्वी अपुला । समाज राजा आतां झाला
धर्माला तो पालनवाला । संगोपुन चातुर्वर्ण्याला
बौद्धिक, भौतिक सर्वच संग्रह । ते तर सारे लोकपरिग्रह
इथें न कांहीं व्यक्तीसाठीं । सर्व झटूं या राष्ट्रासाठीं"
यापरि चालत गुरुसद्भाषण । भोकरवाडित हो तद्घोषण

अध्यात्माची बैठक घेउन । होतें मानवजातिस लक्षुन

* * * *

गुरुजीहृदयीं हरिजन वसतो । हरिजनहृदयीं तर गुरुमूर्ति
सदाशिव सदामान्य संस्कृती । भोकरवाडित गुरु नांदविती

* * * *

होता कांहीं हें संस्करण । करिति गुरुजि हरिजनोपनयन
श्रमी जाहले हरिजन बामण । कार्य गुरूंचें क्रांतिस भूषण

* * * *

पेठ, सदाशिवमधील गुरुजी । भोकरवाडित जाती येती
कितिक दिसांची त्यांची रीती ! एकच घाई लकब एक ती

* * * *

२

आणि पहा या आचार्यांनी । सवें चार त्या भगिनी घेउनि
फिरती हरिजन महिलाद्धरणीं । गुरुपरि गुरुजींच्या त्या राणी
अशिक्षित अशा हरिजन महिला । त्यांचा त्या आधार वाटला !
यांनीं स्त्रीगण भर्जन लाविला । सुधारुनी तो रूपांतरिला
योग्य शुश्रुषा, औषधपाणी । शिक्षण, शिवणें, विणणें, यांनीं
स्त्रीगण बनती समर्थ गृहिणी । गरीबींतही ये सुख फुलुनी !

* * * *

शिवाशिवीची क्रीडा गेली । उच्चनीचता समान झाली
विशाल संस्कृति एकच ठरली । जिच्यांत मानवता हो, भरली
आर्थिक क्षेत्रें खुलीं जाहलीं । हरिजन जाती तिथें मानिली.
योग्य तिला उन्नती लाभली । दैन्य राक्षसी मरूं लागली ।
स्पृश्यास्पृश्यीं मिळणी झाली । सदोष जातीयता पळाली
इतिहासाची स्मृति ती ठरली । गुरुपुण्याई फळास आली

* * * *

पेठ 'सदाशिव' मधील गुरुजी । भोकरवाडित जाती येती
कितिक दिसांची त्यांची रीती । एकच घाई लकब एक ती

* * * *

३

[अभंग]

" जरूरीला थारा दिला । श्रमविभाग त्याचा झाला
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य झाला । शूद्रास्पृश्य जन्मा आला
मनोबल–संसाराला । आला भर आरोग्याला
समाजाचीं बाळें सारीं । मानवसृष्टि ही गोजिरी
* * * *

उच्चनीच भाव सारा । अहंकाराचा हा वारा
त्याच्यांतूनी बीजें आलीं । समाजांत तीं रुजलीं
अस्पृश्यता तेथ आल्या । दृढमूल वेली झाल्या
समाजाही त्या व्यापीती । नानाविधा त्यांच्या जाती
* * * *

हिंदुधर्माचिया पोटीं । अस्पृश्यता आली खोटी
खोडकर खोटी भारी । भावंडांना ती धिक्कारी
ही तर मृत्यूच आपुला । झालों सावध टाळायाला
राक्षसीला मारा मारा । समाजाला तारा तारा "
* * * *

ही गुरुजींची अभंगवाणी । फला धावली प्रत्यक्षांनीं
चहुबाजूंनीं समाजांतला । अस्पृश्यपणा विरून गेला
लौकर पुढतीं एके काळीं । टोळधाड अतिनृशंस आली
स्पृश्य सलग जनताच घेरिली । अलग वस्तिची दूर राहिली
दूर जाति जो दूर राहिली । ती तर भोकरवाडींमधली
अलग दूर ती पळून गेली । टोळधाडिची रसद तोडिली !
रसद तोडली जर ती नसती । टोळधाड ती विजय पावती
धडगत कोणाची मग नव्हती । धडगत आणि हरिजन जाती!
पाय आपुल्या जे धर्माचे । उपेक्षिलेले आजवरीचे
अंतीं साह्या तेच धावले । जानू-बाहू-मुखां रक्षिलें

आंतून बाहेरुन हो हल्ला। टोळधाडिचा खिमाच झाला,
सुविजय चौवर्णिकां मिळाला । स्पृश्यांना अस्पृश्य भेटला!
रक्तांची बरसात जाहली । हरिजन रुधिरें त्यांत वाहिलीं
अमर एकिचीं चिन्हें दिसलीं । अभिन्न रक्तांतुनि तीं आलीं
स्पृश्यास्पृश्यांच्या रुधिरानें । मिळे भूमिला येथिल न्हाणें
तांबडमाती बोलत उठते । शंका त्याची कुणा न येते !
'सलग' 'अलग' ते सलग जाहले । मानवतेला पुजूं लागले,
अभ्युदयीं ते समान झाले । गुरुपुण्याई त्यालीं सुफळें

* * * *

पेठ, सदाशिवमधील गुरुजी । भोकरवाडित जाती येती
कितिक दिसांची त्यांची रीती । एकज घाई लकब एक ती
दि. ६–६–४८

## : २३ : तो पात्र सुस्वागता ....... [सुनीत]

क्षेत्रीं या नच येइं तूं मुळिच रे, त्या द्रव्य–लोभास्तव
या क्षेत्राविण अन्य ठायिं असतें ज्याचें सदा वास्तव
ज्ञानोपासन–कर्म चालत इथें अत्यल्पसें वेतन
येईं घेउनियां सवेंचि अपुलें तूं आत्मतुष्टी-धन !
द्रव्याशा तव भंग होईल इथें! येईल दुर्लक्ष तें
सत्कार्या इथल्या विनाश घडतां, तें कां हिताचें तुतें !
त्यापेक्षां दुसरीकडे स्वखुषिनें जाईं न येइं इथें
संस्थेचा करिं फायदा, करिं तुझा; ऐशाच जाईं पथें !
व्यापारा करी, सावकारि अथवा शेती करीं तूं सुखें
शाळेवीण कुठेंहि नोकरि करीं, लाभोत तीं टाउकें
येथें वाट तुझी चुकून वळली या रुक्ष शाळेकडे
विद्या आणि कला इथें बहरती; द्रव्या इथें वावडें!

ज्ञानानंद मिळेल ज्ञान मिळतां, वाढेल, तें अर्पितां
या लाभावरि येत जो! तर इथें! तो पात्र सुस्वागता
दि. ११-६-४८

---

## : २४ : अनाथ-विद्यार्थी- गृह.... [मार्धी]

करी उपकार फार। अनाथां सनाथ करि दीन बालांना
ही करिते भव-भय पार ।। धृ०।।

माता संस्था खरी असे ही
शिक्षण, रक्षण, भरणा वाही
या जगतीं। गरिबाती। उत्कर्षाचा पथ रचिती
सकल संकटें दूर सारुनी
सुशिल संवर्धन साधोनी। दे आधार १

आश्रय देती औदार्यानें
धनिकांचीं सत्पात्रीं दानें
या हिंदास। ऐश्वर्यास। चढवायातें धन वेचीती
जनकल्याणीं रत ते होती
त्यांची अक्षय होवो कीर्ती। प्रेमोदार. २

उद्योगाचें तें मंदीर
स्वावलंबनाचें माहेर
दारिद्र्यास। नाशायास। दे धंद्याची शक्ति खास
त्याची प्रगति भारी होता
आमुच्या मग हो, येइल हातां। दिव्यागार ३

पवित्र विद्यामृतपानानें
क्षात्रधर्मबल-चैतन्यानें

पोषी बाल । आशाकाल । पुरुषार्थाला पोषक ऐसा,
बालप्रगति सुखकर होई
संस्थामाता प्रेमें गावीं । वारंवार ! ४
सकल जातिना प्रवेश देते,
अंत्यज कल्याणीं ही झटते
सौख्याधान । नाहीं वाण । समतोलपणीं अक्षयि राही
लीन सदा ईशाच्या पायीं
सकल मुखें हीचा हो, होई । जयजयकार ! ५

—-१९२१

---

## : २५ : निर्दोष कार्यीतर........ [सुनीत]

येतें काय? सुधारितां कधितरी बाळा छड्या मारुन
वाटे, क्रूरपणा मला तर अती हा मानवा दुर्गुण.
मारानें शरिरास होति, अवघ्या बाळाचिया वेदना
त्यानें दोष कसे सुधारतिल, ही नाहीं मला कल्पना !
भीतीनें तर दोष सर्व अपुलें तुम्हांपुढें टाळिल,
मारानें भय निर्मितांच, ठरला येथें तुम्ही दुर्बल !
रोगाच्या वरला दवाच करितो, जो रोगसंवर्धन
वद्याचा तर दोष यांत दिसतो! हें स्पष्ट हो, कारण !
होवोनी तुमचें निदान भलतें हट्टा दिलें, औषध
दोषाला लपवावयास अपुल्या राहील, तो सावध
माराचें भय नष्ट होउनि पुढें होतो, निगर्घट्ट तो
होतो शिष्ट-विशिष्ट ! नी अवगुणां निर्लज्ज तो वानितो.
प्रेमाचा सहवास, औषध सदा हो, दोषरोगांवर
दोषां तें कळवी, मुलास वळवी, निर्दोषकार्यीं तर !

दि. १२–६–४०

## : २६ : असा काय केला गुन्हा....... [मंदारमाला]

असा काय केला गुन्हा बालकानें तुम्हीं मारिलें हो कशासाठिं त्या
तया या उपायें सुधारावयाच्या अघोरी मनीषेस सोडूनि द्या.
अशी दांडगाई मनाच्या प्रपंचीं नसे योग्य सारें तुम्ही जाणतां!
कुठें ज्ञान योजावयाचें कथा तें? प्रसंगीं न भानावरी राहतां.

२

अहो, काय सीमा न रागास कांहीं, जसा काय वेताळ संचारला!
क्षणामाजि बाळा सुधारावयाचा प्रतिज्ञा-विडा कां तुम्हीं घेतला.
नसो पूज्य शाळा तुरुंगापरी या, नका शिक्षकांचे बनूं वार्डर!
अहो, शांत व्हा शांत व्हा यांत आहे खरा लाभ धिम्मेपणीं तो तर

३

मला तळमळीनें असे बोलवीती, अहो, कोमलांगाचिये हे बळ.
अधिक्षेप वस्तू न ठावें जना या मनीं वाहि सद्भाव तो केवळ
अशा चेतना ठेवि घे नित्य शाळा, सुविश्वासुनी ठेविताती जन
तयांचें करूं फार नाजूक हातें, अनेक प्रकारें सुसंगोपन!

४

इथें पूर्ण वात्सल्य नी प्रेम नांदे तयांमाजि टाका तुम्हीही भर.
तुम्हांमाजि आहे तशी लायकीही मनःशास्त्रवेत्ते तुम्ही खंबिर!
प्रसंगां प्रसंगां परीक्षूनि घ्यावें, निदानास सामान्य घाला कर;
तिथें मार्ग लाभेल तुम्हांस दैवी, यशाचें तुम्हां श्रेय येवो तर!

५

तुम्हांला नवें क्षेत्र हें होय शाळा, तसे तुम्हि शाळेस आहां नवे.
मनासारिखें जाहलें नाहिं कांहीं, तरी राग येतो तुम्हांला जवें.
नका जाउं आहारिं रागाचिया हो, असो राग आहारिं तो तूमच्या.
तुम्हां लाभुं द्या भूमिका योजकाची, असा लाभ घ्या दुर्लभ क्षेत्रि या

ग्रा. क्र. ७२६३ ..... ५९

इथें काम धिम्मेपणा–शांतिचें हो, इथें काम नाहीं मुळीं सक्तिचें
गुणा संक्रमावें क्रमानें क्रमानें, असावें अशीं चीज त्या व्हायचें !
अहो, खेळ हा चेतनायुक्त ओल्या असे मातिशीं, तुम्हि ध्यानीं धरा
जरी होय तुम्हांवरी सक्ति ऐशी, रुचे काय तुम्हां, विचारा करा.

७

नका राग मानूं तुम्हीं बोलण्याचा तुम्हां प्रार्थितों प्रार्थना मद्दल!
असें काय नाहींतरी हातिं माझ्या, तुम्हांसारखा एक मी दुर्बल!
अहो, दुर्बला राग-आवेग येती, मला प्राप्त झाला तिथें संयम
तसा प्राप्त होवो तुम्हां या प्रसंगीं, मिळो संयमानंद तो मत्सम.

८

म्हणों राग येणें अहो, मानवांच्या दिसे दुर्बळामाजि हें लक्षण.
न थारा जिथें युक्त त्या युक्तिवादा, तिथें मोहसंभ्रांतिधीभ्रंशन
अधःपात हा थोर टाळावयासी, असो धोरणें तीं सदा खंबिर;
सदा शांत चित्तांतुनी जन्मती तीं, बहिष्कार टाकाच रागावर !

दि. १४–६–४८

---

## : २७ : नका सांगु कांहीं....... [ चंद्रकला ]

१

नका सांगुं कांहीं–करूं द्या धडपड बाळाला
पूर्ण संधि द्या त्या–घ्यावया तद्यशसौख्याला
मार्गावरि त्याला–ठेवलें पुरें एवढेंच
चळों न तेथुनिया–म्हणूनी लक्ष असूं द्याच.
वळतां बाजूला–इशारुनि मार्गीं आणावा,
मागें जर पडला–जरासा त्या आधारावा.
अडला जर कोठें–अडयळा दुरुनि दर्शवावा,

## : २६ : असा काय केला गुन्हा....... [मंदारमाला]

असा काय केला गुन्हा बालकानें तुम्हीं मारिलें हो कशासाठि त्या
तया या उपायें सुधारावयाच्या अघोरी मनीषेस सोडूनि द्या.
अशी दांडगाई मनाच्या प्रपंचीं नसे योग्य सारें तुम्ही जाणतां!
कुठें ज्ञान योजावयाचें कथा तें? प्रसंगीं न भानावरी राहतां.

२

अहो, काय सीमा न रागास कांहीं, जसा काय वेताळ संचारला!
क्षणामाजि वाळा सुधारावयाचा प्रतिज्ञा-विडा कां तुम्हीं घेतला.
नसो पूज्य शाळा तुरुंगापरी या, नका शिक्षकांचे बनूं वार्डर !
अहो, शांत व्हा शांत व्हा यांत आहे खरा लाभ धिम्मेपणीं तो तर

३

मला तळमळीनें असे बोलवीती, अहो, कोमलांगाचिये हे बळ.
अधिक्षेप वस्तू न ठावें जना या मनीं वाहि सद्भाव तो केवळ
अशा चेतना ठेवि घे नित्य शाळा, सुविश्वासुनी ठेविताती जन
तयांचें करूं फार नाजूक हातें, अनेक प्रकारें सुसंगोपन !

४

इथें पूर्ण वात्सल्य नी प्रेम नांदे तयांमाजि टाका तुम्हीही भर.
तुम्हांमाजि आहे तशी लायकीही मनःशास्त्रवेत्ते तुम्ही खंविर!
प्रसंगां प्रसंगां परीक्षूनि घ्यावें, निदानास सामान्य घाला कर;
तिथें मार्ग लाभेल तुम्हांस दैवी, यशाचें तुम्हां श्रेय येवो तर !

५

तुम्हांला नवें क्षेत्र हें होय शाळा, तसे तुम्हि शाळेस आहां नवे.
मनासारिखें जाहलें नाहि कांहीं, तरी राग येतो तुम्हांला जवें.
नका जाउं आहारिं रागाचिया हो, असो राग आहारिं तो तूमच्या.
तुम्हां लाभुं द्या भूमिका योजकाची, असा लाभ घ्या दुर्लभ क्षेत्रि या

वा. क्र. ६२६३

इथें काम धिम्मेपणा–शांतिचें हो, इथें काम नाहीं मुळीं सक्तिचें
गुणा संक्रमावें क्रमानें क्रमानें, श्रमाचें अशा चीज त्या व्हायचें !
अहो, खेळ हा चेतनायुक्त ओल्या असे मातिशीं, तुम्हि ध्यानीं धरा
जरी होय तुम्हांवरी सक्ति ऐशी, रुचे काय तुम्हां, विचारा करा.

७

नका राग मानूं तुम्हीं बोलण्याचा तुम्हां प्रार्थितों प्रार्थना मद्दल!
असें काय नाहींतरी हातिं माझ्या, तुम्हांसारखा एक मी दुर्बल!
अहो, दुर्बला राग-आवेग येती, मला प्राप्त झाला तिथें संयम
तसा प्राप्त होवो तुम्हां या प्रसंगीं, मिळो संयमानंद तो मत्सम.

८

म्हणों राग येणें अहो, मानवांच्या दिसे दुर्बळामाजि हें लक्षण.
न थारा जिथें युक्त त्या युक्तिवादा, तिथें मोहसंभ्रांतिधीभ्रंशन
अधःपात हा थोर टाळावयासी, असो धोरणें तीं सदा खंबिर;
सदा शांत चित्तांतुनी जन्मती तीं, बहिष्कार टाकाच रागावर !

दि. १४–६–४८

---

## : २७ : नका सांगु कांहीं....... [चंद्रकला]

१

नका सांगुं कांहीं–करूं द्या धडपड बाळाला
पूर्ण संधि द्या त्या–घ्यावया तद्यशसौख्याला
मार्गावरि त्याला–ठेवलें पुरें एवढेंच
चळों न तेथुनिया–म्हणूनी लक्ष असूं द्याच.
वळतां बाजूला–इशारुनि मार्गीं आणावा,
मागें जर पडला–जरासा त्या आधारावा.
अडला जर कोठें–अडथळा दुरुनि दर्शवावा,

उत्तेजनि तुमच्या–तयानें तो ओलांडावा.
गुंतागुंतीचा–उकल तो त्यांतुनि साधावा,
श्रमपरि करण्याचा–तयाचा मार्ग खुला ठेवा.
सुप्तगुणांवरतीं–जागृति फुंकर घालावा,
गुणसंचय त्याचा–आपुल्या तेजें मिरवावा.

२

विचारील शंका–म्हणौनि तीं कधि न निस्तरावी,
प्रश्नांप्रश्नांनीं–निरसनीं गुरुकिल्ली द्यावी.
गुरुकिल्ली परि ती–त्यांतुनी स्वयंस्फूर्त यावी,
स्वयंशिक्षणाची–ज्योति ती उज्वल ठेवावी.

३

कंटाळा आला–विनोदें वेळ रंगवावी,
परि उल्हासाची–कळी ती उमलत ठेवावी.
विनोदींहि तुमची–सुशिक्षणकला दिसों द्यावी,
करमणुकीनें ती–कधींही दूषित नच व्हावी.
श्रमांतराची वा–तत्क्षणि युक्ती काढावी,
परि कंटाळ्याची–सावली तयावरि न यावी.
क्रीडेची वृत्ती–सारखी नाचत ठेवावी,
उद्दिष्टें अपुलीं–त्यांतुनी सहजच साधावीं.
विविध कलारुचिची–लालसा सदा वाढवावी.
अपुल्या कार्याला–सदा हक्कानें जुंपावी.

४

जाउन कंटाळा–धांवत येइल उद्योग,
चलनवलनतेचा–योग्य तो व्हावा उपयोग.
ठेकेदारीनें–मुलांचें नका काम घेऊं,
कष्ट, शीण, सक्ती–न यांचें दर्शन त्या होऊं.

सेवा तर त्यांची–कधींहि करायची नाहीं,
अध्यापन सेवा–मात्र तुम्हि भरपुर साधावी.
कमीच बोलावें–आणखी जास्ती शिकवावें,
जरा हळू बोला–लक्ष तर खेचुन आणावें.
वेंचक बोलावें–मुलांना जास्त बोलवावें,
कमी दर्शवावें–जास्त ते प्रदर्शून यावें.
कमी कृती तुमची–मुलांनीं जास्त विस्तरावी,
कौशल्यें तुमच्या–प्रसुप्ति सदा जागवावी.

५

कमरेला दोरी–लावुनी नदींत फेकीती,
दोरी लांबविती–मुलाला बरा पोहुं देती.
स्वावलंबि होतां–दोरी सोडुनीया घेती,
व्यवहारी युक्ती–सुशिक्षणकार्यीं योजा ती.
मांडीवरुनीया–जाहला सुटा जरी बाळ
संधि निर्मि माता–आपुला चालो वेल्हाळ
ती अपुल्या बाळा–चालवी पांगुळ गाड्यानें
फेकुन दे गाडा–बाळ जंव चाले वेगानें
अशाच युक्तींनीं–करावा स्वावलंबि बाळ
यांत विजय घेतो–सहज तो अध्यापनकुशल

*    *    *

स्वतां स्वस्थ असुनी–परांना करी प्रेरणांना
स्थितप्रज्ञतेच्या–दाखवा तुम्ही लक्षणांना
करुं द्या बाळांना–असा तुम्हि सुदक्ष बसलेले,
उपस्थिती तुमची–बनवुं द्या उद्योगी बाळें

दि. १७–६–४८

## : २८ : खरें कार्य आहे........ [ मन्दारमाला ]

१

खरें कार्य आहे बहू थोर याचें, करी क्रांतिची हा खरी जागृती
अहो, शांततेंतील सत्कर्म याचें, नगारे न त्याचे कधीं वाजती.
नहो वास्तपुस्ती कधीं जीवनाची, अहो कंठि आयुष्य निष्कांचन
चळेना कधीं थोर सत्कर्मबाणा, पदांलागि त्याच्या करूं वंदन

२

युगेच्या युगें कर्म हें चाललेलें, तयाचीं फळें चाखिती मानव
जरी कार्यकर्ता महाथोर हो, हा, तया विस्मृतीचें मिळे वैभव
असे लोभ त्या कोठल्या वैभवाचा जगामाजि तो हो खरा निस्पृह
अहो, कार्य कुंठीत होतांच त्याला खरें दुःख होतें महादुःसह !

३

अहो, आटवी घोर अज्ञानसिंधू, तिथें निर्मितो ज्ञानसिंधू महा
विशुद्धांतली प्रक्रिया सर्व याची प्रमाणाविना ज्ञान देई न हा
दुराचार सच्छीलतेनें दुरावी, करी मातिचें शुद्ध सोनें पहा
करी स्वावलंबी जनां शिक्षणानें, स्वतांची न आबाळ मानीत हा

४

न गाती कुणी कौतुकाचे पवाडे, न कोणी करी दूर दुर्दैन्य तें
नसे संगरांतील हा वीर मोठा, न या मानसन्मान नी स्मारकें
उरे नांव याचें कुठेंही न लोकीं, तनू पंचभूतीं मिळे शेवटीं
परी होय निर्माण यत्काव्यगंगा, दिसे वाहविल्यापरी वाहती ?

५

स्वतांच्या घरीं दैन्य अंधार याच्या, दुजांचे घडो भाग्यदीपोत्सव
सदा कार्य याचें असें चाललेलें, नसे या अपेक्षा मिळो गौरव
खऱ्या मायबापा परि कार्य याचें, नसे जेथ कांहीं अपेक्षाभव
अशा थोर निस्वार्थतेच्याच कक्षीं, असे सद्‌गुरूचें महावास्तव !

दि. २३–४–४८

स्थळप्रत.



२०२५५० वि. ३।०।५५
क्रमांक ...२.३.३०.... नों: दि: २७।११।५५

## : २९ : बंड्या झाला बंडूनाना !........ [प्रणयप्रभा]

१

" खटचाळ साऱ्या तर मुलुखाचा। आहे हो, बंड्या हा अमुचा
खुशाल द्यावा त्याला मार। आम्हि न कांहीं ही म्हणणार
विद्येवरतीं चित्त न याचें। लक्ष सदा तर उनाडायचें!
आम्ही अमुच्या कामामागें। मागें बंड्या करितो दंगे
शाळा त्याला मदत करीती। खेळासाठीं वेळ दवडिती.
देत पिशाच्चा कोलित हातीं। अम्हां वाटतें त्याची भीती
खेळावांचुन कांहि न अडलें। या खेळांनीं खटचाळ केलें.
खेळा त्याच्या बंध घातलें। तिथेंहि आम्हीं हात टेकलें"
" ऐसें पालक करिती भाषण। त्यांचा येथें कांहीं दोष न
मानस शास्त्राचें त्या ज्ञान न। त्यांचें न करा चुकुनि समर्थन

२

खटचाळ म्हणती मुलांस पालक। जसा काय त्यांचा नच बालक
अजाणतेनें ऐसे वदती। करिती बाळाची नालस्ती
आली अवखळ अपुल्या पुढतीं। अचेतन अशी ओली माती
स्वयंप्रगतिनें घट बनवो ती। प्रहार आकारा बिघडविती,
अशिष्ट वळणें टाळायाला। रम्य शिष्टता त्या यायाला
सुदक्ष असुं द्या हात आपुला। ह्यिसेल घट मग सुरम्य झाला.
तज्ज्ञा जवळीं ये व्यवहारी। करून घ्यावे त्या सहकारी
योग्य तयांतून मार्ग निघावा। बालकहितपथ त्यांतुनि यावा
खटचाळ म्हणती मुलांस पालक। परंतु तैसा नसतो बालक
यांत जाणतेपणा आणणें। मानसशास्त्रांतिल नियमानें
खटचाळ साऱ्याही मुलखाचा। सांगा बंड्या नाहीं तुमचा
सूक्ष्म परीक्षण करतां त्याचे। खटचाळपण सिद्ध न हाडाचें
उसळत त्याची वृत्ति खेळकर। वृथा बोलतां त्यास खोडकर

विचारवत्तेच्या न्यूनावर । दोष येतसे शुद्ध मुलांवर !
नका विस्मरूं आत्मसानपण । जाचक जें मानिलेंत आपण
सोडुनि द्या तें अयोग्य धोरण । शहाणपण घेउनी तयांतुन
द्या पोरांना खुलें खुलेपण । ज्यास पारखें होतो आपण
सज्ज असूं द्या प्रगतनियंत्रण । नाचतील तीं शिरिं जें घेउन

* * *

स्वतंत्रतेच्या वातावरणीं । मुलगा खेळो त्या क्रिडांगणीं
कसा राहतो बघूं खोडकर । बंडू क्रीडापटु होणार !
शाळा घडवुनी आणिति सारे । पालकांस हें नच जमणारें
वेळ पालका कुठला इतुका । मात्र अर्पितिल यास्तव पैका
क्रीडासंस्था–विविधा–जाती । शाळेमाजी जागृत असती,
त्याला कोणी आक्षेपीती । शाळा कालापव्यय करिती !
मनोबुद्धिचा विकास व्हाया । क्रीडा उपयोगी पडती या
सुदृढ शरीरीं सुदृढ मनें तीं । शाळांमाजी घडून येती,
क्रीडारुचिची तृषा शमवितां । एकाग्रपणा येतो चित्ता
शिक्षण होतें प्रगतिपथावर । क्रीडा नियमित भरपूर हो तर"

* * *

" उद्योगामधिं बंडु रंगता । खट्याळतेची जाइल चिंता
'खट्याळ' जाइल पद गतकालीं । क्रीडापटु पद चालूं काळीं
शिक्षणांतल्या प्रगतीचें बल । हासत खेळत बंडू साधिल
उन्नति येइल सर्वांगांना । 'बंड्या' होईल बंडुनाना !
बंडखोर त्या क्रीडानिपुणा । बंडुस म्हणतिल बंडुनाना !
मारपिटीची नकोच भाषा । आवड घडविल पूर्ण सदाशा"

३

काना–मात्रासह हें भाषण । पाळी शाळेचें क्रीडांगण
परिणामीं यें त्याला सद्‌गुण । खट्याळपण गेलेंच सुधारुन
कुचंबणा बंडुची गेली । स्वतंत्रता त्याजला मिळाली

प्रगत नियंत्रण होतेंहि तिथें । सुमान्य होते बंडूसहि तें
खेळामाजीं आणि शिक्षणीं । समप्रगति हो बंडूकडुनि
शाळा झाली येथ यशस्विनि । फळास आली हो गुरुवाणी
खट्याळ बंडू होइ शहाणा । खेळकऱ्यांचा झाला राणा
हुशारांत शिक्षणि तद्‍गणना । बंडू झाला बंडूनाना !

दि. २३-६-४८

---

## : ३० : नांदु द्या, तींत कलासुंदरी....... [ केशव ]

‘ गारगोटि नच हिरा सांपडे आज तुला अंगणीं
स्वच्छ तो करीं पुसुनि-घासुनि !
नाजुक घेउन हत्यार त्यावर पैलू घे पाडुनि
खरा तूं कुशाल त्यांत नी गुणी
मग तेज तयाचें पैलू पैलूंतुनी
धावुनी दिशांना उजळिल चहुंबाजुंनीं
गातील मोल तें जवाहिरे रंगुनी
कौशल्यानें तुझ्याच तेजें आलीं ओसंडुनि
होति जीं प्रसुप्तशीं आंतुनी ! १
गारगोटिला हात तुझा जर कधि न येथ लागतां
राहती तशीच ती तत्त्वतां
प्रसुप्त तेजें प्रसुप्त असतीं तिच्या आंत राहिलीं !
जगाला नसतीं तीं लाभलीं
गारगोटि ती तशिच गार राहती,
तव करींच सुकला तुझी गुप्त नांदती;
मग जगांत कुठल्या मोलाच्या संस्कृति !
निसर्ग आणिक कौशल यांची लाभो सत्संगती
दिव्यता भव्य तिथें जन्मती ! २

राशी असती गारखड्यांच्या जगांत या पुष्कळ
परंतु कलावंत दुर्मिळ
प्रसुप्त तेजें निसर्ग निर्मी, कलावंत ते तर
तपःफल निर्मिताति भूवर
ती थोर तपस्या तुजपाशीं वावरे
तरि कलादेवता तुझियाभंवतीं फिरे
या कलाकृतीस्तव तृषा जगीं संचरे
कलाकृतींनीं जगांत येती रत्नमाणकें, हिरे !
तृषेला जिवंत होती झरे ! ३
शिळेंतुनि ये देवि अहल्या पदस्पर्शसद्गुणें
म्हणुनिया राम घेत वंदनें
तसें कलेच्या करस्पर्शानें लाभतांच भूषणें
धाव घे कौतुक सग बहुगुणें
ती प्रथम कलाकृतिसंधि तुवां साधिली !
ती भाग्य आणिते गाजुनि जगतीं भली
ही सहज लाभते तपा भाग्य—सावली
भाग्य हातचें नसे तपस्या असे, हातची खरी
नांदु द्या तींत कलासुंदरी ! ४

दि. २७—६—४८

## : ३१ : नाहींत शाळा त्या गुणी !........[श्यामला]

१

जमतात जेथें बालक—आहेत तेथें पालक
नाहींत शाळा त्या गुणी—नाहींत तेथें शिक्षक
येती उशीरां शिक्षक—सर्व प्रजा सत्सेवक !
डोळांत येती चालत—त्या मार्ग देती भाविक !

जैसे न हे लोकास्तव– जणुं लोक ते यांच्यास्तव
नाहींत शाळा त्या गुणी–ढीलांस जेथें वास्तव !

२

येतात बाळें धावुनी–शाळांत वेळा साधुनी
मागून येती शिक्षक–नाहींत शाळा त्या गुणी
जाती घरांसी लौकर–येतां उशीराला भर
नाहींत शाळा त्या गुणी–दुर्लक्ष जेथें सादर !
मानी मुलांचें सन्मन–वेळेस कांहीं मोल न
घेती गुरूंच्यापासुन–संभावितांचें लक्षण
त्यांच्या मतानें शिक्षक–जो आपणाला प्रेरक !
मोठाच तो संभावित–' व्हा तन्मताचे पूजक '
ते हो मनाचे कोमल–जें जातिचे सन्निर्मल
श्रद्धा धरूनी वागती–त्यांचाच हो येथें छल !
दोषी न याला बालक–दोषीच याला शिक्षक
नाहींत शाळा त्या गुणी–स्पष्टार्थ हा ज्या बाधक !

३

शाळांस पोरें धावती–वर्गांस कुलपें पाहती,
ऐशी अनास्था हो जरी–हो तेथ वाटूं द्या क्षिति
दारांस ते ठोठाविती–किल्लयांस कोणी धुंडिती
नाहींत शाळा त्या गुणी–कष्टांत किल्लया लाभती.
विद्यार्थि येती घेउनि–घेतात कुलपें काढुनी,
बसतात केरा फुंकुनी–नाहींत शाळा त्या गुणी !
त्यांचा कुठें तो शिक्षक–जो ज्ञानमार्गीं पालक !
संसारसिंधूमाजि त्या–तो घेतसे शय्यासुख !

*　*　*　*

तो बाल कोणी मिस्किल–येतां गुरूंची चाहुल
सांगे मुलांना प्रार्थना–ज्ञानार्थं जे हो व्याकुळ !

"देवा कृपेच्या सागरा–दे ज्ञान तूं या पामरा
पायांस तुझ्या वंदना–घें आमुच्या विश्वेश्वरा"
करुणा मुलांची प्रार्थना–देवाजीच्या आणी मना
अवतार त्यानें घेतला–सोडूनि निद्राभूषणा,
अवतार धापा टाकित–गुरुराज रूपें धावुन
येतांच सारे शांत हो–तें प्रार्थना संगायन,
येतांच कांहीं बालक–शाळेंत येतां शिक्षक
पाराच रागाचा चढे–पाहून शिस्ती घातक !
आतां मुलांचें दैवत–न्यायेश्वराचें घे व्रत
दंडी मुलांना शोधुनी–वेळेस आले नाहींत,
दोषी न याला बालक–दोषीच येथें शिक्षक
जे शिस्त मोडीती स्वतां–शाळांस मोठे बाधक
* * * *
हें ज्ञान दाते सद्गुरू–धाकांत जाती आदरूं,
नाहींत शाळा त्या गुणी–धाकास देती वावरूं.
जेंसा न हा पोरास्तव–पोरेंच सारी यास्तव
नाहींत शाळा त्या गुणी–तेथें न विद्यावास्तव !

४

ज्ञानेंद्रियें तीं धावती–ज्ञानार्थ हो उत्सूकती
त्या ज्ञानदेवांची तिथें–प्राप्ती असो ही निश्चिती !
तें ज्ञान बाही बालका–तें ज्ञान बाही बालिका !
नाहींत तेथें शिक्षक–नाहींत तेथें शिक्षिका !
उल्हासमूर्ती येऊं द्या–उल्हास ओसंडावया
त्या शिक्षकां नी शिक्षिकां–उल्हास चित्तें घेउं द्या.
निर्मोत शाळा ही स्थिती–आहे अपेक्षा योग्य ती.
नाहींत शाळा त्या गुणी–ज्याही अपेक्षा नाशिती !
ही वाण जेथें भासते–शाळांस मोठें विघ्नतें
नाहींत शाळा त्या गुणी–शंका कशाची ती इथें ?

५

फुलतात तीं क्रीडांगणें–त्या शिक्षकांच्या सद्गुणें
आरंभि मध्यें शेवटीं–अस्तित्व त्यांचें भूषणें;
जाती न शिक्षक रंगुनी–शाळांचिया क्रीडांगणीं
नाहींत शाळा त्या गुणी–ज्या प्रेम नाहीं बंधनीं !

६

विद्वान आम्ही येथले–आम्हांस बंधन जाचतें
ऐसे नको संभावित–हो, वावडें शाळांस तें,
जीं रूढ सन्निबंधनें–शाळाकरींचीं भूषणें
शिष्यांगुरूंनीं तीं सदा–अत्यादरें संमानणें,
शाळेंतला शिष्योत्तम–समित्र ! सद्गुरु निर्मम !
आदर्श व्हावे हे जन–विद्यार्थि होवोनी क्षम !
कार्यास हो, संप्रेरक–बालांत होतो बालक
तो मान दे सद्बंधना–आदर्श होतो शिक्षक !
जेथें न ऐसें चालतें–भेदांत वारें वाहतें
नाहींत शाळा त्या गुणी–निःशंकवाणी बोलते !

७

विद्यार्थि शुल्काचें धन–जगण्यास शाळा कारण
नाहींत शाळा त्या गुणी–येथें न निस्पृह धोरण !
हें येत शुल्काचें धन–विद्याकलांना साधन
नाहींत शाळा त्या गुणी–ज्या मानिती हें शोभन !
सक्तींत घेती हें धन–शाळांस होतें दूषण
नाहींत शाळा त्या गुणी–दे ज्ञान शुल्का घेउन !
संतोष शुल्काचें धन–घे ऐच्छिकत्वाभूषण
हो खर्च सर्वांलागुन–विद्याकला उत्कर्षून
जेथें न निस्पृह धोरण–व्यापार होतो शिक्षण,
नाहींत शाळा त्या गुणी–द्रव्यार्थ ज्यांचें जीवन !

८

नाहींच शाळा बाहिर–मोठ्या जगाचें दर्शन
नाहींत शाळा त्यागुणी–हो ज्ञान पुस्तकवाचन !
प्रात्यक्षिकांचें दर्शन–तें टाळितें अध्यापन
नाहींत शाळा त्यागुणी–ज्ञानेंद्रियांचीं सोय न
राहून सक्ती जागती–अभ्यास जेथें चालती,
नाहींत शाळा त्या गुणी–कारागृहें बोलाच ती !
वेठींत कामें चालती–द्रामांत सारे बोलती,
नाहींत शाळा त्यागुणी–गिरण्यापरी त्यांची स्थिती !
विद्यार्थि शिक्षक वेगळे–ते ऊंस नी हे भोपळे
नाहींत शाळा त्या गुणीं–नसती सभा नी मंडळें
कर्तव्यकर्मीं बावळे–स्वार्थास सारे कावळे
नाहींत शाळा त्यागुणी–सत्स्फूर्ति तेथें मावळे
शाळागृहें, क्रीडास्थळें–साहित्य ! शोभा-सोहळे
नाहींत शाळा त्यागुणीं–उल्हास शोषीती बळें
जागा फिराया जागती–रानें चराऊ होत तीं
नाहींत शाळा त्यागुणी–क्रीडांगणांची ही स्थिती !
लग्नादि कार्यांचीं गृहें–सुट्टींत विद्यामंदिरें
नाहींत शाळा त्या गुणी–विद्याकलाशून्यागरें
हे कोंडवाडे माणसां–कारागृहांची या दशा
शाळा न चालो या अशा–हानीच देती प्रायशा !
कां व्यर्थ काला घालवा ?–आटापिटा कां चालवा ?
नाहींत शाळा त्या गुणी–व्यापार त्यांचा घालवा !
त्या पालकांच्या संहती–नाहींत ज्यांच्या संगतीं
नाहींत शाळा त्या गुणी–सहकारिता जेथें न ती

* * * *

आनंदवृद्धी–भुवनें–निर्मोत शाळा शिक्षणें
नाहींत शाळा त्या गुणी–जेथें न ऐसें वागणें.
तो ज्ञानविज्ञानी दिवा–उघडचा न नेत्रें मालवा,
त्या घालिताती फुंकर–ऐशा न शाळा चालवा !
हातांत या शाळांचिया–तें चेतना भांडार द्या,
सांगितलें कोणीं असे–निस्तेज तें हातांत द्या !

दि. २–७–४८

---

## : ३२ : गैरसमज तूं दूर करीं........ [पादाकुल]

[गैरसमज हें अज्ञान व खुलासा हें ज्ञान ! अज्ञान घालवून ज्ञान वाढविणें हें सद्गुरूचें व्रत ! गैरसमज दूर करून समाज-स्वाथ्य वाढविण्याचा आदर्श निर्माण करणारा सत्प्रवृत्त प्रचारक म्हणजेच सद्‌गुरु-सज्जन–शिक्षक हें सूत्र !]

गैरसमज तूं दूर करीं
सलतें शल्य न धरीं उरीं ।। ध्रु० ।।

सिद्ध सदा जर सरळपणा । खुल्या दिलाचा खुलेपणा
जरी न थारा अपहरणा । गैरसमज नच मूळ धरी ! १
स्मृति-विस्मृतिच्या, लहरीच्या । चुकी-भुली चालायाच्या
तत्क्षणीं पण वारायाच्या । कळुनि येतां स्थिती खरी ! २
सुरळित अवखळ तें होतें । गोडी कटूपणा वरिते,
प्रमत्त सूकर वावरते । सूडाचे ते झुंजारी ! ३
समर्थ मानव नी दुबळा । कठोर तैसा मृदू भला
थिजवी गुढता खुल्या दिला । खुल्या दिला दिल खुलें करीं ४
कुणीहि कांहीं सांगावें । कलपावें नी पोसावें,
अढी ठेवुनी वागावें । सोड अढीं ही स्नेह हरी ! ५

काळिज फोडी गूढ अढी । नको अबोला नको दडी
करतिल मेल्यावरी मढीं । जिवंतपणिं तूं हें न करीं ! ६
मौन उद्‌भवी मत्सर ते ।द्वेषाचे मत्सर जनिते,
मनास फांटे बहु वाटे । फुटतां आवर कठिण तरी ! ७
संशयखळ हा बळावतां । भ्रमवीतो सज्जन चित्ता
त्या कापाया सज्जनता । करीं धरीं रे सत्य सुरी ! ८
दूषित ग्रह तो जरि झाला । गुप्त ठेवूनी त्यास दिला
पाळिसि विषारी सर्पाला । आयुष्याचा जो वैरी ! ९
कसर भासली अल्पजरी । खाई पैठणी जरतारी
ठिणगी पडली तृणावरी। पसरी वणवा रानभरीं ! १०
झणि सावधगिरि ती घेतां । येतें आगिस विरोधिता
वस्त्रा येतें सुरक्षितां । कळतां धस शिवलाच तरी ! ११
अल्प टोक जरि काटयाचें । पायीं वारुळ कुरुपाचें
झणीं काढतां नच जाचे । अरिष्ट पुढचें ही वारी ! १२
स्नेहलतेंतील कीटक हा । खाइल सारी लता पहा,
अल्प दिसे तरि रोग महा । माणुसकीचा घात करी ! १३
घातुक रोगा नष्टावें । अरिष्ट पुढचें टाळावें
प्रेमलतेला फळ यावें । असलें औषध घे उदरीं ! १४
सत्य प्रांजल सचोटिचें । असेल वर्तन हो, ज्याचें
गैरसमज मग मरायचे । संशय भीती पळे दुरी ! १५
जगांत तंटे किती तरी । ज्यांचीं गैरसमज शिदुरी
पोसाया ते घरोघरीं । असत्य जाणुन घरें करी ! १६
यांत राहि तूं आदर्श । कार्य सद्‌गुरूचें खास
गैरसमज टाळायास । समाजिं आदर तूं पसरीं ! १७
भांडण-तंटे किती तरी । सत्य समज घालवी दुरी
सद्‌गुरु शिक्षक कार्य करी । समाजिं हो आदर्श तरी ! १८

वाढावी सद्‌गुणवत्ता । देश पोषि शिक्षणसंस्था
आत्मा त्यांचा मानवता । जबाबदारी तुझ्यावरी ! १९
विलोभनांना मोहुं नको । पवित्र कार्या सोडुं नको,
अज्ञाना आश्रयूं नको । सत्यादर्शा भी न धरीं ! २०
दावाग्निक्षोभ ही तरी । शांतिसागराच्या उदरीं
प्रशांत होतो खरोखरी । अघटित घे, कार्य हें शिरीं ! २१
गैरसमज हें अज्ञान । खरा खुलासा हें ज्ञान
कार्य न मोठें तुज आन । प्रीतीनें तें घेंच करीं ! २२
वाग असा तूं खरोखरी । बधतिल सारे भिरीभिरी
सारे नेतिल सहजतरी । तव अनुकरणें घरोघरीं ! २३
अज्ञानांमधिं ठेवु नको । अज्ञानामधिं राहुं नको,
खरा खुलासा सोडुं नको । औषध साधें विसरुं नको,
या रोगावर
धन्वन्तरि तर
कवि मुरलीधर
कविता औषध हीच तरी । गैरसमज पळतील दुरी ! २४
दि. १६-६-४७

---

## : ३३ : नवीन खेळणीं .... ....[प्रणवप्रभा]

[जशीं कागदाचीं, मातींचीं, लाकडाचीं, तशीं शिक्षकांचीं]

१

शिक्षक जें जें कांहीं करिती, तें तें सारें मुलां करूं द्या
शिक्षक अमुचे सद्‌गुणशाली, मुलांस ते आदर्श वाटुं द्या
शिक्षक सद्‌गुरु मेळ्यांमाजी, पूर्ण मुलांना समरसुं द्या
शिक्षक अंतरणेंच मुलांना, शिक्षण राज्यीं पाप ठरूं द्या

२

शिक्षक खुर्च्यांवर बसती ज्या, त्या खुर्च्यांवर मुलां बसूं द्या
शिक्षक लिहिती मेजांवर ज्या, त्या मेजांवर मुलां लिहूं द्या
शिक्षक जाती मार्गांनीं ज्या, त्या मार्गांनीं मुलां जाउं द्या
शिक्षक थांबति ज्या ज्या जागीं, त्या त्या जागीं मुलां थांबुं द्या

३

शिक्षक जे जे खेळ खेळती, मुलांस ते ते खेळ खेळुं द्या
शिक्षक घेती जशि विश्रांती, तशि विश्रांती मुलां घेउं द्या
शिक्षक रंगति ज्या व्यायामीं, त्या व्यायामीं मुलां रंगुं द्या
शिक्षक करिती करमणूक जी, करमणूक ती मुलां करूं द्या

४

शिक्षक जाती जेथें तेथें, निःसंकोचें मुलां फिरूं द्या
शिक्षक होती दंग ज्यामधीं, दंग त्यामधीं मुलां होउ द्या
शिक्षक धावति ज्या ज्या क्षेत्रीं, त्या त्या क्षेत्रीं मुलां धावुं द्या
शिक्षकांस जें अनिर्बंध तें, अनिर्बंध तें मुलां राहुं द्या

५

शिक्षक करिती विनोद जे जे, विनोद ते ते मुलां करूं द्या
शिक्षक जैसें हास्य करीती, हास्य तसें त्या मुलां करूं द्या
शिक्षक होती दुःखी जेथें, दुःख मुलांना तें वाटूं द्या
शिक्षक अमुचे दुःखि न डरती, दुःखि न डरणें मुलां कळूं द्या

६

शिक्षक उद्धत सुखांत नसती, सुखांत उद्धत मुलां नसूं द्या
शिक्षक जपती परादराला, परादरास्तव मुलां जपूं द्या
शिक्षक स्वहितीं परहित साधिति, स्वहित परहित मुलां कळूं द्या
शिक्षक सद्‌गुणि विवेकि असती विवेक सद्‌गुणि मुलां शिकूं द्या

७

शिक्षक वाचिति पुस्तक जें जें, पुस्तक तें तें मुलां वाचुं द्या
शिक्षक पाठांतर जें करिती, तें पाठांतर मुलां करूं द्या

शिक्षक जाती सभेंत ज्या ज्या, सभेंत त्या त्या मुलां जाउं द्या
शिक्षक बोलति सभेंत जें जें, सभेंत तें तें मुलां वदूं द्या

८

शिक्षक विद्येचे व्यासंगी, तेथ मुलां व्यासंगी बनुं द्या
शिक्षक विद्याविनयी असुनी, विद्याविनयी मुलां बनूं द्या
शिक्षक घेती कलांत गोडी, कलांत गोडी मुलां घेउं द्या
शिक्षक कलावंत निर्व्यसनी, व्यसनी तेथें मुलां नसूं द्या

९

शिक्षक जें जें कांहीं करिती, तें तें सारें मुलां करूं द्या
शिक्षक विपरित कधीं न करिती, कायम हा विश्वास राहुं द्या
शिक्षक वागति उघड गुप्त तें मिळवुन आणी तें विश्वास
शिक्षक सद्‌गुण असलो श्रद्धा सतेज ठेवीती हें खास !

१०

शिक्षक जेथें चुकले, चुकती, तेथें तैसें मुलां चुकूं द्या
शिक्षक अनुभवि घात जाणती, घात मुलांचे मात्र टाळुं द्या
शिक्षक सुधारणा करिताती, सुधारणा तशि मुलां करूं द्या
शिक्षक तेथें स्वावलंबनी, स्वावलंबनी मुलां असूं द्या

११

शिक्षक सद्‌गुरु मनांत धरिती, आकांक्षा ध्येयादि गुणां ज्या
शिक्षक आणिति ते प्रत्यक्षीं, तसें मुलांना सर्व करूं द्या
शिक्षक मुलांस रूपांतरिती, रूपांतरनी मुलां जाउं द्या
शिक्षक हस्तें मुलांत साऱ्या, कर्तृत्वाचीं विजें रुजूं द्या

१२

शिक्षक जें जें कांहीं करिती, तें तें सारें मुलां करूं द्या
शिक्षक अंधाअनुकरणांना, त्यागिति तैसें मुलां त्यागुं द्या
शिक्षक व्हावें मुलां खेळणीं, खेळण्यांत त्या उघड रंगुं द्या
शिक्षकासवें मुलां खेळुं द्या, अहो, मला हें जास्त सांगुं द्या

१३

बालपणीं निर्जीव खेळणीं सजीव विद्यार्थीपणि असुं द्या
मुलांस रमविति बाळपणीं तीं विद्यार्थीपणिं हीं रमवूं द्या
बाळा परिचित जशीं खेळणीं नवीन तसलीं मुलां मिळूं द्या
रम्य बाळपण करिति खेळणीं विद्यार्थीपण रम्य होउं द्या

१४

बाळपणींची बाळ खेळणीं फक्त रंजविति बाळांना
अचेतनीं रंगी बेरंगी उपयोगी नच मार्गदर्शना
विद्यार्थ्यांचीं नवीं खेळणीं पुरीं असूं द्या मनोरंजना
स्वयंप्रभेचीं नवीं खेळणीं मुलांस होती मार्गदर्शना

१५

नव्या खेळण्यांच्या आदर्शीं, प्रतिभानव नव मुलां दिसूं द्या
लोभनीय हो नवीं खेळणीं, त्यांच्यामाजीं मुलां रंगुं द्या
आईबाप–सन्मित्र–सुबंधू, नव्या खेळणीं मुलां दिसूं द्या
सुदक्ष पालक कल्याणाचे, विशेष तेजें तर चमकूं द्या

१६

सचेतन अशी माती ओली, सुरम्य घालुनि सुशील पाणी
करी तिची कुशलता खेळणीं, परिश्रमांनीं करुनी मळणी
सवंगतेनें मुलां मिळूं द्या, सद्गुरु शिक्षक अशीं खेळणीं
दंग त्यांमधीं मुलां होउं द्या, दंग जशीं तीं होति बाळपणीं

१७

शिक्षक जमती जेथें, तेथें, त्यांच्याभोंवतिं मुलां जमूं द्या
शिक्षक असुं द्या कमलकर्णिका, कमलदलें तर मुलां होउं द्या
शाळांमाजी नी बाहेरी, अगणित कमलें अशीं फुलूं द्या
भुवनावरल्या रम्योद्यानीं, नंदनवनही कमी ठरूं द्या

दि. ७–७–४८

## ३४: होतात शाळा त्या गुणी............' यामला]

१

आहेत उत्तम बालक–आहेत उत्तम शिक्षक
होतात शाळा त्या गुणी–आहेत उत्तम चालक!
आहेत उत्तम बालिका–आहेत उत्तम शिक्षिका
होतात शाळा त्या गुणी–आहेत उत्तम चालिका!
आहेत उत्तम पालक–आहेत उत्तम शासक
होतात शाळा त्या गुणी–सहकार्य ज्यांना लायक!

२

त्या योग्य विद्यामंदिरें–त्या योग्यशीं क्रीडांगणें
होतात शाळा त्या गुणी–भरपूर जेथें साधनें !
संपन्नशी ग्रंथालयें–विज्ञान साहित्यालयें
होतात शाळा त्या गुणी–जेथें न कोठें दैन्य तें !

३

नसतील मोठीं मंदिरें–भरपूरशींही साधनें
होतात शाळा त्या गुणी–त्या शिक्षणाच्या सद्‌गुणें!
त्या शिक्षकांच्या सद्‌गुणें–त्या बालकांच्या भक्तिनें
होतात शाळा त्या गुणी–राही न कांहींहीं उणें !
झाकील जागा अंबर–क्रीडास्थली तें मंदिर
ऐशीहि जागा हो गुणी–चैतन्य जेथें सुंदर!

४

ज्ञानेंद्रियांची संतृषा–संतृप्ति देते मानसा
होतात शाळा त्या गुणी–मोत जेथ हो सर्वंकषा!
तें ज्ञान बाही बालका–तें ज्ञान बाही बालिका
होतात शाळा त्या गुणी–या भेटिला संचालिका!
शिष्टा क्रिया संक्रांतिका–घे तज्ज्ञ शिक्षकशिक्षिका
होतात शाळा त्या गुणी–सत्कार्य संहतिसाधिका!

उल्हास मूर्ती येत त्या-उल्हास ओसंडावया
होतात शाळा त्या गुणी–उल्हास साधी संक्रिया!

५

सौजन्यमूर्ती शिक्षक–आदर्श घेती बालक
होतात शाळा त्या गुणी–ज्यांमाजि शीलोपासक!
सौजन्यमूर्ती शिक्षिका–आदर्श घेती बालिका
होतात शाळा त्या गुणी–ज्यांमाजि शीलोपासिका !
जेथील शिक्षकशिक्षिका–आदर्श बालकबालिका
होतात शाळा त्या गुणी–सत्कार्यसाधकसाधिका!

६

होती शरीरें सुंदरें-जीं आत्मियां सन्मंदिरें
होतात शाळा त्या गुणी–आदर्श मानें वावरे!
आरोग्यशक्तीच्या गुणें–हो रम्य अंगें भूषणें
होतात शाळा त्या गुणी–आदर्श घे वाखाणणें!
संमानिताती बालक–सन्मित्र, बंधू, पालक
होतात शाळा त्या गुणी–जेथें मुलांचे शिक्षक!
भगिनीच मोठ्या बालिका–सन्मैत्रिणी नी पालिका
होतात शाळा त्या गुणी–जेथें मुलींच्या शिक्षिका!
जेथील शिक्षकशिक्षिका–सन्मान्य पालकपालिका
होतात शाळा त्या गुणी–स्नेहाळ बालक बालिका !
गुरुता नि जेथें शिष्यता–संशासिती अद्वैतता
होतात शाळा त्या गुणी–प्रेमैक्यसेवा साधितां!

७

जेथील शाळा चालक–विश्वासिं घेती शिक्षक
होतात शाळा त्या गुणी–होतात उत्तम बालक!
जेथील शाळाचालिका–विश्वासिं घेती शिक्षिका
होतात शाळा त्या गुणी–होतात उत्तम बालिका

जेथील चालकचालिका–विश्वास शिक्षकशिक्षिका
होतात शाळा त्या गुणी–ध्यातात्ति बालकबालिका!
जेथील सेवासज्जन–सेवार्थ देती शिक्षण
होतात शाळा त्या गुणी–ज्या त्याग मोठें भूषण!

८

ज्या पालकांच्या संहती–सेवेस जेथें धावती
होतात शाळा त्या गुणी–लोकाश्रया त्या शोभती!
त्या पालिकांच्या संहती–सेवेस जेथें धावती
होतात शाळा त्या गुणी–लोकाश्रया त्या शोभती!
त्या पालिका नी पालक–एक्या विचारें उत्सुक
होतात शाळा त्या गुणी–सत्कार्य त्यांच्या सन्मुख!
शाळांत त्यांचा वावर–दे शिक्षणाला तो भर
होतात शाळा त्या गुणी–सहकार्य लाभे सुंदर!

९

विद्यार्थिशुल्काचें धन–जेथें विषारी दंशन
होतात शाळा त्या गुणी–त्या ज्ञान दे शुल्काविण !
विद्यार्थिशुल्काचें धन–त्यांच्याचसाठीं खर्चुन
होतात शाळा त्या गुणी–ज्ञानार्थ पैका घेति न
त्या पांच भूतांच्या परी–हें ज्ञान आहे ईश्वरी
होतात शाळा त्या गुणी–नच बंधनें ज्ञानावरी!
देतात दानें पालक–तैसे प्रजेचे शासक
होतात शाला त्या गुणी–दानेंच ज्या संजीवक !

१०

उपयुक्ततेचें जीवन–घे शिक्षणीं संचेतन
होताता शाळा त्या गुणी–सत्कार्य त्यांचें भूषण!
शाळांत चाले शिक्षण–व्यवहारशास्त्रा पाळुन
होतात शाळा त्या गुणी–नच फक्त पुस्तकवाचन !

त्या पुस्तकांच्या बाहिर–मोठ्या जगाचा वावर
होतात शाळा त्या गुणी–मोठ्या जगीं देती भर!
प्रात्यक्षिकां संदर्शन–अध्यापनांचें भूषण
होतात शाळा त्या गुणी–जेथें क्रियासंचालन !

११

प्रारंभ तसा शेवट–सूर्योदयास्ताचे पट
व्यवहार मध्यें चालत–अध्यापनीं हे भासत !
प्रारंभ हो उल्हासुनी–व्यवहार चाले रंगुनी
संतृप्ति ये संतोषुनी–हो जेथ हें अध्यापनीं !
संतृप्ति ते आसूस ते–पुढल्याच पाठीं लागते,
होतात शाळा त्या गुणी–हे नित्य जेथें चालतें !
भिंतीहि जेथें बोलती–पाषाण ज्ञानें शोधती
होतात शाळा त्या गुणी–मातीहि जेथें हासती !
दारेंहि ज्यांचीं स्वागतीं–प्रेमें गवाक्षें पाहती
होतात शाळा त्या गुणी–ज्ञानार्थ त्या बोलविती!

१२

सहकार भूषेच्या गुणें–होतीं सभा संमेलनें
होतात शाळा त्या गुणी–सहली मुळें संक्रीडनें!
सुट्टींत विद्यामंदिरें–हो तीं कलांचीं आगरें
होतात शाळा त्या गुणी–उद्योग नित्यीं साजिरें!
जातांच सुट्टचा नंतर–ये नित्य कर्माला भर
होतात शाळा त्या गुणी–हंगाम मोठा सुंदर !
अभ्यास–वृद्धी–मंडळें–तैशी कलांचीं संकुलें
होतात शाळा त्या गुणी–नाहीं विकासा वेगळें !

१३

ज्या लोकशाही बोलती–लोकांकरीतां होय ती
संपूर्ण लोकांचीच ती–ती लोक सारे शासिती!

शाळा मुलांच्या चालती–त्यांच्याचसाठीं नांदती
होतात शाळा त्या गुणी–विद्यार्थि त्यांना शासिती!

१४

उत्कर्ष जो सर्वांगिण–देशास येतो धावुन
होतात शाळा त्या गुणी–उत्कर्ष ये ज्यांच्यांतुन!
उत्कर्ष बीजें लागती–संगोपनीं तीं वाढतीं
होतात शाळा त्या गुणी–ऐशीं पिकां सनिर्मिती!
वेळांस त्यांची आवक– वेळांस त्यांची जावक
होतात शाळा त्या गुणी–वेळा न जेथें क्षुल्लक!

१५

तंतूमुळें धागा निघे–धाग्यामुळें दोरा बने
हो दोर दोऱ्यांच्यामुळें तो आकळी नागा बळें!
थेंबेच पाणी सांचतें–त्यांतून पाणी वाहते
ओढे नद्या नी सिंधु ही–होतात थेंबांतूनि ते!
बारीक साऱ्या सत्कृती–शाळांमधें ज्या चालती
संगोपनें मोठींच तीं–सत्कार्यशक्ति निर्मिती !
हो, ज्ञान, विज्ञानी दिवा–शाळांत ऐशा तेववा
होतात शाळा त्या गुणी–ऐशाच शाळा चालवा!
क्रीडांगणें ज्या खेळती–व्याख्यानभू ज्या बोलती
जेथें कला त्या नाचती-हास्यांत रंगे सन्मती!
ऐशाच शाळा चालवा–ऐशाच शाळा वाढवा
होतात शाळा त्या गुणी–कल्याण देती मानवा!

१६

राहोत शाळा सान वा–राहोत शाळा थोर वा
ऐशाहि शाळा चालवा–कल्याण देती मानवा!

* * *

राहोत वाचन मंदिरें–होवोत नच वा सुंदरें
ज्ञानेंच शाळा त्या गुणी–झाकोत जागा अंबर !
पेशा असो वा तो नसो– तो ज्ञानदाना देतसो
येतां दिसूनी तो गुणी–तो शिक्षकांमाजी वसो!
हें काम थोडा वेळ हो–हें काम जास्ती वेळ हो
हा प्रश्न वेळेचा नसे–हें काम शाळांचेंच हो!
एकाचसाठीं काम हो–वा पुष्कळांच्यासाठिं हो
हा प्रश्न संख्येचा नसे–हें काम शाळांचेंच हो!
एकास्थळीं हें काम हो– किंवा अनेकस्थानिं हो
हा प्रश्न जागांचा नसे–हें काम शाळांचेंच हो!
हो, ज्ञान विज्ञानी दिवे–तेवावयाला ते हवे
येतें दिसोनी तेवणें–हें काम शाळांमाजि ये!
सद्बुद्धि जेथें जागृत–सत्कार्य जेथें चालत
होतात शाळा त्या गुणी– ऐशाच शाळा चालवा!
ज्या ज्ञानदेवी मानवा– ऐशाच शाळा चालवा
होतात शाळा त्या गुणी– उत्तेजनें त्या वाढवा!

१७

शालांबुजांच्या संकुलीं– ती मानुषी भृंगावली
सौगंध घ्याया धावली– दृश्यें दिसूं द्या हीं भलीं!
द्या शिक्षणाचा सावधसत्कार्यसंतोषीमध
शालांबुजांच्या संकुलीं–भृंगावलीला संबुध!
राहोत शाळा सान वा– राहोत शाळा थोर वा
ऐशाच शाळा चालवा– कल्याण देती मानवा!
ज्या ज्ञानदेवी मानवा– ऐशाच शाळा चालवा
होतात शाळा त्या गुणी–उत्तेजनें त्यानें वाढवा

दि. ११–७–४८

## : ३५ : साध्याही विषयांत.... ....[सुनीत]

१

साध्याही विषयांत बोल तुमचे येतात रागावुनी
साध्या आगमनांत येत दिसतां अंगावरी धावुनी
साधा हांव नि भाव दावित असे ती तांडवाची परी
साधी दृष्टि दिसेच आग जणुं ही जाळील कोणातरी!
आहे हा अवतार भीतिकरितां जाज्वल्य या भूवर
पाहा तो तुमच्या स्वरूपिं दिसतो प्रत्यक्ष आम्हां तर
होता लोकिं कमीच काय म्हणुनी त्या भीतिचा वावर
भीतीचा तर हो प्रसार करितां घालावयाला भर!
सांगा ना पुरुषार्थ थोर तुमचा घब्राट निर्मायचा!
नाहीं ना तुमच्यामधें कधिं असा घब्राट तो यायचा!
घब्राटा करणें, सवंग सुकला ही कां तुम्हीं केवळ!
वाटे ह्या अविचार घोर तुमचा निष्ठूर घेतो फळ!
क्षेत्रीं या तर एक–एकच असे तो मार्ग जो प्रेमळ-
स्वीकारा; तुमचाहि लाभच असे, क्षेत्रेंही पूर्णोज्वल!

२

कैशाही विषयांत बोल तुमचे यावे रसाळून ते
तैशी वावरण्यांत चाल तुमची व्हावीच सन्मान्य ते
व्हावे अंग नि भाव सभ्यपरीचे व्हावा खुलासा पुरा
दृष्टि सत्यपरीक्षणांत रुळुं द्या, स्नेहाळशी, वावरा!
जाऊं द्या तुमचें तमोगुण तुम्हांपासोनी ते हो, लया
येवो सात्त्विकता अशापरि तुम्हां हातांत ते तूमच्या
होऊं द्या अवतार हाच तुमच्या सद्वृत्तिच्या भूवर
प्रेमाचा तर हो प्रसार करुनी सौख्यांत घाला भर

वारें बाह्य जगांतलें नच मुलां या निर्मला लागलें
वारें आणुं नका मुळींच तसलें तें दुष्टराज्यांतलें
वारें मात्र असो तुम्हांत भरलें जें सज्जनांना भलें
वारें तेंच दिसो मुलांत अपुल्या द्वारेंच संचारलें
शाळा क्षेत्र लहान नाजुक तसें नाजूक घ्या वागणें
बालांनीं म्हणणें तुम्हांस आपुलें त्या आपल्या मदगुणें
दि. १३-७-४८

: ३६: सरलता व वक्रता........[काळचा अंधारीं]

(सरळपणासारखा सद्गुरु नाहीं, वक्रपणासारखा वैरी नाहीं]

सरलगती ही सज्जनता । वक्रगती ही दुर्जनता
सरलगतींचा मार्ग धरीं तूं । शिवे न तूं कधीं वक्रपथा ॥ध्रु॥
वक्रगती ही सापाची । सरलगती मुंगूस धरी
वक्रगतीवर सरलगतीची । होते विजयी ती स्वारी १
दिसे वक्रता हो विजयीं । परंतु काळच ती कांहीं
दिसे न आधीं जयी सरलता । अंतिम जय परि ती घेई २
सुधारलेल्या जनांतरीं । सरळपणा ये अवतारीं
माणुसकीचा इथें जन्म हो । सरळपणाच्या व्यवहारीं ३
गुंडगिरीच्या जनांतरीं । वक्रपणा ये अवतारीं
माणुसकीचा इथें खून हो। 'वक्र'पणाच्या व्यवहारीं ४
वक्रपणाचा उकीरडा । दिसेल तेथें शेणसडा
सरळपणाच्या बागा धरिती । फळाफुलांच्या नित झाडां ५
निसंग वाढवि वक्रगति । कला वाढवी सरलगती
माणुसकी प्रिय खरी सरलता । माणुसघाणी वक्रगती ६
वाढ वाढते रानांची । तशीच ती वाढायाची
मनुजपरिश्रम फुलुवि बगीचे। सोय होई आरामाची ७

[illegible] नं. [illegible] स्थलप्रत.
क्रमांक 20248. वि काव्य ...७७..
क्रमांक 9330 नों: दि: [illegible]

मनुज वाढुं द्या वनांतरीं । गिरींदरींमधि किं कंदरीं
आणिल दैत्यालाही लाज तो। मनुज जातीचा होवैरी ८
तो संस्कृतिच्या छायेला । सदाचारण द्या खत त्याला
सुसंग पाणी मिळेल तर तो । मनुज जातिचा देव भला ९
कुसंग जडतो वक्रपणीं । सुसंग जडतो सरळपणीं
मंगलता नच वक्रपणामधि । सदाच मंगल सुसंगती १०
हवें तुम्हांला मंगल ना ! अमंगल नको तुम्हां ना!
कास धरा मग सरळपणाची । वक्रतेस लाथाडा ना ११
निर्भय असतो सरळपणा । धाक धुकीचा वक्रपणा ।
सरळपणा निद्रासुख घेतो । सुखी न निद्रा वक्रपणा १२
काय चालले जनांतरीं । वक्रपणाच्या व्यवहारीं
दिसेल डाकू गिरीं नि चोरी । जी जनता संहार करी१६
त्यांतुनि जगतां वाचिविलें । प्रचीतिच्या त्या सरळपणें
नाहीं डाकुगिरी नि चोरी । सरळपणाच्या दिव्यपणें १४
सरळपणा गुण शीलाचा । वक्रपणा दुःशीलाचा
सरळपणाला मोल येतसे । अवमान घडे वक्राचा १५
कुटिल नीतिचा तो शकुनी । सरलनीतिचा कृष्णमुनी
शकुनि त्याज्य परि कृष्णवंद्य हो । सकल जगाला
हो, म्हणूनी १६
नको वक्रता खरोखरीं । असते पण ती कधीं बरी
कांटा काढायास लागतो । दुसरा कांटा तयापरि १७
दोन्ही कांटे फेकुनि द्या। मलम सलोखा त्या लावा
भगवंताची भगवद्गीता । मानवतेचा हा मेवा ! १८
सरलपणाच्या व्यवहारीं। राजा सज्जन राज्य करी
ही तर तव हक्काची गादी । गुणें आपुल्या स्वीकारी १९
वक्रपणाच्या व्यवहारीं । राजा दुर्जन राज्य करीं
तया ग्रासण्या सिद्ध सदा बा । बाजूला दुस्मानगिरी२०

सरलपणा दे इतरांना । मिळेल बहुगुण तुझ्या गुणा
वक्रपणा आणील वक्रता । शतगुण जीचा क्रूरपणा २१
वक्रतेंत नच सुखबात । असे येथ यातायात
भलेपणानें जगूं जगीं या । जगुं देऊं इतरां त्यांत २२
सरलपणाचा मार्ग धरीं । देव तयाच्या वसे घरीं
सरल मार्ग हा नित्य सुखाचा। वक्रपणा तर टाक दुरीं
सरलगती ही सज्जनता । वक्रगति ही दुर्जनता
सरलगतीचा मार्ग धरीं तूं । शिवे न तूं कधि वक्रपथा २४
दि, १-१-४५

## : ३७ : सद्‌गुण-दुर्गुण मर्यादा....... [फटका]

लीन असावें, दीन नसावें; गर्व न घे, अभिमान असो.
विनोद करि परी, वरी न थट्टा, मर्यादा धरि भीड नसो १
नकोच ममता, प्रेम असूं दे; राग बरा, तो द्वेष नको
कृपणपणाला झिडकारी तूं, काटकसर ती सोडुं नको २
सदा वाग तूं, औदार्यानें, उधळेपण परि घेऊं नको
कार्यनिष्ठ तूं अवश्य होई, कधींहि कर्मठ होउं नको ३
विचारवत्ता तुला भूषवो, विकारवत्ता परी नको
कार्यास्तव तूं होई धाडसी, परी साहसी होउं नको ४
उद्योगाची हवीच गोडी, उपद्व्याप परि करूं नको
किर्तीमध्यें रंगुनि जाई, बोभाटयांमधि रमूं नको ५
सद्‌बुद्धीचा आदर ठवी, हांजीहांजी करूं नको
व्यासंगाची कांस धरावि, व्यसनामधि परि गुंतुं नको ६
धर्मनिष्ठ हो प्राण वेचुनी, धर्मवेड परि तुला नसो
सद्‌गुण-दुर्गुण-मर्यादांचा विवेक दैवी तुला असो ७
—-१९२५

## : ३८ : गुणी मुलांचें चीज करा..... ....[फटका]

शिक्षण आधीं सकलां द्यावें, सकलांना सज्ञान करा,
गुणवंतांना त्यांतुनि निवडा, गुणी मुलांचें चीज करा. १
साहित्यादिक विशेष द्या त्या, विशेष कांहीं सोय करा,
गुणां तयांच्या वाव विकासा मिळेल ऐसें कांहीं करा!
समूह अपुल्या पुढें मुलांचा, मुलें सारख्या न गुणांचीं
टाळा म्हणुनि कुचंबणा ती, विशेष असती जे त्यांची !
विशेषांपरी सामान्यांना वागवितां ते योग्य नसे,
असह्य होतो बोजा त्यांना प्रगतीला तें न्यून असे. २
कमी नि जास्ती गुण तेजाचे सृष्टीनें जे निर्मियले,
कमी नि जास्ती अशा साधनें पाहिजेच ते विकासले.
जाइल बोजा कुंचवणाही गुणांस येईल विश्वास
उभयांच्याही गुणांस येइल विकास यानें हमखास! ३
शिक्षकही तर गुणी मुलांस्तव करती जास्ती अभ्यास
प्रसंग येती नवनव त्यांना आनंदाचे हमखास
प्राविण्याची यशस्वि येइल दिसूनियां मग आघाडी
या कार्यास्तव कां न वाटणें लोकां शाळांची गोडी! ४
सामान्यास्तव दक्ष असावें पिंड असावा शाळांचा
शिक्षक अमुचे पाऊस पाडिति येथें युक्त्याकष्टांचा
सामान्यांची सुदृढ फळीनी, गुणी मुलांची आघाडी
निर्मून शाळा निर्मितात या शिक्षणामध्यें बहु गोडी ५
सकला शिकवा, गुण मग निवडा, गुणी मुलांचें चीज करा,
निवडा गुण परि सामान्यांवरि कधीं न करा दुर्लक्ष जरा
उभयासाठीं कार्यक्रमाचा बरोबरीनें घडा भरा
कर्तुत्वाच्या शाळांमाजी सहज सांपडे मार्ग बरा! ६

ज्झोत आणितिल सत्तेजांचे गुणशाली जाऊनि पुढें
असें न व्हावें, दिपून जावें इतर, तयानें प्रगति नडे
जरी न यावी ही आपत्ती पुढील मोठ्या जगतात,
प्रगती व्हावी समप्रमाणीं छोट्या जगतीं शाळांत! ७
तेज न कळुनि गुणवंतांचें, द्वेष येत, तो असूं नये;
प्रगतीं यास्तव सामान्यांची समाजधारणी कामीं ये.
विरोध येथें त्याज्य असावा पूरकता सन्मान्य असो,
समाजकल्याणीं मोलांचें बीज असें शाळांत दिसो! ८
सामान्यांची संख्या मोठी विशेष संख्या ती थोडी
व्यवहाराचे हे तर राजे, अल्प तज्ज्ञ घे पुढें उडी!
वनराई ही लतातरूंची कल्पलता तरु बागच ती
रत्नमाणकें हिरे या म्हणा, चिंतामणि गुणी ते असती! ९
अत्युपयोगी लोहराशिनां लोहचुंबकादि शक्ति या
परस्परांच्या प्रेमौदार्यें साधितील हे अभ्युदया!
पूर्णपणाची, शुद्धपणाची उल्हासाची कार्य-धुरा,
अभ्युदयास्तव शाळा उचलो, गुणवंतांचें चीज करा १०
सामान्यांतुनि गुणी जन्मती, गुणी मुलांचें चीज करा
त्यांतुनि गुणवंतांची प्राप्ति, गुणवंतांचा हाच झरा!
शाळामध्यें हा आढळतो, गुणी मुलांची निवड करा
सकला आधीं शिक्षण द्यावें, झरा सांपडे तिथें खरा ११
दि, १५-७-४८

## : ३९ : दैन्या फेकोनी देतों बाहेर........[ मुक्तछंद ]

दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर !
दैन्याचा जन्म दारिद्र्याचा पोटीं, दारिद्र्यनाश न आमुच्या हातीं,
शिक्षण निर्मी उन्नत मन, हक्काचेंच हें आमुचें धन !
आम्हींच येथें खरें श्रीमंत ! हार न जाऊं कोणाही येथ,
हातीं च येथें आमुचें चित्त, स्वावलंबन हेंच सामर्थ्य !
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर ! १
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्या नंतर
खिन्नता नी नित्य गंभीर मुख, वातावरणीं या मोठें संकट
आणूं प्रसन्न येथ वावर, प्रसन्नतेचें शाळा माहेर !
करी तें धूसर दैन्याचा धूर, म्हणून टाकीतों दैन्य तें दूर,
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर ! २
उल्हासवारा नाचवूं सारा, येथ भरारा मूलांच्यावर
येथील अणू येथील रेणू ! साऱ्यांच्यावर शाळेच्यावर
प्रेमानंदाचा व्हावा संचार, येथील साऱ्या हाच आधार
आनंदी व्हाया शालासंसार, आम्ही टाकीतों दैन्य तें दूर
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर ! ३
आम्हां स्थान त्या सूर्याचें येतें, आम्हां स्थान त्या चंद्राचें येतें.
आनंदाचा भर साऱ्यांना येतो, शालासृष्टी सारी रंगूनी जाते.
शिष्यगणांच्या उल्हासमूर्ती, मित्राला पाहूनी प्रसन्न होती,
चंद्रसूर्याचें दर्शन होता, किल्बील होते, गाणीं तीं गाते.
हासत नाचत सृष्टि धावते, साऱ्या चित्तांना आनंद देते.
विरजो न हा उत्साह भर, आणू न दैन्या मूलांसमोर,
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर ! ४
द्रव्यसंपन्न न शिक्षक पेशा, कधींच नव्हता नाहीं व्हायाचा !
नसेल द्रव्य तेथें दैन्याचा, संचार कायम तो राहायाचा !

आधार त्याला नयेच देऊं, त्यांत कल्याण कोणाचें नाहीं ?
आश्रय देतां, द्रव्यास आणी, ऐसेंही तेथें होतें का कांहीं !
परंतु होतें नुकसानदायी मूलांबाळांना दैन्य तें पाही,
बाहेरचें तें असू द्या कांहीं, शाळेंत दैन्य कामाचें नाहीं!
प्रसन्नतेच्या गुलालावर दैन्य दे काळे तें थर,
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर! ५
मायबाप, मित्र, पालक, बंधू, यांचें दिसावें पुण्यदर्शन
आमुचे बाल आमुचे प्राण, आमुचें त्यांच्यास्तव जीवन
खिन्नवील हे आपुले प्राण, खिन्न कोणतें अंतःकरण!
शाळाचैतन्य हेच ते प्राण, हवेच ठेवाया पूर्ण प्रसन्न
म्हणून देतों दैन्य फेकून, प्राणांवरूनी या ओवाळून !
शाळासृष्टीच्या चैतन्यांवर! विद्यादेवीच्या लाडक्यांवर!
पडो न दृष्ट दैन्याची घोर टाकूं ओवाळून दैन्या बाहेर
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर ! ६
त्यागाचा ग्रह ज्ञान राशीला देऊन ठाणें नित्य बैसला
स्वीकारूनीया ज्ञानाचा पंथ, त्यागानें झालों तेथील संत !
कुर्कुरभुंगा धरी न साथ, उच्च गुणांचें संगीत जेथ,
सज्जन, शासक, पालक, डोळे आम्हांभोंवतीं फीरती भले!
योगक्षेमाचा सारा विचार सर्वस्वी आहे तो त्याच्यावर
क्षुद्रच वाटे तरि दैन्यवारा मुलां झळ त्याची लागो न जरा !
देशाचे कलिजे चैतन्यखाणी खेळवो संपन्न प्रसन्नराणी
दैन्य फेकोनी देतों बाहेर शाळेंत येतों त्याच्यानंतर ! ७
उदात्त साधेपणा हें धाम श्रीमंतीचें येथें कांहीं न काम !
प्रश्न येथें तो त्या राहाणीचा प्रश्न येथें तो त्या वागण्याचा
भूषण साधी असो राहाणी, भूषवो साधी विचारसरणी !
यांत न कोणा जाऊंच हार, आदर्शरूपी यांचा व्यवहार !
संपन्न धना हाच आधार, दैन्याचा जाळी तो थोर भार

जलसंपन्न ज्याचें भांडार काळेला ढग घेतो आदर!
शुद्ध सूज्ञता तोयद आम्हां आदरा न्यून नाहींच कांहीं !
ऐशा आमुच्या सन्मूख तर, नाचावे प्रसन्न चातक, मोर
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्या नंतर ! ८
हासत येते आमुची स्वारी, प्रविष्ट होते शालामंदिरीं,
विसर येतो आत्मसंसारा, धन मानीत शालासंसारा !
प्रसन्नता ती येते सुंदरा, जाळून सारा दैन्याचा भारा !
ज्ञान-विज्ञानी आम्ही अमीर लाजवा योग्य त्यागीं फकीर
भूषण आम्ही शालामंदिरा भरारूं देतों शिष्यां पाखरां
बरसवीतों आनंद धारा, बांधून दैन्य झुळूक वारा !
दैन्या फेकोनी देतों बाहेर, शाळेंत येतों त्याच्यानंतर ! ९
दि. १७-७-४७ .

## : ४० : भाषा खडी साखरी........ [शा. वि.]

येताती जवळी सभोंवति तुझ्या विद्यार्थि-विद्यार्थिनी
कांहीं तेज तुझ्यांत त्यांस दिसतें! तें घेत आकर्षुनी !
त्यांची भागविसी तृषा समयिं त्या ज्ञानार्जनाची पुरी
आम्हां मोदविण्या तिथें श्रवणिं ये भाषा खडी साखरी! १
मोठ्या अल्प चुका, करीत असतां विद्यार्थि-विद्यार्थिनी
तेथें आपुलकी विशुद्धकरणी धावे तुझी तत्क्षणीं
तूझ्या सत्वर जातिच्या कळकळी दावीति तें माधुरी
आम्हां मोदविण्या तिथें श्रवणिं ये भाषा खडीसाखरी! २
घेवोनी यश पूर्ण सद्‌गुरु तसे विद्यार्थि-विद्यार्थिनी
होती एक यशःसुगान करण्या होतां न बोलावणी !
या संमेलनिं ये स्वयंप्रभ अशी उत्स्फूर्त सन्माधुरी
तेथें हर्षभरी मनास रिझवी भाषा खडी साखरी ! ३

येताती जवळी परस्पर जुनी विद्यार्थि–विद्यार्थिनी
नाहीं हो गुरुजी तरी न पडती सत्कार्यकर्में उणीं !
तेथें जो सहकार येत दिसुनी, नी रंगती चातुरी;
भारी हर्षभरी मनास तिथली भाषा खडीसाखरी ! ४
आतां जाति पुढें स्वयंप्रभ अशी विद्यार्थि–विद्यार्थिनी
तेथें चालवितीं समर्थपणि तीं सत्कार्यकर्में गुणी !
त्यांमाजी दिसते मधूरपणिची नी जातिची चातुरी
भारी हर्षभरी समर्थ तिथली भाषा खडी साखरी ! ५
आतांही गुरुजी न स्वस्थ ! जरि ते निवृत्त कार्यांतुनी
त्यांचें कार्य इथेंहि चालत असे, व्हाया प्रजा शाहणी !
सर्वांचें अधिकांत रुजलें कल्याण ज्यांच्या उरीं
भारी हर्षभरी स्वयंप्रभ तिथें भाषा खडीसाखरी ! ६
दि. १९–७–४८

## : ४१ : अमुचे शिक्षक !........ [साधी]

उषःकालची तांबुस लाली । जींत मुलें उत्साहें भरलीं
अमुचे शिक्षक वितान तांबुस !
त्यां यें उत्साहानें भरती । सारे लालीमाजीं खुलती
महोत्साहमूर्तिच अवतरती ! १
कोकिल गातां ' कूहू कूहू ' । मुलेंहि करिति ' कूहू कूहू '
अमुचे शिक्षक कोकिल होती !
तेही करिती 'कूहू कूहू' । मुलेंहि करिती 'कूहू कूहू'
सारे कोकिल गाती 'कूहू' २
फूलपांखरें तीं फिरताती । मुलें-पांखरें त्यांना धरिती
अमुचे शिक्षक गुणी पांखरें !

हिंसन यांतील थांबविती । मौज तेथली वाढविती
सर्व पांखरें ते भिरभिरती ! ३
लतातरू नी फुलें वर्षिती । मुलें फुलें हर्षांत वेंचिती
अमुचे शिक्षक मुलांफुलांचे !
मुलांत त्या ते फुलें वेंचितीं । फुलांत त्यां ते मुलां पाहती
फुलें–फुलें ते सारे होती ! ४
सूर्य येतसे उन्हें द्यावया । मुलें धावती उन्हें घ्यावया
अमुचे शिक्षक उन्हांत जाती !
मुलांबरोबरिनें फिरताती । यथेच्छ आतपस्नानें करिती
सतेज सारेजण ते होती ! ५
विपूल दिसतां कोठें पाणी । मुलें पोहती उड्या टाकुनी
अमुचे शिक्षक त्यांत मिसळुनि !
सुरकांड्या नी गिरक्या घेती । बालकमोदा आणिति भरती
जलदेवच ते सारे होती ! ६
वारा पाउस खेळ खेळतां । मुलें त्यांमधीं धावत जातां
अमुचे शिक्षक त्यांत रंगती !
प्रहर्ष तेथें आणीताती । शिक्षक बालक एकच जाती
वारा पाऊस सारे होती ! ७
डोंगर, दरडी, रानांमाजी । धावत जाती मुलें चढूनी
अमुचे शिक्षक तिथें जाउनी !
आवेशा संचारीताती । मुलांसवें ते शिखर गांठिती
सारे शिखरावरी खेळति ! ८
प्रशांत वाळू अथवा माती । मुलें तीवरी खेंळति लोळति
अमुचे शिक्षक खेळति लोळति !
मुलांसवें ते वावरताती । त्यांच्या क्रीडांनं रंग आणिती
सारे खेळगडी ते होतीं ! ९

तांबुस लाली संध्या देते । मुलांवरी ते त्या अवतरतें
शिक्षक संध्या वितान तांबुस !
विश्रांतिस्तव उत्सुकताती । मुलांसवें ते हो, घरिं येती
विश्रांतीस्तव सारे धावति ! १०
गगनीं तारे लुकलुकताती । टकमक टकमक मुलें पाहती
अमुचे शिक्षक चंद्र तेथले !
तान्यांमाजीं मुलां निरखिती । मुलांत तारे त्यांना दिसती
सारीं तेजें विहारताती ! ११

* * *

स्वयंपेरणेनें ज्या क्षेत्रीं । मुलें धावुनी रंगुनि जाती
अमुचे शिक्षक तेथें जाती !
अपाय उपाय त्यांना कथिती । अपाय टाकुनि उपाय साधिति
संरक्षीलें सारे जाती ! १२
जें जें कांहीं मुलें करीती । भाग त्यामधि शिक्षक घेती
अमुचें शिक्षक तिथें राहुनी
मुलांस अनुभव विपूल देती । सूज्ञपणाचा नाना क्षेत्रीं
सर्व शहाणे होउन जाती ! १३
शिकविण्यास्तव केवळ नसती । शिकण्यास्तवही शिक्षक असती
अमुचे शिक्षक शिकुनि शिकविती !
ही तर त्यांची खरी प्रकृती । आयुष्याचें सोनें करिती १४
प्रभूस शिक्षक हे आवडती !

दि. २२-७-४८

## : ४२ : ती ज्ञानलालसा आहे जागृत झाली.... [वेडांत]

ती ज्ञानलालसा आहे जागृत झाली,
त्या क्षणिच पाहिजे ज्ञानपेरणी केली ॥ ध्रु० ॥
धावती, प्रश्न मग तेथें नानापरिचे
ते सुसंगत तसे विसंगतहि यायाचे
पण समाधान तेथलें न टाळायाचें;
जावी न संधि जी आपण चालून आली ! १
दुर्लक्ष करुनियां जागृतिच्या अवधानी
ज्ञानास ओतिलें जरि उत्साहें कोणीं !
होईल, पालथ्या घड्यावरी तें पाणी
करि आधीं जागृति जरी ती झाली नसली ! २
आधिं लोह जैसें तप्त लागतें करणें,
मग इच्छित देतां येती त्याला वळणें,
तें थंड जाहल्यावरी न कांहीं होणें,
ते पिटीं जोंवरी त्यांत तप्तता भरली ! ३
जरि नसली जागी हळूवार करि जागी,
चातुरी राबवीं, त्यास्तव तव बहु रंगी
तूं ज्ञान-बिजें तीं लाव, तियेच्या अंगीं
होईल स्वतां मग ज्ञान बिजां ती वाली ! ४
दि. २४-७-४८

---

## : ४३ : कार्य येथें एक चाले....... [ खाण सोन्याची ]

कार्य येथें एक चाले देश उध्दारायचें !
देश उध्दारायचें ! देश उध्दारायचें ! ॥ ध्रु ॥
उन्नतिच्या मार्गी कांहीं देश धावतात,
अवनतींत कांहीं मागें देश राहतात,

कारणें तयांचीं सारीं येथ जागतात,
उन्नतीच्या कारणांचें कार्य येथें व्हायचें !
कार्य येथें व्हायचें ! कार्य येथें व्हायचें! १
देश सर्व होता पूर्वीं पूर्ण वैभवाचा,
निघत नित्य होता येथें धूर सोनियाचा,
कसा आज दैन्यीं झाला ? अशा कारणांचा
नाश होण्यासाठीं येथें कार्य तें जागायचें !
कार्य तें जागायचें ! कार्य तें जागायचें ! २
इथें बोल आचाराच्या विना एक ही न,
चालरीत हेतूवीना येथें सर्व हीन,
मनःशुद्धिच्या कार्याचें क्षेत्र हें महान्,
द्वेष-हेवा येथ नाहीं प्रेम येथें यायचें !
प्रेम येथें यायचें ! प्रेम येथें यायचें! ३
लता-तरु-पाषाणांचा नाहिं देश येथे
मृत्तिका-नद्या-नाल्यांनीं नाहिं देश होत,
जगांतील आम्हांपुढती सर्व मनुजजात
मानवांच्या बालसृष्टी देश येथें आमुचे !
देश येथें आमुचे ! देश येथें आमुचे ! ४
बालसृष्टि सामर्थ्याच्या येथ व्हावयाच्या,
सृष्टितील सामर्थ्याच्या दृष्टि द्यावयाच्या,
विशालास सन्मानाच्या स्फूर्ति यावयाच्या,
उन्नति-वेली--तरूंना येथ हो, लावायचें !
येथ हो, लावायचें ! येथ हो, लावायचें ! ५
बुद्धिमाजी येथें येतें तेज तें रवीचें
मनामाजि पावित्र्याचें कार्य ये जलाचें,
कला, शक्ति शरीरिं येती, कार्य सृष्टि, भूचें,
शिक्षणाच्या क्षेत्रिं आम्हां हेंच हो, साधायचें !
हेंच हो, साधायचें ! हेंच हो, साधायचें ६

जसा नसे अंध:कारा प्रकाशांत थारा,
वास इथें अज्ञानाचा कधि न राहणारा,
येथ ज्ञान–विज्ञानांचा दीप तेवणारा,
मार्ग येथें स्पष्ट होती सर्व उत्कर्षायचें !
सर्व उत्कर्षायचे ! सर्व उत्कर्षायचें! ७

दि. २६–७–४८

## : ४४ : अभिनंदन हें प्रेमळ सोज्ज्वल........ [पादाकुल]

अध्ययनीं जे सुविद्य असती । कलावंत अध्यापनिं होती
सेवेस्तव शाळांस धावति । स्वागत त्यांचें असु द्या चित्तीं!
अनुभवसंचयिं सतेज होती । विक्रमार्थ जे शाला त्यजिती
प्रयाणहि खुलें अभिनंदावें । हार्दिक त्यांचें स्वागत व्हावें !
शिष्टाकृतिनीं सुविद्य होती। निष्ठेनें शाळांत रावती,
या विक्रमिं त्या धन्य म्हणावें । द्विवार त्यांचें स्वागत व्हावें !
अधिकचि शिकण्यास्तव शिकवीती । व्यासंगानें सतेज असती
पूजनीय ते शिक्षक व्हावें । त्रिवार त्यांचें स्वागत व्हावें !
अधिकच शिकण्यास्तव शिकवीती । सुविद्य होती अनुभव देती
संशोधक जे ऋषि गाजावे। स्वागतिं संतत भूषण व्हावें !
शिक्षक असले स्वयंप्रभेंचे । देवच असती ते शाळांचे
ओतायाला दिव्य चेतना । मिळोत शिक्षक हे शाळांना!
उत्साहाच्या या सन्मूर्ती । बघतां होतो प्रहर्ष चित्तीं
समारंभ नेत्रांत चालतो। नित ! घे उत्सवसिंधू भरती !

* * *

आमुच्यांतलें जे जे कोणी । यशें आणितीं व्यासंगांनीं
आम्हींच त्यांचा गौरव करणें । त्यास्तव हें अभिनंदन गाणें!
असति तपस्वी जैसे दुर्मिळ । आपुलकीचा गौरव दुर्मिळ
निर्मत्सर तर फारच दुर्मिळ । अभिनंदन हें प्रेमळ सोज्ज्वळ!

द. २७–७–४८

## : ४५ : शिक्षक व संत ........... [दिण्डी]

जिथें आहे सत्कर्म–पुण्यखाण,
क्षेत्र कुठलें ? शिक्षणाविना आन!
कार्यगौरव ते खरे जाणणारे,
संत मिळतिल सत्तेज पेरणारे ! १

राहि, त्यांच्या तूं पूर्ण संगतींत
तुला स्फूर्ति लाभेल, सदा तेथ
अरे, येथें आहेत, पुण्यवंत
कोण म्हणतो, शिक्षणीं नसति संत ! २

खरें ! दुर्लभ संपूर्ण गुणी संत
परी दिसती विखुरलें अनेकांत
अनेकांच्या सद्‌गुणांमाजि खासे
संत तुजला मिळतील हवे तैसे! ३

मात्र डोळे उघडून भोंवतालीं
पाहण्याची पाहिजे दृष्टि आली.
जिथें जेथें चमकेल तेज कांहीं,
प्राप्ति त्याची व्हावया धाव घेईं! ४

अल्प गुण ही चमकेल जयापाशीं,
तशाकरितां मानीच संत त्यासी.
तिथें श्रद्धा ठेवूनि मनोभावें
अल्प असल्या सद्‌गुणां तूं पुजावें ! ५

सद्‌गुणांचें भांडार एकठायीं
मिळायाचें जगि फार कठिण होई,
अल्प अल्पें भांडार मिळायाचा
मार्ग तूंज्ञा खात्रिचा नी यशाचा! ६

अंशु-अंशु होवोनि समाविष्ट
सद्‌गुणांचा रवि मिळो, तुला इष्ट!
सुलभ तुजला होईल कल्पनेंत,
शिक्षणीं तो हो कलावंत संत ! ७

तो हि तूझा सद्‌गुरुच महासंत,
राहि त्याच्या शोधांत दक्षतेंत.
सुलभ आहे प्रत्येक जणा मार्ग
दरेकाला लाभेल यशोभाग ८

कार्य हेंही नाहींच कमी कांहीं,
दरेकाच्या हातांतलें असे ही!
दरेकानें मार्गि या धाव घ्यावी,
स्वावलंबी युक्ति ही आदरावी ! ९

अंशु-अंशु तूझ्यांत समाविष्ट
करूनीया तेज घे तुला इष्ट !
कार्य हें तर होईल फार मोठें
दुर्मिळांचें येऊं दे स्थान तूतें ! १०

नाहि जमलें! जमुं न दे! भीति नाहीं!
मात्र सेवा सद्‌गुणीं चालुं द्यावी !
त्यांत तूझें वर्धिष्णु तेज ठेवी,
होऊं दे, हें पुष्कळां मार्गदायी ! ११

* * *

तुला दिसतिल संत वा महासंत
मात्र निष्ठावंत तूं राहि येथ!
शिक्षणाचें क्षेत्र हें विशालांत
संतपण तर येथें हि भूषणांत! १२

संत म्हणजे परमार्थ जाणणारा !
लोकशिक्षणि तो अर्थ असे सारा!

याच लोकीं तो लाभ अर्पिणारा!
याच देहीं अनुभूति दाविणारा! १३

संत येथें व्यवहार जाणतात,
संत येथें योग्य ते बोलतात,
संत येथें सत्कर्म साधितात,
संत येथें सन्मार्ग दावितात! १४

अंध निष्ठा येथें न चालणारी,
इथें बुद्धी वरतींच भिस्त भारी!
संप्रयोगी अनुभूति नांदणारी,
ज्ञानबीजें यांवरी वाढणारीं ! १५

शिक्षकोत्तम येथला असे संत,
देव त्याचा बालकांमाजि येथ !
भजन पूजन त्यास त्या शिक्षणांत,
सिद्धि त्याची तो देव बनविण्यांत ! १६

नको त्याला त्या पंढरीस जाणें,
नको त्याला ते वारकरी होणें,
असे त्याची 'पंढरी' येथ शाळा !
होत वारी नित्य येथें तयाला, १७

पंढरीचा नाथही इथें आहे;
मुलांमाजी तो खरा नांदता हे !
मुलांतूनी होत तो प्रगट जेव्हां,
परम होतो आनंद त्यास तेव्हां! १८

म्हणुनि तुजला मी पुन्हा पुन्हा कथितों,
म्हणुनि तुजला तेंच तें दर्शवीतों,
शिक्षणाच्या क्षेत्रांत असति संत,
शिक्षकोत्तम सत्कर्म–भक्तिमंत ! १९

* * *

बोलती ते ज्या पुण्य कर्म संत,
तेथ राहीं तूं खरा भक्तिमंत !
पुण्यकर्में जमतात संत जेथें,
अनायासें कळतील तुला तेथें ! २०

बोलती ते ज्या पापकर्म संत,
उभा त्यांच्या राहीं न सावलींत,
पापकर्में घेरिती दुर्जनांस,
नको इच्छूं तेथील कधीं वास ! २१

शक्त नसतां सत्कर्म करायास,
करीं कांहीं नच नवें ! सुखें ऐस !
नको सोडूं पण संत संगतीस,
हवी तुज ती येईल शक्ति खास ! २२

मात्र तूझ्या सत्कर्म सान दीपा,
तेववीण्या ठेवि तूं मार्ग सोपा,
चांगल्याला नित्य तूं भजत राहीं,
हेंहि कांहीं काम रे, कमी नाहीं ! २३

हवी तैशी नी तुझ्या प्रगतिजोगी,
शक्ति येथें राहील तुझी जागी,
शोध परि येथही संत-संगा,
हीच सेवा दे संत कृपागंगा ! २४

संत छाया सोडितां मोह तूंस
मोहुनीया नेतील पातकांस !
म्हणुनि राहीं, तूं सक्त सावधान
हेंहि आहे मोठेंच काम जाण ! २५

बिंदुपासुनि या मार्ग उन्नतीचा
बिंदुपासुनि त्या मार्ग अवनतीचा

बिंदु वरतीं राहिं तूं या निदान
बिंदु चळतां येईल अधः स्थान ! २६
पातकांच्या जाशील दरींमाजी,
चढुनि याया कष्टांस बहुत दे जी,
याचकरितां राहिं तूं सावधान,
चढुनि जाया सोपेंच मग इथून ! २७
आणि येथें लाभतां संतभेट,
उन्नतीला नेईल तुला थेट !
आणि तेथें कळतील पुण्य कर्में,
ठेविलेलीं राखून तुझ्या नामें! २८
आणि तेथें येईल क्षण सुरेख,
तुला म्हणतिल संत सज्जन अनेक !
तपश्चर्या मात्र ही हवी याला
सिद्ध राहीं व्रत कठिण करायाला ! २९
शिक्षणाच्या क्षेत्रांत असति संत,
संतसंगा राहिं तूं भक्तिमंत !
तूंहि होशिल त्यांतला एक संत ;
पूर्ण निष्ठा राहूं दे तव मनांत ! ३०

दि, २९-१-४५

## : ४६ : चार डोळे........... [अभंग]

दिले दोन डोळे देवानें आम्हांला, सृष्टि पाहायाला त्याची सारी
दिला ज्ञानचक्षु देव जाणायाला तिसरा तो डोळा झाला आम्हां
विज्ञानाचा चक्षु सृष्टि जाणायाला चवथा तो डोळा झाला आम्हां
दोन चर्मचक्षू दिसती बाहेरी दोन ते अंतरीं, अन्तश्चक्षु !
देवाच्या कृपेनें ऐसे चार डोळे आम्हांला मिळाले अन्तर्बाह्य !

जन्मतांच डोळे दोन लाभताती शिक्षणानें येती दोन पुढें !
ऐसे चार डोळे भिन्नभिन्न कामीं शक्तिमंत नामी होताती ते !
चर्मचक्षुंमाजी काम शिक्षकाचें, कांहीं न व्हायाचें विकासार्थं
मात्र अंतश्चक्षू विकासावयाचें, काम शिक्षकाचें, आहे मोठें !
देवाजीच्या कृपें दोन डोळे येती, चष्म्यानेंही होती चार डोळे
चष्माचक्षूपरी नकली नसावे, अंतश्चक्षु व्हावें शक्तिशाली !
उत्तम शिक्षक काम हें साधीती, काम हें करीती देवाजीचें.
बघायाला आले दोन चर्मचक्षू, आले अंतश्चक्षू जाणायाला
असे बाह्य डोळे दोन चर्मचक्षू, दोन अंतश्चक्षू चार डोळे !

चित्रक्रमांक १

दोन डोळे ईश्वरानें । आपणांला दीधले
आणि चष्मा लाविल्यानें । चार आतां जाहले !
सोय-सौंदर्यास भावी । भाव आले चांगले
दोन डोळे चार केले । मानवानें आपुले !

चित्रक्रमांक २

दोन डोळे ईश्वरानें । आपणांला दीधले
दोन अंतश्चक्षु आले । ज्ञान-विज्ञानी भले
सोय-सामर्थ्यास भावी । भाव आले चांगले
दोन डोळे चार केले । शिक्षणानें आपुले!

दि. २७-७-४८

## : ४७ : अमुची शाळा........ [पादाकुल]

सारे म्हणती अमुची शाळा
अमुची शाळा । अमुची शाळा ।। ध्रु० ।।
बालक म्हणतो माझी शाळा। पालक म्हणतो माझी शाळा
चालक म्हणतो माझी शाळा । शिक्षक म्हणतो माझी शाळा
सारे म्हणती अमुची शाळा ! १

उत्तम कैसें तें बोलावें । उत्तम कैसें तें चालावें
उत्तम कैसें तें जाणावें । नित्य शिकविते ही आम्हांला
बालक म्हणती अमुची शाळा ! २

उत्तम शिकलों तें शिकवावें । उत्तम त्याचें दर्शन द्यावें
उत्तम तैसें करवुनि घ्यावें । नित्योत्तम संधि दे आम्हांला
शिक्षक म्हणती अमुची शाळा ! ३

उत्तम उत्तम तें शोधावें । उत्तम उत्तम तें जमवावें
उत्तम सहकार्यी योजावें । उत्तम तर हें क्षेत्र अम्हांला
चालक म्हणती अमुची शाळा ! ४

उत्तम ज्ञानें नी विज्ञानें । उत्तम उत्तम शीलाभरणें
प्रयोग करुनी साधारानें । मुलांस अमुच्या शिकवायाला
पालक म्हणती अमुची शाळा ! ५

बालक म्हणती अमुची शाळा । शिक्षक म्हणती अमुची शाळा
चालक म्हणती अमुची शाळा । पालक म्हणती अमुची शाळा
सारे म्हणती अमुची शाळा ! ६

मुलेंहि म्हणती अमुची शाळा । मुलीहि म्हणती अमुची शाळा
पुरुष म्हणती अमुची शाळा । स्त्रियाहि म्हणती अमुची शाळा
सारे म्हणती अमुची शाळा ! ७

अमुचीं राष्ट्रें यांनीं बनतीं । यांतुनि चालक पुढती येती
यांतुनि शिक्षक ते निवडीती । चेतनस्पंदन निर्मायाला
राष्ट्रें म्हणती अमुची शाळा ! ८

विश्वकुटुंबी-वृत्ती यावी । सन्मानवता ती नांदावी
समान संस्कृति बहरुन यावी । बीजीं शिकवी अभ्युदयाला
विश्वें म्हणती अमुची शाळा ! ९

* * *

गांवां म्हणुं द्या अमुची शाळा। देशां म्हणुं द्या अमुची शाळा
राष्ट्रां म्हणुं द्या अमुची शाळा। सौख्य नि शांती निर्मायाला
जगाहि म्हणुं द्या अमुची शाळा !

* * *

सारे म्हणती अमुची शाळा
अमुची शाळा। अमुची शाळा
सारे म्हणती अमुची शाळा !

* * *

साऱ्या म्हणुं द्या अमुच्या शाळा।
अमुच्या शाळा। अमुच्या शाळा
साऱ्यां म्हणुं द्या अमुच्या शाळा

दि. ३०-७-१९४५

---

## : ४८ : जगाच्या कुलाला........ [अभंग]

जगाच्या कुलाला सांगूं ब्रह्मदेवा, साधूं तूझी सेवा जीवें-भावें
तुवां निर्मियेली सजीव हे सृष्टी, उत्तमोत्तमीं ती ठेवूं, आम्ही
विद्यानगरीचे शिक्षक कुलाल, तूझ्या पंथांतील, ब्रह्मदेवा !
सचेतन-माती ओली आम्हांपूढ, घेते आढेवेढे वळणाला.
विद्यानगरीचे आम्ही ते कुंभार, घालूं चक्रावर मृत्ति-का ते
अध्यापनचक्र सुप्रश्नांचा दंडा, येथें हातखंडा आमूचाची !
वेग देऊं चक्रा आल्हादाचें काम, कौशल्य सुधाम हात आम्हां
सुकर मृण्मय चैतन्यासभोंतीं, ठेवोनी इष्ट तीं, वळणें देऊं !

* * *

इष्ट वळणांनीं सुघट जाहले परीक्षेच्या गेले भट्टीमाजी
चैतन्य-सुघटि मृण्मय-चैतन्य, उपयोगी मान्य झाले आतां !

उत्तम कैसें तें बोलावें । उत्तम कैसें तें चालावें
उत्तम कैसें तें जाणावें । नित्य शिकविते ही आम्हांला
बालक म्हणती अमुची शाळा ! २

उत्तम शिकलों तें शिकवावें । उत्तम त्याचें दर्शन द्यावें
उत्तम तैसें करवुनि घ्यावें । नित्योत्तम संधि दे आम्हांला
शिक्षक म्हणती अमुची शाळा ! ३

उत्तम उत्तम तें शोधावें । उत्तम उत्तम तें जमवावें
उत्तम सहकार्यी योजावें । उत्तम तर हें क्षेत्र अम्हांला
चालक म्हणती अमुची शाळा ! ४

उत्तम ज्ञानें नी विज्ञानें । उत्तम उत्तम शीलाभरणें
प्रयोग करुनी साधारानें । मुलांस अमुच्या शिकवायाला
पालक म्हणती अमुची शाळा ! ५

बालक म्हणती अमुची शाळा । शिक्षक म्हणती अमुची शाळा
चालक म्हणती अमुची शाळा । पालक म्हणती अमुची शाळा
सारे म्हणती अमुची शाळा ! ६

मुलेंहि म्हणती अमुची शाळा । मुलीहि म्हणती अमुची शाळा
पुरुष म्हणती अमुची शाळा । स्त्रियाहि म्हणती अमुची शाळा
सारे म्हणती अमुची शाळा ! ७

अमुचीं राष्ट्रें यांनीं बनतीं । यांतुनि चालक पुढती येती
यांतुनि शिक्षक ते निवडीती । चेतनस्पंदन निर्मायाला
राष्ट्रें म्हणती अमुची शाळा ! ८

विश्वकुटुंबी-वृत्ती यावी । सन्मानवता ती नांदावी
समान संस्कृति बहरुन यावी । बीजीं शिकवी अभ्युदयाला
विश्वें म्हणती अमुची शाळा ! ९

* * *

गांवां म्हणुं द्या अमुची शाळा। देशां म्हणुं द्या अमुची शाळा
राष्ट्रां म्हणुं द्या अमुची शाळा। सौख्य नि शांती निर्मायाला
जगाहि म्हणुं द्या अमुची शाळा ! १०

* * *

सारे म्हणती अमुची शाळा
अमुची शाळा। अमुची शाळा
सारे म्हणती अमुची शाळा !

* * *

साऱ्या म्हणु द्या अमुच्या शाळा।
अमुच्या शाळा। अमुच्या शाळा
साऱ्यां म्हणुं द्या अमुच्या शाळा

दि. ३०–७–१९४५

---

## : ४८ : जगाच्या कुलाला........ [अभंग]

जगाच्या कुलाला सांगूं ब्रह्मदेवा, साधूं तूझी सेवा जीवें-भावें
तुवां निर्मियेली सजीव हे सृष्टी, उत्तमोत्तमीं ती ठेवूं, आम्ही
विद्यानगरीचे शिक्षक कुलाल, तूझ्या पंथांतील, ब्रह्मदेवा !
सचेतन–माती ओली आम्हांपूढ, घेते आढेवेढे वळणाला.
विद्यानगरीचे आम्ही ते कुंभार, घालूं चक्रावर मृत्ति-का ते
अध्यापनचक्र सुप्रश्नांचा दंडा, येथें हातखंडा आमूचाची !
वेग देऊं चक्रा आल्हादाचें काम, कौशल्य सुधाम हात आम्हां
सुकर मृण्मय चैतन्यासभोंतीं, ठेवोनी इष्ट तीं, वळणें देऊं !

* * *

इष्ट वळणांनीं सुधट जाहले परीक्षेच्या गेले भट्टीमाजी
चैतन्य–सुघटि मृण्मय–चैतन्य, उपयोगी मान्य झाले आतां !

बुध्दीचा आवाज निघे खणखण रम्य शीलाभरणं रंग त्याला.
उत्तमोत्तमीं ती अशी तुझी सृष्टी, ओळखते कां ती ब्रह्मदेवा
जगाच्या कुलाला पाहा ब्रह्मदेवा, झालेली ही सेवा जीवें भावें
दि. ३१–७–४८

---

## : ४९ : तिथें हिरकण्यां, हिऱ्यां, प्रभव कोहिनूरां पण !

सुविद्य जन लाभणें तर असे, न सोप्यांतले
सुशिक्षित, सुशील तें तर बरेंच कष्टांतले!
तशांत बहु दुर्लभांतिल मनो-गुणां जाणते
प्रयोग–अनुभूति–सिंधु विरलीं, तसे नांदते ? १

असें जरि असे, तरी सतत शोधणें हें बरें !
प्रयत्न करितां मिळे सुयश हेंहि आहे खरें!
इथेंच दिसती, सुशिक्षक सुजातिचे जे हिरे
दिसेल अभिजातता वहुगुणी इथें वावरे ! २

अगोदर कळे जनां हिरकण्यांतली दिव्यता
पुढें हिरकण्या बहूत मिळती, तया शोधितां !
अचानक पुढें हिरे मिळति आणि कोहिनूर
प्रयत्न नित चालु द्या सकलही मिळाया तर ! ३

जरी बहुत दुर्मिळीं असती, कोहिनूरी हिरे
तरी न कमती कधीं हिरकण्याहिरे आदरें !
तिथें प्रत असे गुणी, गुणगणीं तशी ती ठरे
तयापरि महत्त्व ही अधिक नी कमी संचरे ! ४

इथें हिरकणी नसे हिरकण्यांस शोधावया,
इथें नच तसा हिरा तर हिऱ्यांस शोधावया !
इथें मनुज शोधितो हिरकण्यां हिऱ्यांना सदा
परी न बनतो स्वतां हिरकणी हिरा तो कदा ! ५

... ठा. .. स्थळप्रत.
अनुक्र. २०२५४ वि. काव्य ९१....
क्रमांक .. ९३३२०...... नों: दि. २.११.१९८८



सचेतन जगांतली परी परिस्थिति वेगळी,
गुणी प्रविणता इथें सहज शोधतां ये भली
इथें मनुज शोधितो सुगुरु शिक्षकाला स्वतां
स्वतां सुगुरु होतसे गुणि गुरूस तो शोधितां ! ६

अहो, सुगुण नांदती तर समान साऱ्या जनीं
जिथें अधिक तेज ! त्या सुगुणीं जो ठरे तो गुणी !
गुणी मिळवितो प्रभावळ तयांसभोंती गुणी,
तिथेंच अभिजातता नवनव्या विलासांतुनि ! ७

दुजांस शिकवूं अशी दिसत जेथ सद्भावना
तिथेंच मज वाटतो प्रभव शिक्षकीं सद्गुणां
कमी अधिक नांदती प्रति अशाही वर्गांतुन
तिथें हिरकण्यां हिऱ्यां प्रभव ! कोहिनूरां पण! ८

दि. ५–८–४३

: ५० : संमेलना येऊं द्या तीं मुदें........ [मंदार]

या देवळांमाजि आलासि भक्ता आलास ना लक्ष घेवोनिया
संसार घेवोनि आलास येथें का लक्ष संसारि ठेवोनिया !
संसार चिंता तुझी वाहणारा तो येथ तूं फक्त का एक रे
चिंता तुझी व्यर्थ यामाजि भक्ता, भ्रांती तुझी थोर चिंता ठरे!
संसारचिंता सदा वाहणाऱ्या आहेत रे शक्ति त्या वेगळ्या
चिंता तुवां ती करावी कशाला तूं फक्त ये भक्ति घेवोनिया !
ऐसें न होते बहुधा घडो कीं, प्रत्येक विश्रांति तुझी घरीं !
येताच तूझे इथें पाय होती जाण्यास उत्सुक ते सत्वरीं !
संसार चिंता महात्रासदायी होवोनि तूं मुक्त त्यांतूनियां
औत्सुक्य याया इथें तूज यावें विश्रांति वाटो तुला स्थानिं या
यायास तीं पावलें हालकीं हो, जाण्यास व्हावत्‌ भारी जड

संतोष तूझा इथें वावरावा घ्यावी तुवां व्युत्क्रमाची कड !
या देवळाला असे रे अपेक्षा द्यावें तुवां लक्ष येथें पुरें !
होते यदा चौकशी या प्रकारीं दुर्लक्षि तूझें दिसे नांव रे !
शाळाच हीं देवळें आपुलीं ना ! येथील सद्‌भक्त ते आपण
गेलें ठरोनी असें एकदां हें तेथें नसो तो ' चुकारो ' गुण !
सच्चेपणालाच रे भाव येथें येथें समाधान हें वेतन
कर्तव्यसंतोष लाभास लोकीं सांगावया कांहि रे मोल न !
पूर्णांशि तूला कृपेचा मिळाया पूर्णत्व तूझें इथें येऊं दे,
आतूर ही दोन भेटीस पूर्ण संमेलना येऊं दे तीं मुदें !
दि. ७–८–४८

---

: ५१ : शाळकरी........ [फटका]

मजूर जैसे ते श्रमजीवी जसे शेतकरी कामकरी!
तसेच असती ते श्रमजीवी नोकर खासगि सरकारी !
वकील–वैद्यादि–मंडळीहि श्रमजीवी श्रम करणारी
तसेच शिक्षक हे श्रमजीवी, म्हणा हवें तर 'शाळकरी' १
शाळकरी हा शब्द रुचावा, मुलांस म्हणतां 'शाळकरी'
मुलां भूषवी, प्रिय तें आम्हां म्हणा अम्हांला 'शाळकरी'
वारकरी हा शब्द रुचविती माळकरी नि टाळकरी
बारगीर ही शब्द रुचविती त्यांना म्हणतां धारकरी २
हेटकरी नी तसे गडकरी प्रांगु-शब्द मी कितीतरी
तसा असूं द्या शब्द अमुचा गुणी न कमतो 'शाळकरी'
शब्द न हलका शब्द न भारी शब्द रहातो जसा तसा
अर्थ वाढतो मागिल त्याच्या सतेज पुण्याईसरसा ! ३
मोठे मोठे शब्द ठेविती सामान्यांपासूनि दुरी
छोटे छोटे शब्द घेउनि शिरूं तयांच्या हृद्यांतरीं

मिसळुनि आपण त्यांच्यामाजी नेऊं त्या उन्नतीवरी
छोटे मोठे भेद जावया शिक्षण त्यां घेउं द्या शिरीं ! ४
पवित्रता या शब्दा द्याया झटतो झटुंहो खरोखरी
त्याची पुण्याई कोणाला आज वाटली उणी जरी
सद्गुरु, शिक्षक, मुलें नि शाळा शिक्षण येवो या उदरीं
आणि म्हणावें आपण आतां खुशाल साऱ्यां 'शाळकरी'! ५
'शरिराचे श्रम तसेच असतो मनोबुद्धिचे परिश्रम
आवश्यक तर सारे श्रम हे करिति समाजाचें काम
म्हणून आम्ही श्रम करणारे आहों एका जातीचे
'श्रमजीवी' हें नांव तियेचें जगून तोमधि मरायचें ! ६
अचेतनी कोरड्या नि ओल्या मातीवरि कुणि श्रमताती,
सचेतनी त्या ओल्या मातीवरतीं कुणाचे श्रम असती,
अन्न, वस्त्र नी निवासालयें उत्तम निर्मीलीं त्यांनीं,
उपभोगाला त्यांचा स्वामी उत्तम केला हो, यांनीं ! ७
म्हणून सारे श्रम करणारे एका राशींतील मणी
कार्यभिन्नता भिन्नगुणां दे भिन्नपणाच्या संस्करणीं
वर्ग तयांचा भिन्न असूं द्या मुळांत सारे एक तरी
मजूर किंवा कामकरी वा शेतकरी वा शाळकरी ! ८
सद्भवांचें दैवत मन ज्या असद्भाव ज्यांच्या न उरीं
समाजहित ज्या श्रमांत असती असुं द्या ते कोणीहि 'करी'
सन्मानवता निर्मायाचीं ध्येयें ज्यांच्या सदा शिरीं,
एका प्रतिचे सर्व 'करी' हे असु द्या ते कोणीहि, 'करी' ९

दि. ११-७-४

ग्रं. क्र. ८२६३

## :५२: हाक आयका!.... . . . [नवती]

१

हाक आयका–हाक आयका,
हृदय तुम्हां बाळ ! हृदयहाक आयका ॥ ६६ ॥

*  *  *

हाक आयका–हाक आयका
पीळ अंतरांत पडे हाक ऐकतां !
हाक आयका–टाळुं ती नका,
टाळण्यांत लाज असे सुगुरु शिक्षका !
स्थान सुगुरुतें–व्यर्थ होत तें
आर्तबोल परिसुनिया, पळ असे जिथें !
घ्याच सद्गुरो–प्रेम पाझरो,
औषधोपचार करा बाल ते स्मरो !
हाक आयका–टाळुं ती नका
उघड तुम्हां जरि न ! घ्याच साह्य बालका
सहायीं चुका–कळकळी फुका
तुम्हि स्वतांच हा नमुना होऊं हो, नका

२

कार्य आयका–सूज्ञ शिक्षकां
औषधोपचार करा तुम्हिच्च बालका !
हाक ऐकतां–लक्ष टाळितां
पाप तुम्ही जाणुनिया करितसां स्वतां !
घ्याच जाणुनी–तूमच्या गुणी
गडगडुनी बाळ कसा पडत अंगणीं ?
बाळ खेळतां–जिन्यावरति त्या
पडत तुम्हां पाहुनियां नमस्कारितां !

हात जोडिले—कठडे सूटले,
धावतांच पाय चुकुनि बाळ घसरलें !
तुम्हीं पाहिलें—बाळ घसरलें
हां ! हां ! बोलोनि तुम्हीं पाय काढिले !
दुःख पाहुनी—नयन झाकुनि
जाउं नका छातीवरी दगड ठेवुनी !
हृदय विव्हल—नयनिचें जल
दर्शवीत फार तुम्ही सदय कोमल !

३

रक्त भळभळा—वाहते पळा,
रडत पहा बाळ करुनि कंठ मोकळा !
सान तो किती—तत्त्व अच्युती
मात्र तुम्ही थोर म्हणुनि तत्त्व का च्युती !
मस्तका धरा—दाब द्या बरा,
शाळेबाहेर म्हणुनि लाज नच वरा !
जसा आईचा—बाळ तूमचा
कोठें ही कधीं न संबंध जायचा !
जसा पालका—तसा शिक्षका
कळवळा जींत असो विषयिं बालका !
लागुं द्या मुला—सान सोज्ज्वला,
प्रेमळांतल्या जगांतला भला लळा !
योंतलही क्षणी—इतरजन कुणी,
आधीं जा त्यांचिया तुम्हीच धावुनी !
भीड आवरा—सत्क्रिया करा,
मानसोन्नतीस योग्य तेंच आचरा !

४

फार हो शिका–सत्क्रिया चुका,
ज्ञान सावधान नसे, ज्ञान तें फुका !
फक्त पुस्तकी–ज्ञान घातकी
अहंविशेषांत त्यास शून्य लायकी !
ज्ञानपाठक–भारवाहक
भूमिलाच भार होति लोकीं नाहक !
जुळवुनि खिळे–छाप छापिले
जुळविणें नि छापणेंच त्यांस लाभलें !
बोलती ध्वनि–लिहीती कुणी
कष्ट मात्र ! नसे ज्ञान त्यांचिया मनीं
सत्क्रियाविना–ज्ञान जरि कुणा
खुशाल त्यांस भारवाहकांमधें गणा !
सत्क्रिया स्फुरे–ज्ञान तें खरें
सदाचार हेतु ज्यांत सहज संचरे !

दि. ८–८–४८

---

## : ५३ : कवडी, किंमत तुझी ! ..........[साधी]

कवडी, किंमत तुझी !
नच हो कवडी किंमत तुझी !
जीवनोपयोगी तूं असतां–अमोल किंमत तुझी ।। ध्रु० ।।
अमोलते जीवनोपयोगी–नच हो ! कवडी तुझी !
अमोलते जीवनोपयोगी–नच ! हो कवडी तुझी !
कवडे, तूं जीवनोपयोगी–अमोल किंमत तुझी !
रत्ना नच जीवनोपयोगी–कवडी किंमत तुझी

सुभव्य शाले, भव्य रहा तूं–तव न भव्यता दुजी
शिक्षणोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी !
पवित्रता शिक्षणा, गाजवी–नसो कुठें तशी दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी ! २
धैर्यदेवते, बलसागर तूं–तशी न कोणी दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी !
गुणी श्रेष्ठता असु दे तुझी–तशी नसो जगिं दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी ! ३
हें सौंदर्या, तव सौंदर्या–नाहीं तुलना दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी !
अप्रतिमांतिल हिमालया तूं–प्रतिमा तुज नच दुजी
जीवनोपयोगी असशी तूं–अनन्य किमत तुझी ! ५
तत्त्वा, महती तुला असूं दे–तशी न महती दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी !
अध्यात्मा, तुज असो श्रेष्ठता–न ती श्रेष्ठता दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी ! ४
अप्रतिमे, तूं खरीच मोठी–प्रतिमा तुज नच दुजी
जीवनोपयोगी नच जर तूं–कवडी किमत तुझी !
विश्वबंधुते, मोठी खरि तूं–सन्मानवता दुजी
जीवनोपयोगी होशी तूं–अनन्य किमत तुझी ! ६
सुभव्य अस वा नच तूं शाले–तुला तुलो नच दुजी
जीवनोपयोगी शिक्षण दे–अनन्य किमत तुझी !
जीवनोपयोगी नसतां तूं–कवडी किमत तुझी !
जीवनोपयोगी असतां तूं–अनन्य किमत तुझी ! ७

दि. ११–८–४८

## : ५४ : निश्चित येतील यशःफलें ........ [ फटका ]

सहज सुलभशा वळणालागीं–असति अपुल्या पुढें मुलें,
हेतुपुरःसरपरिश्रमानें–निश्चित येतिल यशःफलें ! ॥ध्रु॥

विचारितां विद्यार्थी शंका–घमेंडींत उत्तरूं नका,
आम्हि जाणतों चटकन कैसें–चमत्कार दावा न फुका !
शांतपणानें समजुन शंका–शांतपणें निरसणें शिका,
अज्ञानाचें मूळ शोधुनी–हळूच उपटुन तें फेंका !
सज्ञानाचें बीज लावुनी–जोपासाया सदा झुका,
बीजांकुरमारक तण सारे–खुरपुन उपटुन दुरि टाका, १

विचारितां विद्यार्थी कांहीं–प्रयोग झटकन दावुं नका,
'अम्हांस येतें सहज पहा हें'–असें दावणें, होत फुका !
तुझ्यापरी रे अम्हि अज्ञानी–दावाया त्या चुकूं नका
अचूकता जशी तुम्हां लाभली–त्यामार्गें जाण्या न चुका
अचूकतेच्या संशोधनिं त्या–आपुलकीनें हातिं धरा,
निर्मल कळतां निर्मल जन्मे–संशोधकता-झरा खरा ! २

सदाचार विद्यार्थ्यां यावा–कांहि अपेक्षा तुम्हां असे,
हुकमत तेथें मुळि न गाजवा–सांगुं नकाही ' करा असें '.
स्वतां वागुनी सोय दाखवा–महत्त्व तीं'मधी तया दिसे,
सूचना नी भाषणें नको हा–मौनाचा अधिकार असे!
अपघाताविण कांहि न सांगा–जाणूं द्या त्या स्वतां चुका,
आचरणां आचार वळविति–कायम ठेवा हा ठेका ! ३

आवडनिवड ही अमकी तमकी–कांहि तयांवर लादूं नका
वाया जाणारे हे श्रम हो,–विनाकारणीं श्रमूं नका.
आवश्यक आवडी नि निवडी–तेथें तुम्हि तल्लीन असा,
रंगतील त्यां तिथें रंगुं द्या–मागें कोणाच्याहि नसा,
हरयुक्त्या परि मात्र चालवा–उघड कुठेंही न हो दिसा,
मौलिकतेचें तेज दावण्या–हरमार्गावर तुम्हिच बसा ४

उत्तम बुद्धि फारच उत्तम–कमी प्रतीची असेहि वा,
येथें प्रगती श्रमामुळें हो–परिश्रमी अभ्यास हवा !
परिश्रमानें सकलां अंगीं–प्राविण्याच्या येति कला,
परिश्रमावर मदार अमुची–असोत पण ते सुहेतुला.
स्वतां परिश्रम करायचे ते–परिश्रमी पर करणारे,
इथें एवढें अपुल्या हातीं–एवढेंच हो, होणारें ! ५
दि. १२–८–४८

---

## : ५५ : चांगलें ! ................ [सुनीत]

जें आहे जगिं 'चांगलें' बघ तयां तूं चांगल्या रीतिनें,
ठेवीं वेंचुनिया तुझ्या जवळ तें तूं चांगल्या रीतिनें !
द्यायाला इतरांस सिद्ध असणें तूं चांगल्या रीतिनें,
द्यावें तें तर चांगल्यास्तव परां तूं चांगल्या रीतिनें !
ज्यांचा वाटत जन्महेतु पितयां तूं चांगल्या रीतिचा,
हो, त्यांच्या चरितांस लौकिक पिता तूं चांगल्या रीतिचा !
ठेवा अर्पि तुझा तयांस सगळा तूं चांगल्या रीतिचा,
संधिचा तर घेइं लाभच पुरा, तूं चांगल्या रीतिचा !
सत्कर्मे घडती जगांत, बधसी तूं चांगल्या रीतिची,
टाकावी भरपूरशी भर तिथें तूं चांगल्या रीतिची !
येउं दे चतुराइ सर्व परिची तूं चांगल्या रीतिची,
क्षेत्रीं या तर पात्रता मिळिव रे, तूं चांगल्या रीतिची !
येतें संस्कृतिचें महत्त्व पुढती त्या चांगल्या रीतिंना !
राहो शुद्ध मुळांत सावधगिरी त्या चांगल्या रीतिंना !
दि. १६–८–४७

## ५६ : मधुनी मधुनी भेट देउनी............ [कटाव]

मधुनी मधुनी भेट देउनी, पहाच शाळा अमुची येउनी !
आपण येतां ये उत्तेजन विश्वासा ये नव संजीवन!
सूत्रधार गुरुजीच येथले; हरपदिं सारें दिसुनि यायचें
मुलांकडुनी करवायचें, हें तर हातीं कंकण त्यांचें! ॥ ध्रु० ॥

१

नुसते फिरलां जरि सज्जांतुनि दिसेल हासत शिक्षण त्यांतुनि
चित्रांवरुनी, फलकांवरुनी, प्रसन्नता घे आकर्षूनी !
शाळा नाहीं इमारती त्या, म्हणा न शाळा त्या साहित्या
मुलें, मुली शिक्षिका नि शिक्षक म्हणजे शाळा म्हणती तात्त्विक.
नाहीं जमले विनाशिक्षणा, तुम्हां दावितिल चित्रें नाना !
ते विद्यार्थी त्या विद्यार्थीनि शिक्षिका नि शिक्षक ते सुगुणी
गुरुशिष्यांचे ते मेळावे असेच असती नजरि भरावे,
शिक्षणसुगंध दरवळणारा फिरतो सज्जामधला वारा !
सौंदर्यें तीं निर्मायाचीं विद्यार्थ्यांनीं या शाळेचीं
स्वतांहि सौंदर्य व्हा त्याचीं, प्रथाच येथें ही नित्याची !

२

दृष्टिक्षेपीं सहज यायचा अमुच्या शाळेचा तो बगिचा !
केवळ नाहीं तो शोभेचा परिसां हरपदिं शिक्षणवाचा !
-परवां स्वातंत्र्योत्सव दिवशीं जवळिल खेडेगांवापाशीं
बागेमधल्या याच मुलांनीं शंभर झाडें दिलीं लावुनी !
कामें होती मुलांकडुनी स्वयंस्फूर्तिनीं नी प्रेमांनीं
तत्पर गुरुजी प्रेरक होउनी सल्ला देती बाजुस राहुनी !
शिक्षक अमुचे कष्टाळू अति सल्यापुरतें केवळ नसती;
स्वावलंबना द्याया स्फूर्ति, जरूर घेती कुदळही हातीं!

३

भव्य आमुचें हें क्रीडांगण घेतलेंच शाळेला लागुन
सांज सकाळीं जाते गाजुन, स्फूर्तीनें मर्दुमकी बहरुन !
व्यायामाच्या बाजुस शाळा साहित्यानें भरपुर भरल्या !
कुठल्याही क्रीडेंत कशाची उणीव नाहीं दिसावयाची !
हवेंत उघड्या पटांगणावर क्रीडावेशा येतो बहु भर ।
सर्व योजना साधिति भरपुर शरिरें सुंदर चपल नि कणखर !
शैथिल्याला मिळे न अवसर जागृत येथें शिस्त सुसत्वर
प्रमुक्त होउन क्रीडासागर सर्वोच्चावर ठेवी वावर !
विविध खेळते आवेशाचे प्रकार नाना कवायतीचे
मर्दुमकीचे चपळाईचे धकाधकीचे नी तोलाचे
मल्लखांब साधा नी वेती जोर बैठका लेजिम लाठी
पहारी कंदुक नी वोथाटी इत्यादि नित खेळ चालती !
खो खो, हूतुतु चेंडुफळीचे आट्या पाट्या आणि उड्यांचें
पळापळीचे नी गमतीचे खेळ चालती नानापरिचे !
देशिविदेशि खेळांसाठीं प्राविण्याच्या विशेष गोष्टी
क्रीडांगणि या दिसून येती ज्यांनीं वाढे शाळामहती
नमस्कार नी विविध आसनें सहज भारिती निरीक्षक मनें
प्रकार होती आणिक नाना जाउन पाहा प्रत्यक्षच ना !
क्रीडा प्राविण्यांत मिळालें प्रशस्ति, पदकें, ढाली, पेले,
प्रमुख ठिकाणीं दिसतिल सगळे पाहुन निवतिल तुमचे डोळे
असल्या क्रीडांगणावरूनी सैनिक राष्ट्रीय येति निर्मुनी
शाळेमाजीं उगम गुणांचा राष्ट्रसागरिं प्रवाह ज्यांचा !
नाना परिच्या या क्रीडांचीं सुभव्य छाया चित्रें असती,
नसती केवळ गौरवार्था तीं सदैव देती इतरां स्फूर्ति !

४

अभ्यासाच्या हो विषयांची विविध मंडळें येथें असती
कच्चे येवोनी विद्यार्थी पक्के तेथुनि होउनि जाती !

कच्चे विद्यार्थी जर असती, वर्ग खाजगी तिथें चालती
अशा मंडळामुळें येथल्या नष्टच होते ही परिस्थिति!
सामुदायिकांमधि व्यक्तिचें व्यक्तीमधुनी समुदायाचें
शिक्षण चाले जरि वर्गाचें तरीहि कांहीं अडावयाचें !
जे जे अडलेले विद्यार्थी मंडळांत या धांवत येती
स्वतां आपल्या चुका सुधारिती, हुशार त्यांना सहाय्य देती
हुशार बालां योजिति शिक्षक सुधारिति ते अडले बालक
सुट्टीनंतर हें व्हायाचें अडलेल्यांना सुधारायचे
हुशार दाविती खरी हुशारी, द्विगुणित करिती ज्ञानशिदोरी
अपुलें कौशल ते प्रकटीती, पूर्ण नियोजित नित ही रीतीं !

५

विविध अशीं अभ्यासमंडळें अलंकार शाळेस जाहले
विद्यार्थ्यांनीं स्वतां घडीले, प्रेरक गुरुजी मात्र येथले !
इतिहासाचें भूगोलाचें, भूमिति-भाषा-गणितादींचें,
व्याकरणाचें नी शास्त्राचें, पाठांतर-काव्यगायनांचें,
सहलीचें नी निसर्गमंडळ, प्रयोगविज्ञानाचें मंडळ,
नाटच-नृत्य-सत्कृत्यमंडळें, गायन-भजनांचींहि मंडळें,
चित्रपटाचें, वक्तृत्वाचें, आरोग्याचें, सहकाराचें,
आजी-माजी-विद्यार्थ्यांचें, मंडळ येथें प्रेमवृद्धीचें !
वादन-मंडळ, शोभामंडळ, बालवीर-संमेलन-मंडळ
अशींच आणिक विविध मंडळें फलक दाविती खोल्यांवरले !

६

पहा लढाया, तह नी फितुऱ्या, बंडें संघर्षादि स्वाऱ्या
उन्नति-अवनति-पट राष्ट्रांचे चित्रीं, लेखीं, दिसुन यायचे !
नाना लोकांची माहीती नाना उत्पन्नें नि परिस्थिति !'
हवामान-भूजल-कटिबंधें खगोल-भूचे लागेबंधे !

चित्रसंग्रह नि तक्ते मोठे बघाच आपण खोल्यांतुनि ते
इथें वाढते कलावंतता, यांमधि अमुची विशेष संस्था !
विषय बोलतिल नाना तक्ते, नाना परिच्या कौशल्याचे !
नाना नमुने व्यवसायाचे, प्रयोग दिसतिल नव नव्यांचें
कांहीं चित्रें भिंतीवरतीं कांहीं कांहीं वह्यांत असतीं
बघीतल्याविण त्यांची महती सांगुन नाहीं कळायची ती !
कांहीं शाळेच्या खर्चानीं कांहीं केला विद्यार्थ्यांनीं !
दिसेल मोठा पदार्थसंग्रह विद्यार्थ्यांना नित्य हितावह !

७

बालक गण आतूर बघा तो, सहल मंडळाकडे धावतो,
आगाऊ सहलीस सिद्धता, दावी त्यांना तेथिल तक्ता;
कौमुदींत वा वनांत भोजन निसर्गसहली जवळुन लांवुन
तयारि होते आपण होउन, अति प्रेमानें अति उल्हासुन !
मुलें प्रयोगास्तव परिश्रमती, तज्ज्ञ तयां हे मार्ग दाविती,
येथें हो अनुभवसंप्राप्ति, वसते कायम बालकचित्तीं !
भजन–गायना, नाट्य–वादना वक्तृत्वादी इतर कलांना
निवडुन घेती गुणी मुलांना शाळा सिद्धच मार्गदर्शना !
छायाचित्रांची ही खोली आहे निष्णातें सजवीली
विद्यार्थ्यांच्या कृतिनीं भरली, हौस ज्यांत मोलाची ठरली !
माती–चित्रें, फुलें, विमानें, तारकाम नि कागदकामें
विणकामें नी सूतकताई, चित्रकलेची ही नवलाई !
औद्योगिक भासेलच शाळा कलाकृती पाहुनि तुम्हांला
खरी न ही औद्योगिक शाळा वाढवि उद्योगप्रियतेला !

८

नाहीं केवळ तृषा शमविणें गलिच्छता प्रक्षाळन करणें
घरांत ज्यास्तव नसतिल सोई, पाणघरीं ती दिसे नवाई !

पिशवी, कपडा, हस्त, पादवा, नाक तोंड वा शरीर किंवा
दिसेल जेथें गलिच्छ कांहीं, पाणघरीं तीं मुलें पहावीं !
आणिक मंडळ आरोग्याचें कार्य करीते सुदक्षतेचें !
इथें साह्य हो, प्रौढ मुलांचें अजाण भांवडां यायाचें !
तुटती गुंड्या, तुटती छत्र्या, वह्या, पुस्तकें उसवती पिशव्या
शिवण घरांमधि कामें होतीं, स्वावलंबनें सिद्धिस जाती !
स्वदेशिवस्तुभांडाराचें दुकान हें तर फार दिसांचें
विद्यार्थ्यांनीं चालवलेलें थोरांनीं या उत्तम म्हटलें !
पेयें, खाऊ, फराळ यांचे प्रकार दिसतिल नानापरिचे
फराळघरिं हें मुलांस मिळतें बाहेरिल कांहि न खायचें !
साधे नी आरोग्यदायक पदार्थ येथें असती साजुक
भिषग्वर तिथें पर्यवेक्षक, कधीं न कांहीं होतें बाधक !
असल्या सोई शाळा करिते दिसेल मोठें वैशिष्ट्य इथें
सुटींत मोठ्या कार्य चालतें, शाळा यास्तव धन अर्पितें !
विशाल येथें ये आपुलकी विद्यार्थी ही एक लायकी
एकारूपें इथें मिसळती, भिन्नपणाला इथें न वसती !

९

मुलें उधळति खेळ खेळती, अपघाताचे प्रकार होती
तत्क्षणि घ्यावी मदत मुलांनीं, वैद्यकीय मंडळाकडुनी !
तपासणी होऊन मुलांची जाई पालका दखल तयांची
वैद्यकीय सल्ल्यांच्या मदती शाळेकडुनी मोफत होती !
विविध दगड नि शंख शिंपले, घरटीं, कांती, पिसें, पाकिटें,
तसेंच पत्ते, नाणीं, तिकिटें, छंदमंडळीं सारें जमतें !
ठायीं ठायीं फलक शोभती नाना लेखांनीं नी चित्रीं
आकर्षिति तें आपुले बालक मालक पालक, चालक, शिक्षक
लेखन सुधारि लेखनमंडळ, वाचन सुधारि वाचनमंडळ,
भाषण सुधारि भाषणमंडळ शुद्ध विचारा चर्चामंडळ !

१०

मुक्या, बोलक्या चित्रपटांचीं यंत्रें असती बहु मोलाचीं
सभागृहांमधिं ध्वनिसंवर्धक, दिवा जादुचा, ध्वनिसंक्षेपक !
दूरध्वनिचें यंत्र हें इथें, नभोवाणीचें यंत्र तें तिथें
इथें मोजिती हवा उष्णता, येथें पाऊस आणि आर्द्रता !
बोलपटांच्या कार्यक्रमाला अथवा चित्रें दाखविण्याला
सर्व तयारी सहज घडवितें, चित्रदर्शनाचें मंडळ तें !
भव्य-सभागृह हें यास्तव तें अद्यावत साधनीं साजतें
प्रसन्न होती प्रेक्षकचित्तें आमंत्रिल तें नित्य तुम्हांतें !
भाषास्पर्धा, काव्यगायनें, विवादचर्चा, इतर दर्शनें
नाट्यनाटकें, विविधगुणकला, रंजनि शिक्षण इथें नित मुलां
उत्सवमंडळ सदैव जागृत, लहान मोठें प्रसंग साधित
उत्सवि आवड अथांग मोठी वहरून येते नाना रीती !

११

गृहपाठाची तयारि करिती, इथें मंडळांमधि विद्यार्थी,
घरींच घेती ते विश्रांति गृहराज्या सुख त्यांतुनि देती !
सर्व मंडळें कामें करिती शाळेच्या वेळेनंतर तीं
आवड येथें सदा राबती नाहींच कोठें येथें सक्ति
शाळेचे जे असती स्नातक मंडळांत ते स्वयंसेवक
मंडळांत दर दोघे असती एक वर्ष शाळेला देती !
उत्तम तर करणेंच नागरिक! उत्तमता राहो सन्मानक
आजी–माजी विद्यार्थ्यांचा परिचय येथें तर नित्याचा !
अहो, मंडळें जिवंत असलीं शाळेच्या वैभवार्थ सगळीं
झटती सारीं मनापासुनी, स्वयंस्फूर्तिनीं नि प्रेमांनीं !
मंडळांत तर सारे बालक आणि राबति सहसंप्रेक्षक,
पडद्यामागें कार्य गुरूंचें अपुल्या शिष्यां यश द्यायाचें !

१२

विद्यार्थीसाहाय्यकमंडळ काम चालवीं अपुलें सोज्ज्वल
गरीब विद्यार्थ्यांस्तव येथें, शिक्षण-साहचें, कपडे जमती !
देणारे साहाय्य अर्पिती, घेणारे ते स्वीकारीती,
दाते-घेते भेद न दिसतो, समान शालाप्रंपच असतो!
बाधि जाणत्या आयतेपण, संमानिति ते हें शालाऋण,
टाकिति ते पैन पै फेडुन कष्टांनीं वा दानें अर्पून !
आपण होउन करार करिती, आपण होउन तो पाळीती
शाळेची कांहीं नच सक्ती स्वयंप्रथा घे जिवंत मदती !

१३

शाळेमाजी शाळेबाहिर समाजकार्यासाठीं आतुर,
स्वयंसेवकांचें हें मंडळ कार्याची संधी घे उज्वल !
पवित्रतेचें नागरमंडळ शोभा वाढवि शोभामंडळ !
ग्रामीणांचा परिचय करितें ग्रामोध्दाराचें मंडळ तें,
जीवन अनुभवि कृषीवलांचें परिश्रमाचें पण मोलाचें
खेड्यांमधि बालक जाताती ग्रामीणांमधि निवासताती !
सुदक्ष तुम्हां सदा दिसेल बालवीरपथकाचें मंडळ,
त्यांची पाहा सेवावृत्ती नागरिकांच्या राही चित्तीं !
व्यसनें शोधुनि तीं घालविणें शीलाभरणें त्यांना देणें
कार्य चालवी सुशीलमंडळ, याला पोषक सत्कृतिमंडळ !
सत्कृति कांहीं मुलें करीती, सत्कृतिमंडळ दखल घेत ती,
निदान महिन्यांतुनि एकाची, दरविद्यार्थ्यांची व्हायाची !
मुलांस आणिति उन्मार्गांतुनि, मुलांस नेती सन्मार्गांतुनि
सुसंगति आचार समर्पुन येथें शीलाचें संवर्धन !
अपराधाचें कांहीं घडतां, न्यायमंडळीं येते वार्ता
निकाल हो न्यायाधीशाचे, विद्यार्थ्यांनीं इथें द्यायचें !

कांहीं शिक्षा कोठें झाली हट्ट असत्यावरिती असली
तिला मान्यता येथें मिळते योग्य मार्गही इतरां येथें
अनुपस्थित जें असती कोणी, कारण त्यांचें आणिति शोधुनी
होत व्यवस्था मुलांकडुनी चौकशी मंडळ चौकशी करुनी !
पालकांस्तव आहे मंदिर मुलां शिक्षका भेटाया तर
विचार विनिमय तिथेंच होतो तिथेंच तो नोंदिलाहि जातो !

१४

अनेक पत्रें नियतकालिकें हस्तलिखितपत्रें नि मासिकें
जेथें विद्यार्थी बहु रमती वाचनालयांमधेंच दिसती !
नियतकालिकांचें तें उज्ज्वल उच्चप्रतिचें तुम्हां दिसेल !
लिहिलेलें वा आहे छापिल, परिश्रमच ते ओळख देतील !
कांहीं घोषणा जाहीराती, निबंध, लेख नि कथनें, गोष्टी
विज्ञानींही उडवी चंगळ नियतकालिकांचें तें मंडळ !
छोटी मोठी सुट्टी हो जर अथवा शाळा सुटल्यानंतर
बारी लागे दरवाज्यावर ग्रंथालय तें बघाच सुंदर !
विविध तऱ्हेचीं पुस्तक-पंक्ती कपाटांतुनी धावत येती
विद्यार्थ्यांच्या हातीं जाती रंजवुनी ज्ञानास अर्पिती !

१५

येथें अध्यापनें चालति वेळेवरतीं ठरल्या रीती
पूर्वतयारीवीण न होती जरी तज्ज्ञ ते शिक्षक असती !
चित्रें, प्रश्न नि विवाद, रंजन, प्रयोग, नमुने, तक्ते, लेखन!
सुरम्य-संचालन, अध्यापन रंगवि विद्यार्थी नी गुरुजन.
अध्यापनिं जें ज्ञान पिजलें, चिंतनांत तें जमून आलें
मंडळांत परिपाक पावलें, कांहीं क्षण द्या बघण्या अपुले !
विषयवर्गही इतर वर्ग कीं, धारिति तल्लीनता सारखी,
रजेवरति गुरु कोणी असती, स्वयंशिक्षणें वर्ग चालती !
अवतारच यास्तव शाळांचे बहर इथें ज्ञानोत्कर्षाचे,
कटाक्ष अध्यापनांत त्यांचे, अध्यापन गुण वाढायाचे !

१६

हे यत्तांचे पर्यवेक्षक, हे विषयांचे पर्यवेक्षक,
त्यांच्यावरती व्यवस्थापक, येथें असती हे लेखनिक !
शिक्षकसंघ प्रतिनिधिमंडळ, कार्यकारि सहकारीमंडळ,
शाळेचे हे सारे सेवक गढले कार्यीं शाळापोषक !
परिहाराया त्यांच्या शीणा विश्रांतिगृह सेवकगुरुंना
शाळा सोई सज्ज ठेविते, कामापुरता प्रवेश येथें !
ज्यांनीं शाळा स्थापन केली, भव्य वैभवीं ज्यांनीं नेली
ज्यांच्या ती स्मारकार्थ झाली, ही त्यांच्यास्तव सुरम्य खोली
त्यांचीं छायाचित्रें पुतळे, शाळेचेंही वाङमय सगळें
आलेखादी–चरितें, तक्ते दिसुनी सारें येतें येथें!

१७

शाळेंमध्यें जें जे असतें, दिसावयाचें जगांत तें तें !
शाळेंमध्यें जें जें नाहीं, तें तें जगांत नसतें कांहीं !
अतिशय उक्ती येथें नाही घमेंड नाहीं कसलीं कांहीं !
शाळेची तर कर्तव्यें हीं, सकल शिक्षणास्तव शाळा ही !
दि. १६–८–४७

---

## : ५७ : एक व्हा, हो, एक व्हा !........... [पांडव]

शिक्षकांनो, चालकांनो, मालकांनो, एक व्हा !
शासकांनो, पालकांनो, एक व्हा, हो, एक व्हा ! ॥ ध्रु०॥

१

एक व्हायाला जमा नो कांहि चर्चा हो करा
रंजनालाही जमा ना ! खेळिमेळीं वावरा,
त्या नसूं द्या नव्य–भव्या, त्या असुं द्या हो, जुन्या
होत नाहीं तें वृथा हो, व्यर्थ गेलें जाउं द्या !

व्यर्थ कांहीं होत नाहीं, या जगामाजी कधीं
अंकुरायाचीच बीजें पेरलेलीं भूमधीं
कारणाला कार्य येतें, पेरल्या येतीं फळें
कारणांचें, पेरण्यांचें कार्य होउं द्या भलें
काळ थोडा फार लागे हो, फला लागायचा
तो निसर्गाच्या क्रमाचा नेम पूरा व्हायचा !
पेरणीचें काम हातीं, पेरणी ती होउं द्या,
ती पिकाची मात्र चर्चा व्यर्थ एव्हां ! राहुं द्या.
कार्य साधें हें असें हो, तुम्हि तें साधायचें
आपुलें हें कार्य आहे, नाहि तें टाळायचें
शेलकेना या समाजीं मानिताती आपणां
शेलक्यांनीं दाविणें हो, शेलक्याशा सद्गुणां !
याचसाठीं हो, जमावें, नी जमावें, नेहमीं
योग्य ते निष्पन्न व्हाया, या सभांमाजी तुम्ही
या अभावीं पूर्ण हातांतून आशा जायची
तीच या संमेलनांनीं पूर्ण हातीं यायची !

२

थोर राष्ट्राचा जिव्हाळा शिक्षणाचा प्रश्न तो !
त्याकरितां एक व्हाया नित्य हो आमंत्रितों
ती अनास्था आणि आस्था जेधवां हो शिक्षणीं,
दुष्फलें नी सत्फलें तेव्हांच येती धांवुनी !
दुष्फलें जाउनि व्हाया सत्फलांच्या निर्मिती,
याकरितां एक होणें, गोष्ट मोलाची अती.
याकरितां एक व्हा हो खेळि-मेळि वावरा
घ्या सभासंमेलना हो, कांहीं चर्चा त्या करा-
सौख्य-दुःखें एक व्हाया, संधि देती मानवा
सौख्य होती एक दुःखामाजि त्याची वानवा !

सौख्यदुःखांची शहाण्या ये अगाऊ कल्पना
सौख्य याया, दुःख जाया साधिति ते योजना !
सौख्य सज्ञानांत, अज्ञानांत दुःखाचा भाव
जाणतों मीं कल्पना ही आपणां नाहीं नव
लोक अज्ञानी असावे, संकटाचें लक्षण
त्यांस कांहीं ज्ञान याया, द्यावयाचें शिक्षण !
याच साठीं हो, जमावें, नी जमावें नेहमीं
योग्य तें निष्पन्न व्हाया या सभांमाजी तुम्ही
या अभावीं पूर्ण हातांतून आशा जायची
तीच या संमेलनांनीं पूर्ण हातीं यायची !

३

द्रव्य नाहीं तें म्हणोनी एक नाहीं व्हायचें ?
एक झाल्यावीण नाहीं द्रव्य तेही यायचें !
एक होणें सिद्ध होतें आपणांला आधिचें,
मार्ग तेथें लाभताती; तें परंतू पुढचें !
'द्रव्य नाहीं' तें नसूं द्या, ठीक राहुं संयमीं,
शिक्षकांच्या हो, वर्तीनें सांगतों तुम्हांस मी !
सर्व योगक्षेम त्यांचा चालवीतां आपण,
यांत हो निश्चित चिंता ! हो, प्रजेचें शिक्षण !
आणि मोठा त्याग ठेवा द्रव्यवंतांना, तुम्ही
त्याग, लाभांतूनि होतां काय व्हायाचें कमी !
योग्य योगक्षेम हक्का द्रव्य ठेवा आपण
उर्वरीतांमाजि चालो; हो, प्रजेचें शिक्षण
आणि द्यावें हो, करांना ज्यांस आहे पात्रता
कां डरावें द्रव्य देण्या जेंथ हो, आत्मीयता !
तांटि-वाटींमाजि कोठें सांडतें तें एकच,
द्रव्य जातें आपुल्या हे राष्ट्रकार्यामाजिच !

ताट येथें राष्ट्र आहे, व्यक्ति वाटी ती असे,
जात वाटींतील पोटीं, जाइ ताटीचें तसें,
फक्त वाटीं मांजि घेतां सांडतें तें खालिच
जात वाया, ताट घ्या हो, सांडुं द्या तें ताटींच !
काय जन्माच्या सवें ये संपदा ते आपुल्या
आणि न्यायाची तुम्हांला ती सवें का आपुल्या ?
काय चारा माणकांचा आपल्याला लागतो ?
काय सोनें आंथरीतां भोग त्यानें वाढतो !
जरूरीचे भोग सारे सर्व लोकांसारखें
प्रश्न मोलाचाच तेथें भोग घ्या इच्छासुखें
आणि बाकीचे कशाला ठेवितां हो, राखुनी ?
त्याग येथें वावरावा आपणां संमानुनी!
तुष्टिच्या भोगांतुनी संतुष्टिचा तो त्याग द्या,
योग्य-योगक्षेम संतुष्टींत सारा नांदु द्या.
जाति वा या संपदा त्या त्याहि येथें येउं द्या,
याच संपत्तींत सारें शिक्षणाचें साधुं द्या !
साधनांचा लाभ व्हावा स्तुत्य हेतु आपला
त्याविना नाहीं सभा त्या ! न्याय ऐसा कोठला ?
साधनें निर्मावयाला एक ना हो व्हायचें !
मुख्य या कार्यास केव्हां ही न मागें घ्यायचें !
याचसाठीं हो, जमावें, नी जमावें नेहमीं
योग्य तें निष्पन्न व्हाया, या सभांमाजी तुम्ही
या अभावीं पूर्ण हातांतून आशा जायची
तीच या संमेलनांनीं पूर्ण हातीं यायची !

४

आफिरका-भू-भाग कांहीं, ज्ञात नाहीं विस्तृत,
बोलताती ' खंड काळें ' वास्तवीं हें विश्रुत.

घोर अज्ञानांधकारीं लोक येथें नांदत,
तेंहि 'काळें खंड' व्हावें आपणांला संमत !
आफ्रिका तें 'खंड काळें' दूर आहे आपुल्या,
ज्ञात व्हावें जें म्हणोनी शोधिती पाश्चात्य त्या !
'खंड काळें' आपुलें हें आपुल्यापाशीं असें,
ज्ञानतेजानें प्रकाशीं आणुं या त्याला तसें !
ते नद्यांना, पर्वतांना, भूमिना, निर्मानुषी–
शोधतांना, शोधिताती रानटीही जातिसी
शिक्षणाचें तेज देती; देति त्या माणूसकी
शुभ्रता काळचास द्याया, सिद्ध त्यांची लायकी !
आणि आम्हां ज्ञात भूमी ज्ञात सारीं माणसें
शोधकार्या कष्ट हो, आहेत कांहीं कां तसें ?
सिद्ध जी माणूसकी ! ती शिक्षणीं मागासली
शुभ्रता काळचास द्याया, देउं शक्ती या भली !
याचसाठीं हो जमावें, नी जमावें नेहमीं
योग्य तें निष्पन्न व्हाया या सभांमाजीं तुम्ही !
या अभावीं कार्यआशा पूर्ण ती नाशायची,
तीच या संमेलनांनीं पूर्ण हातीं यायची !
दि. २९–८–४८

---

## : ५८ : स्वयंशासनाचें एक दिग्दर्शन.... [सुनीत]

आहे वर्ग करीत काम अपुलें, नाहींत ते शिक्षक
नाहीं गोंधळ कांहि तेथ न करी हूं–चूं कुणी बालक
होते आज रजेवरी, कळवुनी अभ्यास जो निश्चित
त्यांच्या गैरहजेरिमाजिही मुलें आज्ञा अशी पाळित !
नाहीं धाक जुलूम येथ कसला, तें कांहिही जाचक
प्रेमानें करिती सदैव गुरुजी ती शिस्त आकर्षक

वर्गांना असली असे संवय तें होतें स्वयंशिक्षण
रीतीनेंच अशा शहाणपण ये, तो हो, स्वयंभूगुण !
नाहीं रीत जया अशी परिचिता, होतात ते विस्मित
आहे विस्मिततेंमधींच असल्या, शिस्तीस या किंमत
आहे क्षुल्लक गोष्ट ! लाभ परि ये ऐशास मोठे पुढें
येतें उत्तरदायिता कळुनियां ! शाळाच दे हे धडे !
ऐसे मार्ग मुलां अनेक असती, जेथ स्वयंशासन !
त्याचें या अटळा रजेंतिल असे हें एक दिग्दर्शन !
दि. ३-२-४८

---

## :५९: घे तोंड भरोनी म्हणवुनि 'गुरुजी गुरुजी'

१

ती जगांत मोठी आहे आपुली आई!
परि राळ जगांमधि तिची फार हो होई.
परि खंत कांहिही तिला तयाची नाहीं!
अणुमात्र मातृता उणी पडो नच देई !
घे तोंड भरोनी म्हणवुनी 'आई-आई '!
जन सदैव गुरुला स्तुतिचीं सुमनें देतें,
परि राळ तयाची जगांत भारी होते,
परि खंत कांहिही जया तयाची नाहीं !
अणुमात्र न घेई, यद्‌गुरुता इतराजी
घे तोंड भरोनी म्हणवुनि 'गुरुजी-गुरुजी'!

२

जेंधवां सबलता पिलां जननिच्या येई,
ते तिला रक्षितिल खात्री याची नाहीं,
आणि ती पिलां नच त्यास्तव बांधुन घेई !

अणुमात्र मातृता उणी पडो नच देई.
घे तोंड भरोनी म्हणवुनि ' आई–आई '!
जेधवां सबलता शिष्य गणांला येई,
ते तया रक्षितिल याची खात्री नाहीं,
आणि जो तयांस्तव त्या नच बांधुन घेई, !
अणुमात्र न घेई तद्‌गुरुता इतराजी
घे तोंड भरोनी म्हणवुनि ' गुरुजी–गुरुजी '!

३

जरि पिलें राहिलीं, अबल आपुल्या ठायीं
' जड म्हशीस शिंगें नसति ' पिलां तद्‌ग्वाही !
हो, तिची मातृता पान्हवलेली राही !
अणुमात्र मातृता उणी पडो नच देई,
घे तोंड भरोनी म्हणवुनि ' आई–आई '!
जरि शिष्य राहिले, अबल शिक्षणीं कांहीं
' होईल जिवाचें रान ' मुलां यद्‌ग्वाही
ती गुरुता त्याची ओथंबित नित राही !
अणुमात्र उणी नच, गुरुता त्याला ये जी
घे तोंड भरोनी म्हणवुनि 'गुरुजी–गुरुजी' !

४

ती मात्र मातृता–महती कथेंत गावी !
ती तिला तेवढ्यापुरती किंमत यावी !
व्यवहारमात्र त्या किंमत नच जरि देई !
अणुमात्र मातृता उणी पडो नच देई,
घे तोंड भरोनी म्हणवुनि ' आई आई '!
गुरुमहिमा निशिदिनि कथा पुराणीं गावा !
कां तया भाव तेवढ्याचपुरता यावा !
व्यवहारमात्र त्या कां हो उलटा जावा !

यांतही जयाची गुरुता सदैव ताजी
घे तोंड भरोनी म्हणवुनि 'गुरुजी–गुरुजी'!

५

नवमास मुलांचें ओझें उदरीं वाही,
ती आत्मरुधिर–पीयूष पोषणा देई,
तल्लालनपालन कार्यीं रंगुनि जाई !
अणुमात्र मातृता उणी पडो नच देई,
घे तोंड भरोनी म्हणवुनि 'आई–आई'!
तो नित्य मुलांचें ओझें शीर्षीं वाही,
त्या आपुली प्रत्यय–सुधा पोषणा देई,
तो शिष्य समुन्नति–कार्यीं रंगुनी जाई !
अणुमात्र करि न उणि सुधा मुला जी पाजी,
घे तोंड भरोनी म्हणवुनि 'गुरुजी–गुरुजी'!

६

पण पुरेंच तुळणें ! 'गुरुजी आणिक आई'
थोरवी तयांना भिन्न गुणांनीं येई,
परि लाभ थोरवी मुलां सारखा देई!
त्या शब्द मोद दे गुरुजी ! आई–आई !
त्यांमधे तयांना विसर जगाचा होई !
मज सदैव वाटे आपण व्हावें, आई,
सिद्ध ती मनीषा शाळा-क्षेत्रीं होई,
मम मातृपणाचें तेज नसांतुनि वाही !
ही टिको मातृमय गुरुता माझी प्रभुजी !
गोड शब्द कानीं येवो 'गुरुजी–गुरुजी'!

७

मज मान नको हो, नकोत सत्ता–मत्ता
तें क्षेत्र त्यागिलें आलें होतें हाता

मज तिथें मिळेना हृदय विसांवा पुरता
त्यागिल्या क्षेत्रिचा होतों मी तर 'गाझी'
आवडे मला हो, कारण होणें 'गुरुजी' !
मजकडे याच तुम्हि निमित्त काढुनि कांहीं
मी तुम्हांकडे येईन धावत्या पायीं
मी तुम्हांत तुम्हि माझ्यांत एकता द्या ही
ती तुम्हां मिळूं द्या सक्रिय कळकळ माझी
मग तोंड भरूनी म्हणाच 'गुरुजी ! गुरुजी'

८

तुम्हि जसे बाहतां आइस 'आई आई !
ती हाक प्रेमें गुरुला तशीच यावी,
तो ज्ञान सुधांनीं पान्हेवलेला राही !
घ्या सुधा नित्य तुम्हि, अवश्य तुम्हां जी जी
मग तोंड भरोनी म्हणाच 'गुरुजी गुरुजी' !
मातृता धरीते वत्सलता अभिराम
धरि गुरुता तसें शिष्यशिक्षणीं प्रेम
होतसे मुलांना पुरुषार्थाचें धाम
ही दिव्य सुगुरुता कराच पावन माझी
मज तोंड भरोनी म्हणूं द्या गुरुजी–गुरुजी !

दि. ६–९–४८

---

## : ६० : मति असे जरि अल्प........ [द्रु. वि.]

मति असे जरि अल्प असो तुला
कुशलता तरि ठेंव सुहेतुला
शिकवुनी शिकुनी सजवी कला
विजय देइल ती तुजला भला १

मति अनल्प नसे न भयाकुला
जर परिश्रम-देव असे, तुला
प्रगतिची तुज तेथ मिळे कला
मग न खेद तुला उणिवांतला !

अधिक तीव्र, विशाल सुलक्षणी
जशि महार्ह असे मति शिक्षणीं
तशि नसेल तिथें जरि साधि ती
तरि महार्ह असे तितुकी मती ! ३

मति अनल्प न अल्प न हातचें
अविरत-श्रम हें परि हातचें !
जरि असेल कमी मति आयती
श्रम करोत सतेज, विशुद्ध ती ! ४

सदुपयोगि जशी अति तीव्र ती
सदुपयोगि तशी कमती मती,
उभयि मोल समानच शिक्षणीं
प्रचिति भिन्नपदीं दिसते गुणी ! ५

कमति, मध्यम, आणिक उत्तम
मति-मतींत असा ठरला क्रम
तिन्हिहि येथ वसोत सुशिक्षणीं
तिन्हि असोत सुरम्यकलागुणी ६

जर कलाविण होय कुशाग्रता
नच पुरी तिज शिक्षणपात्रता
मग बरी तर ती मतिमंदता,
पण असे जर रम्य कलायुता ! ७

भ्रमरवृत्ति, निरीक्षण, चातुरी,
समयसूचक, जी दृढता वरी,

सुजन संगति, सुंदर वैखरी,
सुमति अन्यसमा पडते पुरी ! ८
परवडेल जरा मति–मंदता
जर नसेल तिथें मति–हीनता
'विहित–कार्य करूं अति उत्तम'!
गुण करील असा गुरु–सत्तम ! ९
अधिक तीव्रपणा मतिमंदता
गुणि परिस्थिति निर्मित भिन्नता,
बदलतां तर तीच परिस्थिति
बदलती गुण ते अशि निश्चिती ! १०
अवयवा इतरांपरि सारखी
प्रभुजिची सम–इंद्रिय–देणगी
परि परिस्थिति दे बलभिन्नता,
परि परिश्रम दूरवि ऊनतां ! ११

दि. १९३४

---

## : ६१ : पावसावर मात ! ........ [मुक्तछंद]

१

..सूचना फलक शाळेंतील सारे, एक विचारें नी एकच सूरें,
घोषून उठले, मोठ्या उल्हासें, झुंबड उडाली फलकांपुढें !
मुंगीस तेथें रीघ कोठली ! आतांच हो शाळा आहे सुटली.
दुरून पाहा, दुरून ऐका ! शक्य कोणती छाती घुसाया
गर्दीनें सारे येथील सज्जे उतास आले. गगन–भेदी
उठताती हो, येथ आरोळ्या ! दुरून पाहूं, दुरून ऐकूं !

२

....' मिरवणुकीनें जायाचें आहे ' ' बजरंग क्रीडा मैदानावर
' बरोबर सहा,' ' अगदीं सकाळीं सहारे सहा-सूर्योदयीं सहा'
'सांगतों तूला, चल हो बाजूला' अरे नाहींका कळत ! तूला!
जायाचें आधीं आपआपल्या टोला बरोबर वर्गामाजीरे !
चौकांत जमायाचें आहेना शिक्षकासमवेत रे, हो–हो !'
' चाराचाराच्या व्हायाच्या रांगा' ' पांढरा सदरा खाकी विजार
इस्तरीची अर्धी जानूस्पर्शी ती ! श्वेत पादत्राणें, प्रत्येकाच्या
पायीं हवेत जरूर ! हवेत जरूर !' ' भावी सैनिक भारताचे या !
त्यांचा हा साधासुधा गणवेष! ! ' अरे, हा तर आहे नित्याचा
आपूला वेष ! ' चाराचारांच्या रांगा जायाच्या, राजमार्गानीं
नगरांतुनी मिरवणुकीनें सैनिक जायाचे, स्वातंत्र्यदिनाच्या
महोत्सवाला ! ' नगरोपनगरांतील मुलें, आणिक मुली ! सान
थोर हीं जमावयाची आहेत सारीं कवायतीला ! बजरंगक्रीडा
मैदानावर, हजारों–हजारों ! मजा मजा रे उद्यां सकाळीं,
लौकर या या लौकर या–या !
....वर्षाकाळाचा श्रावणमास ! पर्जन्य आला घोष ऐकाया !
क्षणांत आला, तसा तो गेला, अविश्वासी पावसाचा हा चाळा !
धावूं लागले सैनिक सारे वेगें उधळत आपुल्या घरा !
....सामसूम झालें शाळेंत तेव्हां !

३

....उत्सव म्हणजे आनंदीआनंद सान–थोरांना रंकरावांना
मुलांमुलींना, शिक्षकशिक्षिकां, आचार्यां–प्राचार्यां
बालकापरी चालकांनाही पालकांनाही मालकांनाही
स्वातंत्र्यदिन महोत्सवाला उल्हास सारा फुलून आला !
आनंद झाला, आनंद झाला ! आनंद झाला साऱ्या लोकांना !
....स्वतंत्रता ती वर्षें दीडशें पारखी होती या भारताला

आपुली आपण भारती आली! वर्ष एक झालें होतें त्या आज दिनांक पंधरा आगस्टमास एकोणीसशें अठ्ठेचाळीस !
महोत्सवाच्या आनंदाचा हा होता तो पहिला आनंदी सुदिन !
....महायुद्ध गेलें, स्वातंत्र्य आलें. सरकारी कांहीं-कांहीं प्रतिबंध शिथील झाले, कांहीं ते गेले; नोकरांच्या सर्व वेतनवाढी प्रमाणांत त्या महागाईच्या, सुधारायाचे आदेश आले. धावूं लागली महागाई ! ती पूढेंच पुढें....
....भरपूर पैका हातीं प्रजेच्या खेळूं लागला शासक होते भारताचे या आतां आपूले ! शासीत होते समर्थपणें सारी जनता! जीच्यामधूनी निवडूनीया शासक आले आतां आपपर भाव तो होता नष्टच सारा ! दैन्य देशाचे जाईल आतां, हृदयीं आशावल्ली प्रजेच्या अंकूरीत त्या झाल्या वाढल्या! ! आनंदांत या स्वातंत्र्यमहोत्सव हा आला !
.....महोत्सवोल्हासा सर्व बाजूंनीं महापूर आला धावोनीया हो! आणि तत्क्षणीं विषण्णताही धावूनी आली हृदयाकाशीं ! स्वातंत्र्याचें दान ज्यांच्या ये हातीं, जगन्मान्य ते थोर पुढारी अहिंसेचे जे प्रणेते होते, जे सत्याचे कैवारी होते, मानवतेचे शुद्ध-पाईक, शांतिसागर, त्यागाचे मेघ! अजात शत्रू ! अमरकीर्तीचे कोठें गांधीजी ! ते महात्माजी ! आहेत कोठें, कोठें बापूजी ! अहो, बापूजी ! अहो, बापूजी ! ! अहो, बापूजी ! ! !
विषण्णते गे वेग आवर, कर्तव्य आहे भारी कठोर....

४

....दहा दीसांच्या कलानीं युक्त, दशमीचा तो नक्षत्र राणा निशाधिपति अपूर्ण चंद्र नित कोर उणा-पाऊणभर धरणीवरी ओतीत होता, चांदण्याचें ते शुभ्र-शुभ्र नी दाटसें ताक ! त्याच्यांमाजी नी श्रावणसृष्टि तरंगू लागे, घटिका कांहीं.....
इतूक्यांमाजी साऱ्या आकाशीं अविश्वासी मेघ भरुन आले.

शुभ्रशुभ्र ताक चांदणें सारें अंध.काराच्या भूमिमाजीतें सारेंच सारें जिरुन गेलें. खालीं वरी सारें काळेंच काळें! दशमीची रात्र बंडखोर मेघ आकाशांतूनी पाण्याच्या घागरी ओतूं लागले! स्वातंत्र्यदिनमहोत्सवाच्या महानंदाला विरजण घालाया हट्टा पेटले...गळति लागली त्या आकाशाला! आकाशांतूनी सरींच्या सरी त्या पावसाच्या खालीं धावल्या....खालीं छत्र्यांवर.. छत्र्यांच्या खालीं शाळेचीं मुलें.. मुलांच्या खालीं विशाल धरणी..धरणीवर घोटच्यापर्यंत पाणीच पाणी! श्वेत पादत्राणें भिजून गेली, पायावरतीं आवळलेलीं पोतेरीं झालीं! !
..ऐशाहि स्थितींत, अगदीं सकाळीं सहा वाजतां, नक्की वेळेला चाराचारांच्या रांगा मुलांच्या शाळेंतूनीया बाहेर जाण्या सिद्ध जाहल्या! रात्रभर जे धडपडले गणवेष त्यां नाहीं लाभले. छत्र्या कोठल्या त्या मिळायाच्या शिस्तीकरितां पहा ते आले! भिजूनी ओलें चिंब ते झाले, रांगाच्यामध्यें मिळून गेले! शाळेनें ओले कपडे त्यांचे बदलूनीया कोरडे दिले! छत्र्यांसाठीं त्या बाकीच्यांनीं हो आश्रय दिले, योग्य तें केलें, योग्य तें झालें!

५

..उजव्या बाजूस सर्वांच्या पुढें राष्ट्रीय निशाण उंचच्याउंच डाव्या बाजूला कमी उंचीचें निशाण खास होतें शाळेचें, वाजत होती शाळेचीं वाद्यें आघाडीवर....गर्जत होतीं मुलें आवडतें सुरम्य सैनिक रणगीत तें!....शाळेचें सैन्य वीर-चालीनें चालूं लागलें आणि असंख्य मुखांतुनीया निशाण-गीत सुरू जाहलें! वीरश्री वातावरणीं साऱ्या भरून गेली! वीर-चालीनें वीरवाणीचें अमुचें राष्ट्रीय निशाणगीत, नगरांतील राजरस्त्यांच्या परिसरांत घुमूं लागलें!

* * *

—निशाणगीत

" हें निशाण अपुलें । पाहिजेच वंदिलें ॥ ध्रु० ॥

पाहिजेच वंदिलें

उभें स्वतंत्रतेतलें निशाण हेंच आपुलें
जगांत आज गाजलें पाहिजेच वंदिलें ! १

भारतांतुनी पुरा

निशाण लुप्त जाहलें पुन्हा अम्हांस लाभलें
नव्या सुरंगि रंगलें पाहिजेच वंदिलें ! २

प्रेम-सत्य—शांतिचें

प्रतीक भूषणांतलें नव्या युगांत पातलें
नवेंपणांत जन्मलें पाहिजेच वंदिलें ! ३

बंधुता स्वतंत्रता

इथेंच साम्यता खुलें विशाल भावनांतलें
प्रजा-सुखार्थ धावलें पाहिजेच वंदिलें. ! ४

मानवा विभूषलें

स्वतंत्रतेस आणिलें जयें भले लढे दिलें
नभोंगणांत ते डुलें पाहिजेच वंदिलें ! ५

गाजवुं प्रतापि हें

प्रतापशालि जन्मलें महाप्रतापि नांदलें
असे परंपरेंतलें पाहिजेच वंदिलें ! ६

* * *

६

...शिळंधार होता पाऊस चालूं ! बुडूं लागली अपुली धरणी चोहीकडे होतें पाणीच पाणी ! पाण्यावरल्या इमारतींच्या रांगांमधूनी मिरवणूक आमुची होती डौलानें जात !

...नगरांतील लहान मोठ्या शाळांहि होत्या; तैशींच अन्य छोटीं मोठीं हीं विद्यालयें तीं ! मुलांमुलींना मोठ्या डौलानें चाराचारांच्या रांगांरांगांनीं, नेत तीं होतीं राजमार्गांनीं !

....गणवेषाची बातच दूर ! कोणाला आहे, कोणाला नाहीं,
धड पोशाख ! आणिक छत्र्या होत्या तुरळक ! आणिक पायीं
पाहूंच नका ! पाय होते ते पाण्याच्या खालीं. .विषम दृश्यें
दिसूं लागलीं, कांहीं कांहीं तीं आजूबाजूला ! मुलें-मुलीं
सारीं भिजून गेलीं. विशेष त्रेधा मुलींची झाली ! ओलीं चिंब
तीं सारींच झालीं ! दोघेदोघेजण एका छत्रींत चिकटून
ते चालूं लागले ! अनुकरण तें मुलांच्यामाजी होऊं लागलें,
जेथें तत्क्षणीं पालकही ते पाल्यांचे कोणी धावत आले छत्र्या
घेवोनी, जलसंरक्षक कपडे कोणी पालक देती मुलां आणोनी. .

७

देवघेवींनीं सैनिकी शिस्त विस्खळीत ती होऊं लागली
शिस्तशील तें दृश्य पाहोनी पित्त तयांचें आलें उसळोनी !
....रशियन नी अमेरिकन, जर्मन, इंग्रजी मुलामुलींच्या शिस्तीचीं
रम्य–सुरम्य दृश्यें परदेशीय मासिकांतूनी पाहणारी शिक्षक
मंडळी ! स्वतांहि परदेशां गेलेली कांहीं कांहीं ती शिक्षक
मंडळी ! बाणलेलें ज्यां शिस्तमहत्त्व कांहीं शिक्षक स्वयं-
स्फूर्तिचे ! मिरवणूकीच्या नेत्यांत होतो भरणा त्यांचा बहू
मोलाचा !....अनेक चित्रें पाहणारे ही, तसे वर्णनें वाचणा-
रेही शिक्षक तसे आजूबाजूला पौरजनही पुष्कळ होते !
जोराचा जैसा पाऊस होता कळवळा होता तैसा जोराचा!
....पण शिस्तीचें महत्त्व होतें साऱ्या जणांना !—त्यांना वाटलें!
काय वाटलें ! तशा शिस्तीचीं भारत भूचीं नाहींत मुलें काय
आपुल्या ! आमुच्या येथें शिस्त नसाया काय हो, झालें ! झालें
हो काय? तींहि माणसें आम्ही माणसें! शक्य जें त्यांना शक्य तें
आम्हां, मात्र पाहिजे चांगल्याचा तो जिवंत अभिमान जागृत!
भिजूं द्या मुलें कांहीं वेळ तीं असा प्रसंग कधीं यायाचा !
. .दुबळा एक आला विचार ! ‘कार्यक्रम हा रद्द करावा !

पण. . . पण हें काम कोणाचें ? स्वतंत्रदिनमहोत्सवाच्या
मंडळाच्या या आदेशापरी ठरला होता रेंखीव सारा कार्यक्रम
हा ! तैसा चालला ! रद्द करावा कोणी तो येथें विचार आला,
तसा तो गेला क्षणीं उडोनी ! शिस्तीचें मोल आलें धावोनी
राष्ट्रीयमोल अशा शिस्तीचें उचंबळोनी आणी मनीषा !
आणीक पहा ! स्वातंत्र्यमहोत्सवआनंद ! श्रावणवृष्टी
पाहे घालवूं ! भारतभूच्या मुलांमुलींचा नी जनतेचा!
वृष्टीस तोंड द्याया निर्धार झालाच त्यांचा !

....इष्ट सर्वांना छत्र्या असणें, शक्यच नाहीं तें आतां पण !
थोडा पाऊस मुलां लागूं द्या विशेष काय होणार त्यानें !
छत्रीधर सारे अशक्य तर छत्रीहीन ते सत्वर करूं शक्य तें तर!
'छत्र्या मिटाव्या' आदेश झाला! कठोर शिस्त वाटे कांहींना
एकूण एक छत्र्या मिटल्या, छत्र्या मिटल्या !

....म्हणा वृष्टीनें गंमत केली बोलांफुलां कीं गांठ पडली
पर्जन्यवृष्टि क्षणीं थांबली, आश्चर्यें सारीं मनें फूललीं !
सूर्यानें डोकावून पाहिलें, चक्क ऊनही तेव्हां पडलें !
हर्ष केवढा ! काय सांगावा ! दाही दिशांनीं धावूनि आला !
स्वातंत्र्यमहोत्सवें जिकीलें, असेंच सारें बोलूं लागले !
एकसूरानें महानंदानें जयजयकारें उद्‌घोष झाले ! ! !

८

....सूर्यप्रकाशीं मोठ्या डौलानें, मिरवणूकी जातच होत्या;
मध्यमार्गांत क्रीडांगणाच्या कांहीं वेळानें येऊं लागल्या मिरवणूकी ! आणि तत्क्षणीं सूर्यप्रकाशीं त्याच डौलानें सरीचसरी येऊं लागल्या पावसाच्या त्या ! ऊनपाऊस आळीपाळीनें सुरू जाहले त्यांतच वारा वाहूं लागला.

....श्रावणसृष्टि अविश्वासाची ! म्हणावें काय आतां

तियेला! पाऊस आला, पाऊस आला, उघडल्या त्या, मिटल्या छत्र्या, प्रथम, कांहीं शिक्षकांमाजी! ....शिक्षकांमाजी ....शिस्त मोडली! चूक ही झाली! स्पष्ट बोलतों. चूक ही झाली! हळूहळू त्या चूकींत आतां सामील झालें पुष्कळ जण! हंशा पीकला मुलांत साऱ्या! जरि न पिकतां अपवाद तो! शिस्त क्षुल्लक गोष्ट हो काय! काय हो यांना कळली नाहीं! शिस्तनिर्माते शिस्त मोडीती, आहे महान अपराध हा! विटंबना ही थोर शिस्तीची! मुलें नी मुली बघत होती! पाहूं नये तें पाहात होती आणि खुशाल हांसत होती! उच्चाराचारा मेळ ठेवीती! वंद्य ते होती वंद्य ते होती. त्यांची निर्मिती फार कमती ऐसें हें दृश्य दिसूं लागलें! मोठ्यां बोलावें आतां हो कोणी पंचाईत मोठी नेत्यांना आली!

..आजारी, रोगी, दुर्बल! त्यांची मुक्तता आहे शिस्तीस मान्य! कळवून तें पण नेत्यांना! न हें, तर तो विश्वासघात! पौरांना हें दृश्य फार लागलें आणि तसें तें लागायाचेंच! आपण निर्मितों, आपुली शिस्त! योग्य विचारांतुनि जी आली कांहिहि होवो पाळिली जावी! व्यवहारीं हें केव्हां यायाचें!

....अभिमानी ही शिस्तीचे कांहीं, होतेच तेथें! वंद्य वाटलें! सुरवातीला अगदीं पूर्वी विषमता जें त्यांनीं पाहिली अनवाणी नी छत्रीहीन तीं मुलगे–मुली त्यांना दिसतां, झटकन हो, मिटून गेल्या ओल्या चिबही छत्र्या त्या त्यांच्या! अन् पादत्राणें पाण्यानें नेलीं वंदायासाठीं पायांपासूनी! जागृत होतें सन्मन त्यांचें गुंगत होतें गीत आंतुनी! सर्व हृदयीं गीत असलें, कोण म्हणेल, गुंगत नव्हतें!

....हृदयाची प्रतारणा त्या ठायीं हृदयनिष्ठा होती त्या ठायीं! काय हो होतें तेवढ्यानें तें? निष्ठेस विचार मान्य हा नाही छोट्याछोट्याही शिस्तभंगांत शीलप्रासादा सुरूंग मोठे निष्ठा-

—निशाणगीत

" हें निशाण अपुलें । पाहिजेच वंदिलें ।। ध्रु० ।।

पाहिजेच वंदिलें

उभें स्वतंत्रतेतलें निशाण हेंच आपुलें
जगांत आज गाजलें पाहिजेच वंदिलें ! १

भारतांतुनी पुरा

निशाण लुप्त जाहलें पुन्हा अम्हांस लाभलें
नव्या सुरंगि रंगलें पाहिजेच वंदिलें ! २

प्रेम-सत्य-शांतिचें

प्रतीक भूषणांतलें नव्या युगांत पातलें
नवेंपणांत जन्मलें पाहिजेच वंदिलें ! ३

बंधुता स्वतंत्रता

इथेंच साम्यता खुलें विशाल भावनांतलें
प्रजा-सुखार्थ धावलें पाहिजेच वंदिलें. ! ४

मानवा विभूषलें

स्वतंत्रतेस आणिलें जयें भले लढे दिलें
नभोंगणांत ते डुलें पाहिजेच वंदिलें ! ५

गाजवुं प्रतापि हें

प्रतापशालि जन्मलें महाप्रतापि नांदलें
असे परंपरेंतलें पाहिजेच वंदिलें ! ६

* * *

६

**...शिळंधार होता पाऊस चालू ! बुडूं लागली अपुली धरणी त्रोहीकडे होतें पाणीच पाणी ! पाण्यावरल्या इमारतींच्या रांगांमधूनी मिरवणूक आमुची होती डौलानें जात !**

**....नगरांतील लहान मोठ्या शाळांहि होत्या; तशींच अन्य छोटीं मोठीं हीं विद्यालयें तीं ! मुलांमुलींना मोठ्या डौलानें चाराचारांच्या रांगांरांगांनीं, नेत तीं होतीं राजमार्गांनीं !**

....गणवेषाची बातच दूर ! कोणाला आहे, कोणाला नाहीं,
धड पोशाख ! आणिक छत्र्या होत्या तुरळक ! आणिक पायीं
पाहूंच नका ! पाय होते ते पाण्याच्या खालीं..विषम दृश्यें
दिसूं लागलीं, कांहीं कांहीं तीं आजूबाजूलः ! मुलें-मुलीं
सारीं भिजून गेलीं. विशेष त्रेधा मुलींची झाली ! ओलीं चिंब
तीं सारींच झालीं ! दोघेदोघेजण एका छत्रींत चिकटून
ते चालूं लागले ! अनुकरण तें मुलांच्यामाजी होऊं लागलें,
जेथें तत्क्षणीं पालकही ते पाल्यांचे कोणी धावत आले छत्र्या
घेवोनी, जलसंरक्षक कपडे कोणी पालक देती मुलां आणोनी..

७

देवघेवींनीं सैनिकी शिस्त विस्खळीत ती होऊं लागली
शिस्तशील तें दृश्य पाहोनी पित्त तयांचें आलें उसळोनी !
....रशियन नी अमेरिकन, जर्मन, इंग्रजी मुलामुलींच्या शिस्तीचीं
रम्य–सुरम्य दृश्यें परदेशीय मासिकांतूनी पाहणारी शिक्षक
मंडळी ! स्वतांहि परदेशां गेलेली कांहीं कांहीं ती शिक्षक
मंडळी ! बाणलेलें ज्यां शिस्तमहत्त्व कांहीं शिक्षक स्वयं-
स्फूर्तिचे ! मिरवणूकीच्या नेत्यांत होतो भरणा त्यांचा बहू
मोलाचा !....अनेक चित्रें पाहणारे ही, तसे वर्णनें वाचणा-
रेही शिक्षक तसे आजूबाजूला पौरजनही पुष्कळ होते !
जोराचा जैसा पाऊस होता कळवळा होता तैसा जोराचा!
....पण शिस्तीचें महत्त्व होतें साऱ्या जणांना !—त्यांना वाटलें!
काय वाटलें ! तशा शिस्तीचीं भारत भूचीं नाहींत मुलें काय
आपुल्या ! आमुच्या येथें शिस्त नसाया काय हो, झालें ! झालें
हो काय? तींहि माणसें आम्ही माणसें! शक्य जें त्यांना शक्य तें
आम्हां, मात्र पाहिजे चांगल्याचा तो जिवंत अभिमान जागृत!
भिजूं द्या मुलें कांहीं वेळ तीं असा प्रसंग कधीं यायाचा !
..दुबळा एक आला विचार ! ‘कार्यक्रम हा रद्द करावा !

पण. . . पण हें काम कोणाचें? स्वतंत्रदिनमहोत्सवाच्या
मंडळाच्या या आदेशापरी ठरला होता रेंखीव सारा कार्यक्रम
हा! तैसा चालला! रद्द करावा कोणी तो येथें विचार आला,
तसा तो गेला क्षणीं उडोनी! शिस्तीचें मोल आलें धावोनी
राष्ट्रीयमोल अशा शिस्तीचें उचंबळोनी आणी मनीषा!
आणीक पहा! स्वातंत्र्यमहोत्सवआनंद! श्रावणवृष्टी
पाहे घालवूं! भारतभूच्या मुलांमुलींचा नी जनतेचा!
वृष्टीस तोंड द्याया निर्धार झालाच त्यांचा!

....इष्ट सर्वांना छत्र्या असणें, शक्यच नाहीं तें आतां पण!
थोडा पाऊस मुलां लागूं द्या विशेष काय होणार त्यानें!
छत्रीधर सारे अशक्य तर छत्रीहीन ते सत्वर करूं शक्य तें तर!
'छत्र्या मिटाव्या' आदेश झाला! कठोर शिस्त वाटे कांहींना
एकूण एक छत्र्या मिटल्या, छत्र्या मिटल्या!

....म्हणा वृष्टीनें गंमत केली बोलांफुलां कीं गांठ पडली
पर्जन्यवृष्टि क्षणीं थांबली, आश्चर्यें सारीं मनें फूललीं!
सूर्यानें डोकावून पाहिलें, चक्क ऊनही तेव्हां पडलें!
हर्ष केवढा! काय सांगावा! दाही दिशांनीं धावूनि आला!
स्वातंत्र्यमहोत्सवें जिंकीलें, असेंच सारें बोलूं लागले!
एकसूरानें महानंदानें जयजयकारें उद्घोष झाले! ! !

८

....सूर्यप्रकाशीं मोठ्या डौलानें, मिरवणूकी जातच होत्या;
मध्यमार्गांत क्रीडांगणाच्या कांहीं वेळानें येऊं लागल्या मिरवणूकी! आणि तत्क्षणीं सूर्यप्रकाशीं त्याच डौलानें सरीचसरी
येऊं लागल्या पावसाच्या त्या! ऊनपाऊस आळीपाळीनें सुरू
जाहले त्यांतच वारा वाहूं लागला.

....श्रावणसृष्टि अविश्वासाची! म्हणावें काय आतां

तियेला ! पाऊस आला, पाऊस आला, उघडल्या त्या, मिटल्या छत्र्या, प्रथम, कांहीं शिक्षकांमाजी ! ....शिक्षकांमाजी ....शिस्त मोडली ! चूक ही झाली ! स्पष्ट बोलतों. चूक ही झाली ! हळूहळू त्या चूकींत आतां सामील झालें पुष्कळ जण ! हंशा पीकला मुलांत साऱ्या ! जरि न पिकतां अपवाद तो ! शिस्त क्षुल्लक गोष्ट हो काय ! काय हो यांना कळली नाहीं! शिस्तनिर्माते शिस्त मोडीती, आहे महान अपराध हा ! विटंबना ही थोर शिस्तीची ! मुलें नी मुली बघत होती ! पाहूं नये तें पाहात होती आणि खुशाल हांसत होती ! उच्चाराचारा मेळ ठेवीती ! वंद्य ते होती वंद्य ते होती. त्यांची निर्मिती फार कमती ऐसें हें दृश्य दिसूं लागलें ! मोठ्यां बोलावें आतां हो कोणी पंचाईत मोठी नेत्यांना आली !

..आजारी, रोगी, दुर्बल ! त्यांची मुक्तता आहे शिस्तीस मान्य! कळवून तें पण नेत्यांना ! न हें, तर तो विश्वासघात ! पौरांना हें दृश्य फार लागलें आणि तसें तें लागायाचेंच ! आपण निर्मितों, आपुली शिस्त ! योग्य विचारांतुनि जी आली कांहिहि होवो पाळिली जावी ! व्यवहारीं हें केव्हां यायाचें ! ....अभिमानी ही शिस्तीचे कांहीं, होतेच तेथें ! वंद्य वाटलें ! सुरवातीला अगदीं पूर्वी विषमता जें त्यांनीं पाहिली अनवाणी नी छत्रीहीन तीं मुलगे–मुली त्यांना दिसतां, झटकन हो, मिटून गेल्या ओल्या चिंबही छत्र्या त्या त्यांच्या! अन् पादत्राणें पाण्यानें नेलीं वंदायासाटीं पायांपासूनी ! जागृत होतें सन्मन त्यांचें गुंगत होतें गीत आंतुनी ! सर्व हृदयीं गीत असलें, कोण म्हणेल, गुंगत नव्हतें !

....हृदयाची प्रतारणा त्या ठायीं हृदयनिष्ठा होती त्या ठायीं! काय हो होतें तेवढ्यानें तें ? निष्ठेस विचार मान्य हा नाही छोटयाछोटयाही शिस्तभंगांत शीलप्रासादा सुरूंग मोठे निष्ठा-

वंतांच्या दिव्यदृष्टीलाच दिसायाचे ते ! त्यांचें हृदय–संगीत साऱ्या हृदयीं हेंच ! कोणते गीत ! पहा तुमचे तें हो, तुम्हीच !

* * *

" पावसांत भिजती बाळें छत्री तूं उघडूं नको
छत्रींत चालतां बाळें भिजतां तूं कचरूं नको
जर उन्हांत राबति बाळे सावलींत राहूं नको
वादळांत सोडुनि त्यांना आसऱ्यास धावूं नको
तीं जिथें तिथें तूं रहा
विश्वास तया तूं महा
सर्वस्व आपुलें वहा
या मुलांमुलींच्यासाठीं, मोक्ष यांत तव शेवटी ! १

त्या लावी आणायाला, छत्र्यांची जरुरी जरी
मग खुशाल उघडी छत्री, पण करीं बोलल्यापरी !
वेळा ती आतां गेली ! आतां न छत्र धरिं शिरी
ते असंख्य डोळे तूला बघतात पहा, भिरिभिरी
आपुली
शिस्त मोडणें
व्यर्थ तें जिणें
तुवां मानावें ! हें शीला भूषण व्हावें !
ही निष्ठा असु दे तुझी ! घे चरितिं जरा काळजी ! " २

* * *

....छत्रीहीन नी जे अनवाणी, चालत होते मुलांच्या सवें थंडी–वाऱ्यांत त्या पावसांत भिजत होते मुलांमुलींसह ! 'असें पाहिजे ! असें पाहिजे ! !' शब्द घूमले वातावरणीं ! 'माणसें फार ! देव थोडेच ! ' प्रतिध्वनीहि घूमूं लागले. आदर्श झाल्या गुरुदेवांनीं उन्नत माथा केला हो, केला !

....स्वातंत्र्यदिनमहोत्सवाच्या महामंडळकार्यालयांत खण-

खणून–खणखणलें दूरध्वनीचें यंत्र तेधवां ! आणि बोललें झालेली वार्ता जशीच्या तशी! पुनः पुन्हाही होऊं लागलें असें असेंच ! चहुंबाजूंनीं एकच वार्ता !

....झाला साधक, झाला बाधक, विचार सारा महामंडळीं ! ठरलें कार्य ! ठरली वेळ ! साधायासाठीं वाटेल तें तें, दिलें पाहिजे मोल आपण ! शिस्त कळूं द्या लहानथोरां ऊनपाऊस थंडी नी वारा शके न मोडूं शिस्त आमुची ! शिस्तगुणाचें राष्ट्रीयमोल भारीच मोठें! कळूं द्या लोकां ! प्रसंग ऐसा वर्षानुवर्षांनंतर आला ! शिस्ततपस्यापरीक्षेस या निश्चयें टिकूं आपण येथें ! पण आरंभ ! आरंभ आहे ! सोय करूं या! आपण येथें वाटेल ती ती ! आदेश झणि धावोनी गेले सर्व पौरांना नी व्यापाऱ्यांना !

......असंख्य छत्र्या धावत आल्या ज्यांना नव्हत्या त्यांना मिळाल्या होत्या मिटल्या उघड्या झाल्या कारण मुलां छत्र्या लाभल्या ! हुडहुडीनें व्याकूळ झालीं, असलीं कोणीं मुलें नी मुली मिरवणूकींत दिसून आलीं, गाडींतूनी तीं वाहवूनीयां सारीं झटकन त्यांचीया घरीं पोहोंचविलीं ! गेल्या उणीवा इतरही त्या! खऱ्या शिस्तीच्या शाळासेनांच्या मिरवणूकी चालूं लागल्या !

......आकाशाखालीं काळे ते मेघ दाटच्या दाट जमूनी आले! अधिक हट्टें तयांच्या खालीं पर्जन्यधारा धावूं लागल्या ! धारांच्या खालीं एकजात त्या काळ्याकभिन्न छत्र्याच छत्र्या पर्जन्यधारा झेलूं लागल्या !

......छत्र्यांच्या खालीं भारतभूच्या स्फूर्तिचे ठेवे सैनिक तेजें यंत्रांच्यापरी आदेशावरी वाद्यांच्या गजरीं चालूं लागले ! ठेव्यांच्या खालीं पाणीच पाणी ! पाण्याच्याखालीं सुस्थिर धरणी प्यार आपुल्या भारतभूची! भारतभूती बालबालिकासेना पावलें मोठ्या प्रेमानें स्पर्शीत होती ! दाबीत होती !

१०

......ठरलें कार्य, ठरल्या वेळीं, ठरल्याक्रमें, ठरल्या स्थळीं, कांहीं फेरानें, समयज्ञशा उत्सवमहामंडळाच्या त्या अध्यक्षमहाशयांनीं तेथें भारतभूच्या भव्य निशाणाखालीं अपुल्या अतिशय त्या शांतरीतीनें स्फूर्तिभाषणें पार पडिलें ! आनंदीआनंद साऱ्यांना झाला !

....आणिक राष्ट्रगीताच्या वेळीं श्रावणवृष्टि अविश्वासाची!
जिच्यावरतीं मात जाहली ! पराभवें ती लाजून गेली !
गूपचूप ती बाजूस झाली !
राष्ट्रगीताच्या समयास ती राष्ट्रनिशाणाखालीं लवोनी
हात जोडोनी उभी राहिली ! राष्ट्रगीतही गाऊं लागली !
....वातावरणीं एकसूरानें त्रिवार तेथें घोषणा झाली !
पूर्ण स्वतंत्र भारताचा या विजय असो ! पूर्ण स्वतंत्र भारताचा या विजय असो ! पूर्ण स्वतंत्र भारताचा या विजय असो ! विजय असो !

दि. १८-९-४८

---

## : ६२ : मी प्रकाशूं शकतों!...................... [गद्य]

—मी प्रकाशूं शकतों ! मी प्रकाशूं शकतों ! कसाहि असो; मी प्रकाशूं शकतों ! तेजाविषयीं जग आतूर आहे ! त्याला प्रकाश पाहिजे; तो प्रकाश मी देऊं शकतों !

—कारण मला तपश्चर्येची आवड आहे ! मी तपस्वी आहें. तपस्येंतून दिव्यअग्निस्फुल्लिंग निघतो ! त्यानें दिवा प्रज्वलित होतो ! दिवा प्रकाश देतो. त्यानें वणवेही भडकतात ! माझी तपस्या वणव्यांकरितां नाहीं ! माझी तपस्या दिव्याच्या ज्योतीकरितां आहे ! तो दिवा माझ्या तपस्येंतून निघणाऱ्या

अग्निस्फुल्लिगानें प्रज्वलित होवो ! जगाला प्रकाश मिळो ! जगाला तेज मिळो ! जग तेजाविषयीं आतूर आहे ! तें तेज मी देऊं शकतों ! मी प्रकाशू शकतों !

* * *

—ईश्वरानें जग निर्माण केलें आहे ! त्यांत फार विविधता भरलेली आहे. जगांत कांहीं वस्तु सुंदर असतात ! जगांत कांहीं वस्तु गुणवान् असतात ! जगांत सौंदर्य आणि गुणवत्ता एकत्र क्वचित्‌च आढळतात ! गुण म्हणजेच सद्‌गुण ! !

—केवळ सौंदर्य अविनाशी नाहीं ! केवळ गुण अविनाशी आहेत ! सौंदर्य चिरंतन होण्यास गुणांची आवश्यकता आहे ! तेही गुण सद्‌गुण पाहिजेत ! असद्‌गुण चालावयाचे नाहींत ! असद्‌गुणांचा जगाला काय उपयोग ! सद्‌गुण–दुर्गुण जगास मारक ठरतात ! जगास उपयुक्तता पाहिजे. ती सद्‌गुणांनीं येते ! सौंदर्य चिरंतन होण्यास सद्‌गुणांचीच आवश्यकता आहे ! सौंदर्ययुक्त सद्‌गुण–सद्‌गुण युक्त सौंदर्य चिरंतन होवो !

* * *

—सौंदर्यानें केवळ शोभा येते. गुणांनीं उपयुक्तता वाढते. शोभा केवळ मनोरंजन ! जगाचें जगणें गुणांवर ! जरूर गुणांची! केवळ गुण चालतील ! सौंदर्य उत्तम ! पण केवळ तें नको ! आधीं जीवन जगूं द्या ! जीवन जगल्यावर मग रंजन !

—सौंदर्यासह सद्‌गुण ! दुधांत शर्करा ! ही क्वचित् आढळणारी कपिलाषष्ठी ! नित्याच्या जीवनास दूध हवें, गोड शर्करा हवीच असें नाहीं !

* * *

—सौंदर्य दैवाधीन असतें, गुण पराक्रमसाध्य ! परावलंबनामुळें सौंदर्य त्याज्य ! स्वावलंबनामुळें गुण पूज्य ! ही तेवणारी सोन्याची सुंदर समई आहे! ही तेवणारी मातीची सुंदर पणती

आहे ! पणतीला कुरूप म्हणणारे खुशाल म्हणोत ! ज्योतिविना दोघींची किंमत एकच ! सुंदर सोनेंही मृत्तिकेसमान ! तेजाविना समई पणतींचा उपयोग नाहीं !

—जीवन तेजावर जगतें ! सुवर्ण–मृत्तिकांच्या साधनांवर नव्हें ! नुसतीं साधनें अडगळ ! सुवर्ण–मृत्तिका चेतनाशून्य ! तेवती ज्योति चेतनामय ! सत्यशिवाची ! निष्प्रभ सुंदर सुवर्णाची समई मातीच्या पणती समान ! कुरूप म्हणाऱ्यांनो कुरूपता नको ! कबूल ! पण नुसतें सौंदर्य ही नको ! !

* * *

—मला माती निर्माण करतां येत नाहीं ! मला सुवर्ण निर्माण करतां येत नाहीं ! तें काम जग निर्माण करणाऱ्याचें ! त्यानेंच मानव केला ! मानवानें तपस्या केली ! मानवानें समई केली–पणती केली ! मानवाची तपस्या उपयुक्त ठरली !

—तो परमेश्वर दयासागर आहे ! तो मानव निर्मितो ! त्याला अयाचित समर्थता देतो ! त्यामुळें तो सामर्थ्यसंपन्न होतो ! सामर्थ्यांतूनच प्रकाश ! मी मानव आहें ! मला ईश्वरानेंच निर्माण केलें ! त्यानेंच मला सामर्थ्य दिलें त्यामुळें तपस्या झाली ! म्हणून प्रकाश आला, हा तपस्येचा प्रभाव ! मीच प्रकाशूं शकतों ! माझी तपस्या नी तपस्येचा प्रकाश ! मी तपस्येनें प्रकाश देऊं शकतों ! मी प्रकाशूं शकतों !

* * *

—माझें योजना चातुर्य सौंदर्याचीं उपयुक्त पण सुंदर पात्रें बनवितें ! प्रबल इच्छा हें दिव्य तेल ! सद्‌गुणांच्या तंतूंचें अभंग सूत्र ! दीर्घ तपस्येनें केलेलें हें सूत्र ! प्रबल इच्छेच्या तेला–सह सद्‌गुणांच्या अभंग सूत्राची ही वात मी त्या पात्रांत ठेवतों ! तपस्येंतूनच अग्निस्फुल्लिंग निघतो ! त्यानें वातीला ज्योत येते ! त्यानें दिवा प्रज्वलित होतो !

--तो दिवा प्रकाश देतो, जीवन जगवितो, जागवितो !
जगाला प्रकाश मिळाला ! कोणी घेवो पणतीच्या दिव्याचा प्रकाश कोणी घेवो सुवर्ण-समईच्या दिव्याचा प्रकाश ! प्रकाश एकच ! सत्य शिव सुंदर !

—उपाधिनिरपेक्ष प्रभा मी देऊं शकतों ! जीवनास प्रकाश अवश्य ! जग केवळ प्रकाश बघतें ! सुवर्णमृत्तिकापात्रें साधनापुरतींच ! जगास प्रकाश पाहिजे ! तो मिळाला ! हाच खरा आनंद ! हीच माझ्या तपस्येची गोड इतिकर्तव्यता !

—मी प्रकाशूं शकतों ! मी प्रकाशूं शकतों ! कसाहि असो, मी प्रकाशूं शकतों ! कारण मी तपस्या करूं शकतों ! तपस्या तेज देतें ! जग तेजाविषयीं आतुर आहे !

—हीच तपस्या मला तेजोमान सूर्यही करूं शकेल !!!

दि. १७-१२-३९

---

## : ६३ : कोणत्याहि आमिषाचें अस्त्र तूझें मोहिनीचें....

कोणत्याही आमिषाचें अस्त्र तूझें मोहिनीचें
शिक्षणाच्या क्षेत्रिं सारें शून्य मोलें व्हावयाचें ! ॥ धृ० ॥
　　पूर्ण ऐशा सद्विचारें पाय येथें टाकलेला
　　भाग पाडी कोण येथें ! पाय मागें घ्यावयाला !
मोह नाहीं मोहवाया, लोभ नाहीं लोभवाया
क्षेत्र हें आकर्षि आम्हां यापुढें ते सर्व वाया !
　　मानवा प्रारंभ जेथें, शिक्षणा प्रारंभ तेथें
　　मानवाला अंत जेथें, शिक्षणाला अंत तेथें !
ते ऋषीही ते मुनीही साधु आचार्यादि संत
नेत देवत्वास ऐशा शिक्षणाचें स्तोत्रगात !

आजही त्या शिक्षणाचें क्षेत्र भव्योदात्त भारी
श्रेष्ठता होती ! असे ती ! ती पुढें ही राहणारी !
पीक ये मानव्य येथें शिक्षणाच्या भूवरी या
ज्या अभावीं मानवाला हो पशूता लाभती त्या
व्यक्तिनां संस्कार होती येत जन्माला जधीं त्या
शिक्षणा प्रारंभ तेथें आई–दाईपासुनीया !
कार्य आमृत्यूहि चालें व्यक्तिच्या त्या शिक्षणाचें
शिक्षणीं ये मेळ सारे चांगले सत्प्रत्ययाचे !
सद्‌गुणांचा, संत्कृतींचा सन्मती–सत्संगतींचा
दिव्य येथें हो पसारा सत्प्रपंचीं योग ज्यांचा !
कामधेनूकल्पवृक्षां जन्म लाभे सत्य येथें
निर्मितें चिंतामणी हें निर्मितें हें सच्चरित्रें !
शुद्धभव्योदात्ततेला शिक्षणीं या पूर्ण थारा
चाललेला, चालताहे, या पुढेंही चालणारा !
शुद्धभव्योदात्ततेला वावडें जें अल्पही तें
तत्क्षणीं संपर्क त्याचा दक्षता ये टाळण्यातें !

२

कांहि कोठेंही जमेना ! शिक्षणीं आम्ही न आलों
आवडीनें येथ आलों; नीतिमत्तेमाजि धालों !
लाभली जी पुण्यभूमी ! पुण्यभूमीपासुनी या
कोण आतां शक्त आहे? त्या परावृतीस द्याया !
संपदांच्या दिव्यराशी वाहितां तेथें न जाऊं
जेथ नाहीं नीतिमत्ता काय त्यांना आग लावूं !
नीतिमत्तेलागि लत्ता जी धजे देण्यास सत्ता
राजशाही त्याज्य ! तीही आणि तीची मालमत्ता !
वंद्य जेथें नीतिमत्ता तेथ होतो नम्र माथा
तेथली निर्द्रव्यताही पूज्य आम्हां जैशि माता !

३

नीतिमत्ता नित्य येथें क्षेत्र भव्योदात्त भारी
श्रेष्ठता होती; असे ती, ती पुढें ही राहणारी !
स्पर्धण्या या क्षेत्र नाहीं, धुंडितांही पृथ्वि सारी
शुद्ध भव्योदात्ततेची नित्य कांती वाढणारी !
साधनांना पद्धतींना लाभलीं स्थित्यंतरेंही
शुद्धभव्योदात्ततेच्या मात्र रूपा भंग नाहीं !
जाउनी अस्वस्थतेचा काळ आला शांततेचा
जाति तीं रानें अरण्यें काळ ये लोकाश्रयाचा !
राजसत्ता एक हातीं, नष्टुनी ये लोकहातीं
याप्रकारें शिक्षणाचीं साधनें हीं अन्य होती !
आश्रमांच्या होति शाळा आणखी विद्यापिठें तीं
शिक्षणांच्या होति संस्था धर्मसंस्थादिहि होती !
ब्रह्मविद्या रूप नाना नांदताती विस्तृतांनीं
ज्ञानविज्ञानस्वरूपीं संप्रयोजी जीवनांनीं !
पूर्ण रूंदावूनि गेल्या सर्व सीमा शिक्षणाच्या
सर्व जाती मानवांच्या घेति शक्ति जाणण्यांच्या !
रूंद झाल्या शिष्य जाती तेथ आल्या सर्व जाती
भेदभावातीतबीजें स्पष्ट झालीं त्यासभोंती !
आश्रमा 'आगत्य' तेव्हां ! शिष्यजाती हो शहाणी
आज ते 'आगत्य' लोकां! सूज्ञ होती शिक्षणांनीं !
संचही अध्यापकांचा नामभिन्नें वावरे तो;
पद्धतीभिन्नांत कामें शिक्षणाचीं चालवीतो !
कंदमूळें सर्व गेलीं क्रांति येथें ती जहाली;
सौख्यदुखें जींत तैशी वेतनांची श्रेणि आली !
थोरवी या शिक्षणाला पूर्व कालीं प्राप्त झाली
जी पुढें ही चालणारी, तीच आहे चाललेली !

ज्ञानविज्ञानीं पवित्रीं सत्क्रियांनीं गाजलेलें
शुद्ध शीला मानलेलें क्षेत्र भव्योदात्त झालें
होउं द्या स्थित्यंतरें तीं एक किंवा तीं अनेक
शुद्ध भव्योदात्ततेचें स्थान हो हो, नित्य एक!
दि. २८-९-४१

---

## : ६४ : राजकुमारांचे हो, शिक्षक........ [पादाकुलक]

राजकुमारांचे हो, शिक्षक! राजकुमारांचे हो,शिक्षक!! ॥ध्रु०॥
राजकुमारांनींही शिक्षण-पूर्वि घेतलें ऋषि-मुनिपासुन
प्रसिद्ध गुरु वा कुलगुरु म्हणुन!'
महान होते ते अध्यापक। राजकुमारांचे ते शिक्षक! १
राजकुमारांना अर्वाचिन-सद्‌गुरुपासुन मिळतें शिक्षण
आणिति गुरु तें पाश्चात्यांतुन!
प्रिय त्या परके हो, अध्यापक। राजकुमारांचे ते शिक्षक! २
अपुली वर्णी तेथें कांहीं-मुळींच लागायाची नाहीं
परी न वाटो विषण्णता ही
आपण ही हो, तर अध्यापक। राजकुमारांचे हो, शिक्षक! ३
प्रजेंत राजा विरून गेला—दरेक माणुस राजा झाला
राजकुमारच तत्सुत अपुला!
आपण त्यांचे तर अध्यापक। राजकुमारांचे हो, शिक्षक! ४
राजाबद्दल राजशाहितिल—सगळे राजे लोकशाहितिल
देति शिक्षणा संततिसद्‌बल!
सद्‌गुरु आपण त्यां अध्यापक। राजकुमारांचे हो, शिक्षक! ५
राजकुमारी-राजकुमारां-पाजाया ज्ञानामृत-धारा
भाग्य धावलें आपुल्या घरा
भाग्यवंत आपण अध्यापक। राजकुमारांचे हो, शिक्षक! ६
दि. २५-९-४८

## : ६५ :साम्राज्य मानवजगावरि शिक्षणाचें.... [व.ति.]

‘ साम्राज्य मानव जगावरि चालवाया
ये शिक्षणा अवतरोनि जगांत राया’
ही प्रार्थना उदित जैं सुमनांत झाली
त्याच्याहि पूर्वि तव मूर्ति जगांत आली ! १

“ लाभे न आश्रय मला जगतांत कोठें ?
पाळा मला दिसतसां तुम्हि फार मोठें !
मत्पालनांत तर रक्षण या जगाचें
हें आपल्याविण कुणां न कळावयाचें! २

संगोपिलें जर तुम्हीं मजला सदैव
संगोपिण्यास जग देईन शक्ति दिव्य”
स्वीकारुनी विनति तत्क्षणि शिक्षणाची
साधी यशा चतुरता बहु सज्जनाची ! ३

होतेंच आठव भले नि बुरे जगाला
शोधांत त्यांतिल समानपणा कळाला
संगोपिला तर भला नि बुरा त्यजीला
कल्याणकारि पथ जो मनुजा मिळाला ! ४

हा मूळचा मनुज दुर्बल सर्वथैव
घे रक्षणार्थ अनुकूल गुणां भरीव
‘ येथेंच शिक्षण सुरू ’ लव ये दिसून
जैसी नदी दिसतसे उगमांत सान ! ५

ओहोळ बिंदुतुनि ये बनवीति नाले
नाले मिळोनि बनवीतिहि ओघओढे
ओढे मिळोनि सरिता ! मग अंबुराशी
अल्पाल्पतेमधुनि गौरव शिक्षणासी ? ६

व्यक्तींत शिक्षण, फिरेहि कुलांकुलांत
चाले कुलांतुनि तसेंच जथ्था जथ्थ्यांत
आला समाज पुढती मग लोकसेवा
आलें विशालपण शिक्षण कार्यभावा ! ७

* * *

घेई शरीरबल मानव शिक्षणांत
होतें अवश्य तर त्यास सुरक्षणार्थ
आणी परंतु भरतें कलहास तेथ
आलें मनोबल शरीरबलासमेत ! ८

आली स्मृती, धृति, मति पुढल्याक्रमानें
प्रज्ञा प्रगल्भ घडली उपयोग-मानें
तेथेंहि कांहि अतिरेक दिसे अपायें
चित्तात्मशुद्धिबलसाह्य मनोबला ये ! ९

होतें शरीरबल केवळ पाशवी तें
तैसेंची बुद्धिबल केवळ तर्क देतें
येथें फलासी मिळतात रणेंच भारी
तैसें न केवळ मनोबल कार्यकारी ! १०

आतां शरीर, मन, बुद्धि-समन्वयानें
राहोनि कार्य करिती सुविचारमानें
सच्छील येथ वसते जनतोषकारी
येथेंच कार्य घडतें सुहितानुसारी ! ११

येथेंच दुर्जनपणा धुळिला मिळाला
येथेंच सज्जनपणा उसळोनी आला
येथेंच मानव सुसंस्कृत होत गेला
येथें सुशाश्वतसुसंस्कृतिजन्म झाला ! १२

आतां शरीरधन शोभत सौष्ठवांनीं
तेथें मनोधन विफुल्ल समुन्नतांनीं

तेथें सुबुद्धिधन होइ सतेज भारी
चित्तात्मशुद्धि घडते सुविकासकारी ! १३

* * *

याचेंच थोरपण शिक्षण-शुद्ध-गंगा
व्यापीत संसृतिजगांतिल सर्व अंगां
आतां स्वरूप खुललें विविधप्रकारें
लोकांस शिक्षण जणूं श्वसनास वारे ! १४

येतांच आश्रम तसे गुरुकूल आलें,
विद्यापिठांत ! मग शिक्षण मान्य झालें !
बागा, मळे, पिकविते सरिता शुभांगा
तैसा प्रपंच करि शिक्षण शुद्ध गंगा! १५

येई विशाल विविधास सुसूज्ञताती
आलेंच जीवन तयांत, अवश्यवृत्ती
अंतीं तरंगिणि मिळेच सरित्पतीला
तैसेंच शिक्षण सुमानवतार्णवाला! १६

जो जो ' कुणी ' शिकवितो ' दुसऱ्यास ' ' कांहीं '
तो तोच शिक्षक इथें अभिमान्य होई
विद्यार्थी तोच दुसरा ! गुरु, शिष्य झाले;
ते ज्ञान ' कांहि ' तर शिक्षणि बोलियेलें ! १७

बोलूनि बोलवुनि लीहवुनी लिहूनी
वागूनि वागवुनि चिंतुनि चिंतवूनी
हो साध्य शिक्षण भलें मिरवूनि डोलें
कायामनोमतिंतुनी व्यवहार चाले ! १८

संकोचमात्र चतुरस्र विशाल होती
जाती विकार, सुविचार सर्वेचि ऐती

जाती दुराग्रह सदाग्रह, धाव घेती
ये विन्मुखा निरव, सन्मुख हो प्रवृत्ती ! १९

* * *

विद्यापिठांत पुढती गुरुकूल गेलें
शाळाच आश्रमहि ! शिक्षण तेंच आलें
विद्यार्थि शिष्यगण त्यापरि आज आला
सत्कार्य सिद्ध असतें नित शिक्षणाला ! २०

ठेवीत दिव्य मनुजांत समुन्नतीचें
तत्वें नि सत्कृति सुसंग करावयाचें
साम्राज्य मानव जगावरि शिक्षणाचें
होतें. असेंच पुढतीहि असावयाचें ! २१

* * *

येतांच सूर्य उदया उदयाचलाला
तो दूर घालवि जसा सहजें तमाला !
आलें जसें उदयि शिक्षण मानवांत
लागेच मावळु नृशंसपणा क्षणांत ! २२

शांतीश्वरें उघडिला तिसरा स्वनेत्र
केला विकार जगतांतिल दग्धमात्र !
झाला विहार जगतांतिल बंद रम्य
एकांगि वृत्ति असली नच येथ मान्य ! २३

या शिक्षणें उघडिला तिसरा सुनेत्र
सर्वांगि उन्नति सुदक्ष तिथें पवित्र
पैलू जगीं चतुरतेस अनेक आले,
संपूर्ण ज्यांत समतोल सुसंग झाले ! २४

यानें सुमानव–कुटुंब–जथा–समाज
सद्धर्म–संस्कृति, विशाल करोनि आज

वि. ...... नों: दि: १४७

साम्राज्य मानव जगावरि निर्मियेलें
तेंही चिरंतन गुणांत सतेज केलें ! २५
प्राण्यांमधूनि मनुजांस विभिन्न केलें
मानोन्नतांतिल पथांवर त्यांस नेलें
संसार–सिधुंत सुधारस ओतियेले
सद्भूषणीं विपुल मानव भूषियेलें ! २६

* * *

साम्राज्य भूजलनिधीवरलें अपूर्ण
साम्राज्य मानवजगावरलेंच पूर्ण
एकास नाशच चिरंतनता दुजास !
साम्राज्यलाभ असला तर शिक्षणास ! २७
गेलीं लयास किति जीं उदयास आलीं
हें सत्य ! यास अपुला इतिहास वाली
साम्राज्य–जाति अविनाशि नसेच झाली
ती येथ शिक्षणपदीं अविनाश ल्याली ! २८
सेना–समूह तर सद्‌गुण शिक्षणाचे
सच्छीलवर्धनसुकोषच संपदांचे !
सत्कार्य संतत घडो व्यवहार ज्याचे
साम्राज्य सन्मनुजधर्म करावयाचें ! २९
येथें सुमंत्रिदल सज्जन शिक्षकांचें
तैसे प्रशासक तयांतिल उत्तमांचे
आबालवृद्ध सगळी जनता प्रजाच
तीला सुशील करणें व्यवहार हाच ! ३०
संशोधनें, विवरणें, नि कथा–पुराणें,
तीं लेखनें, शिकविणें, उपदेशदानें,
व्याख्यान, नाटक, सुवाचन, गीत, गाणें,
हो, लोकशिक्षण घडेच अशा तऱ्हेनें ! ३१

येथें सदाचरण, सत्कृति, लोकसेवा,
स्वल्पांत सज्जतपणाच सदा दिसावा,
ऐसे प्रकार दिसतात, सुशिक्षणानें
त्याचाच मान मिरवे सुविशेषमानें ! ३२

या लोकिं सन्मनुजधर्म करावयाचें
साम्राज्य मानव-जगावरि शिक्षणाचें,
आहे, सुमानव-जगास अवश्यतेचें
निर्बंध तोंवरि जगांत असावयाचें ! ३३

* * *

ते अज्ञ जे म्हणति शिक्षणिं भेदभाव
सत्यार्थं त्यांस मिळु द्याच मुळांत ठाव !
द्या दीर्घदर्शकसुयंत्र बघावयातें
त्यांना वरील मग संबुध सूज्ञतातें ! ३४

'शोधूं नये ऋषिकुला' म्हण काय सांगे !
साम्यांतलेच दिसती ऋषितेंत धागे
जागाच शिक्षणिं जरी असमान-भाव,
येतां न त्या ऋषिमुनींस कधींच भाव ! ३५

निर्बंधभाग तर रक्षणनीति जेथें,
जी आजही जगति पावत मान्यतेतें
होतो अयोग्य उपयोगही चांगल्याचा
त्या चांगल्यास पण दोष कसा तयाचा ? ३६

विप्रोत्तमांत गणला कविदेव वाल्हृया
झाली अविप्रललना ऋषिवर्यजाया !
कांहींच बंध नव्हते कधि शिक्षणांत
लोकिं तपें चिर-महोन्नति पावतात ! ३७

कष्टाविना न घडते, पण ती तपस्या
लाभे सवंग नच ही जमते समस्या !

आली सुसंस्कृति तियेंतुनि जी अपार
तीलाच लोकहितिं ये सुलभ–प्रसार ! ३८

विद्याप्रवाह तर धावत पाश्चिमात्यीं
निर्बंधदर्शनविरुद्ध ! विशालता ती
घ्यायाा शिरीं जग सुसज्ज विशालतेला
होतें ! असेंच ! नि असेल पुढील काला ! ३९

मोठा सुसंस्कृतिप्रसार मिळे जगाला
हें श्रेय पूर्णच असे, तर शिक्षणाला
‘ सच्छील ’ मानव–सुधर्म जगांत आला,
उत्कर्ष त्यांतिल चढे, चिरमान्यतेला ! ४०

* * *

सच्छिक्षणाजवळ दुर्मिळ दुर्जनत्व,
सच्छिक्षणाविण मिळेल न सज्जनत्व,
ऐसा स्वयंप्रभ पराक्रम शिक्षणाचा
पुण्यस्वभाव तर त्यास चिरंतनाचा ! ४१

कक्षेमधील जनसागर शिक्षणाच्या
कक्षेंत जात कधिही नच वादळाच्या
ओढील वादळ ! परी निजभाव त्याचा
‘रत्नाकरत्व’ न कधींहि त्यजावयाचा ! ४२

एकांतताहि रमणीय सुशिक्षणें ती
येते परस्पर जनांत सहानुभूती
विश्वास आदर करी रिघतां समाजीं
राखी सुशिक्षण सदा परदेश राज़ी ! ४३

प्रत्यक्ष कार्य मनुजा मिळण्याहि पूर्वीं
येथें प्रकल्पित भलें नि बुरें कळेही !
तेव्हां प्रचोदन मिळे, अनुकूल त्यास
सच्छिक्षणीं सुलभलाभ घडेच खास ! ४४

नांववरी प्रभुजिच्या सगळे सुधर्म
सच्छिक्षणास उपदेशिति पूर्णकाम !
सच्छील एकच तिथें जरि भिन्नधर्म
हट्टाग्रहोन्मुख न शिक्षणि शुद्धकर्म ! ४५
येती परोपकृतिसद्‌गुणसत्प्रवृत्ती,
ये ती सुसंस्कृतसटीककुशाग्रबुद्धि,
येतीच आत्मसुविकासकला–सुशांति,
ये संसृतींत अभिजात सुरम्यता ती ! ४६
सौंदर्यसौख्य नवनिर्मिति सत्यनिष्ठा
कार्यक्षमत्व, सुहृदत्व, विचारवत्ता
सौजन्य, सत्कृति, सुभक्ति, विशाल दृष्टि
ये शिक्षणीं तर सुशीलसमाजनीति ! ४७
इत्याद्यनेक गुण शिक्षणि धावताती,
जे जीवना नित जनां उपयुक्त होती
व्यक्ती समष्टित समष्टि तिच्याच हातीं
सद्व्यक्तितूनि करि शिक्षणसत्समष्टि ! ४८
'सोपें न हें तव चरित्र-सुगीत गाणें
मी गातसें तरि यथामति याप्रमाणें
गाण्यास अंत, नच अंत तुझ्या चरित्रा
हे शिक्षणा, तुज सुभव्यविशालवत्ता ! ४९
विश्वा प्रकाश रविचंद्र समर्पिताती
वाहे प्रभंजन, जला घन वर्षिताती,
आधारभूमि, नभ नांदत संचराया,
नांदेल तोंवरि तुझें सुचरित्र राया ! ५०

दि. १७–१०–४८

## : ६६ : संप नका करूं–संप नका हो ! [मुक्तछंद]

...संप नका करूं, संप नका हो ! कांहीं झालें तरी, केव्हां कोठेंही ! आणि कसल्याहि कारणाकरितां संप नका करूं संप नका हो ! ॥ ६९० ॥

१

....अवल हरिणी संप न करी ! जरी अर्धपोटी, तरी पाजीतांना, पाडस तान्हा चोरी ना पान्हा, असाच तीचा स्वभाव जाणा ! असे चीड कांहीं, असे त्रास कांहीं, आपुल्या टीचभर पोटासाठीं पाडसाचा राग करायाची नाहीं ! ऐसें केव्हांही व्हावयाचें नाहीं ! पाडसानें तीचें काय हो केलें ! अन्न बंद केलें ? असेंहि नाहीं ! राग जर मग त्याच्यावरतीं तीचा हो झाला ! तर ती माता–माताच नाहीं ! ....तैसा विचार तिच्या हो ध्यानीं, तिच्या हो मनीं कधीं यायाचा नाहींच नाहीं ! ...पाहून तान्हा पाडसराणा भुका–तहाना जातात विरून तिच्या स्वतांच्या ! पाडसाची चिंता अधिक जशी आपुल्या जीवाची चिंता तिजला नाहींच तशी !

२

....अवल चिमणी संप न करी ! असेल जरी अर्धपोटी वा उपवासी ती ! आधीं काळजी पिलांची करी ! आपुल्या पिल चोचींत चारा, भरविणारा वेध चिमणीला लागतो सारा, ऐसा तो तिचा स्वभाव खरा ! उगारा काठी, येऊं द्या माऊ, येऊं द्या बोका ! धडपडेल रक्षाया बाळें, प्राणांपलीकडे ! उडून जाईल, आणील दाणा पिलांच्यासाठीं, आणील पाणी, पाजील पिलां! कारण हृदय मातेचें हो तें ! स्वतांच्या तीच्या पोटाची चिंता तिची नंतर ! भूका–ताहाना हारपताती पिलांच्यापुढें ! आधीं काळजी पिलांची तिला ! आपुल्या पिलांची जशी चिंता तशी

न चिंता आपुल्या जीवाची तीज असते ! नसे चीड कांहीं नसे राग कांहीं ! छोटेंसें पोट करील हानी जीवांची मोठी माहीत तिला जीवापरीस जपते ज्याला त्याचीच हानी, कांहीं झालें तरी करीत नाहीं ! कांहीं झालें तरी नाहीं रुसाधाची पिलांच्यावर !

३

....आचार्य, सद्‌गुरु, तुम्हि पुरोहित, तुम्ही उपाध्याय, ऋषि-मुनियति-परंपरेंतील सन्मान्य आहां, तुम्हि अध्यापक तुम्ही शिक्षक ! आत्मसत्तेज आठवा तुम्ही ! शोभत नाहीं सत्तेजाला त्या ! कसली अवदशा तुम्हा आठवली ही हो संपाची !

....तत्त्वें शोधीती, तत्त्वांपरी ते आचार करिती, जैसे तत्त्वांचे प्रभू तैसे ते त्या आचारांचे प्रभु ते आचार्य ! तुम्हीच आहां ! कैसा आचार कच्च्याबच्च्यांच्या पुढें ठेवीतां ! पुढील हित सहज त्वरित जाणते तुम्ही आनुभविक म्हणूनी पूज्य तुम्हि पुरोहित,! घातुक संप-प्रथा अहिताची कैशी न दिसते ! जवळ घेणारे अध्ययनासाठीं विद्यार्थ्यांचें तुम्ही पूज्य अध्यापक उपाध्याय ना ! संपासारखी तामसी कृती अंगीकारावी, हें अध्ययनीं कैसे मानावें ? उपाध्यायांना ! ऋषि-मुनि-यति-परंपरेची पुण्याई आहे पाठिशीं तुम्हां ! तुम्ही शिक्षक, शिकविणारे थोर सद्‌गुरु ! थोर गुरुजी ! सर्व ग्रहांत गुरुग्रह तो फारच मोठा ! तुम्हीही तैसे मोठेच आहां !

....सच्चिंतनाचें, सद्विचारांचे, सदाचारांचे महान आगर तुम्ही खरोखर, सद्‌गुरु-गुरुजी आहां तुम्ही हो-तुम्हीं खरोखर ! महाजनांमाजि तुम्हीहि आहां ! पथ तुमचे अनुकरणा मानिते शुद्ध सारी जनता ! कारण आहां, तुम्हि गुरुजी !

....सच्चिंतनाचे चिंतामणी हो ! घृताची धारा, वायूची गति वा जैशी सरळ तैशा सरळ मनाचे तुम्ही थोर गुरुजी ! कसचें चिंतन कसलें आचरण लोकांच्या पुढें तुम्ही ठेवितां घोर संपाचें!

विशेषतः त्या कोवळ्या मनांच्या मुलांच्या पुढें ! ऐसें आचरण निर्घृण, दारुण ! राष्ट्रही नृशंस होइल त्यानें ! शुद्धांचें आचरण तें मोठ्या प्रमाणामध्यें अनुकरलें जात असतें !

....कल्पनाबागा पिकविणारे कल्पतरु तुम्ही ! कसली घातुक कल्पना तुम्ही मांडियेली ही घोर संपाची ! मांडीवरल्या चिल्या-पिल्यांची आणि भोवतीं वावरणाऱ्या पोरठांच्या त्या आयु-र्धनाची राखरांगोळी ही करायाची ! हो, हो तुम्हीच त्यांच्या चारित्र्याचे लौकिक पिते! लौकिक माता आहांत तुम्ही ! कोणत्या मातांनीं, कोणत्या पित्यांनीं केली होती हत्या अपुल्या पोरांची!

...म्हणाल तुम्ही संप आमुचा पोरांविरुद्ध नाहींच मुळीं ! शिकविण्याचें बंद झाल्यानें परिणाम तो निश्चित ऐसा पोरा-विरुद्ध नाहीं कां होत ! पोरांनीं सांगा काय हो, केलें ! ज्ञान-विज्ञानांच्या तृषा सहज शमविणारे जिज्ञासा–इच्छा पुरविणारे, आशा–आकांक्षा वाढविणारे अधीत विद्या–पूर्णकाम तुम्ही कामधेनु ना ! अघोरी अघोरी कामनेनें या झडपीयेलें तुम्हां संपाच्या ! यानें होणारी हानी आहे हो, आहे कायमची ! आणि कोणाची तुमच्या शिष्यांची ! त्या बालकांची ! ज्यांचा अपराध कांहींच नाहीं ऐशा लाडक्या त्या विद्यार्थ्यांची ! तरी सद्गुरो मार्ग संपाचा नका चोखाळूं ! दुःशील जैसें त्याज्य साध्वीला संप तैसा हो त्याज्य तुम्हांला !

४

...सज्ञानी तुम्ही, अज्ञानी जग, डोळे लाविते तुमच्याकडे अनुकरणाला सिद्ध जें जग ! आणि असल्या अघोरी कामीं अनुकरणें होती सहजच ! वाईटाच्या हो अनुकरणाला नाहीं उशीर ! सहजप्रवृत्ति त्यांत वावरे ! आदर्श ऐसा घातुक तुम्ही नका हो, निर्मूं ! नका हानीच्या परंपरेचा पायंडा पाडूं ! असली घातुक सहजप्रवृत्ति, संयमें टाळा ! द्यावी निवृत्ती संपापासूनी!

मानवतेची येथें उन्नति ! शिक्षकांनीं हो उन्नत प्रथा ही निर्मायाची ! कलावंतता येथेंच तुम्ही ती दावायाची !

....तुम्ही करितां हत्या मुलांची ! मुलें कोणाची तुमचीच ना ! चरित्रें त्यांचीं तुम्हीच निर्मितां; चारित्र्यांचें त्या पालनपोषण तुम्हीच करितां ! संप करोनी कार्य तुम्ही तें बंद पाडितां ! चारित्र्यांची हत्या ! मुलांच्याच त्या दिव्य शरिरांची महान हत्या ! मुलांची हत्या त्यांची हो हत्या ! कसेसेंच वाटो तुमच्या चित्ता ! ! चांगल्यांच्या हो, अनुकरणाला सहजप्रवृत्ति कधींच नाहीं; माहीत आहे, सारें तुम्हांला ! सदाचारांच्या परंपरांची प्रथा निर्माते तुम्हीच आहां ! अनुकरण हें व्हायाच्यासाठीं सत्याग्रह हो करा तुम्हीच !

....लोहाचेंही करी परीस सोनें, ऐसे परीस तुम्हीच आहां ! दुष्टप्रवृत्ति लोहापरि जरी असे कणखर ! कणखरता तीच वळवा साधुप्रवृत्ति निर्मायासाठीं ! ज्याला म्हणती जन लोखंड तेथें दिसेल त्यांना सुवर्ण ! सदाचारांच्या परंपरांचा पायंडा तुम्ही, तुम्हीच पाडा ! अनुकरण हें व्हायाच्यासाठीं कणखर व्हा ! चांगला आदर्श तुम्हीच निर्मा ! प्राप्तकर्तव्य करीत रहा, खीळ घालूनी चालता गाडा आडवूं नका ;

....आकाशाची कोणी चौकशी कधीं केली कां सांगा ! परी त्यानें कधीं वायू वाहाणें बंद न केलें ! हाणी कुठारी जो खोडावरी त्याची सावली झाड न वारी कधींही तरी ! उणें तुणें होतां प्रपंच कांहीं साध्वी परी राही एकनिष्ट ती ! नांगरठींत अडूं नका तुम्ही ! दंडावरली कर्मधुरा ती छाती काढूनी पुढेंची ओढा ! तीच करुणा निपजवील, धाव घेईल सहानुभूति चारी बाजूंनीं ! हानी टळेल ! तुमचाही योगक्षेम चालेल, तुमच्याही हो इच्छेच्यापरि ! मात्र जरा हो धीरानें घ्या ना !

५

....योगक्षेमाचा भार तुमचा स्वीकारिती जे, तुमच्या परिस्थिती-विषयीं अज्ञानी सारे आहेत ऐसें मानीतां कैसें ! कळत कां नाहीं कांहींच त्यांना ! कैशी भलतीच समजूत तुमची होऊन गेली ! त्याग तिचा तुम्ही आधीं करावा ! तेही तुमचेच ! तुम्हीहि त्यांचे !

....ऋषिमुनींच्या परंपरेंतील शिक्षक तुम्ही ! राष्ट्र आपुलें-बनविणारे कलावंत तुम्ही सन्मान्य थोर ! पूर्ण–संपूर्ण जाणीव याची आहेच त्यांना ! जरा सद्‌गुरो धीरानें घ्या–घ्या ! मोठ्या मनानें अपुल्या स्थाना निरखूनियां तुम्ही हो पहा ! कराया मोठें मन समर्थ तुम्हीच आहां !

....तुमचीं मुलें, मुलांचें राष्ट्र, राष्ट्राचे लोक लोकांचे तुम्ही ! कल्याणकारी आदर्श ठेवा मुलांच्यापुढें लोकांच्या पुढें, राष्ट्राच्या-पुढें, तुमच्यापुढें ! चैतन्यसंचार खेळवाया रे, चैतन्यदाते तुम्हीच आहां !

....तुम्ही मुलांचे, मुलें राष्ट्राचीं, राष्ट्र लोकांचें, लोक तुमचे ! कल्याणकारी आदर्श असो तुमचा त्यांना ! अपेक्षा पुरी करा राष्ट्राची ! अपेक्षा पुरी करा मुलांची ! अपेक्षा पुरी करा लोकांची ! आणि व्हायाची आपुल्यापासूनी पुरीच खरी ! आदराचा मान न याचितां घ्या त्यांच्यापासूनी ! मान येणारच विश्वास ऐसा मनिं राहूं द्या !

....होणार काय, अहो रुसूनी ! रुसून बसेल जरी ती बुद्धि ! निर्बुद्ध होतील शरीरें सारीं भ्रमिष्ट होईल प्राणी मानव ! बुद्धिच्या स्थानीं लागेल वर्णी अशी लायकी तुमचीच आहे ! तसेंच तुम्ही हृदय अहां ! रुसून बसेल हृदय जरी, संपलीं शरीरें सारींच तरी ! राष्ट्र–शरीराचे खरोखर तुम्ही हृदय बुद्धि ! मोठा अधिकार ! आहे तुमचा !

....प्रेमळ माता, प्रेमळ पिता, प्रेमळ पालक, तुम्ही मुलांचे ! सांभाळ करा आधीं मुलांचा, आधीं लोकांचा, आधीं राष्ट्राचा यांतच होईल राष्ट्राच्याकडुनी सांभाळ तुमचा !

६

....स्वतांचें पोट, स्वतांचा हक्क ! गाळूनी घाम करीति श्रम म्हणून संप समर्थनीय मानीताती, ते संप करीती ! न्याय्य मागणी त्यांची ही जरी ! तरीहि संप योग्य हो नव्हे ! पिळवणूक करिताती जे भांडवलवाले, त्यांच्याविरुद्ध म्हणूनही संप समर्थनीय नाहींच होत ! पिळवणूक करणाऱ्यां-च्यावरील वार ! वाराचा पण बसेच मार; मुलांच्यावर लोकांच्यावर! गैरसोय पण होते मुलांची आणि लोकांची आणि देशाची !

...तूमचा संप करीतो हानी प्रत्यक्ष त्यांची ! आयुष्याची हानी कधींहि नाहीं भरूनि येत ! माहीत तुम्हां ! म्हणून तुम्ही मार्ग संपाचा आधीं सोडवा ! आदर्श निराळा दावावा त्यांना! पिळवणूक वृत्ति नाहींशीं व्हावी म्हणूनी ! आणि पिळले जाऊंच नये, कोणीहि कधीं त्यांच्यापासूनी ! करावी महोन्नत सुमनें ! विश्वकर्मे हो, आपण आहां याचे तुम्हीच!

...,अन्नवस्त्र नी आश्रयस्थानों प्रत्येका पुरे-पूर मिळावीं सोय म्हणूनी अवश्य मार्ग काढावे तुम्ही, ज्यांमध्यें नाहीं मानवहानी! सज्जनतेच्या पुण्यशीलसें जान्हवीजल वाहावें त्यांच्या दोहों बाजूंनीं ! तेथेंच पिकेल समप्रवृत्ति कलाचतुर यांतिल तुम्ही, तुम्हीच आहां ! आणि राहा हो राहा तसेच ! थोर अधिकार आहेच तुमचा ! अडवणूक संपाची साथ नाहिशी होईल याच उपायें! साधासुधा हा पंथ पवित्र त्यागुनी तुम्हीं इतरांच्या त्या अनुकरणा बळी पडावें ! छे, छे योग्य हें नव्हेंच हा नव्हें ! जयांचें अनुकरण त्यांनीं करावें ऐशा पुण्यशीलांनीं थोर गुरुजींनीं

इतरांचें अनुकरण ! आणि तेंहि घातुक ऐसें करावें! नव्हें योग्य हो, योग्य हो, कधीं !

....कोठुनही घ्यावा चांगला गुण ! सुभाषित हें मान्यच येथें ! वाईट गुण थोडाहि पण कितीहि येवो चांगल्यांतूनी त्याज्यच माना आणि तत्क्षणीं !

....अज्ञानी जन चुकतातो ते, चुकण्याचा दोष त्यांचाही नाहीं ! पण तुम्हि नका मुळींच चुकूं! वळी नका पडूं तुम्ही संपाला! कारण आहां तुम्ही सज्ञानी, बरें वाईट घ्याया जाणोनी दिव्य चक्षु तर तुम्हां लागूनी आले लाभूनी ! समर्थनीय अनुकरण नाहीं आपुलें !

....अज्ञानी जन, सज्ञानी करा तुमच्या शिक्षणें जीवन त्यांचें दिव्य होऊं द्या! तैसेंच जीवन लक्ष्मीवंताचें दिव्य होऊं द्या! उपभोगाला धन सर्वांचें ऐसें वाटूं द्या! समानतेनें अंतःकरणें सारीं भरूं द्या! नांवही नको, मग संपाचें! ऐशा काळाचे तुम्ही निर्माते, तुम्हीच आहां ! परंतु संप तुमचा सद्गुरो आधींच टाळा ! आदर्श तुम्ही समाजापुढें सुंदर ठेवा !

.... सचेतन ओल्या मातीचें दिव्य मानवीजग अपुल्या पुढें ! नका या कळ्या, नका हीं फुलें, चुरडूं पायांनीं! फळांचा नाश करूं नकाहो !

...पुरते डोळे चिल्यापिल्यांनीं नाहीं उघडिले ! चालावयाची चरणीं रग नाहींच आली! स्वावलंबनाचे पाय तयांना नाहींच आले ! उडावयाला पंख अजूनी नाहीं फुटले ! आणीक तुम्ही निरपराधी कोमल-नाजूक नरडीवर नख संपाचें सज्ज द्यायाला ! शिव, शिव हें ! अघोरी कर्म ! आणी वठणीस आणावयास, पहा कोणाला ! पिळवणूक करावयाच्या विरुद्ध झटती भांडवलवाले नाहींत कोणी ऐसा लोकांना ! सत्ताधाऱ्यांना ! जनतेच्या त्या मायबापांना तुमच्या योगक्षेमाची

आहे काळजी त्यांना ! येथें राग हो विनाकारण ! आणि राग तो काढितां तुम्ही निरागस त्या शिष्यांच्यावर ! कशास कांहीं आहे कां पत्ता ! वडचाचें तेल सळसळतें वांग्यावरतीं ओतावयाला कां हो धजतां ! त्यांच्या हो, कानीं तुमची स्थिति जावी हें खरें ! अघोरी रीत संपांची परंतु नाहीं हो, बरी ! प्राप्तकर्तव्यीं रत राहातां दिसे हालाखी ! करुणा आणील मालकचित्ता भागेल सारें एवढचावर !

....अज्ञानी जन करीती संप, होतेच हानी गैरसोयीची काढीतां येते भरून सारी ! सचेतन ओल्यामातीवरति हानी न त्यांची! पण जी हानी कराल तुम्ही शिष्यगणांच्या आयुर्धनांची येत का सांगा कधीं भरोनी ! होतो नैतिक अधःपात ही हानी निराळी ! ऐसा विचार आपुल्या चित्ता यावा सद्‌गुरो ! याच करितां परोपरीनें तुम्हां कथीतों, अंतःकरणीं प्रकाश याचा शुद्ध पडूं द्या! समर्थनीय मुळींच नाहीं संप कोणता ! तुमचा त्यांतुनि मुळींच नाहीं, मुळींच नाहीं !

...शुकवाल्मीकिवरतंतूच्या, सांदीपनीच्या परंपरेंतील पुण्यशील तुम्हि आहां गुरुजी, अयाचितवृत्ति त्यांच्याचपरी ठेवावी तुम्ही, लोकशिक्षणाचें प्राप्त पवित्र कार्य आपुलें हातीं घेतलेले तडीस न्यावें, ऐशा बाण्यानें चाल ठेवितां योगक्षेमाचा भार घेणारे रघु–जनकराम–श्रीकृष्णपरंपरेंतील ज्यांनीं चालविलीं मोठीं गुरुकुलें पूर्वीच्या कालीं आपुल्या समाजीं त्यांच्या जातीचे मालकांमाजी आहेत सज्जन आजच्या काळीं दिसेल दिव्य दृश्य सुविद्य ऐसें तुम्हांला !

....नाहीं कारण, निराशा चित्ता येण्याचें काहीं! त्यागा निराशा, आतांच्या आत्तां ! ठेवाच निष्ठा !

म्हणाच आतां !. 'संपाचे उणें तुणें जें कांहीं बोलून गेलों, वागून गेलों इतिहास जमा सारें तें झालें ! क्षमा करावी !

क्षमा करावी! संपाचा स्थायीभाव हा परी आमुचा नाहीं
अध्ययन नी अध्यापन स्थायीभाव आमुचा चालूंच राही !"
म्हणाच ऐसें!
...महर्घतेच्या चढाओढींत यातनांनीं जी कमाल केली! कहरांनीं डोकीं फिरून गेलीं! अल्पस्वल्प संपभाषा निघाली ! चूक ही तरी चूक ही खरी ! क्षमा कराया तयार जाणते आहेत येथें ! ठेवाच निष्ठा ! थोर कर्तव्याची जागृत जाणीव येईल येथें स्वयंस्फूर्तीनें धावून पुढें ! ......! ठेवाच निष्ठा!
....संप नका करूं संप नको हो ! कांहीं झालें तरी केव्हां कोठेंही आणि कसल्याहि कारणाकरितां संप नका करूं संप नको हो!
दि.१९-१०-४८

## : ६७: पाठाचे अभंग................ [अभंग]

[अध्यापक-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे पाठ चालू असतात. ते निरीक्षण करणाऱ्या अध्यापकांच्या मनांत असे विचार चालणें शक्य आहेत.]

सान मोठी नर-नारी, होऊं द्या विद्यार्थी सारीं
येथें ज्ञानाचा आगम, उत्कर्षाचें जें सद्धाम
दिव्य दृष्टि येथें लाभे, मानवता जेथें शोभे
अज्ञानाचें नांव नुरे, कळे अंतर्बाह्य सारें! १
विद्यार्थी व्हा विद्यार्थी व्हा, सारेजण विद्यार्थी व्हा
ज्ञान पूर्ण कळूं द्यावें, शिकवाया सज्ज व्हावें
विद्यार्थी शिक्षक व्हावें, शिक्षक विद्यार्थी असावे
परस्परा पूरक जांती, अध्यापक नी विद्यार्थी ! २
कृषीवला भरे स्फूर्ति, सभोंवतीं पाहुनि शेती
जीव टाकी तीच्यावरतीं, चालवी तो मशागती

'मुलें पाहुनि भोंवतीं, सांगु सांगु ज्ञान किती ?'
ऐसें व्हावें गुरुजींना जोर यावा अवसाना ! ३

विचक्षणा वाढू द्यावी, विचिकित्सा चालवावी
ज्ञानगंगा खेळवावी, मानवजातीच्या वैभवीं
व्यवहारें भूषवावी, उपयुक्त सारी व्हावी
स्वर्गभूमी खालीं यावी, भूलोकाला भेटवावी ! ४

व्हावा शिक्षक बालक, व्हावा बालक शिक्षक
परस्पर एक होवो, उन्नतींत दोघे राहो
तेथें होते नव निर्मीती, तीच सजीव प्रगती
गोड फळ येतें हातीं, अभ्यासाच्या हो शेवटीं ! ५

अध्ययनें अध्यापक, होती उत्तम शिक्षक
अध्यापनें कला मिळे, कैसें शिकवावें ? कळे
अध्यापनीं न्यून कळे, अभ्यासीं जें दुरावलें
येथें प्रत्यक्षाप्रत्यक्ष ज्ञानवृद्धीचा सत्पक्ष ! ६

अध्ययनीं अध्यापनीं, प्रविणता ठेवा दोन्ही
जेथ केवळ अध्ययन, नाहीं शिक्षका भूषण
नाहीं जेथें अध्ययन, तेथें कैसें अध्यापन ?
सहज ये अध्यापन, अध्ययनाचा सद्गुण ! ७

अध्यापनाचा सद्गुण, पूर्व तयारींत पूर्ण
पाणी नाहीं विहिरींत येई कैसें पोहोऱ्यांत ?
थोर संचयाचें बळ, देतां येतें तें सढळ
तेथें यशही अढळ, आत्मविश्वासा जें मूळ ! ८

शास्त्रशुद्ध अध्ययन, शास्त्रशुद्ध अध्यापन
विद्यार्थ्यांना विद्यादान, देतें शास्त्रशुद्ध पूर्ण
शुद्धावरी शुद्ध गेलें, शास्त्ररूप दृढ झालें
शास्त्रशुद्ध ज्याचा पाया, जाणार तें नाहीं वाया ! ९

मोठे मोठे विद्यावंत, पूर्ण अभ्यासांत रत
त्यांच्या आत्मविश्वासांत, सज्जता ये ओसंडत
सावधान नाहीं जेथ, निश्चित ये तेथें घात
यश अभ्यासाचें पायीं, अनाभ्यासें यश नाहीं ! १०

विनोद्देशानें न होणें, कांहीं बोलणें वागणें
नाहींतर भडकायाचें, तारुं कोठेंही जायाचें
वृथा करूं नका शीण, कांहीं ठरविल्यावीण
बहु मोलाचे ते क्षण, उपयोजावे संपूर्ण ! ११

साऱ्या देहाचें भूषण, प्रसन्न ठेवावें आनन
जाती संतोषें भारून, पाहतां जे शिष्यगण
सुंदर तें राहो ध्यान, प्रश्न येती ज्याच्यांतून
जावीं मुलें प्रसन्नून, भेटो प्रसन्ना प्रसन्न! १२

वाट पाहताती चित्तें, कोण हर्षवी आम्हांतें
चित्तें चकोर धावती, चंद्रोदयाला बाहती
शिक्षका, तूं चंद्र होसी, बालकचित्तचकोरासी
चंद्रा, चंद्रिका वर्षू दे, मोदें चकोर नाचू दे ! १३

प्रश्नबीजें मनोहरें, अंकूरूं द्या सदुत्तरें
प्रश्न शस्त्र शिक्षकांना, ज्ञानी कराया मुलांना
अध्यापनाचें सद्‌बल, प्रश्नीं दिसावें कौशल
त्या ही अभ्यास कारण, काय न येई अभ्यासून ! १४

प्रश्न नसावे अस्पष्ट, प्रश्न नसावे धांद्रट
प्रश्न नसावे ते खट, खुंटवीतील जे वाट
गोंधळाला न द्या थारा, संदिग्धता दूर सारा
अतिव्याप्त नी अव्याप्त, होती ऐसे प्रश्न व्यर्थ ! १५

प्रश्न असावे सुस्पष्ट, आणि सुचावे झटझट
प्रश्न साधे सोपे यावे, सुविचारा जागवावे,

अचूकता वावरावी, निःसंदिग्ध धिम्मी व्हावी
कांहीं घाटणी क्रमाची, ठेवावी सत्कौशल्याची ! १६

अप्रत्यक्षा प्रत्यक्षानें, अज्ञातीं जावें ज्ञातानें
स्थूलांतून सूक्ष्में यावीं, समकेन्द्र रीत घ्यावी
सामान्यीं जा विशेषानें, व्हावें सारें व्यवहारानें
उद्गामीनें वर जावें, अवगामीनें अनुभवानें ! १७

रंजनांनीं निरीक्षणां, निरीक्षणांनीं कल्पनां
कल्पनांनीं अनुमानां कार्यकारणां चिंतनां
ऐशा आत्मविकसना, अध्यापनीं गुण गणा
असे सावधान जेथें, अध्यापनीं यश तेथें ! १८

ज्ञान मुलांचें शोधावें, नवें ज्ञान तें पेरावें
ज्ञानतृषा वाढवावी, पद्धतीनें शमवावी
सारें सांगा प्रयोगांनीं चित्रांनीं वा आकृतींनीं
संचालनीं ज्ञानेंद्रियें ठेवा शक्य त्या उपायें ! १९

ज्ञान मुलांनीं शोधावें, प्रयत्नांना विश्वासावें
शुद्ध सुसंगत व्हावें, अचूक स्पष्ट कळो यावें
शंका–कुशंका निर्धास्त, याव्या विवरा दरोबस्त
अनादर अल्पांशही, यावा कधीं न कोठें ही ! २०

साहचें अंग विक्षेपाचीं, घ्यावीं जीं जीं जरूरीचीं
सभ्य, सौम्य अविक्षिप्त, राहो व्यावहारिकांत
सहजता क्षोभवावी, आवडीला वाट द्यावी
नित्य मुलें डोलवावीं, अध्यापनीं रंगवावी ! २१

संधी आणा संवादांच्या, चर्चा, वाद, खुलाशांच्या
तेणें चैतन्य वावरे, मुलां अंगीं भरो वारें
येथें होताती आवृत्ति, ज्ञाना येते सुदृढता ती
येते प्रत्यया जागृति, प्रत्यक्षांची होता कृती ! २२

स्वतां कमीच बोलावें, आणि जास्ती बोलवावें
स्वतां कमीच लिहावें, आणि जास्ती लिहवावें
स्वतां प्रेरकच व्हावें, प्रेरणेपरि वागवावें
स्वतां आपण नाहीं कोणी, सारें करावें मुलांनीं ! २३

काय, केव्हां, किति, बोलावें, केव्हां काय किति लिहावें
बोलवावें, लिहवावें, प्रयोजावें प्रयोजवावें
चितवावें, घोषवावें, योग्य ठायीं सारें व्हावें
सारें योजून ठेवावें, पूर्व तयारींत व्हावें! २४

म्हणूं नये ऐसें कोणीं, निष्णात मी अध्यापनीं
येथें विनय सांडतो, अभिमान अंगीं येतो
अवगुण सोंगें घेती, बैसति सद्गुण पंगती
येथ सावधान धरा, उणें शोधा शिक्षकवरा ! २५

सततचा तो अभ्यास, अध्यापनीं य विकास
त्यांत नवेषणा नित्य, अध्यापकः दिसे तेथें
निष्णातींचा भ्रम चित्ती, खुंटवील सत्प्रगति
मिळवायाला पूर्णत्व, सदा चालावी खटपट ! २६

न्यून शोधा संशोधनें, न्यून टाळा प्रयत्नानें
भरघोस यश येतें, अधिकाधिक दिसे तेथें
'पूर्ण झालों' जो हें म्हणे, सांभाळिलें न्यून तेणें
पूर्ण मानवाचें जिणें, धाडसाचें हें बोलणें ! २७

* * *

वेदविद्या मुखांतली, कानामात्रासह आली
तेथें झाली जयशाली, संथापद्धति आपुली
येथें श्रद्धाबलवती, वेदकालाची हे स्थिति
विद्या-गंगा अवतरली, मुखोमुखांत वाहिली! २८

अर्थ हीन पाठांतरें संथेमाजी दोष ठरे
मुखें यंत्रें झालीं सारीं, हृदयाला मारणारीं

विद्या संरक्षणासाठीं संथेंतही रुचि होती,
सार्थ व्हाया कामा आली संथेनें जी संरक्षिली! २९
असंस्कृत संकटकाळीं, संस्कृतिपुण्याई जाणिली
जिनें विद्या सांभाळिली, तिनें संस्कृति रक्षिली
काळावरी मात केली, बुडती विद्या उद्धारीली
धन्य धन्य 'संथा' झाली, आपण पाहिजे वंदिली! ३०
कानामात्रासह सगळी, विद्या संथेनें आणिली
संथा चर्चामया झाली, विद्या हृदया भिडली
अर्था मनें आतुरलीं, नाना शास्त्रें उदया आली
चर्चा झाली जयशाली सार्थ विद्या धाविन्नली! ३१
होता श्रद्धेवर भर, खुलासा तो साक्षात्कार
गुरु-शिष्य दूर दूर, शिष्यां गुरु, परमेश्वर
संरक्षणीं मुख्य जोर विद्या आली श्रद्धेवर
संथा-देवी ब्राह्मणकालीं, चिकित्सेचें रूप आली ! ३२
येथें बुद्धि अंकूरली, श्रद्धादेवी डोळस झाली
गूढपणा गेला पार झाला खुला व्यवहार
खुले झाले अर्थ, धन, तृप्त झाला शिष्यगण
आतां गेलें दूरपण, वाटे समीपता गुण ! ३३
स्फुरणांत जन्मलेलें, सथेनें जें साठवलें
चर्चेनें तें स्पष्ट केलें, ज्ञान जगन्मान्य झालें
गुरु-शिष्यमनें भिन्न, येथें जाहली समान
संथा होतां चर्चारूप, ज्ञाना मोल ये अमूप ! ३४
संथापद्धति गाजली, तशी 'चर्चा' धन्या झाली
तिनें तर गुरुमाउली, शिष्यांमध्ये मिसळिली
गुरुशिष्य एक झाले, सृष्टि निरीक्षूं लागले
अध्यापनपद्धतीनें, व्यवहाराचें केलें लेणें ! ३५

साक्षात्कार, योगायोग, झाले क्रीडा-संप्रयोग
झालीं सारीं तीं चिंतनें प्रत्ययांचीं संशोधनें
इंद्रियादि सर्वशक्ति, राबताती ज्ञानासाठीं
सारा व्यवहारावर, गुरुशिष्य देती भर ! ३६
खेळीमेळी रूप आलें अध्यापन रम्य झालें
इंद्रिया ये संचेतन, आलें मना संविकसन
चित्तमति–संवर्धन, आत्मा दिसे तेजोगुण
आंतरबाह्य विकासाची, तिसरी क्रांति शिक्षणाची ३७
गुरुजींचे प्रेरकबल, शिष्या बनवी यत्नशील
मार्गे प्रेरक राहाती शिष्याहातें कामें होती
पूर्ण स्वावलंबी वृत्ति, मुळापासोनी चालती
संथा, चर्चा, संक्रीडन, चवथें स्वयंप्रशासन ! ३८
अध्यापनांच्या पद्धति, जगीं नांदू द्याही किती
चारांत या साऱ्या येती, साऱ्या जिवंत नांदती
एक मोलें वावरती, सुविचारें वागताती
पात्र एक भिन्न जागा, वाहण्या घे शिक्षणगंगा ! ३९
एक पद्धति उत्तम, बोलणें हें व्यर्थ श्रम
शुद्धरूपा गौरवावें, परि आहारीं न जावें
नाना शिष्यांचिया जाति, अध्यापनांमाजि येती
नानास्वभाव नानारीति, भिन्न करीति पद्धति ! ४०
अध्यापनकार्य तर, आहे सचेतनांवर
नसो तेथें अनिवार, कायम नी कणखर
तारतम्यें संयोजनें, सचेतनां द्यावीं वळणें
अधिक जें साधी हितें, अध्यापन उत्तम तें ! ४१

* * *

आकर्षवील नजर, विषय शोभो फलकावर
काढा मोत्यांपरि अक्षर, चित्रें आकृति सुंदर

सहजता, संक्षिप्तता, सुलभता नि शुद्धता
यावयाला घ्या दक्षता, साधावी त्या मौलिकता ! ४२

श्रद्धावती जोडी हातां, अनुकरणप्रियता
केलें डोळस तुम्हीं तिला, तिच्या पुरवा आकांक्षेला
निर्दोषता, प्रांजलता, अंतःस्फूर्ति, सहजता
दिसु द्यावी अध्यापितां, ऐसा ध्यास राहो चित्ता! ४३

वेळ निभावून नेणें, नकोत तीं अध्यापनें
सर्व कांहीं पाहायाचें, जें जें मुलांच्या हिताचें
सहानुभूतीनें मुलां वाटे शिक्षक आपुला
मग येतोच जिव्हाळा, यशस्विता होते गोळा! ! ४४

ज्ञानविज्ञानाचे तज्ज्ञ, तुम्ही मानसशास्त्रज्ञ
यांचा होवो उपयोग, शक्य तेथें जागोजाग
काम आहे हें घरचें, घरच्यापरी करायाचें
कशाला हें सांगायाचें, अभिजातभाव वाचें ! ४५

मुलांकडून चूकलें, मनासारिखें न झालें
तेंहि उल्हासें स्वीकारा, फार गोडीनें सुधारा
तिरस्कारा नी धिक्कारा, लेश ही न द्यावा थारा
सुधारणेचा हा खरा, मार्ग वरा ! अनुसरा ! ४६

पारितोषिक, उत्तेजन, चांगल्याला हें जीवन
सत्कर्मा हें संजीवन, घ्यावें अवश्य साधन
टाळावया अवास्तवता ठेवा साधन दक्षता
जिव्हाळ्याचे मधुबोल पाहिजे ते ते साधील ! ४७

बाह्यस्वरूप कैसें तें पाहतांच कळों येतें
आणिक सौंदर्यही त्याचें, साधा वेष वाढविते
अंतर्मन बाह्यमन, कळे भाषणावरून
अधिक सौंदर्याचीं फळें सदाचारोच्चारें कळे ! ४८

सद्‌गुरो, मन आपुलें तर सद्‌भावांचेंच माहेर
अमृताचाच सागर, सत्करणींचा रत्नाकर
वाहुं द्या तरि अमृतवाणी, वाढवी जो साधुकरणी
सत्कर्मांची रत्नखाणी, अमृतमय गोडवाणी ! ४९

दिसो करतळावरला, सगळा डोलता आवळा
घाट दाखवी आपुला, माला घातलेली गळां
वारा सज्ज श्वसनाला, जैसा पाहिजे त्या वेळां
राहोनीयां अंतःसंगा, पाणी भरो ज्ञानगंगा! ५०

जागवावें गतकाला, सूज्ञपणा यावयाला
भविष्यांतील उज्ज्वला, लावा समोर नाचायाला
विशालशी सारी सृष्टी खेळवाया राहो हातीं
सारा जगव्यवहार, मुलां दावा वारंवार ! ५१

गृहपाठ द्यावे नित्य, पाठांतर व्यवसाय
येथें ये आत्मविश्वास, वाढे अभ्यासाचा ध्यास
उपजे स्वावलंबन, होतें प्रगत विकसन
व्हावें मननचिंतन अभ्यासाची हीच खूण ! ५२

तुम्हीं केलें अध्ययन, कळवी अपुलें अध्यापन
निपजो हेंच अध्यापन, मुलांकडून अध्ययन
ज्ञानज्योती प्रज्वालुन, ज्योति वातिस द्या लावुन
अंधःकार घालवून, सारें टाका प्रकाशून ! ५३

दिनांक ९-११-४८

## :६८: दर रविवारीं ........ [साधी]

"दर रविवारीं सांगा गुरुजी
जाते कोठें आपुली स्वारी
आणि अम्हांला कधि न भेटतां
आपण आपुल्या सुटिंत घरीं !"

[ एक उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी सधन जनांच्या दारोदारीं
गरिब मुलांस्तव मदत मागते शिक्षण ज्यांचे तिच्यावरी
निर्धनवायु वाहे भंवतीं, मालवि ज्योति उडवुनि वाती,
सधन आश्रयें हातिं लागती सुदीपिका त्या कितिक घरीं!
फुकट जीवनें अमोल जाती, गरिबी नाहीं सदोष जाती;
परि न कोणी इकडे बघती, लक्ष आमुचें तिथें तरी !
दानें वर्षति भलतीयांवरी, देणारे आहेत भूवरी,
एशीं दानें अमुची स्वारी, ओढी सुपर्थी खरोखरी !

[ दुसरें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी टाळिति शाळा त्यांचीयाघरीं
पाल्यास्तव पालकांस कथिते पाल्याची त्या बहादुरी !
घरींच मुलगा शाळा म्हणते, बिसंबतें घर शाळेवर तें
पुष्कळ वेळां असेंच होतें, खरा खुलासा कळे घरीं !
पाल्य आणखी पालक यांची चौकशि सारी जरुर व्हायची
साधक बाधक पाहुनि सारें, गैरसोय करितेच दुरी !
दळणवळण राहिल हें कैसे करूं न आम्ही जर हो ऐसें
चौकशिस्तव तर अवश्य जातों कळतें वस्तुःस्थिती खरी!

[ तिसरें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी आजारी विद्यार्थ्यांच्या घरिं
वास्तपुस्त ही करिते, घेते परामर्ष ही जरूर तरी !

पालक देती सद्धन-बालक, यच्चारित्र्यां आम्ही पालक
आम्हां त्याची असे काळजी, जनक नि जननीबरोबरी !
इथें जन्मतो खरा जिव्हाळा ज्यावरि होते प्रपुष्ट शाळा
अवश्य हें तर कार्य गुरूंचें आम्ही करितों खरोखरी !
कधि कधि ऐसें दिसून येते आजाऱ्याला मदतहि नसते,
अवश्य तेथें मदतहि करिते, प्रमुक्ततेनें जरुर तरी !

[ चौथें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी जाइ न विद्याअभिरुचि त्या घरीं
विद्या अभिरुचि तिथें निर्मिते जिची जरूरी खरोखरी !
शिक्षण आम्हां कशास व्हावें ? वृथाच माथें कां पिकवावें?
अशा मतां दे उपाय नाना व्हाया समजुत परोपरी !
अमुची स्वारी तेथें जाते, साक्षरतेचा विकास करिते
नित्याच्या कामाच्यानंतर काम चालते अशापरी !
साक्षरतेचा दीप लाविते लावुनियां तेवता ठेविते
गोडी विद्येची निर्मीते, तिची जरूरी खरोखरी !

[ पांचवें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी ज्ञान कणांचा करण्या भरणा
सभां–पुराणां–कथां–प्रवचनां वेळ साधिते खास पुरी !
शक्य आपणा कधि न वाचना, कळती ऐसे विचार नाना
सहजच येतो बहुश्रुतपणा, अध्यापन जो मधुर करी !
अहो, कधिकधि अमुची स्वारी, भागघेउनी जाते रंगुनी
सभापुराणीं कथाप्रवचनीं तुम्ही एकदां याच तरी !

[ सहावें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी झाडू आणिक पाटी घेते
स्वतां झाडिते गल्ल्यारस्ते शिष्यगणांच्या बरोबरी !

अथवा जवळिल गांवीं जाते सुधारणेचें शिक्षण देते
प्रात्यक्षिक खेड्यांत चालतें नागरशिक्षण हेंच तरी !
जनसेवेचें बीज यांत तें मुलांमधें लागुनिया जातें ·
जनसेवेविण अन्य काय तें ? शिक्षण तुम्ही कथा तरी !

[ सातवें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी प्रवाससह लिस जवळ जरादुरि
खुल्या सृष्टिच्या वातावरणीं मुलां चिया हो बरोबरी !
यांत्रिकजीवनगती सारखी सृष्टि होते जिला पारखी
दिव्य चेतना ओती ती सखी, यंत्रा ये रम्यता पुरी !
सृष्टिसवें तीं समरस होती विशाल लाभे त्यांना दृष्टि
यास्तव अवश्य ऐशा सुट्टी, उपयोगीही अम्हां खरी !

[ आठवें उत्तर ]....

दररविवारीं अमुची स्वारी घेउनि दौलत कला नि कुसरी'
शाळेमध्यें देत हजेरी, सर्व अर्पिण्या शिष्य करीं !
कलांत ज्या अभिजात आवडी, घेती तीच्याभंवति ते उडी
व्यर्थ न सुट्टचा कोणी दवडी, रमती तेथें ही स्वारी !
कला मुलांमधि सहज लागती. अल्प सहाय्यें भरभर वाढति
रमताती त्या मुलांसंगतीं, अज्ञानाला ज्या वैरी !

[नववें उत्तर : रस्त्यांत !]....

[ याप्रमाणें गुरुजींच्या सुट्याही सदा गर्दीच्या असतात.
सुटींत सुद्धां आपल्या व्यवसायांत गर्क असल्याचें एक अुत्तर ! ]

" दररविवारीं सांगा गुरुजी जाते कोठें अपुली स्वारी
आणि आम्हांला कधीं न भेटतां आपण आपुल्या सुटिंत घरीं
इतरहि दिवशीं आणिक आपण फुरसतिचा ठेविला कुठें क्षण
भेटाया आपणांस म्हणुन आज गांठिलें पथावरि ! "

* * *

'नमस्कार' पण उचला पायां, पडती खेपा तुम्हांस वाया
'माफ करा' पण काम वदा या, भेट जाहली इथें वरी !
चालत चालत चला बोलुं या बोलत बोलत चला चालुं या
पाहिजेच वेळेवर जाया, धांदल अमुची सदा खरी !
क्षमा करा उचलाच पाय तर काम आपुलें वदाच भरभर
काम आपुलें होइल सत्वर शक्य मला तें असे जरी !
हें जमणारे नसे तुम्हां जर भेटायाचे असेल यावर
संध्याकाळीं नउच्यानंतर अपुलें स्वागत करूं घरीं !
दिवस सुटीचा नी कामाचा अम्हां सारखा असावयाचा
उकल करा तरि या भेटीचा निःसंकोचा धरुनि उरीं !
नित्य काल तर असे बरा पण पर्वकाल सुटिचाच बरा न
कार्यें बसतो आधिच येउन लक्ष्य जयांचें सुटीवरी ?
हौसेनें लावून घेतलीं कामें आम्ही अम्हांला भलीं
कुणिन सांगतां आम्हि काढिलीं जीं उपयोगी असती खरी
सत्कर्म जीवनसंजीवन अकर्म तर हें जीवनमरण
विकर्म किंवा येइल त्यांतुनि मानवतेच्या मुळावरी !
कर्मशून्यताक्षण ते खडतर खरा विसावा तर कार्यांतर
जीवन अमुचें यांत मनोहर हें यन आम्हां धन्य करी !
लिहाच किंवा काम चिठ्ठिवर चिठ्ठी पेटी घेइल सादर
अपुल्या कामाबद्दल सत्वर, कळेल अपुल्या सर्व घरीं !

* * *

"ठीक नमस्ते पायां उचला येतों रात्रीं भेटिस नउला
निवांत आपण तेथें असलां वदतां येइल कांहींतरी!
सत्कर्मी जे गढलेले जन होईल त्यांचें पवित्र दर्शन
तिथें जाउं द्या मन संतोषुन, तर रात्रीं येऊंच घरीं!"

दि. २०–११–४८

## : ६९ : शिक्षाविवेक.................... [अनुष्टुभ्]

१

करा शिक्षा करा शिक्षा करा शिक्षाच सांगणें
शिक्षणाचें असें अंग साधनाच्या स्वरूप तें !
करा शिक्षा करा शिक्षा करा शिक्षाच सांगणें
नसे सोपें, जसें वाटे ! मागें मोठा विचार त्या!
मानवांना नको शिक्षा, शिक्षा जी होय पाशवी
मानवांना असो शिक्षा, शिक्षा जी होय मानवी !
अंतिमोपाय ही माना अपरिहार्य कारणीं
विवेकाच्या कुशींतूनि येतां साधी सुधारणा !
विवेकाच्याविना येतां होते भारीच घातक
नाहीं सुधारणा तेथें, क्रूरतेचा विलास तो !
नको त्याचें इथें नांव बालांचें थोर तें भय
भयाची भावना जें दे, दूर जावोच तें क्षणीं !

२

विवेकाला जिथें फाटा विकार नित जागृत
नसो शिक्षा अशा हातें कांहींही होउं द्या तिथें !
शारीरिक कशीही हो, शिक्षा देणें न योग्य हो,
मनोबल कमी त्याचें शिक्षा जो करितो अशी !
रोगी मानस हो त्याचें ये ज्याला राग तत्क्षणीं
दुर्बलानें नी रोग्यानें शिक्षा करूं नये कधीं !
चीडखोर तसा हट्टी, उतावळा, असंयमी,
प्रचीति प्रत्ययांची ज्या वावड्याची नसे क्षिती !
चौकशी नी खुलाशांचें नांव नाहीं न शांतता
शिक्षार्हांच्या चरित्रांचें नाहीं ध्यान मनीं मुळीं ! --
न न्यायाची तिथें शिक्षा, दुष्टता वावरे खुली
स्वप्नीं केव्हां न येऊं द्या, कार्यांचा नाश येथ हो !

स्वतांला शिष्ट जो मानी मनोवृत्तीस पारखा
सूड ज्याचा असे जागा शिक्षा त्यानें करूं नये !
सहानुभूति नसे ज्याला दयामाया न पोंचही
खिजवी चिडवी बाला शिक्षा त्यानें करूं नये !
जसा गुन्हा तशी शिक्षा तेवढ्यापुरती असो,
द्वेष राहो न कांहींही प्रेमें येवो सुधारणा !

३

अपशब्द नको तेथें, त्यांचें नाहींच कारण
सुविचाराविना बोल शिक्षकांना न भूषण !
धैर्य येवो विनोदानें हास्यानें कलिका फुलो
प्रश्न सत्य सुगंधोनी आणोत फल दिल्गिरी !
अनाचार जरी येथें आला कांहीं कळोनिया
क्षमा तेथें पुढें यावी सुधारायास बालका !

४

'द्वाड' 'मूर्ख असे शब्द येती कर्णपथीं जया
ऐकवोनी पुनः ते ते, होई काय सुधारणा!
सुविचाराविना कांहीं नये होऊंच बोलणें
पुरें पुरें कळूं द्यावें, चूक झाली असे कुठें !
हो निवृत्ती चुकींतूनी, प्रवृत्ती शुद्धतेंत हो
उच्चाराचार यांतूनी येऊं द्यावें खरें यश !

५

राग सार्वत्रिकी यावा तो ही यावाच सात्त्विक
व्यक्तीसाठीं जरी आला बाकीचे म्हणुंद्या बरें !
होतां शिक्षा प्रसंगानें होवो नाजूकशा गुणें
घेवो ती सर्व वर्गाची प्रेमाची अनुकूलता !
अपरिहार्य ती होतां, होतां ती योग्यकारणीं
प्रेम आणील बाळांचे तेथें वाढेल आदर !

६

गुरुजींनीं स्वदेहाला घेणें शिक्षा करूनिया
आततायीपणा जाणा हास्यास्पदहि हें असे !
आपुलें हें नसें कार्य गांधी–कर्वे करोत तें
व्यावहारिक सन्मार्ग प्रेमाचा राहुं द्या मनीं !
अतिमानुषता तैशी, ती अमानुषता नको.
मानुषता असे जेथें होतसे प्रगति तिथें !

७

बंधनें नियमांचीं तीं नांदावीं कमती अती
सोपीं नी पूर्ण सोईचीं पक्षपाती नि जातिचीं !
दांडगाई नको कोठें नसावी अविवेकता
न्यायबुद्धि सदा राहो जाज्ज्वल्य तशि जागृत !
कांहीं होतां विधानें तीं डाग त्यांना न लावणें
म्हणोनी शुद्ध बुद्धीनें ठेवावें तेथ वागणें !
अल्प शिक्षाच शाळेची निर्मुद्या चांगले गुण
टळे त्यानें महाशिक्षा आयुष्यांतील पूढल्या !
क्षमा तेथें मुळीं नाहीं, कायदा कार्य चालवी
क्षमा येथें असे सिद्ध शीलाला प्रेम वाढवी !

८

थके सौम्योपचारांची, शक्ति सारी पुरी पुरी
शिक्षा तेथें करावीच खरा हट्ट पळो दुरी !
अयोग्याचरणीं बीजें नासायासी मुळांतुनी
प्रेमापोटीं असो यत्न अयशीं धाक दे यश !
स्वीकारिताति वळणें योग्य तीं कोमलांकुरें
स्वभावांचे तरू होती, वळवा योग्य त्याक्रमें !

* * *

शिक्षेला दिव्य ये अर्थ शिक्षा आहेच शिक्षण
तशी शिक्षा असो द्यावी दे जी चारित्र्यजीवन !
क्रिया व्हायाच खोडयांच्या अुपयुक्त सुशिक्षणीं
वाणीला भूषणें द्यावीं विचारास विचक्षणीं !
हट्ट येतां महाखाष्ट, ओसरे तो असें करा
अशक्याला पुरा हट्ट प्रेमोदारि बळें धरा !
न्यायेंदुशांतिचें तेज प्रेमरूपें भरो दिशा
सौजन्यजळा भरती शिक्षेच्या वादळीं असो !

दि. ३०-११-४८

---

## : ७० : भीति कोणा नको................

भीति कोणा नको कधीं कोठें वाटूं देऊं
अंकुरल्या अंकुराला कीड नको लावुं ॥ ध्रु ॥
बहरल्या उल्हासाला घेऊं द्यावी वाढ
फक्त दूर करीं तेथ आलें कांहीं आड
सहजींची निर्भयता लागूं द्यावी वाढूं ! १
बाऊ, भूत, दैत्य, बुवा, ज्यानें भिववील
कधीं न हे उच्चारावे भयदायी बोल
खोटे बंध भंवतींचे तुटून दे जाऊं ! २
बंधापलीकडील त्या दिसूं नये भाग
म्हणूनी न पाखडावी त्याजवरी आग
प्रेमादरांतून त्याला सर्व देइं पाहूं ! ३
निर्भयता निपजवी आत्मविश्वास
नवनिर्मितीस तेथें संभव खास
नको नवनिर्मितीच्या आड कधीं येऊं ! ४

भयाच्याच पोटीं येते कधीं पळापळी
नको अशी आणुं बालकाच्यावरी पाळी
भीति मूला भोंवतींची दोस्त दे होऊं ! ५
दि. २-१२-४८

---

## : ७१ : मी फिरतों मागत माधुकरी....

मी फिरतों मागत माधुकरी
देणारांच्या घरोघरीं ।। ध्रु० ।।
चौत चौत ज्या मिळत भाकरी । पांच मुलें पोसती तयांवरी
पराश्रयावर तीं जगणारीं, गरिबांची तीं बाळें सारीं
ठेविलि शिकण्या मींच घरीं ! १
लक्ष्मी होईल मला प्रसन्न । गरिबां देईन मी विद्याधन
निष्पन्न न या मनोरथांतुन, उधारि गेलें आयू उडून
मनीषा पुरी रोखि करी ! २

* * *

सेवक झालों मी शाळेचा । निश्चय केला या सत्कृतिचा
गरिब मुलांच्या या सेवेचा । पांच मुलांना शिकवायाचा
कांहि न जमलें तदा तरी ! ३
मम विद्याधन करि माधुकरी । गुरुजी झालों मी त्याच्यावरि
अनृणि व्हाया ऋणा घे शिरीं । योग न ये त्या आजवरी परि
ऋण आतां अनृणावरी ! ४
शालासेवाप्राप्ति जाहली । तोंड मिळवण्यावारी गेली
जबाबदारी मज जी आली । स्वावलंबि ती सारी झाली
सेवा प्राप्तीसहच संपली ! ५
जागृत रुखरुख अनृणतेची । सत्वर दीक्षा दे कार्याची
आहे त्याला वेळहि भरपूर । आहे इच्छाबल बलवत्तर
देतों भरपुर ऋणावरी ! ६

स्वश्रम-प्राप्ती येत जोंवरी । हातपाय चालती तोंवरी
ही पांचांची जबाबदारी । पाळिन नित मी माझिया घरीं
उमेद धरिली असें उरीं ! ७
ते माधुकरी जरी मागतिल । विद्या त्यांची कैसी होईल
भिक्षेचा न्यूनगंड येईल । उन्नतिला जी बाधा आणिल
निकाल हा अनुभवावरी ! . ८
आहे भरपुर जवळी विद्या । देतां येते हवी तशी त्या
परंतु निर्वाहास द्यावया । जवळी नाहीं कांहीं माया
भिक्षांदेहिच तूर्त वरी ! ९
दुसऱ्यासाठीं भिक्षायाचन । कमीपणाचें यांत कांहि न
श्रम अपुलें भरतींत घालुन । शिकवीतों घरिं दरिद्री जन
पुण्यकृति मी घेत शिरीं ! १०
निर्धनतेच्या त्या हालांतुन । जीवन जगलों अनुभव घेउन
वृथा न व्हावें निर्धन जीवन । आयुष्या हें मम संजीवन
असे कामगिरि अल्प जरी ! ११
आयुर्धनही निवृत्तांचें । धन देशाचें खरोखरीचें
वृथा न कधि हो जाऊं द्यावें । मला न कधि तें मानायाचें
असेल दृढता जरि शरिरीं ! १०
दि. ४-११-४८

## : ७२ : आदरगंगेच्या कावडी........

१

आदरगंगेच्या कावडी धावल्या, दारीं रिचवल्या गुरो तुझ्या
सहानुभूतीच्या फुलल्या या बागा, गुरो महाभागा तुजसाठीं
निष्कांचनतेला निष्कही भेटती, निष्कते रहाती घरीं तुझ्या
प्रशस्त निवांत आश्रयाचें स्थान कर उभारून बाही तुज!

कांहि एकरांची उत्तम सुपीक, भूमि तुज एक आहे तेथ.
आरोग्यसाधनें सेवेसी तुझीया, सिद्ध गुरुराया विनामूल्य !
विनम्रसज्जन सभोंवतीं जन, तुझा अभिमान जागा जेथ !
निःशेष अज्ञान जावें घालवाया, बल तुझ्या पायां गुरो यावें
एकाग्र मनानें तेथें वावरोनी, शहाणें करोनी सोडी जन
योगक्षेम तेथें बहरून आला, कमी काय बोला आपण तें !

२

शेतकामकरी तैसा धारकरी, तैसा शीलकरी आहेस तूं
शिक्षणांत आहे खरें संरक्षण, रक्षण शिक्षण एकरूप !
ऐशी सत्कल्पना रुजली जगांत, भाग्या नाहीं अंत गुरो तुझ्या
रम्य काळ आहे, मोठा तुजपुढें, धावे तुझ्याकडे सारें जग !
विलोभनासाठीं कांहीं न करीं तूं उच्च तुझे हेतु शुद्ध राहो.
सेवा जनतेची करावी सदैव, तुज हें भूषण चिरंतन !
ठेवूनियां श्रद्धा सत्कर्मावरतीं, आचार सद्वृत्ती तैसी राहो
निश्चित घ्यायाचें सत्फल सत्कर्म, भोगाया उत्तम तूंच तेथ
गेली ग्रहदशा अवहेलनांची, उच्चोच्चग्रहांची युती आज
खरा जाहलेला आतां भाग्योदय, ज्ञानाचा उदय करी आतां
शालामहाशाला ग्राममहाग्राम म्हणायाचें काम नाहीं आतां
आतां चोहींकडे मेघ वैभवाचा, सदा वर्षायाचा समानत्वें
अज्ञान जनांचें जावें हीच आतां, हृदयांत चिंता तुझ्या राहो
तृषा ज्या ज्ञानाची जन ते सभोंती, सज्ञानसुशांति देई त्यांना !

दि. २०-२१-४८

---

## : ७३ : सावधानतेचा देत हा इषारा.......

अवश्य स्वीकारा नाविन्याचा वारा नव निर्मितीला प्रकाश देणारा
तेथ दुराचारा देउं नये थारा, विषाचश्रा प्रयोगा मानूं नये प्यारा
सावधानतेचा देत हा इषारा ॥ धृ० ॥

१

तत्त्वत: शुद्ध असेलहि सारें, तुझ्या दृष्टिचा तो नवीनपणा रे
चुकीचें तयांत कांहींच नाहीं रे, पसंत न केले परि व्यवहारें !
नांवावर तेथें नाविन्याच्या कांहीं, अपप्रचारांना आणायाचें नाहीं
निर्धार जो योग्य होऊनिया गेला, श्रद्धेनें पूर्ण तो पाहिजे पाळीला
कोंवळीं मनें तीं मानिताति तुला, भूलतील तूझ्या नवीनपणाला
पक्व झाल्यावर हसतील ज्याला, ऐशीं नको कृत्यें कधीं व्हावयाला
जेथें दुराचारा प्रतिबंध झाला, थारा नच देईं त्यांच्या संभवाला
गूढ सौजन्याची नितांत माधुरी, निष्कलंक ठेवीं त्यांतील चातुरी

२

मनोरंजनींही नको अनाचार, हौस ती घडीची करीलहि घर
वाईट संवय होतां अनावर, व्यर्थ उपचार तेथ अनिवार !
अनाचारितेची प्रचीति न पाहीं अशा नाविन्याला प्रतिष्ठा न देईं
टाळिती घातुक व्यवहारी जन, तेथें हो मर्मज्ञ ! तेंही रे नाविन्य
नवीन म्हणोनी धिक्कारतरंग नवीन येतां ती भरविण्या रंग
परिणाम त्याचा जनां भोंवलेला, कसा असायाचा प्रभाव निराळा
जयांच्याकरीतां खटाटोप केला, त्यांनीं धिक्कारिलें अपप्रचाराला
मनांत म्हणती मोठ्यानें न बोला, चांगलें घेवोनी त्यागा वाईटाला

३

सज्जनांच्या मौनीं तुझा हर्ष वाढे तुज नवीनता मग करी वेडें
यांत कांहीं नाहीं नवीन परंतु, कळून द्यायाला सिद्ध होईं तें तूं
सज्जन म्हणती ज्याला अनाचार, अदूरदृष्टीचा तव नवाचार
नाविन्यामधोनी गाळीं तूं तयास, तेथ कार्य हानी नाहीं कांहीं खास
नाहींच नडलें ज्याच्याविण कांहीं जेथ घातबीज दिसोनिया येई
टाकाऊ ठरले प्रयोगांत जेंहि करण्यांत तें तें पुरुषार्थ नाहीं !
क्षेत्रें उच्च थोर आहेत विस्तृत नाविन्यें भरलीं लक्ष घाल तेथ
ज्याविण नडला जगात्रा उत्कर्ष गुरुराज त्यांचा घेई परामर्ष !

४

नको नटपणीं नको धीटपणीं नको तें स्वप्नींही शिष्ट ज्यां न मानी
नाविन्याचा ध्यास अवश्य ठेवीं तूं, असभ्य तयांत नसावें परंतु
ज्वालाग्राही ओतूं नको राखेवरी राखही पेटाया तिथेंवल भारी
लोहफळीचीही करील चाळणी तेजाब पहावा तीवर ओतूनी
नको धूम्रपान नको नशापाणी शृंगारकरणी दिसो न लोचनीं
क्षण मौज हानी आणील धावोनी मानवो न तूला नजें स्वसंतांनीं
पशुत्वांतुनीया जाऊं उच्चांकडे दिव्य ही मनीषा करो तूज वेडें
कार्य थोर हेंच आणि आवश्यक सन्मानवतेचा तरी हो साधक !

५

मातापिताजींच्या गृहिणीआप्तांच्या स्वतांच्याचतूझ्या मुलांच्या
मुलींच्यासमक्ष! आचारा तुज जो संकोच पोंच तोबाहेरी ठेवावा तूं
तोच! पिता चारित्र्यांचा शाळांतीलतूंच शिष्यशिष्यिणी हे बंधुभ-
गिनीच! होऊं दे मुलाचा खेळ निःसंकोच शुद्ध भाव तेथें वाढावा
तसाच! विक्रम यामधें दाखीव तूं कांहीं जरूरच याची अपेक्षा
तशी ही ! पूरवावी ती तें सामर्थ्य तुलाही सोज्ज्वल कृती ती
तुवां चालवावी जरी न विक्रम तुज करायाचे मोल काय बोल
स्वस्थ वसायाचें उपद्व्याप येती म्हणतां नवीन नाकीं नव येती
निस्तारितां कोण !

६

विक्षिप्त आणिलें नवीनपणाला तुवां विटंबीलें शुद्ध पावित्र्याला
विक्षिप्तता त्यांना कळोनियां येतां विरोधी येईल तेथ गुणवत्ता
त्याज्य जें संसारीं तें न ते घेतील शुद्धाचार सारे शुद्ध राखतील
दुर्गुणांच्या पीका सहज लागण वेडीवाढ त्याला येत ही दिसून!
सहजपणीं सद्गुणीं दुर्मिळता तपस्येंत येतें सद्गुणसुवत्ता
शहाणपणा या काळ हा आणील विटंबिलें जें तें उज्ज्वल होईल!
अशी दूर दूर नजर तूं ठेवीं सुयश घ्यावया पुढें येई-येई
सुचत तुला हें नाहीं ऐसें नाहीं भ्रमांत उमज परि नष्ट होई !

७

उत्तमउत्तमउत्तमांचें घेणें हींच आपणाला स्फूर्तींचीं ठिकाणें
उत्तमांचीं लेणीं सामान्य आपणां आत्मविश्वासाची भूषणेंच जाणा
अनुत्तम कांहीं उत्तमीं असणें तींच अनायासें धोक्याचीं निशाणें
टाळायाचें काय कळे आपणांला भाग्यच अपुल्या विशुद्धपणाला
उत्तमांचें घ्यावें उत्तम उत्तम टाळावें तयांचें जें जें अनुत्तम
सांगितलें येथ रहस्य प्रथेचें जागरूकतेनें तसें पाळायचें !
उन्मार्ग रोधोनी सन्मार्ग वाढावे कलावंततेला अशा मिरवावें
तुझ्या सर्वस्वाला यांतच वेंचावें जीविताचें कार्य तुवां हें मानावें

८

उच्चानुकरणें नाहींत व्हायाचीं होतेंच चलती अधमगुणांची
नको तें कधींही नाहीं टळायचें हवें तें कधींहि नाहींच यायाचें!
वाईट तयाला जाणून टाळून अनूकूल त्याला आणीं आवर्जुन यांतच
येऊं दे चारित्र्य निर्मून यांतच मानव जाऊं दे शोभून अनुकर-
णाला सज्ज वातावरण सद्भाव तयांत टाकीं तूं पेरून नित्य
त्यांत राहो नाविन्याच्या बाणा शोभूंद्या आमुचा शीलदेवराणा
थोर थोर कला समाजांमधील त्यांत तूं ओतावें संपूर्ण सुशील
महान हें कार्य तुझीयापुढील तुझ्या सत्कृतीला चढूं देइं मोल !
दि.२९–१२–४८

---

## : ७४ : काम तुला सांगायाची नको वाट पाहूं !....

काम तुला सांगायाची नको वाट पाहूं
नको नेमलेलें केल्यावीण स्वस्थ राहूं !
स्वयंप्रेरणा दे तुझ्या नसांतुनि वाहूं ! ॥६६०॥

* * *

तुला काम करण्यासाठीं कुणी बाहतील
तुला आदराच्या माला कुणी घालतील
नको आदराच्या ऐशा अपेक्षेस वाहूं ! १
तुझें काम कल्याणाचें जरी समाजाच्या
असो तुला निर्भयता ती पुढाकारि त्याच्या
समाजांत मिसळायाला देइं धीर धावूं! २
तुझें कळायचें आधीं जरि न तें महत्त्व
कार्यसिद्धि दाविल तुझें प्रभावी सुसत्व
तरी निश्चयें तूं लागे पुढें पुढें जाऊं ! ३
आपल्या न कोणी येती पुढें गौरवाला
निरुत्साह म्हणुनि तूझ्या शिवो नत्र मनाला
आणि नको टाळायाला पिछाडीस घेऊं ! ४
तुझ्या सारखे जन त्यांना कार्य प्रेरणारे
काय करायावें ! केव्हां ! नसति जाणणारे
तुझें स्थान आघाडीचें नको रितें ठेवूं ! ५
पुढें जाइं आघाडीला भरीं शुद्ध पाया
दिसूं दे न ! कार्य न जातें तुझें कांहि वाया
दिव्य मंदिरें त्यावरतीं जाउं दे उभारूं ! ६
उपस्थिति तुझी तर तेथें अवश्य असावी
तुझी पात्रता तर आधीं तिथें सिद्ध व्हावी
नये चुकारीचा तूझ्या शिरीं दोष येऊं ! ७
दैन्यदुःख नाशी, आणी उन्नतीस काम
तेंच तुझ्या आयुष्याचें असो शांतिधाम
दैन्य–दुःखि असतां कोणी सुखीं नको लोळूं ! ८
कार्य चालुं ज्याचें आहे सदा तो जिवंत
कार्य चालूं ज्याचें नाहीं ! नसे तो जिवंत
चरंजीव व्हाया ! तूझें कार्य देइं चालूं ! ९

चिरंजीवतेची तूला नसे जरि जरूरी
परी तुझ्या सत्कर्माची जगाला जरूरी
तसें शक्य तूला तें दे अनाहूत होऊं ! १०

दि. २६–११–४८

---

## :७५: निर्मितीचें मम चीज असें झालें ! .... [दिंडी]

तुला देतों, कापूस तुझ्यापाशीं
कापसाचें वस्त्र तूं विणीतोसी;
तुला देतों लांकडें, दगड, माती
करिसि त्यांचीं सुंदरें मंदिरें तीं ! १

दिलें पाणी; योजिसी जीवनास
वन्हि देतां; केलास, त्यास दास
अन्न देतां पक्वान्न करीतोसी;
ओषधींचीं औषधें निर्मितोसी ! २

तुला देतों, माणूस तुझ्यापाशीं
माणसाचा देव त्या करीतोसी;
तुला केलें मीं; मला तुवां केलें;
निर्मितीचें मम चीज असें झालें ! ३

अरण्यांचीं उपवनें महा होतीं,
माळरानावरि पुरें जन्मतातीं;
अरे, सृष्टि सुंदरा सर्वव्यापी
सदा होते ती उन्नत-स्वरूपीं ! ४

शक्ति ज्याच्या सृष्टींत पेरियेल्या
जाणुनी त्या तूं रम्यरूप केल्या;
यांत माझा जाणसी, पूर्ण हेतू
म्हणुनि माझा प्रतिनिधी शोभसी तूं ! ५

तवागमनें सद्वृत्ति पोसताती,
नको त्या त्या दुर्वृत्ती नष्ट होती;
जागृतीच्या संस्कृती जन्म घेती,
अशीं कार्यें तव करें नित्य होती ! ६
करायाचा भूलोकचाच स्वर्ग
यत्न माझा जाहला, तव विभाग
कार्य माझें हालकें असें झालें;
तुला निर्मुनि, मम चीज तुंवा केलें ! ७
दि. २०-२-४९

---

## :७६: प्रवेश मिळूं दे ........

प्रवेश मिळूं दे निर्मळ त्या क्षेत्रीं
अभिमानमूर्ती शिरीं घे धरित्री ! ॥ ध्रु० ॥
कर्तव्याची जेथें स्वयंभू जागृती
सहकारी जेथें सह अनुभूति
ज्ञानविज्ञानीं ये क्रियावंतता ती
प्रसन्न चित्तानें वावरे प्रचीति
संक्रीडनीं जेथें सहज ये रीती ! १
विशाल विलासी स्वतंत्रता हो ती
जोपासल्या जाती गुणशक्तिजाति
सोज्ज्वल डोलते जेथ स्वयंस्फूर्ती
नीत झळकते नूतन निर्मीती
व्यक्त संवृद्धि ये सुप्त अंकूरां ती ! २
तीव्र होत जाती इंद्रियसंशक्ती
जयांच्या संक्रीडा उपयुक्त होती
विविधगुणांच्या पल्लवफुलांनीं

अंतरंगजाती नीत वहरती
वसंताची जेथ ऐशी दिव्यकांती ! ३
संमेलनीं जेथें गुणवृत्ति जाती
नाना कंठ गाती विविध संगीतीं
प्रहर्षूनी हर्षा नृत्या ये प्रवृत्ती
रंजनांत नाना ज्ञानानंद होती
सर्वोत्तमतेला जेथ निश्चिती ती ! ४

दि. २५-२-४९

---

## :७७: मॉंटेसरी-गौरव ........ [ दिण्डी ]

[ यांनीं पुण्यपुरीस नुकतीच भेट दिली होती. ]

वयें वाया चाललेलीं मुलांचीं
दाविलीं तीं तुम्हि फार महत्त्वाचीं
स्वयंशासन त्यामधें निर्मियेलें,
बालकांचें सामर्थ्य खुलें केलें ! १
असति बाळें जन्मतः क्रियाशील
हेतुता दे दिव्यता त्या अमोल !
जाणलें नच ! जाणलेल्यापरीस
दिसे तेथें सुप्रभव दिव्यतेस ! २
मुलां स्वातंत्र्यामधें रंगवीलें
स्वयंभावा भरपूर भाव आले !
शिक्षणाला सत्क्रियावंत केलें
मनोरंजन रंगून ज्यांत गेलें ! ३
क्रिया साऱ्या व्यवहारमान्य होती,
इंद्रियांची सूक्ष्मता वाढवीती !
जागुनीया सत्स्वयंप्रेरणांना
स्वयंगतिनीं धाव ये विकासांना ! ४

शिक्षणाचा धर्म हा प्रत्ययांचा
खरा केला उत्कृष्टशा प्रतीचा
मानवांना सत्पदा न्यावयाला
सुलभतेला सन्मान भेटवीला ! ५

रुसो, पेस्टालॉझि फरोबेल यांसी
दिव्यदृष्टि लाभली ! तुम्हां तैशी !
रुक्ष म्हणती क्षेत्र हें शिक्षणाचें
तुम्हीं केलें आनंदभुवन त्याचें ! ६

तपस्येचें तेज मॉन्टेसरीचें
भारतीं घे रूप मातेश्वरीचें
गिजूभाई हे प्रणेते तयाचे
कार्य त्यांचें आपुल्या गौरवाचें ७

अर्पिती जे चारित्र्य बालकांना
तयां देतां चारित्र्य गुणी नाना
म्हणुनि तुम्ही शिक्षिका-शिक्षकांना
देवता कीं सत्पात्र, वंदनांना ! ८

फला आलेली ऋषींची तपस्या
सर्व कल्याणांतली जिची दीक्षा !
मूर्त मॉंटेसरिरूपि ती पहातों
सत्य अमुचा अभिमान धन्य होतो ! ९

पाहुनीया रक्षिलें ज्ञान कोणी
कुणीं नेलें जीवनीं रंगवोनी !
अशा माना साधिती समावेश
आदरा ते आदर्श गुण-गणेश ! १०

बघुनि युष्मन्सन्महादिव्यकार्य
नित्य झालेलें जगा शिरोधार्य !



बालमानसशास्त्राच्या अधिदेवता

**मदाम मॉटेसरी**


गाँधीजी
मूर्तिमंत मूलोद्योग

सिद्ध झालों आपुल्या पूजनाला
त्याकरीतां अर्पितों गीत–माला !

दि. १३–२–४९

---

## :७८: घे श्रेय संचेतनीं ........ [सुनीत]

थैमानास रिकामटच्या मनि खड्या दुर्वृत्ति कैदासिणी
तेथें ही सहजप्रवृत्ति ! जिचिया पोटीं सदा आपदा
उद्योगी सुमनांत नांदति तदा सद्वृत्तिसौदामिनी
तेथें ही सहजप्रवृत्ति जिचिया पोटीं गुणी संपदा !
दुर्वृत्ती पिकती विनाश्रम जगीं वेडींच त्यांचीं पिकें
सद्वृत्तीकरितां मशागत हवी, जोपासनाही नित !
उद्योगाप्रियता अधोगति ! वरी नाशीत सारीं सुखें
उद्योगप्रियतेमधील असती ते मार्ग सर्वोन्नत !
प्रत्यक्षीं दिसतो तयापरिसही मोठा गुणांचा निधी
सामर्थ्यें भरला, प्रसुप्त असला, आहेच अंतर्मनीं
जो तो शोधुनि वाढवी गुणनिधी, तो हो म्हणावा सुधी
नाना निर्मित आवडी नवनव्या घे श्रेय संचेतनीं.
अर्थानर्थ जयांत वावरति ते ! त्या दक्षता ऽ दक्षता––
प्रत्यक्षीं कळवावयास असती सन्मार्ग–उन्मार्गता !
दि. ३०–३–४९

---

## :७९: व्यवहारी तें शिक्षण केलें........

ज्ञान शोधुनी त्याचें रक्षण ऋषि–मुनिनीं केलें,
तेंच कार्य तर आणि तयांचें नित्याचें झालें !
जनाभिमुख तें ज्ञान कराया पंडित गुरु आले
ज्ञानशिक्षणा विशदीकरणीं माना चढवीले !

निसर्गानुगामी शिक्षण तें केलें रूसोनें
शास्त्रशुद्धशी कला दिली त्या पेस्टालॉझीनें
क्रियाशील व्यवसायदेणग्या देई फरोबेल
प्रसुप्तबल बालांचें पटवी तो बालंबाल !
बाई माँटेसरी प्रेरिती आत्मविकासास
पार्खर्स्ट् हेलेन् महत्त्व आणी स्वयंशासनास !
अन्न, वस्त्र, आच्छादन यांची सोय पूर्ण व्हाया,
सत्य, अहिंसा, प्रेम, नीतिची मानवता याया,
स्वावलंबि जीवनोपयोगी मूलोद्योगानें
व्यवहारी तें शिक्षण केलें ! गांधीगुरुजीनें !

दिनांक ३०–१–४८

---

## : ८० : अनुकरणा भूदेवी ........ [ चंद्रकांत ]

प्रभातिं भास्कर भरूं लागतां पूर्व दिशेला रंग
प्रसन्न सृष्टि स्तवनीं त्याच्या पूर्ण होतसे दंग !
खरी अहर्निश तपा चालवी अविरत परि वसुधा ही
यद्भ्रमणांनीं प्रदक्षिणांनीं रवि उदयाला येई !
स्तवनेंस्तोत्रें तिचीं परंतू तशीं न कुणिही गाई
परंतु तीही कधीं तयास्तव मुळींच रुसली नाहीं !
सर्वसाक्षि तिज कौतुक-नयनें अनंतांतुनी पाही,
परी तपस्येविना धरेचें चित्त न कोठें कांहीं ?
निरंतराची तिची भ्रमंती अखंड चालू राही !
रसग्राहका कांहि मागणें नसे रसेला हेंही !
निष्कामी आदर्श तपस्या सत्य ! कुणींही गावी
पूजनीय ती धरती-माता, खरी जगाची आई !

क्रमांक ... ९३३० ... नां दि.

तर्पे अपुल्या स्तवनांसह तीं सत्तेनें जर यावीं
आपण अनुकरणा भूदेवी भूषणभूत गणावी !

दि. १–१०–४९

---

## : ८१ : यशःश्रेय कार्याचें सुन्दर........

बुद्धिनिष्ठता मान्य ! तीमधीं यांत्रिकता परि रुक्ष नको,
मनोनिष्ठता भोळीभाबडी नसेल तर ती सोडुं नको !
बुद्धिनिष्ठता, मनोनिष्ठता, वागूं द्या संमेळानें
व्यवहारें हें–हेंच मानिलें ! अनुभव हें सारें जाणे !
बुद्धिनिष्ठ तो हंस उडूं द्या खुशाल अस्मानांत वरी
परी आश्रया यायचाच तो अपुल्या मानससरोवरीं !
शुद्ध बुद्धि अविकारि मनाला भेटाया यायाचीच,
जिवाशिवांच्या भेटीपरि ती अमोल आनंदाचीच !
पितृगुणांचा असतो कोणी ! मातृगुणांचाही कोणी
मात्र लाभतें उभय गुणांचें संमेलन दुर्मिळांतुनी
सत्ता-अनुशासनांत जरुरी उभय गुणांची खरोखरी
यशःश्रेय कार्याचें सुंदर ! लोळण घेतें पदावरी !

—१९३३

---

## : ८२ : अभिनंदन अपुलें.... [बालमुकुन्द]

अभिनंदन अपुलें सद्गुरु शिक्षक वरा
सुजनता इथें
सुखित नांदते
सुशिक्षणाच्या घरा ! ॥ ६६० ॥

ज्या अधीत झाल्या बहुविध शिष्टाक्रिया
त्या संक्रांतीला समुन्नतें न्यावया
ये पाचारण आपणां गौरवावया
   हा मान आपला पराक्रमार्जित खरा ! १

सहकारी सेवक विशाल मन घेउनी
तुम्हि सुदक्ष मिसळा बुद्धिनिष्ठ राहुनी
शाळेस उन्नतोन्नतींत तेजाळुनी
   ओढाच यशस्वी या शाळेची धुरा ! २

गुरुदेव नाम दे सार्थतेस चातुरी
द्या शिक्षणभूला तशीच सन्माधुरी
आचार्यगुणां न्या उच्च उत्तरोत्तरीं
   आपणांस अमुची यास्तव गौरवगिरा ! ३

२

मी सतत वंदितों सद्गुरु शिक्षकवरा
      प्रकट तो असो
         प्रकट तो नसो
            जातिचा तो खरा ! ॥ ध्रु० ॥

ती वीज नांदते सकलवस्तु-अंतरीं
हरवस्तु विजेचा दिवा न होते जरी
ती गुप्त, उघडही वीज एक हो परी
   एकताच होते मात्र पात्र आदरा ! १

संस्कार तेथ अभिजात तेज विस्तरी
जरि भिन्न तेज ये दिसून भिन्नांवरी
ती वस्तु गुणांची विभिन्न मातब्बरी
   अभिजाततेस संस्कार देत आसरा ! २

बालकाहुनी जो बालक होतो स्वतां
सत्पात्रसुबंधू, प्रेमळ माता पिता
सन्मित्र, सौंगडी, आप्त, नजिक राबतां
तो इथें निर्मितो सत्य-शिवा-सुंदरा ! ३

बोलणें, चालणें, वागविणें, वागणें
सद्विचार-संगति, सौजन्याचें जिणें
मोहरूनि सद्गुण एक-अनेकहि गुणें
जो अनुकरणांना विशुद्ध गुणि मोहरा ! ४

तो असतो प्राध्यापक अध्यापक खरा
जो ज्ञानपिपासू अष्टपैलुसा हिरा
जो दैविगुणांना देत पूर्ण आसरा
जो मूर्त असे सौंदर्यप्रीतिचा झरा ! ५

हरदास, पुराणिक, पत्रकार, शाहिर
वा वक्ता, प्रवचनकर्ता, सेवक जर
तो सुदक्ष निर्मी विशाल मनमंदिर
तो उरीं बाळगो जागृतिचा पण खरा ! ६

हो वाचन, लेखन, विवाद, संभाषण,
सत्कार्य कांहि वा चिंतन, संशोधन,
तो मनोबुद्धिशरिरा दे संचालन
जो इथें जागता ठेवितसे पाहरा ! ७

त्या एक असो वा अनेक असु द्या स्थळें
क्षण एक वापरो, सततच वा तद्वलें
सत्कर्म अल्प वा होवो मोठें भलें
स्थल-कालमापनातीत मान वावरा ! ८

दि. १९-४-४९

REFBK-0007263

## : ८३ : तेजस्वी व्हा !........

तेजस्वी व्हा तुम्हि अनिवार
तुम्हां मिळाल्या तेजा दिसुं द्या अनेकविध विस्तार ! ॥ध्रु०॥
सवाइ होता कन्याबालक । पितरां तर तें महान सार्थक
महोन्नतीचें तर तें द्योतक
शिष्यांपासुनि पराजयाची तृषा गुरुंना प्यार ! १
वाढवुनी जें होतें दिधलें । तुम्हीं पाहिजे उन्नत केलें
त्यांतच अमुचें विजय साठलें
महाधन्यता यांतच आम्हां, हाच खरा उद्धार ! २
विद्यार्थि आजन्म राहिलों । खरे तरी अध्यापक झालों
पवित्रकार्यी रंगुनी गेलों
त्या कार्याचें दिसुं द्या आतां, प्रात्यक्षिक साधार ! ३

## : ८४ : जगन्नाथ ही वाट !........

जगन्नाथ ही वाट ! जगन्नाथ ही वाट ! ॥ ध्रु० ॥
नच रुळलेली नच मळलेली तण तीवरतीं दाट
आलों मी तुजकडे तियेनें दिसे मला ती नीट
तुझ्या देवळाच्या कळसाच्या अनुरोधें ये थेट
दरवाजांतुन गाभाऱ्यामधि सरळ तुझ्यापर्यंत ! १
रुळलेल्या त्या वाटांवरतीं नच मुंगीला रीघ
बळें न शिरलों ! म्हणतील मला 'चल जा येथुन नीघ'
वारी खाइल अमोल आयु, तरि न उभा मी तेथ
रूढ सोडुनी कोऱ्या मार्गे आलों धरुनी नेट ! २
दुर्वांकुर हे भक्ति अर्पिते तुजला हिरवेगार
रसाळ ते इक्षुदंड हो, हा चमत्कार साचार !
काय आणखी कसा गाउं? तव महाकृपेचा थाट
अपुरे पडतिल जी गायाला ! मजपरि अगणित भाट ! ३
दि. १०-१०-४९

[ विश्रांति ]

REFBK-0007263
REFBK-0007263